# एम.ए. इतिहास

## सत्र - II (CBCS)

## अभ्यासपत्रिका क्र. ८

## आधुनिक जगाच्या इतिहासातील मुक्ती चळवळी

**पेपर कोड - 93418**

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. रवींद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक इतिहास व प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. कृष्णा गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
एल. जे. एन. जे. महिला महाविद्यालय, विले-पार्ले (पू.), मुंबई.

: **डॉ. मनोज रविंद्रनाथ इंगोले**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव ४२५००१.

: **प्रा. तुळशीदास मोकल**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
को. ए. सो. डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हणे कला महाविद्यालय,
रोहा-रायगड-४०२१०९.

: **प्रा. युवराज मोहन मोरघा**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
के. वि. पेंढारकर महाविद्यालय,
डोंबिवली (पू.), जि. ठाणे.

**जानेवारी २०२२, प्रथम मुद्रण,**

**प्रकाशक**
**संचालक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| **१. वंशभेद** | | |
| १. | वांशिक भेदभाव | १ |
| २. | मार्टिन ल्युथर किंग आणि आफ्रो-अमेरिकन नागरी हक्क चळवळ | १३ |
| ३. | नेल्सन मंडेला आणि दक्षिण आफ्रिकेतील वंशभेद विरोधी चळवळ | २९-३६ |
| **२. लिंगभाव** | | |
| ४. | स्त्रीवादी चळवळीची पहिली लाट | ३७ |
| ५. | स्त्रीवादी चळवळीची दुसरी लाट | ५४ |
| ६. | स्त्रीवादी चळवळीची तिसरी लाट | ६५ |
| **३. जात** | | |
| ७. | जात : व्याख्या आणि अर्थ | ७९ |
| ८. | जात : परंपरा, सत्तासामर्थ्य आणि मानहानी | ८८ |
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार रामास्वामी यांची जाती विरोधी चळवळ | १०० |
| **४. वर्ग आणि जमाती** | | |
| १०. | मार्क्सवादी आणि नवमार्क्सवादी वर्गाची ओळख | ११७ |
| ११. | भारतातील कामगार चळवळीचे स्वरूप | १२६ |
| १२. | २० व्या शतकातील भारतीय आदीवासी जमाती आणि त्यांच्या संघर्षाचे स्वरूप | १३९ |


*****

## Core Paper VIII: History of Emancipatory Movements in Modern World

**Objectives:** To make students aware about social movements of the world and introducing her/him with main emancipatory movements of the modern world.

Module

**1. Race**

(a) Understanding Race and Apartheid
(b) Martin Luther King, Jr. and Afro-American Civil Rights Movements
(c) Nelson Mandela and Anti-Apartheid Movement in South Africa

**2. Gender**

(a) First Wave Feminist Movement
(b) Second Wave Feminist Movement
(c) Third Wave Feminist Movement

**3. Caste**

(a) Concept and Understandings
(b) Caste as Tradition, Power and Humiliation
(c) Anti-caste movements of Dr. B.R. Ambedkar and Periyar E.V. Ramasamy.

**4. Class and Tribe**

(a) Marxist and Neo-Marxist Understandings of Class
(b) Nature of Labour Movements in India
(c) Understandings of Tribe and Nature of Indian Tribal Struggles in the 20th Century

**References:**


- Alan B. Anderson, George W. Pickering, *Confronting the Color Line: The Broken Promise of the Civil Rights Movement in Chicago*, University of Georgia Press, 2008.
- Andrews Kenneth T., *Freedom Is a Constant Struggle: The Mississippi Civil Rights Movement and Its Legacy*, University of Chicago Press, 2004
- Callahan Nancy, *The Freedom Quilting Bee: Folk Art and the Civil Rights Movement* , University of Alabama Press, 2005
- Babbitt Susan E., Sue Campbell, (ed.) *Racism and Philosophy*, Cornell University Press, 1999
- BorseSadanand, *Mandela*, RajhansaPrakashan (Marathi)
- Carol Anderson, *Eyes off the Prize: The United Nations and the African-American Struggle for Human Rights, 1944-1955*, Cambridge University Press, 2003.
- ChakrabartyDipesh, *Rethinking Working – Class History:Bengal 1890-1940*, OUP, Delhi, 1989.
- ChandavarkarRajnarayan, *The Origins of Industrial Capitalism in India: Business Strategies and the Working Classes in Bombay 1900-1940*, Cambridge University Press, Cambridge, 1994.
- Christoph von Furer-Haimendorf, *Tribes of India, The Struggle for Survival*, Berkeley: University of California Press, 1982.
- GaikwadKishor*GhatnecheShilpakarBabasahebAmbedkar*, ShriGandharvavedaPrakashan, Pune, (Marathi)

- Gregory Steven, Roger Sanjek, (ed.) *Race*, Rutgers University Press, 1994 GuhaAmalendu, *Planter Raj to Swaraj: Freedom Struggle and Electoral Politics in Assam: 1926-1947,* ICSSR, New Delhi, 1977
- JodhkaSurender S., *Caste* (Oxford India Short Introductions), OUP, New Delhi, 2012
- Khalil Gibran Muhammad, *The Condemnation of Blackness: Race, Crime, and the Making of Modern Urban America*, Harvard University Press, 2010
- Calloway -Thomas Carolyn, Lucaites John Louis (eds), *KingMartin Luther, Jr. and the Sermonic Power of Public Discourse,* University of Alabama Press, 1993.
- Krolokke Charlotte, *Gender Communication Theories and Analyses: From Silence to Performance,* Sage, 2005.
- Kwame Anthony Appiah, *Lines of Descent: W. E. B. Du Bois and the Emergence of Identity*, Harvard University Press, 2014.
- Memmi Albert , Translated and with an introduction by Steve Martinot*Racism*, University of Minnesota Press, 1999
- Mills Charles W., *Blackness Visible: Essays on Philosophy and Race*,Cornell University Press, 1998
- Mills Charles W., *The Racial Contract*, Cornell University Press, 1997 Mitchell W.J.T., *Seeing Through Race*, Harvard University Press, 2012
- Morning Ann, *The Nature of Race: How Scientists Think and Teach about Human Difference*, University of California Press, 2011
- Murray Pauli, *States' Laws on Race and Color*, University of Georgia Press, 1996. O'Malley Michael, *Face Value: The Entwined Histories of Money and Race in America*, University of Chicago Press, 2012
- Parfitt Tudor, *Black Jews in Africa and the Americas*, Harvard University Press, 2013 PathyJagannath, *Tribal Peasantry: Dynamics of Development*, Inter-India, New Delhi, 1984
- Paul Alkebulan, *Survival Pending Revolution: The History of the Black Panther Party*, University of Alabama Press, 2007
- Purdue Theda, *Race and the Atlanta Cotton States Exposition of 1895*, University of Georgia Press, 2010
- R. Bentley Anderson, *Black, White, and Catholic: New Orleans Interracialism, 1947- 1956*, Vanderbilt University Press, 2005
- SarkarSumit ,*Modern India 1885-1947,* Macmillan Madras, 1985
- ShethFalguni A., *Toward a Political Philosophy of Race*, State University of New York Press, 2009
- Smith Mark M., *How Race Is Made: Slavery, Segregation, and the Senses*, University of North Carolina Press, 2006
- Smith Michael Peter, Feagin Joe R., (ed.) *The Bubbling Cauldron: Race, Ethnicity, and the Urban Crisis*, University of Minnesota Press, 1995.
- Spears Arthur K., (ed.) *Race and Ideology: Language, Symbolism, and Popular Culture*, Wayne State University Press,1999.
- Tom Bottomorel (ed.), *A Dictionary of Marxist Thoughts*, Blackwell Publication, 1985 XaxaVirginius, *State, Society and Tribes: Issues in Post-Colonial India*, Pearson Longoman, Delhi, 2008.


*****

# १

# वांशिक भेदभाव

**घटक रचना**


१.० उद्दिष्टये

१.१ प्रस्तावना

१.२ वांशिक भेदभाव म्हणजे काय ?

१.३ वांशिक भेदभावाची पार्श्वभूमी

१.४ वांशिक भेदभावाचा उगम

१.५ वांशिक भेदभावला अनुसरून लादण्यात आलेली बंधने

१.६ वांशिक भेदभावाबाबतचे अधिकृत धोरण

१.७ वांशिक भेदभाव धोरणास आफ्रिकेमधील विरोध

१.८ वांशिक भेदभाव धोरणास जागतिक स्तरावरील विरोध

१.९ वांशिक भेदभाव समाप्ती

१.१० सारांश

१.११ प्रश्न

१.१२ संदर्भ


## १.० उद्दिष्टये

१. वांशिक भेदभाव संकल्पना समजून घेणे.

२. वांशिक भेदभाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३. वांशिक भेदभावाची बंधने काय होती ती समजून घेणे.

४. वांशिक भेदभावाच्या अधिकृत धोरणाबाबतची माहिती जाणून घेणे .

५. वांशिक भेदभावास आफ्रिका व जागतिक स्तरावर विरोध कसा झाला याची माहिती मिळविणे.

६. वांशिक भेदभाव समाप्तीबाबतची माहिती जाणून घेणे.

## १.१ प्रस्तावना

जगातील मानवप्राणी हा वेगवेगळ्या वंशानी विभागाला आहे. अशा वेगवेगळ्या वंशानी विभागलेल्या मानवांनी एक स्वतंत्र संस्कृती निर्माण केली आहे, यातूनच वांशिक चालीरीती, रुढीपरंपरांचा उगम झाला. त्यामुळेच एक वंश हा दुसऱ्या वंशापेक्षा वेगळा आहे, एक वंश हा

दुसऱ्या वंशापेक्षा श्रेष्ठ आहे या भावना आपोआपच मानवी प्राण्यामध्ये निर्माण झाल्या व यातूनच वांशिक भेदभावला सुरवात झाली व अल्पावधीतच या वांशिक भेदभावाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली. सदर प्रकरणात आपण वांशिक भेदभाव म्हणजे काय वांशिक भेदभावाची पार्श्वभूमी, वांशिक भेदभावाचा उगम, वांशिक भेदभावला अनुसरून लादण्यात आलेली बंधने, वांशिक भेदभावाबाबतचे अधिकृत धोरण, वांशिक भेदभाव धोरणाची वैशिष्ट्ये, तसेच वांशिक भेदभाव धोरणास आफ्रिकेमधील झालेला विरोध तसेच वांशिक भेदभाव धोरणास जागतिक स्तरावरील विरोध व वांशिक भेदभावाचा झालेला शेवट आदींबाबत ची माहिति पाहणार आहोत.

## १.२ वांशिक भेदभाव म्हणजे काय ?

एखाद्या राष्ट्रातील एखाद्या वंशाने आपल्याच राष्ट्रातील दुसऱ्या वंशापेक्षा आपण वर्णाने, संस्कृतीने, आचार- विचाराने, रूढी-परंपरेने वेगळे व श्रेष्ठ आहोत हे सिध्द करण्यासाठी प्रयत्न करणे व यासाठी वांशिक भेदनीतीचा अवलंब करणे म्हणजेच वांशिक भेदभाव होय. तसे पाहिले १९१० मध्ये दक्षिण आफ्रिकन संघराज्याची निर्मिती झाली होती. या संघराज्यात गौरवर्णीय ब्रिटिश व डच बोर यांच्यात सातत्याने संघर्ष सुरू होता. दक्षिण आफ्रिकेतील केप व नाताळवर ब्रिटिशांचे वर्चस्व होते तर ट्रान्सवला व ऑरेंज फ्री स्टेट डच्यांच्या ताब्यात होता. दक्षिण आफ्रिका संघराज्यातील आफ्रिकॅनर डच बोर हे ब्रिटिशांपेक्षा अतिशय कडवट व वर्णद्वेषी होते. मात्र पुढे आफ्रिकॅनरचा प्रभाव ब्रिटिशांच्या ताब्यात असणाऱ्या केप व नाताळ या प्रांतांवर पडल्यापासून ब्रिटिशांनेही वंशद्वेषी धोरणाचा हिरीरीने पुरस्कार केला. याच कालखंडात १९२४ मध्ये आफ्रिकॅनरानी स्थापन केला नॅशनॅलिस्ट पक्ष बहुमताने निवडून सत्तेवर आला येथूनच खऱ्यार्थांने दक्षिण आफ्रिकेत वांशिक भेदभावाला सुरवात झाली. दक्षिण आफ्रिकन समाज गौरवर्णीय शासक व त्याच्या नियंत्रणाखाली गुलाम अवस्था प्राप्त झालेले कृष्णवर्णीय लोक अशा दोन भागामध्ये विभागाला होता. दक्षिण आफ्रिकेत वांशिक भेदभाव निर्माण होण्या पाठीमागील काही महत्त्वाचे घटक

**१.२.१** दक्षिण आफ्रिकेतील गौरवर्णीयांच्या मनात स्वतःच्या वंश श्रेठत्वाची भावना रुजली होती त्यामुळे ते कृष्णवर्णीयांचा द्वेष करत होते

**१.२.२** दक्षिण आफ्रिकेतील मुळ गौरवर्णीय रहिवासी डच बोर समानतेचे कडवे विरोधक होते.

**१.२.३** 'डच रिफॉम्ड चर्च 'या धर्मसंस्थेने वांशिक भेदभावाला खतपाणी घालण्यास सुरुवात केली होती.

**१.२.४** 'डच रिफॉम्ड चर्च 'या धर्मसंस्थेनेकृष्णवर्णीय आफ्रिकन हे हीन वंशाचे आहेत असा प्रसार करण्यास सुरुवात केली.

**१.२.५** डच रिफॉम्ड चर्च 'या धर्मसंस्थेने कृष्णवर्णीय आफ्रिकन हे कानिष्ठ प्रतीचा देवदेवतांची पुजा करतात असा प्रसार करण्यास सुरुवात केली.

**१.२.६** १९३६मध्ये कृष्णवर्णीय, गौरवर्णीय व मिश्रवर्णीय यांच्या स्वतंत्र मतदार याद्या तयार करून कृष्णवर्णीयांना स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्यात आले होते.

**१.२.७** गौरवर्णीयांच्या युनायटेड पार्टीलाही आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांवर गौरवर्णीयांचे कायम वर्चस्व असायला पाहिजे असे वाटत होते.

दक्षिण आफ्रिकेत १९४८ मध्ये आफ्रिकनर नॅशनल पार्टीचे सरकार बहुमताने सत्तेवर आले व पंतप्रधान डॉ. डॅनिअल मालन यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आलेल्या सरकारने वांशिक भेदभावाची धोरण अत्यंत पद्धतशीरपणे व कडक धोरणाने राबविण्यास सुरवात केली. डॉ.डॅनिअल मालन (१९४८-५४), जे. जी. स्ट्रीजडम (१९५४-५८), डॉ. हेनरीक व्हेरवोर्ड(१९५८-६६) व बालथझार जे. होस्टर(१९६६-७८) या चारही पंतप्रधानांनी १९४८ ते १९७८ या कालखंडात सलग तीव्र वांशिक भेदभावाचे धोरण दमनतीचा वापर करत अत्यंत कठोर पद्धतीने राबविले त्यामुळेच आफ्रिका खंडातील शांततेला मोठा धक्का बसला.

**आपली प्रगती तपासा.**

१. दक्षिण आफ्रिकेत वांशिक भेदभाव निर्माण होण्यास जबाबदार ठरलेल्या घटकांची माहिती सांगा.

## १.३ वांशिक भेदभावाची पार्श्वभूमी

वांशिक भेदभाव हा एक वंश हा दुसऱ्या वंशापेक्षा वेगळा असतो या तत्वावर आधारलेला आहे. दक्षिण आफ्रिकेत जर १९% गौरवर्णीय, ६८% कृष्णवर्णीय आफ्रिकन व ३% आशियायी व अन्य आहेत. म्हणूनच ६८% कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांना त्यांचे स्वायत्तत एकवंशीय राष्ट्र त्यांनी दक्षिण आफ्रिकेत निर्माण केले पाहिजे अशी वांशिक भेदभावाची नीती पाश्चिमात्य गोऱ्या युरोपीय वासातवाद्यांनी प्रस्तुत केली. यातूनच खाऱ्यार्थाने वांशिक भेदभाची पार्श्वभूमी तयार झाली. याही पुढे जावून युरोपीय वासातवाद्यांनी आपले वेगळेपण सिद्ध करण्यासाठी असे सांगण्यास सुरवात केली की युरोपातील गौरवर्णीय वंशानेइतर वंशापेक्षा सर्वश्रेष्ठ असून त्यांचे श्रेष्ठत्व इतर वंशाने मान्य करायला पाहिजे. कारण युरोपातील गौरवर्णीयांच्या वंशश्रेष्ठत्वाला युरोपच्या रूढी-परंपरा, आचार-विचार, ऐतिहासिक वरसांचा कायदेशीर पाया आहे. याच विचारांचा आधार घेवून त्यांनी आपल्या वांशिक भेदभाव विचारसरणीला बळकटी देण्याचा पद्धतशीरपणे प्रयत्न केला. तसेच वांशिक भेदभाव ही एक निसर्गदत्त गोष्ट आहे हे त्यांनी वारंवार लोकांना पटवून सांगण्यास सुरुवात केली यातून वांशिक भेदभाची पार्श्वभूमी तयार झाली.

## १.४ वांशिक भेदभावाचा उगम

वांशिक भेदभावाचा उगम दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्यात झाला. या संघराज्यातील 'केप ऑफ गुड होप' या भागात सर्वप्रथम डच ईस्ट इंडिया कंपनीचे काही लोक १६५२ मध्ये

रहायला आले.व हे ठिकाण १७७५ पर्यन्त डच लोकांची वसाहत बनली. या ठिकाणच्या डचाणा 'आफ्रिकनर किंवा बोअर' असे म्हटले जावू लागले. याच डचाणी येथील स्थानिक मागास असणाऱ्या आदिवासींच्या जमिनी हिसकावून घेवून गुलामाप्रमाणे वागविण्यास सुरवात केली व शेतीवर शेतमजूर म्हणून काम करण्यास भाग पाडले. १७७५ मध्ये फ्रेंचांनी ही वसाहत जिंकली व फ्रेंच व डच यांच्यात तह होवून ही वसाहत ब्रिटिशांकडे राहिल असे जाहीर केले. त्यामुळे आफ्रिकेच्या अन्य भागात रहाण्यासाठी असलेले ब्रिटीश लोक कायम वास्तव्यासाठी 'केप ऑफ गुड होप' मध्ये आले. 'केप ऑफ गुड होप' ताबा मिळताच ब्रिटिशांनी या ठिकाणची गुलामगिरी नष्ट करण्याचा एक भाग म्हणुन येथील शेतीवर काम करणाऱ्या गुलामांची गुलामगिरीतूंन मुक्तता केली. परिणामी डच लोकांना शेतीवर काम करण्यासाठी मजूर मिळणे अशक्य झाले. या कारणास्तव डचाना ही वसाहत सोडणे भाग पडले. नंतर डचानी १८३५ ते १८४९० या कालखंडात उत्तरेकडील 'ट्रान्सवाल' व 'ऑरेंज फ्री स्टेट 'या भागात स्थलांतर केले. तर काही डचानी केप वसाहती- च्या कॉलनीच्या 'नाताळ 'म्हणून ओळखळ्याजाणाऱ्या पूर्व भागात स्थलांतर केले. या स्थलांतराच्या प्रश्नावरूनच ब्रिटिश व डच यांच्यात बोर युद्ध झाले. या युद्धात डचांचा पराभव झाला.पुढे ब्रिटिशांनी ट्रान्सवला व ऑरेंज-फ्री-स्टेट ही राज्य जिंकली पुढे नाताळ हे राज्य केप कॉलिनीस जोडले व १९१० मध्ये ट्रान्सवला, ऑरेंज-फ्री-स्टेट, नाताळ व केप कॉलिनी या प्रदेशाचे 'दक्षिण आफ्रिकेचे संघराज्य' निर्माण झाले.

या नवीन संघराज्यात ६८% कृष्णवर्णीय असून सुद्धा त्यांना दिली जाणारी वंशभेदाची वर्तणूक ही अमेरिकेतील निग्रो लोकांना दिल्या जाणाऱ्या वर्तणुकीपेक्षा अत्यंत हीन दर्जाची होती.

## १.५ वांशिक भेदभावला अनुसरून लादण्यात आलेली बंधने

अल्पसंख्येने असणाऱ्या गौरवर्णीयांची राजवट दक्षिण आफ्रिकेत सुरु झाली होती. याचाच फायदा घेत या गौरवर्णीयांने आपल्या सत्तेचा फायदा घेत संख्येने जास्त प्रमाणात असणाऱ्या कृष्णवर्णीयांवर आपली सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक बंधने लादून कृष्णवर्णीय लोकांचे जीवन अत्यंत बिकट बनविले होते. खालील मुद्यांच्या आधारे गौरवर्णीयांने कृष्णवर्णीयांवर कोणती बंधने लादली होती त्याची माहिति स्पष्ट करण्यात आली आहे.

**१.५.१** कृष्णवर्णीयांना शहरांमध्ये रहाण्यास मज्जाव करत त्यांना शहरांमधून हाकलून देण्यात आले.

**१.५.२** दक्षिण आफ्रिकेच्या एकूण क्षेत्रफळाच्या केवळ १३ % भागात त्यांना राहण्याची सक्ती करण्यात आली.त्यामुळे ८०लाखाहून अधिक कृष्णवर्णीय लोक या भूप्रदेशात अत्यंत गर्दीने पशुतुल्य जीवन जगत होते.

**१.५.३** कृष्णवर्णीय लोकांना दिलेल्या राखीव प्रदेशाव्यतिरिक्त इतर प्रदेशामध्ये जमीन खरेदी करण्यास सक्त मनाई करण्यात आली होती.

**१.५.४** गौरवर्णीयांने वंशभेद धोरणाला अनुसरून पोस्ट, तारायंत्र, दळणवळण व वाहतुक या सामाजिक सेवांच्या बाबतीत कृष्णवर्णीयांसाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली होती.

**१.५.५** गौरवर्णीयांने वंशभेद धोरणाला अनुसरून रेल्वे, बससेवा, उपहारगृहे, उद्याने, बागबगीचे, दवाखाने, क्रीडांगणे, चर्च व समुद्रकिनाऱ्याचे बीच या ठिकाणांची सुद्धा कृष्णवर्णीयांसाठी स्वतंत्र व्यवस्था केली होती.

**१.५.६** कृष्णवर्णीय लोकांना निवासाचा पत्ता, कामाचे ठिकाण, आदीबाबतची माहिती देण्यासाठी सोबत ओळखपत्र ठेवण बंधनकारक करण्यात आले होते. परिणामी कृष्णवर्णीयांना आपल्या सोबत ओळखपत्रांचा जुडगा घेवून हिंडावे लागत होते.

**१.५.७** कृष्णवर्णीयांना ओळखपत्र व परवान्यांशिवाय कोणत्या ठिकाणी फिरण्यास मज्जाव होता.

**१.५.८** गौरवर्णीयांनी 'मिक्स मॅरेंज व इम्मोरॅलिटी ऍक्ट' हा कायदा करून या कायद्यान्वये गौरवर्णीय व कृष्णवर्णीय या दोहोंत विवाह होणार नाहीत हे या कायद्याने स्पष्ट केले होते. गौरवर्णीयांचे वांशिक पावित्र्य व शुद्धता कायम ठेवण्यासाठी हा कायदा करण्यात आला होता.

**१.५.९** गौरवर्णीयांच्या शाळेत कृष्णवर्णीयांच्या मुलांना प्रवेश निषिध्द करण्यात आला होता.

**१.५.१०** गौरवर्णीयांचनी ' बांटू एज्युकेशन ऍक्ट' पास करून कृशनवर्णीयांच्या मुलांच्या शिक्षण घेण्याच्या मर्यादा निश्चित केल्या होत्या. या कायद्यांन्वय कृष्णवर्णीय मुले लिहिता-वाचता येतील एवढीच शिकायला पाहिजे. या पुढील शिक्षण त्यांना घेता येणार नाही हे या कायद्याने निश्चित केले होते.

**१.५.११** कृष्णवर्णीयांची मुले उच्च शिक्षण घेणार नाहीत या साठी गौरवर्णीय सतत लक्ष ठेवून होते. तसेच कृष्णवर्णीयांच्या मुलांना बाहय जगाचे व पुरोगामी सुधारणांचे ज्ञान प्राप्त होणार नाही याकडे लक्ष ठेवून होते.

**१.५.१२** कृष्णवर्णीयांना गौरवर्णीयांनी स्वतंत्र उधोग स्थापन करण्यास पूर्णपणे मज्जाव केला होता.

**१.५.१३** कृष्णवर्णीयांना तांत्रिक कौशल्य हस्तगत करण्यास मनाई होती.

**१.५.१४** गौरवर्णीयांनी १९११ मध्ये संमत केलेल्या कायद्यान्वये कृष्णवर्णीयांना संप करण्याची बंदी घालण्यात आली होती.

**१.५.१५** कृष्णवर्णीयांना उधोगधंदे, कारखाने, खाणी व शेतीमध्ये अल्पमजुरीने कामे करावी लागत होती. एकंदरीत गौरवर्णीयांनी ही कृष्णवर्णीयांवर लादलेली बंधने होती ती अत्यंत बिकट व अन्यायकारक होती. या बंधनांमुळे कृष्णवर्णीयांचे राजकिय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक हक्क हिरावून घेण्यात आले होते.

**आपली प्रगती तपासा**

वांशिक भेदभावला अनुसरून लादण्यात आलेल्या बंधनाची माहिती जाणून घ्या.

## १.६ वांशिक भेदभावाबाबतचे अधिकृत धोरण

डॉ. डॅनिअल मालन हे १९४८ मध्ये दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान झाले व त्यांनी आपल्या नव्या वांशिक भेदभावाची बंधने अत्यंत कडक केली. या धोरणाला अनुसरून त्यांनी कृष्णवर्णीय आफ्रिकनांवरील बंधने व नियंत्रणे अत्यंत कडक केली. याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**१.६.१** १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिश राष्ट्रकुलात गोऱ्या ब्रिटिशांन पेक्षा गौरेतर देशांची संख्या वाढली होती. तसेच या देशांमध्ये वांशिक समानतेला मान्यता मिळाली होती. अशी वांशिक समानता गौरवर्णीयांना दक्षिण आफ्रिकेच्या वांशिक भेदभाव धोरणास धोकादायक ठरणार होती. म्हणूनच गौरवर्णीयांने कृष्णवर्णीयांच्या मनावर आपले वांशिक श्रेष्ठत्व बिंबविण्यासाठी वांशिक भेदभावाची बंधने कडक केली.

**१.६.२** डॉ.डॅनिअल मालन यांच्या आफ्रिकन नॅशनल पक्षातील जहाल विचारसरणीचे सभासद वांशिक समानतेला कडाडून विरोध करत होते. त्यांच्या मते गौरवर्णीय श्रेष्ठव कृष्णवर्णीय नीच प्राणी आहेत. हेच धोरण कडक करण्यासाठी डॉ. डॅनिअल मालन यांच्या सरकारने वांशिक भेदभावाची बंधने कडक केली.

**१.६.३** डॉ. डॅनिअल मालन यांच्या पक्षाने १९४८ मध्ये कृष्णवर्णीयांच्या धोक्यापासून गौरवर्णीयांना वाचविण्यासाठीचं निवडणूक लढवली होती व निवडणूक जिंकली होती. त्यामुळे गौरवर्णीयांना दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी कृष्णवर्णीयांवर वांशिक भेदभावाची बंधने कडक करण्याचा निर्णय घेतला. पुढे जे. जी. स्ट्रीजडम (१९५४-५८), डॉ. हेनरीक व्हेखोर्ड (१९५८-६६) व बालथझार जे. होस्टर (१९६६-७८) या चारही पंतप्रधानांनी १९४८ ते १९७८ या कालखंडात सलग तीव्र वांशिक भेदभाव धोरण जास्तीत जास्त प्रमाणात कडकपणे राबविले.

## १.७ वांशिक भेदभाव धोरणास आफ्रिकेमधील विरोध

दक्षिण आफ्रिकेतील सत्ताधारी हे वांशिक भेदभावाचे कट्टर समर्थक असल्याने या सत्ताधाऱ्यांना विरोध करणे अतिशय कठीण काम होते. जे वांशिक भेदभावाला विरोध करतील त्यांना कठोर शिक्षा केल्या जात होत्या. तसेच नवीन राजकीय पक्ष स्थापनेस बंदी असल्यासने नवीन विरोधी पक्षही प्रचलीत नव्हता. असे जरी असले तरी वांशिक भेदभावाला पुढे टप्प्या टप्प्यात विरोध झाल्याचे दिसून येते.

### १.७.१ अल्बर्ट लुथिलीचा विरोध :

अल्बर्ट लुथिली हा आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचा नेता होता. त्यांनी आफ्रिकन गौरवर्णीय सरकारच्या दडपशाही धोरणाच्या विरोधात मोहीम काढून कृष्णवर्णीय कामगारांच्या माध्यमातून काही दिवस काम बंद पाडले. तसेच त्यांनी काही कृष्णवर्णीय लोकांच्या

मदतीने १९५२ मध्ये गौरवर्णीय लोकांच्या दुकानांमध्ये व राखीव जागांमध्ये घुसखोरी करण्याची मोहीम यशस्वी राबविली. पण ही घुसखोरी करणाऱ्या ८००० कृष्णवर्णीयांना प्रचलीत सरकारने अटक केली व ही प्रचलीत मोहीम दडपून टाकली .

**१.७.२.संयुक्त निषेध मोहीम:**
आशियायी, बिगर गौरवर्णीय व आफ्रिकन नॅशनल काँग्रेस हे जोहान्सबर्ग येथील क्लिपटावून येथे एकत्र आले व प्रचलीत सरकारच्या विरोधात निदर्शने करण्यास सुरुवात केली व पोलिसानी निदर्शने उधळून लावण्यापूर्वीच निदर्शकांनी 'स्वातंत्र्याची सनद' जाहीरपणे वाचून दाखवली. व पुढे स्वातंत्र्याची सनद' हाच कार्यक्रम आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने स्वीकारला.

यात आफ्रिकन जनतेसाठी पुढील मागण्या होत्या .

| | |
|---|---|
| १. कायद्यासमोर समानता . | २. सभा, संचार, भाषण, धर्म व मुद्रण स्वातंत्र्य. |
| ३. मतदानाचा अधिकार | ४. काम करण्याचा हक्क |
| ५. समान कामासाठी समान वेतन | ६. सप्ताहात ४० तास काम. |
| ७. किमान वेतन | ८. बेकार भत्ता |
| ९. नि:शुल्क वैद्यकीय मदत | १०. सक्तीचे मोफत व समान शिक्षण. |

**१.७.३ नेते व संस्थांचा वांशिक भेदभावस विरोध:**
दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीय व गौरवर्णीय चर्च मिशनऱ्यानी वांशिक भेदभावस विरोध करण्यास सुरुवात केली. याचे नेतृत्व ट्रेव्हर हडलस्टन या प्रसिद्ध धर्मप्रमुखाने केले. परिणामी या प्रवाहातूनही विरोध वाढला.

**१.७.४ वाहतुक व्यवस्थेवरील बहिष्कार:**
आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने प्रचलीत गौरवर्णीय सरकारला विरोध करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू केले होते. अशातच गौरवर्णीय सरकारने बस भाड्यात मोठ्याप्रमाणात वाढ केली होती. प्रचलीत सरकारच्या या धोरणाला विरोध करण्यासाठी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने कृष्णवर्णीय कामगारांना कामावर जातांना बस ऐवजी पायी जाण्यास सांगितले. कामगार रोज १० किलोमीटर अंतर रोज पायी जावू लागले हे धोरण सतत तीन महिने सुरू ठेवले. भाडे कपात होईपर्यंत ही मोहीम तीन महिने सुरू होती.

**१.७.५ आफ्रिकन कॉंग्रेसचा १९६० मधील संघर्ष :**
प्रचलीत सरकारच्या अन्यायकारक धोरणाला विरोध करण्यासाठी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने राजधानी जोहान्सबर्ग जवळ असलेल्या शार्प व्हील या छोट्या नगरात प्रचंड मोर्चे व निदर्शने आयोजित केले. प्रचंड विरोध लक्षात घेता परिस्थिती नियंत्रनात आणण्यासाठी प्रचलीत सरकारने निदर्शकांवर गोळीबार केला. या गोळीबारात ६७ निदर्शक मृत्यू पावले. अनेक निदर्शक जखमी झाले. प्रचलीत सरकारने १५००० निदर्शकांना अटक केली. यानंतर प्रचलीत सरकारने आफ्रिकन नॅशनल काँग्रेसवर बंदी घातली. असे असून सुद्धा प्रचलीत सरकारच्या अमानुष कारवाईला विरोध करण्यासाठी आंदोलकाने हिंसेला हिसेने

उत्तर देण्यासाठी बाँबस्फोट, गोळीबार इत्यादी मार्गाचा अवलंब केला.मात्र प्रचलीत सरकारने बळाचा वापर करून आंदोलकांचे खच्चीकरण केले. डॉ. नेल्सन मंडेला यांना अटक करून त्यांच्या विरोधात खटले भरले.

डॉ. नेल्सन मंडेला यांना जन्मठेपेची शिक्षा केली व प्रचलीत सरकारने ही परिस्थिती नियंत्रणात आणली.

### १.७.६ १९७० मध्ये असंतोषाचा भडका :

आफ्रिकेतील ट्रान्सवाल घटक राज्याने गौरवर्णीय डचांची भाषा कृष्णवर्णीय शाळांमध्ये सक्तीची केली. या विरोधात कृष्णवर्णीय शाळांमधील छोट्या छोट्या मुलांनी सोवेटो या शहरात प्रचंड निदर्शने केली. या निदर्शकांवर पोलिसांनी गोळीबार केला यात २०० निदर्शक मृत्युमुखी पडले. पोलिसांनी केलेल्या या अत्याचारामुळे ही चळवळ संपूर्ण देशात अतिशय वेगाने पसरली. मात्र सहा महिन्यात ही चळवळप्रचलीत सरकारने अतिशय क्रूरपणे मोडून काढली. या क्रूरपणाचे ५०० आफ्रिकन लोक बळी ठरले. तर स्टीव्ह बोका या आफ्रिकन नेत्याला पोलिसी अत्याचारमुळे आपला प्राण गमवावा लागला.

**आपली प्रगती तपासा**

वांशिक भेदभाव धोरणास आफ्रिकेमध्ये विरोध कसा झाला त्याची माहिती तपासा

## १.८ वांशिक भेदभाव धोरणास जागतिक स्तरावरील विरोध

वांशिक भेदभावास जसा दक्षिण आफ्रिकेत विरोध सुरू झाला होता तसाच विरोध जागतिक स्तरावर सुद्धा विरोध सुरू झाला होता याची माहीती खालील मुद्द्याचा आधारावर स्पष्ट करण्यात आली आहे.

### १.८.१ ब्रिटिश राष्ट्रकुल देशांचा विरोध :

दक्षिण आफ्रिकेमधील प्रचलीत गौरवर्णीयांच्या सरकारने सुरू केलेल्या वांशिक भेदभावाच्या धोरणास. ब्रिटिश राष्ट्रकुल देशांचाही विरोध होता. ब्रिटनचे पंतप्रधान हेरॉल्ड मॅक्लीन ये जेंव्हा १९६० मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर होते तेंव्हा अफ्रिकेतील वाढत्या राष्ट्रभावनेचा उल्लेख करून कोणत्याही सरकारने 'बदलत्या काळानुसार प्रत्येक राष्ट्राने व त्या राष्ट्रातील सरकारने वांशिक भेदभावाचा त्याग करायला पाहिजे' असे प्रतिपादन केले. मात्र दक्षिण आफ्रिकेतील सरकारने याकडे दुर्लक्ष केले. परिणामी दक्षिण आफ्रिकन सरकार व ब्रिटिश सरकारचे संबंध बिघडले व पुढे दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रकुल सदस्यत्व रद्द करण्यात आले.

### १.८.२ जागतिक स्तरावरील दोन मोठ्या संघाची भूमिका :

जगातील संयुक्त राष्ट्रसंघ व आफ्रिका एकता संघ या दोन मोठ्या संघाने दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावाच्या धोरणाचा निषेध केला. संयुक्त राष्ट्रसंघाने १९६२ मध्ये दक्षिण आफ्रिकेबरोबरच्या सर्व आर्थिक व्यवहारांवर बहिष्कार टाकला. तसेच आफ्रिका

एकता संघाने ही सर्व आर्थिक व्यवहारांवर बहिष्कार टाकला. मात्र या दोन मोठ्या संघाने बहिष्कार टाकूनही १९६० पासून १९८० पर्यन्त दक्षिण आफ्रिकेचे तत्कालीन पंतप्रधान व्हेवर्ड व व्होस्टर यांनी या बहिष्काराची दखल घेतली नाही.

## १.९ वांशिक भेदभावाचा शेवट

दक्षिण आफ्रिकेतील प्रचलीत सरकारने १९४८ पासून १९८० पर्यन्त कृष्णवर्णीय लोकांना कोणत्याही सवलती न देता चालूच ठेवले होते. कृष्णवर्णीयांनी वांशिक भेदभावाचे समर्थन करणाऱ्या सरकारच्या विरोधात निषेध मोर्चे, चळवळी काढून आपला विरोध कायम ठेवला होता. आफ्रिका एकता संघ, संयुक्त राष्ट्र संघ व अन्य मानवतावादी संघटनांनी पाठींबा दिला होता. त्यामुळे वांशिक भेदभावाचा प्रश्न दक्षिण आफ्रिकेपुरता न राहता या प्रश्नाला जागतिक स्वरूप प्राप्त झाले होते. परिणाम याची दखल दक्षिण आफ्रिकेतील प्रचलीत सरकारला घ्यावी लागली व यातूनच वांशिक भेदभावाचा शेवट झाला.

**१.९.१ पंतप्रधान बोथाचे धोरणं:**
दक्षिण आफ्रिकेत १९७९ मध्ये दक्षिण आफ्रिकेत सार्वत्रिक निवडणुका होवून पंतप्रधान पी. डब्लू. बोथा यांचे सरकार सत्तेवर आले. पंतप्रधान पी. डब्लू. बोथा यांना वांशिक भेदभावाच्या बदलत्या परिस्थितीची जाणीव झाली होती. त्यामुळेच पंतप्रधान पी. डब्लू. बोथा यांनी दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांच्या बाबत काही अनुकूल निर्णय घेण्याचे ठरविले. व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली.

**१.९.२** १९७९ मध्ये कृष्णवर्णीय कामगारांना संघटना स्थापन करण्यास व संपावर जाण्यास परवानगी दिली.

**१.९.३** १९८१ मध्ये कृष्णवर्णीय लोकांना नगरपालिका निवडणुकीत मतदानाने प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिला.

**१.९.४** १९८४ मध्ये नवी राज्यघटना प्रस्थापित करत संसदेत दोन सभागृह निर्माण केले. एक मिश्र वर्णीयांसाठी तर दुसरे आशियायी वंशीयांसाठी. मात्र गौरवर्णीयांचे वर्चस्व प्रस्थापित व्हावे ही अपेक्षा होती.

**१.९.५** १९८५ मध्ये मिश्रवंशीय विवाह व लैंगिक संबंधाना परवानगी देण्यात आली.

**१.९.६** १९८६ मध्ये गोरेत्तरना पास देण्याचा कायदा रद्द करण्यात आला.

**१.९.७ पंतप्रधान बोथाच्या धोरणाला विरोध :**
पंतप्रधान पी. डब्लू. बोथा यांनी आपल्या धोरणाला अनुसरुन दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांच्या बाबत काही अनुकूल निर्णय घेतले होते. मात्र कृष्णवर्णीयांना अपेक्षित असणारा मतदानाचा हक्क व शासकीय प्रक्रियेत पूर्ण सहभाग या गोष्टी त्यांनी विचारतात

घेतल्या होत्या. त्यामुळेच अफ्रिकन नॅशनल काँग्रेसने आपल्याला जो पर्यंत आपल्याला राजकीय हक्कांची पुर्तता होत नाही तो पर्यंत ही हक्क चळवळ बंद होणार नाही असे जाहीर केले.

**१.९.८ पंतप्रधान बोथा सरकारच्या विरोधात चळवळ :**

पंतप्रधान बोथा सरकारच्या विरोधात चळवळ उभी करत आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने हिंसक मार्गाचा अवलंब सुरु केला. यासाठी त्यांनी वांशिक भेदभावाबद्दल सहानुभूती दाखविणाऱ्या कौन्सिलर व कृष्णवर्णीय पोलिस हत्या करण्यास सुरुवात केली. अशा लोकांच्या मानेत टायर टाकून अशा लोकांना पेटवायला सुरवात केली. त्यामुळे अशांत: वातावरण निर्माण झाले. अशातच शोर्प व्हिल येथे मृत पावलेल्या कृष्णवर्णीयांच्या २५ व्या स्मृतिप्रीत्यर्थ निघालेल्या शोकसभेच्या मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला. या गोळीबारात ४० कृष्णवर्णीय मारले गेले. त्यामुळे प्रचलीत सरकारने या भागात आणीबाणी जाहीर केली व पुढे ही आणीबाणी संपूर्ण देशात लागू केली. विनावॉरंट लोकांना अटक करणे, विनाचौकशी लोकांना तुरुंगात टाकणे ही कारवाई सुरू झाली. वृत्तपत्र, टेलिव्हिजन व रेडिओ या प्रसारमध्यमांवर बंदी घालण्यात आली. त्यामुळे या चळवळीची तीव्रता कमी झाली.

**१.९.९ आंतरराष्ट्रीय दबाव :**

१९८६ मध्ये राष्ट्रकुलातील ब्रिटन व अन्य सदस्य देशांनी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कडक आर्थिक बंदीचे धोरण जाहीर केले. दक्षिण आफ्रिकेला कर्जे देवू नयेत, तेलविक्रीबंदी, संगणक व आण्विक साहित्य पाठविण्यावर बंदी, सांस्कृतिक व वैज्ञानिक कर्यक्रमांवरील बंदी, आदी घटकांना अनुसरून बंदी टाकण्यात आली. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेची नाकेबंदी झाली.

**१.९.१० अमेरिकेचा पाठिंबा :**

राष्ट्रकुलाच्या आर्थिक नाकेबंदीच्या कारवाईस सप्टेंबर १९८६ अमेरिकेने पाठिंबा दिला व तत्कालीन अध्यक्ष रोनाल्ड रिगन याच्या नकाराधिकाराची पर्वा न करता तेथील प्रतिनिधीगृहाने दक्षीण आफ्रिकेला कर्जस्वरूपात देण्यात येणारी आर्थिक मदत स्थगित केली. तसेच हवाई वाहतूक बंद करण्यात आली. तसेच दक्षिण आफ्रिकेतून अमेरिकेत होणाऱ्या आयातीवर बंदी घातली.

**१.९.११ दक्षिण आफ्रिकेतील बदल:**

वांशिक भेदाबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर दबाव निर्माण होत असतांनाच आफ्रिकन जनताही जागृत झाली होती. याच काळात आफ्रिकन जनता साक्षर झाली होती. आफ्रिकन जनतेचा अज्ञानिपणा नष्ट झाला होता. यातूनच आफ्रिकेत सुशिक्षित, सुधारणावादी व व्यावसायिक मध्यमवर्ग निर्माण झाला होता. एवढेच नव्हे तर या कालखंडात कृष्णवर्णीयांनी आफ्रिकन समाजात प्रतिष्टेची पदे प्राप्त केली होती. परिणामी दक्षिण आफ्रिकेतील या बदलाचा फायदा या चळवळीस झाला.

### १.९.१२ गौरवर्णीयांच्या मानसिकतेत बदल:

वांशिक भेदभावाच्या संघर्षामुळे बदलत्या परिस्थितीनुसार सतत बदल होत गेले. त्यामुळे कृष्णवर्णीयांची बाजू मजबूत होत गेली. त्यामुळेच गौरवर्णीयांची मानसिकता बदलत्या काळानुसार बदलत गेली. व गौरवर्णीयांना असे वाटू लागले की आता आपण कृष्णवर्णीयांना राजकीय सहभागापासून रोखू शकणार नाही. या मानसिकता बदलाचा फायदा या चळवळीस झाला.

### १.९.१३ डच रिफॉर्म चर्चची भूमिका:

सुरवातीपासून डच रिफॉर्म चर्चनी वांशिक भेदभावचे उघडपणे समर्थन करून वांशिक भेदभावला खतपाणी घातले होते. नंतर मात्र डच रिफॉर्म चर्चनी आपली भूमिका बदलत वांशिक भेदभावाचे धोरण हे ख्रिश्चन धर्मातत्वांशी विसंगत आहे असे जाहीर केले. व प्रचलीत सरकारच्या वांशिक भेदभावाचे धोरणास उघपणे विरोध केला. या बदलाचा फायदा या चळवळीस झाला.

### १.९. १४ वांशिक भेदभाव समाप्तीस अनुकूल वातावरण:

१९८९ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षपदी डब्लू. डी. क्लार्क विराजमान झाले. त्यांनी अत्यंत सावध पावले टाकत वांशिक भेदभाव समाप्तीचे पद्धतशीरपणे नियोजन केले. त्यांनी कृष्णवर्णीयांच्या हाती सत्ता सोपविण्याचे ठरवले होते.

- दक्षिण आफ्रिकेच्या वांशिक भेदभाव विरोधी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या २७ वर्ष तुरुंगावसात असणाऱ्या डॉ. नेल्सन मंडेलाची तातडीने तुरुंगातुन सुटका केली .
- दक्षिण आफ्रिकेतील आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस या पक्षाला राजकीय मान्यता दिली. तातडीने या पक्षाचे नेतृत्व डॉ. नेल्सन मंडेला यांनी स्वीकारले.
- दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभाव करणारे सर्व कायदे रद्द केले.
- दक्षिण आफ्रिकेच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या नामीबिया या प्रदेशाला तातडीने स्वातंत्र्य दिले त्यामुळे तेथे कृष्णवर्णीयांची सत्ता प्रस्तापित झाली.
- आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस व दक्षिण आफ्रिकेचे सरकार यांच्यात कृष्णवर्णीय लोकांना सर्वप्रकारचे राजकीय व अन्य हक्क देणारी राज्यघटना तयार करण्यासंबंधीचे विचार पुढे येवून वाटाघाटी सुरू झाल्या.

### १.९.१५ वांशिक भेदभाव समाप्ती :

प्रचलीत दक्षिण आफ्रिका सरकारचे अध्यक्ष क्लार्क, आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसचे अध्यक्ष नेल्सन मंडेला, नॅशनल पक्ष व इतर पक्ष यांच्यात कृष्णवंशीय राजवट स्थापनेविषयी बरेच दिवस चर्चा सुरू होती. शेवटी १९९३ मध्ये या वाटाघाटींना यश आले. व सर्वांनी गौरवर्णीयांकडून कृष्णवर्णीयांकडे सत्ता हस्तांतरित करण्यास मान्यता दिली. व दक्षिण आफ्रिकेत सार्वत्रिक निवडणुका घेण्यास मान्यता देण्यात आली व खुल्या वातावरणात निवडणुका पार पाडण्यात आल्या. या निवडणुकीत डॉ. नेल्सन मंडेला यांच्या आफ्रिकन नॅशनल पक्षाला संसदेत दोन तृतीयांश जागा मिळाल्या. तरी पण सत्तान्तर करारात ठरल्या प्रमाणे दक्षिण आफ्रिकेत सर्वपक्षीय सरकार सत्तेवर आले व दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्ष-

पदी नेल्सन मंडेलाची व उपाध्यक्षपदी क्लार्क यांची एकमताने निवड करण्यात आली. येथूनच खाऱ्यार्थाने वांशिक भेदभाव समाप्ती झाली.

## १.१० सारांश

जगातील संयुक्त राष्ट्रसंघ व आफ्रिका एकता संघ या दोन मोठ्या संघाने दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावाच्या धोरणाचा निषेध केला. संयुक्त राष्ट्रसंघाने १९६२ मध्ये दक्षिण आफ्रिकेबरोबरच्या सर्व आर्थिक व्यवहारांवर बहिष्कार टाकला. तसेच आफ्रिका एकता संघाने ही सर्व आर्थिक व्यवहारांवर बहिष्कार टाकला. मात्र या दोन मोठ्या संघाने बहिष्कार टाकूनही १९६० पासून १९८० पर्यन्त दक्षिण आफ्रिकेचे तत्कालीन पंतप्रधान व्हेवर्ड व व्होस्टर यांनी या बहिष्काराची दखल घेतली नाही. बोथा सरकार आल्यानंतर मात्र कृष्णवर्णियांच्या बाबतीत अनुकूल निर्णय घेण्यात आले. त्याचप्रमाणे डब्लू. डी. क्लार्क यांनी पण भेदभाव नष्ट करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करून दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णियांना त्यांचे मूलभूत अधिकार बहाल करून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.

## १.११ प्रश्न

१. दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावाची पार्श्वभूमी स्पष्ट करा ?

२. दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावा संदर्भातील कृष्णवर्णीयांवर लादलेल्या बंधनाचा आढावा घ्या ?

३. दक्षिण आफ्रिकेतील वांशिक दक्षिण आफ्रिकेतील वांशिक विरुद्ध निर्माण झालेल्या परिस्थितीचा मागोवा घ्या ?

४. दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावा समाप्त कसा झाला ते स्पष्ट करा?

## १.१२ संदर्भ


१. डॉ. धनंजय आचार्य, विसाव्या शतकातील जग.

२. प्राचार्य य. ना. कदम, विसाव्या शतकातील जगाचा इतिहास.

३. डॉ. सुमन वैद्य, आधुनिक जग.

४. डॉ. चौसाळकर, आधुनिक जगाची परिस्थिती आणि अलिप्तता चळवळ.


*****

# २

# मार्टिन ल्युथर किंग आणि आफ्रो-अमेरिकन नागरी हक्क चळवळ

**घटक रचना**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ अमेरिकेतील निग्रो लोकांची स्थिती .

२.३ अमेरिकेतील मळेवाल्यांची स्थिती

२.४ निग्रोंच्या हक्कासाठी वैचारिक पार्श्वभूमी.

२.५ अब्राहाम लिंकनची कामगिरी

२.६ अब्राहम लिंकन नंतर निग्रोंची स्थिती

२.७ नागरी हक्क चळवळ

२.८ मार्टिन ल्युथर किंगची भूमिका

२.९ विसाव्या शतकातील शेवटच्या टप्प्यातील निग्रोंची स्थिती

२.१० सारांश

२.११ प्रश्न

२.१२ संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये

१. अमेरिकेतील निग्रो लोकांच्या स्थितीचा अभ्यास करणे.

२. अमेरिकेतील निग्रो लोकांच्या वैचारिक जागृतीस जबाबदार ठरलेल्या घटकांचा अभ्यास करणे.

३. अब्राहाम लिंकनची कामगिरी समजून घेणे.

४. अब्राहाम लिंकन नंतरच्या स्थितीचा अभ्यास करणे.

५. नागरी हक्क चळवळ विषयक माहिती जाणून घेणे.

६. मार्टिन ल्युथर किंगच्या कामगिरीचा अभ्यास करणे.

७. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील निग्रोंच्या परिस्थितीला समजून घेणे.

## २.१ प्रस्तावना

अमेरिकेतील निग्रो वंशीय लोकांनी आपल्या न्याय व समानतेच्या हक्कासाठी सुरू केलेली चळवळ म्हणजे नागरी हक्क चळवळ होय. ही चळवळ निग्रो वंशीय लोकांनी आपल्या मूलभूत अधिकार प्राप्तीसाठी सुरू केली होती. या मूलभूत अधिकार प्राप्तीसाठी निग्रो वंशीय लोकांना प्रदीर्घ स्वरूपात लढा द्यावा लागला व शेवटी त्याची परिणीती निग्रोंच्या मूलभूत अधिकार प्राप्तीने झाली. याचाच अभ्यास आपण अमेरीकेतील निग्रो लोकांची स्थिती कशी होती, निग्रो लोकांमध्ये वैचारिक जागृती कशी निर्माण झाली, अब्राहम लिंकनने निग्रोंच्या न्याय हक्कसाठी कोणते योगदान दिले, अब्राहाम लिंकनच्या मृत्यूनंतर निग्रोंची स्थिती कशी होती, या स्थितीनंतर अमेरिकेत निग्रोंच्या न्याय हक्कासाठी चळवळ कशी उभी राहिली व या चळवळीच्या माध्यमातून निग्रो लोकांच्या मनामध्ये कशाप्रकारे आत्मविश्वास निर्माण झाला व नंतर मार्टिन ल्युथर किंगने निग्रोंच्या न्याय हक्कासाठी कसे योगदान दिले या घटकांना अनुसरून करणार आहोत.

## २.२ अमेरिकेतील निग्रो लोकांची स्थिती

दक्षिण अमेरिकेतील वेगवेगळ्या वसाहतींमध्ये निग्रो गुलामांना विकत घेण्याची पद्धती प्रचलीत होती. त्यातूनच दक्षिणेकडील कृषिप्रधान वसाहतींमध्ये निग्रो गुलामगिरीची बीजे रुजली गेली.ही प्रथा दक्षिण अमेरिकेतील अलबामा, मिसिसिपी, लुझियाना या नव्या संघराज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रचलीत होती. तसेच दक्षिणेकडील वासाहतवल्यांना शेतीच्या मळ्यावर काम करण्यासाठी निग्रो गुलाम गरजेचे असल्याने मानवतावादी दृष्टिकोन न ठेवता घटना निर्मिती प्रसंगी निग्रो गुलामगिरी नष्ट करण्यासाठी ठामपणे विरोध केला नाही. अशातच जॉर्ज वॉशिंटन, थॉमस जेफरसन व बेंजामिन फ्रँकलिंन या मानवतावादी नेत्यांना दक्षिण अमेरिकेतील निग्रोंची गुलामगिरी ही अमानुष्य व अन्यायकारक आहे हे माहीत असून सुद्धा नष्ट करता आली नाही. त्यामुळेच दक्षिण अमेरिकेतील निग्रो गुलामांची स्थिती अत्यंत बिकट होती.

- दक्षिण अमेरिकेतील मळेवाले निग्रो गुलामांना जबरदस्तीने शेतमळ्यावर राबवत होते.
- दक्षिण अमेरिकेतील मळेवाले निग्रो गुलामांना जबरदस्तीने शेतमळ्यावर राबवत असतांना चाबकाच्या फटकाऱ्याने मारत होते.
- निग्रो गुलामांच्या बायकांना व मुलांना जबरदस्तीने शेतमळ्यात काम करायला लावत होते.
- निग्रो गुलामांच्या बायकांना व मुलांना जबरदस्तीने मळेवाल्यांच्या स्वयंपाकघरात काम करायला लावत होते.
- दक्षिण अमेरिकेतील मळेवाले निग्रो गुलामांना जबरदस्तीने चोवीस तास कामाला जुंपत होते.
- दक्षिण अमेरिकेतील मळेवाले निग्रो गुलामांना काडीचाही किंमत देत नव्हते.

- निग्रो गुलामांची उपयुक्तता संपल्यावर बाजारू वस्तुप्रमाणे त्याला विकले जात होते.
- निग्रो गुललामाला उपयुक्तता संपल्यानंतर विकल्यामुळे त्याच्या कुटुंबियाबरोबर त्याची ताटातूट होत असे त्याच्या वाट्याला येणारे हे जीवनही अत्यंत कष्टदायक होते.
- दक्षिण अमेरिकेतील निग्रो गुलामांना सार्वजनिक ठिकाणी वावर करण्याचा अधिकार नव्हता.
- दक्षिण अमेरिकेतील निग्रो गुलामांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. एकंदरीत या सर्व परिस्थितीमुळे दक्षिण अमेरिकेतील निग्रो गुलामांचे जीवन हे अत्यंत बिकट होते हे स्पष्ट होते.

**आपली प्रगती तपासा :**

१. दक्षिण अमेरिकेतील गुलामांची स्थिती कशी होती सांगा.

## २.३ अमेरिकेतील मळेवाल्यांची स्थिती

दक्षिण अमेरिकेतील मळेवाल्यांकडे शेकडो एकर जमीन असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती समृध्द होती. निग्रो गुलामांच्या कष्टावर ते धनाढ्य बनले होते. घटनात्मक अधिकारांचे पाठबळ त्यांच्याकडे होते. राजकर्त्यांच्या वरदहस्त त्यांच्या बाजूने होता. त्यामुळेच त्यांचे जीवन सुखावह होते. ते मोठमोठ्या वाड्यांमध्ये राहत होते. शिकार करणे, घोड्यावर रपेट करणे, मद्यपान करणे व मनोरंजना- साठी नृत्य कार्यक्रमांचे आयोजन करणे आदी आनंदमय जीवनाचा उपभोग घेत होते. मात्र या जीवनाचा उपभोग घेत असतांना निग्रो गुलामांबाबतचा त्यांचा दृष्टिकोन चांगला नव्हता. ते निग्रो गुलामांवर अन्याय करत होते. त्यांना भेदभावाची वागणूक देत होते. त्यांच्यावर अन्याय करत होते. त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवत होते. त्यांचे हे धोरण निग्रो गुलामांच्या दृष्टिकोनातून अन्यायकारक ठरल्यानेच पुढील संघर्षमय परिस्थिती उद्भवली.

## २.४ निग्रोंच्या हक्कासाठी वैचारिक पार्श्वभूमी

अमेरिकेतील निग्रोंच्या न्याय हक्कासाठी सुरवातीला वैचारिक पार्श्वभूमी तयार करण्यामध्ये दोन व्यक्तींचे महत्वपूर्ण योगदान आहे. या दोन व्यक्तींमध्ये हॅरिअट स्टोवे व अब्राहम लिंकन या दोन महत्वपूर्ण व्यक्तींचा समावेश आहे.

**२.४.१ हॅरिअट स्टोवे :**

हॅरिअट स्टोवे या महिलेने 'नॅशनल इरा' या वृत्तपत्रातून १८५२ मध्ये 'अंकल टॉम्स केबीन' ही निग्रो गुलामांच्या जीवनावरील कादंबरी क्रमशः प्रकाशित केली होती. या कादंबरीमध्ये त्यांनी अमेरिकेतील गुलामांच्या जीवनाचे वास्तववादी चित्रण केले होते.

अल्पावधीतच या कादंबरीच्या तीन लक्ष प्रती अमेरिकेच्या दक्षिण-उत्तर भागात संपल्या होत्या. त्यामुळेच या कादंबरीच्या माध्यमातून अमेरिकेतील निग्रो गुलामगिरी प्रथेविरुद्ध आपोआपच प्रचार सुरू झाला. या मुळे दक्षिण अमेरिकेबरोबरच उत्तर अमेरिकेत सुद्धा निग्रो गुलामगिरी सारख्या अनिष्ट व चुकीच्या प्रथेविरुद्ध वातावरण निर्माण झाले.

**२.४.२.अब्राहाम लिकंन :**

अब्राहम लिंकन स्टिफन डग्लसच्या विरोधात रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून सिनेटची निवडणूक लढवली होती त्यात अब्राहम लिंकांचा पराभव झाला होता मात्र अब्राहम लिंकनने या निवडणुकीच्या दरम्यान जे विचार मांडले होते ते अत्यंत परिणामकारक होते.

"अमेरिकन निग्रो गुलामांना गोऱ्या लोकांना बरोबरीचे अधिकार देण्यात यावे. अमेरिकन निग्रो गुलामांना गोऱ्यांच्या पंक्तीला नेवून बसवावे. केवळ वंशभेदामुळे निग्रो गुलामांना गुलामगिरीत डांबून ठेवणे अन्यायकारक आहे. या अन्याकरक पद्धतीची व्याप्ती वाढु नये असे माझे मत आहे. हे कठोर सत्य आहे आणि ते बोलून दाखविण्याची ही वेळ आली आहे यासाठी मला मरण आले तरी चालेल". त्यांच्या या विचारांची प्रचिती दक्षिण-उत्तर अमेरिकेत अल्पावधीतच पसरली यातूनच निग्रोंच्या न्याय हक्कसाठी वैचारिक पार्श्वभूमी तयार झाली.

## २.५ अब्राहाम लिंकनची कामगिरी

अमेरिकेला एकसंघ बनविण्यासाठी महत्वपूर्ण प्रयत्न करणारे अब्राहम लिंकन हे अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष होते. त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून आपल्या राजकिय कारकिर्दीची सुरवात केली होती. अमेरिकेतील निग्रोंच्या वाट्याला आलेली गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले होते त्यांच्या कामगिरीचा आढावा खालील माहितीच्या आधारे मांडण्यात आला आहे .

**२.५.१ १८५८ ची सिनेट निवडणूक:**

अब्राहम लिंकनने १८५८ मध्ये रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून सिनेटची निवडणूक लढविली होती मात्र या निवडणुकीत त्यांना अपयश आले होते. पण त्यांनी अमेरिकेतील निग्रो गुलामांच्या हक्कसाठी जी वैचारिक पार्श्वभूमी तयार केली त्याचा फायदा पुढे त्यांना व त्यांच्या रिपब्लिकन पक्षाला झाला.

**२.५.२ १८६० ची अध्यक्षीय निवडणूक :**

अब्राहम लिंकनने १८६० ची अध्यक्षीय निवडणूक लढवून ही निवडणूक जिंकली. त्यांच्या विजयाने दक्षिणेकडील संघराज्याना जबरदस्त हादरा बसला. एक चांगल्या विचारी नेतृत्वाने अविचारी प्रवृत्तीचा शेवट केला.

**२.५.३ दक्षिणेकडील राज्य संघराज्यातून बाहेर :**

अब्राहम लिंकंनच्या विजयाने दक्षिणेकडील राज्यांना जबरदस्त हादरा बसला होता. या हताश भावनेतूनच सर्वप्रथम दक्षिण कॅरोलीनच्या विधिमंडळाने १७ डिसेंबर १७६० मध्ये

संघराज्यातून बाहेर पडण्याचा निर्णय प्रस्ताव पास केला याच प्रस्तावाला अनुसरून फ्लोरिडा, मिसिसिपी, अलबामा, जॉर्जिया, लुझियाना व टेक्सस ही दक्षिणेकडील सहा राज्य अमेरिकन संघराज्यातून बाहेर पडली.

**२.५.४.अब्राहम लिंकनचे धोरण :**

अमेरिकन संघराज्य एकसंघ व्हावे हे अब्राहम लिंकनचे महत्वपूर्ण धोरण होते. पण दक्षिणेकडील सहा राज्य संघराज्यातून निघून गेल्याने अब्राहम लिंकनला मोठा धक्का बसला होता. अशातच उत्तरेकडील अर्कान्सस, टेनेसी,उत्तर कॅरोलिना आणि व्हर्जिनिया ही राज्य संघराज्यात सामील झाल्याने संघराज्याची ताकद वाढली होती. मात्र फुटून निघून गेलेली दक्षिणेकडील सहा राज्य पुन्हा संघराज्यात परत येतील हा आशावाद पुर्णपणे संपुष्टात आला होता. त्यामुळेच अब्राहम लिंकनने आपले धोरण बदलून या राज्यांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

**२.५.५.राज्यसंघविरुद्ध घोषणा :**

दक्षिणेकडील राज्य परत संघराज्यात येणार नाहीत हे लक्षात येताच अब्राहम लिंकनने सप्टेंबर १८६२ मध्ये संघराज्यविरुद्ध युध्द घोषणा केली. व अमेरिकन संघराज्यातून जी राज्य फुटून बाहेर पडली आहेत ती राज्य संघराज्यात सामील झाली नाही तर या राज्यांमधील सर्व निग्रो गुलाम स्वतंत्र होतील असे जाहीर केले व नव वर्षाच्या मुहूर्तावर १ जानेवारी १८६३ मध्ये अब्राहम लिंकनने 'अमेरिकेतील गुलामगिरी नष्ट करणारा जाहीरनामा' घोषीत केला. या जाहिरनाम्याला अनुसरून अब्राहम लिंकनने दक्षिण अमेरिकेतील राज्यातील निग्रो गुलाम स्वतंत्र आहेत असे घोषीत केले. या घोषणेला अनुसरून दक्षिणेतील राज्यातील सर्व निग्रो गुलाम संघराज्याच्या लष्करी छावण्यांकडे धावू लागले त्यामुळे त्यामुळे दक्षिणेकडील मळे ओस पडू लागले .

**२.५.६.गुलामगिरी कायद्याचे उच्चाटन:**

अब्राहम लिंकनला संघसरकारचा विजय दृष्टीपथास पडताच गुलामगिरी कायद्याचे उच्चाटन करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. यासाठी त्यांनी तेराव्या संशोधनाचा प्रस्ताव काँग्रेसपुढे मांडला व १८६५ मध्ये आवश्यक असणाऱ्या राज्याची मंजुरी मिळवून तेरावे संशोधन घटनेला जोडले.

**२.५.७ अब्राहम लिंकनची पुनश्च राष्ट्राध्यक्षपदी निवड :**

अब्राहम लिंकनने केलेल्या महत्वपूर्ण कामगिरीच्या जोरावर १८६४ च्या अध्यक्षीय निवडणुकीत पुनः प्रचंड मतांनी निवडून आले. निवडुन आल्यानंतर त्यांनी कुणाविषयी सूडबुद्धी न ठेवता सर्वांनविषयी आपुलकीची भावना ठेवत अमेरिकन संघराज्यात चिरंतन शांतता प्रस्तापित करण्याचे विनम्र आवाहन आपल्या देशबांधवाना केले. तसेच अमेरिकेत ऐक्य टिकवण्यासाठी दक्षिणेबद्दलचा राग, द्वेष, वैर नष्ट करून आपल्याला शांतता प्रस्थापित करायला पाहिजे असे विचार व्यक्त केले.

**२.५.८ अब्राहम लिंकनचा मृत्यू :**

अब्राहम लिंकनने दुसऱ्यांदा अध्यक्ष पदाची निवडणूक जिंकून आपले निर्विवाद राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले होते. मात्र त्यांचे विरोधक शान्त बसले नव्हते. ते संधी साधून अब्राहम लिंकनचा शेवट करण्याच्या प्रयत्नात होते. १४ एप्रिल १८६५ मध्ये त्यांच्या प्रयत्नांना यश आले. फॉर्ड्स थिएटर्स मध्ये एका नाट्य प्रयोगाला ते उपस्थित राहणार होते ही माहिती तेथील वृत्तपत्रांनी जाहीर केली या माहितीच्या आधारेच जॉन विलक्स बूथ नावाच्या माथेफिरुनी अब्राहम लिंकांच्या पाठीमागच्या बाजूने मेंदूत गोळी झाडली. या घटनेनंतर त्यांचा मृत्यू झाला. अब्राहम लिंकनच्या महत्वपूर्ण कामगिरीने अमेरिकेतील गुलामगिरी पुर्णतः नष्ट झाली मात्र दक्षिण अमेरिकेतील राज्यांवर लादले गेलेले निर्णय उत्तरे कडील राज्यांबद्दल द्वेषभावना निर्माण करणारे ठरले. त्यामुळेच पुढे निग्रोंचे अनेक प्रश्न पुढे नव्याने उद्भवले व पुनः या साठी नव्याने संघर्ष करावा लागला.

**आपली प्रगती तपासा :**

अब्राहम लिंकनच्या  कामगिरीची माहिती मोठ काम सांगा.

## २.६ अब्राहम लिंकन नंतर निग्रोंची स्थिती

अब्राहम लिंकनच्या मृत्यूनंतर अमेरिकेतील निग्रोंची स्थिती अत्यंत बिकट झाली होती. अमेरिकन राज्यघटनेला जोडण्यात आलेल्या तेराव्या संशोधनानुसार निग्रो लोकांची जरी गुलामगिरीतून मुक्तता करण्यात आली असली तरी व त्यांना समान नागरी हक्क दिले असले तरी ते या सर्व गोष्टींच्या बाबतीत वंचित होते.

वर्ण व वंश श्रेठत्वाने पछाडलेले अमेरिकेतील गोरे लोक निग्रोंना समान दर्जाने वागविण्यास तयार नव्हते. त्यामुळे निग्रो लोकांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात कुचंबना होत होती.

**२.६.१. सामाजिक क्षेत्रातील स्थिती:**

अमेरिकन राज्यघटनेला जोडण्यात आलेल्या तेराव्या संशोधनानुसार निग्रो लोकांची जरी गुलामगिरीतून मुक्तता करण्यात आली असली तरी व त्यांना सामाजिक जीवनात अत्यंत हिनतेची वागणूक दिली जात होती. मोटारींमध्ये वर्ण व वंशद्वेषाचा त्यांना सामना करावा लागत होता. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील  आगगाड्या, बस व मोटारींमध्ये त्यांना वेगळ्या बाकांवर बसावे लागते होते. सार्वजनिक उपहारगृहांमध्ये त्यांना प्रवेश नाकारण्यात आला होता. थॉमस जेफर्सनने तयार केलेल्या अमेरिकन स्वतंत्र्याच्या जाहिरनाम्यातील त्यांचे घटनादत्त अधिकार नाकारण्यात आले होते.

निग्रो लोकांना त्यांच्याच देशात अस्पृश्यांप्रमाणे अत्यंत बिकट जीवन जगावे लागत होते. एकंदरीत या सर्व परिस्थितीचा जर विचार केला तर निग्रो लोकांचे अब्राहम लिंकन नंतरचे सामाजिक जीवन अत्यंत बिकट अवस्थेतील होते.

### २.६.२. शैक्षणिक क्षेत्रातील स्थिती:

शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा मोठ्या- प्रमाणात भेदभाव होता. श्वेतवर्णीयांच्या शिक्षण संस्थांमध्ये निग्रो लोकांना प्रवेश नव्हता. निग्रोंसाठी स्वतंत्र शाळा होत्या त्यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट होता. त्यांच्यासाठी उच्चशिक्षण उपलब्ध नव्हते. एकंदरीत त्यांची शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टिकोनातून सुद्धा कोंडी करण्यात आली होती. त्यामुळं त्यांची शैक्षणिक परिस्थिती अत्यंत बिकट होती.

### २.६.३. आर्थिक क्षेत्रातील स्थिती:

अब्राहम लिंकनच्या मृत्यूनंतर निग्रोंची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट झाली होती. त्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्याची संधी नव्हती. त्यामुळे त्यांना शेतीवरच काम करावे लागत होते. अकुशल कामगार, शेतमजूर व खंडाने शेती करणारा कूळ असेच त्यांच्या कामाचे स्वरूप असे. ही सर्व कामे अत्यंत कष्टाची व मेहनतीची होती मात्र त्यातून प्राप्त होणारा मोबदला हा अत्यंत अल्प होता परिणामी त्यांची आर्थिक उन्नती होण्या ऐवजी आर्थिक अवनती मोठ्या प्रमाणात झाली होती. त्यामुळेच त्यांची आर्थिक स्थिती सुध्दा अत्यंत बिकट होती.

### २.६.४.राजकीय  क्षेत्रातील स्थिती:

अब्राहम लिंकनच्या मृत्यूनंतर निग्रोंची राजकीय परिस्थिती अत्यंत वाईट झाली होती. त्यांना मतदानाच्या राजकीय हक्कापासून दूर ठेवण्यात आले होते. यासाठी त्यांच्यावर उत्पन्नाची व शैक्षणिक पात्रतेची अट लादण्यात आली होती. यापुढे जावून त्यांच्यावर निवडणूक करही लादण्यात आला होता. तसेच राजकिय स्वरूपात त्यांच्यावर कोणताही अत्याचार झाला तर त्यांना न्यायालयात दाद मिळत नसे. न्यायाधीश त्यांच्या तक्रारीची दखलही घेत नव्हते. त्यामुळेच त्यांची राजकीय स्थिती सुध्दा अत्यंत बिकट होती.

### २.६.५ धार्मिक क्षेत्रातील स्थिती:

निग्रोंना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील वागणुकी सारखीच भेदभावाची वागणूक धार्मिक क्षेत्रात सुद्धा दिली जात होती.

बऱ्याच ठिकाणी निग्रोंसाठी वेगळे चर्च होते. तर काही ठिकाणी असणाऱ्या चर्चमध्ये निग्रोंसाठी वेगळी जागा राखून ठेवलेली असे. ज्या ठिकाणी त्यांची राखीव जागा असे त्या ठिकाणी त्याने बसणे बंधनकारक असे. जर निग्रोने हे दिलेले नियम  मोडले तर त्यांना कडक शासन केले जात होते. त्यामुळेच त्यांची धार्मिक स्थिती सुध्दा अत्यंत बिकट होती.

**आपली प्रगती तपासा :**

१. निग्रोंच्या स्थितीचे थोडक्यात वर्णन करा.

## २.७ नागरी हक्क चळवळ

"अमेरिकेतील निग्रो लोकांनी त्यांच्या समानतेच्या हक्कासाठी सुरू केलेली चळवळ म्हणजे नागरी हक्क चळवळ होय".

अमेरिकेच्या इतिहासातील एक ऐतिहासिक घटना म्हणून या चळवळीचा उल्लेख केला जातो. अमेरिकेतील निग्रो वंशाच्या वेगवेगळ्या संघटनांनी निग्रोंना मतदानाचा हक्क, सार्वजनिक स्थळी प्रवेश, शैक्षणिक व आर्थिक संधीच्या प्राप्ती यासाठी ही चळवळ सुरू केली होती.

**२.७.१.निग्रो संघटनांची निर्मिती :**

अमेरिकेतील निग्रो लोकांना संघटीत करण्यासाठी व त्यांच्या न्याय हक्काच्या लढ्यासाठी अमेरिकेत वेगवेगळ्या संघटना स्थापन झाल्या होत्या. या संघटनांमध्ये 'नॅशनल असोसिएशन फॉर दि ऍडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल' व 'काँग्रेस ऑफ रेशल इक्वालिटी' या दोन संघटनांचा समावेश आहे. यापैकी 'नॅशनल असोसिएशन फॉर दि ऍडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल' ही संघटना निग्रो लोकांची सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती सुधारावी यासाठी प्रयत्नशील होती. तर 'काँग्रेस ऑफ रेशल इक्वालिटी' ही संघटनां निग्रोना अमेरिकन समाजात समानतेची वागणूक मिळावी यासाठी प्रयत्नशील होती. या दोन्ही संघटनांनी श्वेत वर्णीयांच्या जुलूमशाहीला तोंड देत दुर्बल निग्रो लोकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी व त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी अखंड प्रयत्न सुरू केले होते. याही पुढे जावून या संघटनानी १९५४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निग्रो बाबतच्या अनुकूल निकालाचा आधार घेत निग्रोंच्या न्याय हक्कासाठी अहिंसेच्या मार्गाने लढा सुरू केला.

**२.७.२.रोझपार्क प्रकरण :**

रोझपार्क ही एक प्रौढ निग्रो महिला होती. ही महिला अलबामा राज्यातील मॉटगोमेरी शहरातून बसमधून प्रवास करत होती. मात्र  या महिलेने प्रवास करताना आपल्या शेजारी उभ्या असलेल्या गोऱ्या पुरुषाला आपली जागा दिली नाही. त्यामुळेच या साध्या कारणावरून या महिलेला अटक करण्यात आली. या पक्षपाती घटनेचा निषेध म्हणून डॉ. मार्टिन ल्युथर किंग या अवघ्या २५ वर्षीय निग्रो धर्मोपदेशकाच्या नेतृत्वाखाली अलबामा राज्यातील निग्रोंनी संघटीत आंदोलन सुरू केले. व या राज्यातील बस वाहतुकीवर कडकडीत बहिष्कार टाकला. हा बहिष्कार जळजळ वर्षभर चालला. या बहिष्काराचे विपरीत परिणाम लक्षात येताच या बस कंपनीने निग्रोंबाबत पक्षपाताचे केले जाणारे धोरण बंद केले. त्यामुळे या चळवळीला हा मोठा विजय मिळाला.

**२.७.३.डॉ. मार्टिन ल्युथर किंगची भूमिका :**

डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांनी हजारो निग्रो तरुणांना एकत्रित करून त्यांच्या मनामध्ये निग्रोंच्या न्याय हक्कसाठी प्रेरणा निर्माण केली होती व सनदशीर मार्गाने अहिंसेच्या मार्गाने आपला लढा सुरू केला होता यासाठी त्यांनी अटलांटा शहरात 'सदर्न ख्रिश्चन लीडरशिप कॉन्फरन्स 'नावाची संस्था स्थापन केली. पुढे हिच संस्था निग्रोंच्या न्याय हक्काच्या अहिंसक लढ्याचे केंद्र बनली. आत्मिक बळाच्या जोरावर अहिंसेच्या मार्गाने व शांततापूर्ण जनआंदोलनाने श्वेतवर्णीयांचे परिवर्तन घडवून निग्रोना न्याय हक्क मिळतील अशी डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांची ठाम भूमिका होती. श्वेतवर्णीयांनी मात्र डॉ. मार्टिनल्युथर किंग यांच्या भूमिकेला सातत्याने विरोध केला. त्यांना अनेकवेळा मारहाण केली. अनेक

आंदोलनात त्यांना अटक केली. त्यांना सक्तमजुरीची शिक्षाही ठोठाविण्यात आली. मात्र आपल्या आंदोलनापासून ते यत्किंचितही ढळले नाहीत.

### २.७.४. उपहारगृह प्रवेश लढा:

उत्तर कॅरोलीनातील उलवर्थ या शहरातील उपहारगृहात निग्रोना खाद्य पदार्थ देण्यास उपहारगृहातील एका गोऱ्या सेविकेने नकार दिला. या नकाराचा निषेध म्हणून तेथे उपस्थित असणाऱ्या सर्वच निग्रो लोकांनी धरणे आंदोलन करून जो पर्यंत आम्हाला उपहारगृहातून खाद्य पदार्थ उपलब्ध होत नाहीत तो पर्यंत आम्ही या उपहारगृहातून बाहेर जाणार नाही असे ठणकावून सांगितले. शेवटी काही तासाच्या अंतराने उपहारगृहाच्या मालकाने निग्रोंची मागणी मान्य केली. पुढे निग्रोंनी याच आंदोलनाच्या अस्त्राचा वापर करत आंदोलनाची आक्रमकता वाढविली. त्यामुळेच दक्षिणेतील बरीच उपहारगृहे व भोजनालये निग्रोंसाठी खुली करण्यात आली. या कामगिरीमुळे निग्रोंच्या नागरी हक्क चळवळीला हे मोठे यश मिळाले.

### २.७.५.१९६० चा नागरी हक्क कायदा :

अमेरिकेतील ७५% निग्रो लोकांना मतदानापासून वंचित ठेवण्यासाठी जे जे लोक कार्य करत होते अशा लोकांवर कडक कारवाई करण्यासाठी १९६० मध्ये नागरी हक्क कायदा अमलात आणला. या कायद्याने निग्रो लोकांना दिलासा मिळाला. मात्र या कायद्याचा प्रत्यक्ष व्यवहारात श्वेत वर्णीयांवर कोणताही प्रभाव न झाल्याने या कायद्याचे महत्त्व कमी झाले. असे जरी असले तरी निग्रोंच्या राजकीय परिवर्तनासाठी या कायद्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रित्या नंतर फायदा झाला हे नाकारता येणार नाही.

### २.७.६ .जॉन केनेडीकडून दिलासा:

जॉन केनेडी हा डेमोक्रॅटिक पक्षाचा कार्यकर्ता होता. त्याला १९६० च्या निवडणुकीसाठी डेमोक्रॅटिक पक्षातर्फे उमेदवारी मिळाली होती. प्रभावी व्यक्तिमत्व, अप्रतिम संघटन कौशल्य व सहकाऱ्यांसोबतचा आत्मविश्वास तसेच व्यवहारचातुर्याच्या जोरावर त्यांनी डेमोक्रॅटिक पक्षाच्या माध्यमातून पुरोगामी कार्यक्रम घेवून निवडणूक लढवली व या निवडणुकीचा प्रचार करतांना आपला पक्ष निग्रोंना त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात नागरी हक्क मिळवून देण्यास मदत करील असे जाहीर केले व त्यांनी ही अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्यास सुरवात केली. निवडणुकीच्या कामामध्ये व्यस्त असतानाच जॉन केनेडीना असे समजले की वाहतूक नियमांचे भंग केल्याच्या साध्या कारणावरून डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांना चार महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे व ते आता शिक्षा भोगत आहेत. सर्वप्रथम जॉन केनेडीने डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांच्या पत्नीला फोन करून त्यांचे सांत्वन केले नंतर आपल्या राजकीय ताकदीचा वापर करत त्यांनी डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांची कारागृहातुन सुटका केली. त्यामुळेच निग्रो लोक व मार्टिन ल्युथर किंग एकदिलाने जॉन केनेडीच्या पाठीशी उभे राहिले.

### २.७.८ निग्रोंच्या मुक्तीप्रवासाची सुरवात :

आंतरराज्य प्रवासात निग्रोंना नेहमीच पक्षपाती वागणूक मिळत होती. या प्रथेच्या विरोधात मुक्ती प्रवास ही अभिनव योजना हाती घेतली. या अभियानांतर्गत काही निग्रो व त्यांचे काही

गौरवर्णीय मित्र एकत्रित येवून एकुण१३ मुक्तीप्रवास बसने वॉशिंगटन ते न्यूऑर्लीअन्सला प्रवासाला निघाले.या मुक्तीप्रवास बसेसचा उत्तरेकडील राज्यानमधील प्रवास अत्यंत सुखरूप झाला मात्र दक्षिणेकडील राज्यात मुक्तीप्रवाशाना प्रवेश करताच चित्र एकदम पालटले. गौरवर्णीयांच्या विखारी द्वेषाचा ठीकठिकाणी सामना करावा लागला. मुक्ती प्रवास करणाऱ्या बसेसवर दगडफेक करणे, बसेस पटवणे असे भयंकर प्रकार घडू लागले शेवटी हिंसक प्रकार वाढल्यानंतर दक्षिणेतील राज्यासरकारांच्या मदतीने मुक्तीप्रवास करणाऱ्यांच्या मदतीला सशस्त्र लष्कर पाठवावे लागले. सरते शेवटी केनेडी शासनाच्या सक्त आदेशामुळे दक्षिणेतील बस, रेल्वे व विमान कंपन्यांना नमते घ्यावे लागले व निग्रो प्रवाशांबाबत प्रवसासंदर्भात होणारा पक्षपात रद्द करावा लागला .

### २.७.९ जॉन केनेडी सरकारचे अनुकूल धोरण:

केनेडी सरकारने सुरवातीपासूनच निग्रो लोकांच्या बाबतीत अनुकूल धोरणाचा अवलंब केला. निग्रो समाजातील अत्यंत हुशार व बुद्धिमान लोकांची नियुक्ती शासनाच्या वेगवेगळ्या भागात केली.

- हाऊसिंग व होमफायनान्स समितीच्या अध्यक्षपदी रॉबर्ट विव्हरची निवड केली.
- सर्किट कोर्टात थरगुड मार्शल या कायदेतज्ञांची करण्यात आलेली निवड.
- फिनलंड मधील अमेरिकन राजदूत म्हणून करण्यात आलेली कार्ल रोवन यांची निवड.

याही पुढे जावून निग्रो मुलांना प्रवेश मिळू नये म्हणून ज्या दक्षिणेतील शिक्षण संस्थांनी आपल्या शाळांना कुलपे लावली होती त्या सर्व शाळा त्वरित सुरू कराव्यात व या शाळांमध्ये गौरवर्णीयांच्या मुलांबरोबरच निग्रोनच्या मुलांनाही प्रवेशे देण्यात यावा असे आदेश काढले. तसेच अब्राहम लिंकन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शासकीय कार्यक्रमात राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनी शेकडो प्रतिष्ठित कृष्णवर्णीयांना आमंत्रित केले. राष्ट्राध्यक्ष केनेडींच्या या अनुकूल धोरणाचा फायदा निग्रो लोकांना झाला व त्यांचा आत्मविश्वास वाढला.

### २.७.१० रॉबर्ट केनेडीचे धोरण :

रॉबर्ट केनेडी हा राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडींचा भाऊ होता. त्यांनी निग्रो लोकांना इतकी मदत केली की दोन वर्षात तो निग्रो लोकांचा कैवारी बनला. रॉबर्ट केनेडी यांनी न्याय खात्यात अनेक निग्रो लोकांची भरती केली. व घटक राज्यांमध्ये गुणवत्तापूर्ण निग्रो लोकांच्या नियुक्त्या व्हाव्यात असे आदेश काढले. अनेक न्यायालयातील निग्रोंचे खटले प्रलंबीत असत ते खटले लवकरात लवकर निकाली काढण्यात यावेत असे आदेश काढले. एकंदरीत निग्रो न्यायहक्क संघर्षामध्ये रॉबर्ट केनेडी यांची महत्वपूर्ण मदत झाली हे आपणांस नाकारता येणार नाही.

### २.७.११ जेम्स मेरीडेथ प्रकरण :

जेम्स मेरीडेथ हा निग्रो विद्यार्थी होता. त्यांनी मिसिसिपी राज्यातील विद्यापीठात प्रवेश मिळावा म्हणून अर्ज केला होता मात्र या विद्यापीठाने त्याचा अर्ज फेटाळून त्याचा प्रवेश

नाकारला. या घटनेला अनुसरून तो न्यायालयात गेला. न्यायालयाने त्याला न्याय देत त्याला या विद्यापीठात प्रवेश देण्याचे आदेश दिले. मात्र निग्रो द्वेष्ट्या गव्हर्नर रॉस बार्नेट यांनी जेम्स मेरीडेथ याला विद्यापीठातून हाकलुन दिले. मात्र राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांनी गव्हर्नर रॉस बार्नेटवर दबाव आणून जेम्स मेरीडेथला प्रवेश देण्यास भाग पाडले. जेम्स मेरीडेथ जेव्हा विद्यापिठात आला तेव्हां त्याच्यावर दगड, ऍसिड व बळ बल्बचा तुफानी हल्ला झाला. त्याच्या बचावासाठी करण्यात आलेल्या कारवाईत ३७५ लोक जायबंदी झाले. असे असतांनाही जेम्स मेरीडेथ यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत आपले दोन वर्षाचे शिक्षण पुर्ण केले.

### २.७.१२ निग्रों विरोधात आक्रमक हिंसाचार :

जॉन केनेडी यांचे सरकार निग्रो लोकांच्या हिताचे निर्णय घेत आहे हे लक्षात येताच गौरवर्णीय आक्रमक झाले. त्यांनी निग्रो व निग्रो समर्थकांवर अमानुष अत्याचार करण्यास सुरुवात केली. यातूनच निग्रो लोकांचे हत्यास्त्र सुरू झाले.

- अलबामात विलियम मूर या निग्रोसमर्थक गौरवर्णीयांची एप्रिल १९६३ मध्ये हत्या करण्यात आली.
- जॅक्सन शहरात मेगर एवर्स या निग्रो नेत्यांची राहत्या घरी गोळ्या घालून हत्या करण्यात आली.
- मिसिसिपी मध्ये ईव्हर्स या निग्रो नेत्यांची क्रूर हत्या करण्यात आली. या हत्या सुरू असतांनाच १५ सप्टेंबर १९६३ रोजी बर्मिंगहॅम शहरात माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. या ठिकाणच्या चर्चवर बॉंब फेकण्यात आला यात निष्पाप चार लहान मुलांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे निग्रो आक्रमक झाले व सर्व शक्तीनिशी गौरवर्णीयांना प्रतिकार करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

### २.७.१३.जॉन केनेडीची हत्या :

अमेरिकेतील निग्रो लोकांना त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात अधिकार प्राप्त झाल्याशिवाय अमेरिका हे मुक्त राष्ट्र बनणार नाही याची कल्पना जॉन केनेडी यांना होती. यासाठीच अमेरिकेतील सर्व दुकाने, विक्रिकेन्द्र, उपहारगृहे, निवासगृहे, शिक्षणसंस्था व वसतिगृहे निग्रोंसाठी खुली राहावी म्हणुन व्यापक विधेयक मांडले होते. जॉन केनेडीनी मांडलेल्या विधेयकाला नैतिक पाठबळ यावे म्हणुन मार्टिन ल्युथर किंग यांच्या नेतृत्वाखाली अडीच लाख  निग्रो लोकांनी एकत्र येवून पाठबळ दर्शविले होते. निग्रोंच्या न्याय हक्काच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असतानाच जॉन केनिडीचे विरोधक त्यांची हत्या करण्याच्या कटात गुंतले होते. कटाची रचना पुर्ण झाल्यानंतर २२ नोव्हेंबर २०२१ रोजी टेक्सस राज्यातील डलास शहरात मोटारीतून जात असताना जॉन केनेडीची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. निग्रोंच्या न्याय हक्कसाठी लढणाऱ्या एका विचारी नेतृत्वाचा असा दुर्दैवी अंत झाला. जॉन केनेडीच्या हत्येनंतर त्यांचा मारेकरी जॉन फित्झगेराल्ड याला अटक करण्यात आली. मात्र जॉन केनेडीच्या मृत्यूने निग्रोंच्या नागरी हक्क चळवळीला मोठा धक्का बसला.

**२.७.१४ राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांची भूमिका :**

जॉन केनेडीच्या हत्येनंतर उपाध्यक्ष असणाऱ्या लिंडन जॉन्सन यांनी शपथ घेवून सत्तेची सूत्रे हाती घेतली व जॉन केनेडीने निग्रोंच्या बाबतीत मांडलेले विधेयक संमत करणे किती गरजेचे आहे हे काँग्रेसला पटवून दिले. अखेरीस जुलै १९६४ मध्ये नागरी हक्क कायदा संमत झाला. या कायद्यान्वये वांशिक भेदभाव न करता सर्व अमेरिकन नागरिकांना मतदानाचा समान हक्क असावा, सार्वजनिक ठिकाणी प्रवेशाचा सर्वांना अधिकार असावा, शैक्षणिक संस्थांमध्ये भेदभाव नसावा, संघशासनाकडून कंत्राट मिळविणारा कंत्राटदार वांशिक पक्षपात करत असेल तर त्याचे कंत्राट रद्द करावे, सामाजिक व आर्थिक संस्थांमध्ये लिंगभेद व वंशभेदला मनाई करण्यात यावी आदी बाबींचा या कायद्यामध्ये समावेश होता. या कायद्यामुळे निग्रो लोकांना खऱ्या अर्थाने यश दृष्टीपथास पडले .

**२.७.१५. मतदान हक्क कायदा :**

निग्रो लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांचा मतदानाचा हक्क नाकारण्यात आला होता. मात्र मतदान हक्क कायद्यामुळे सर्व निवडणुकांसाठी राष्ट्र, राज्य व स्थानिक पातळीसाठी मतदारांच्या नोंदी व्हाव्यात व मतदानाचा अधिकार सर्वानाच बजावता यावा यासाठी सर्व अधिकार त्या त्या राज्यातील ॲटर्नि जनरलला देण्यात आले. सर्वानाच मतदानाचा हक्क प्राप्त व्हावा यासाठी नोंदणी सुरू झाली व अल्पावधीतच दक्षिणेतील चार राज्यांमध्ये १२४००० कृष्णवर्णीयांची भर पडली. तर अन्य सहा राज्यांमध्ये मतदार याद्यातील कृष्णवर्णीय मतदारांचे प्रमाण ४०% वरून ४६% वर गेले. परिणामी या कायद्यामुळे निग्रोंच्या राजकीय प्रवेशाचा व राजकीय वाटचालीचा मार्ग मोकळा झाला.

अमेरिकेतील निग्रो लोकांनी आपल्या न्याय हक्कसाठी नागरी हक्क चळवळ सुरू केली होती. ही चळवळ यशस्वी करण्यासाठी सर्वप्रथम निग्रो लोकांनी संघटना निर्मितीकडे लक्ष दिले. नंतर बस प्रवास, उपहारगृह प्रवेश, निग्रोंचा मुक्ती प्रवास लढा, शिक्षण प्रवेश संघर्ष, मतदान हक्क लढा आदी घटनांतून प्रयत्न केले. अशातच राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी व त्यांचे अनुकुल धोरण तसेच रॉबर्ट केनेडी यांचे सहकार्य याच्या जोरावर ही चळवळ यशाच्या अंतिम टप्प्यात येण्यास मदत झाली. तसेच ही चळवळ यशस्वी करण्यासाठी मार्टिन ल्युथर किंग या महान नेतृत्वाने अथक प्रयत्न केले. त्यांचेही कार्य खऱ्या अर्थांने या चळवळीच्या यशाने यथार्थ झाले.

**आपली प्रगती तपासा :**

नागरी हक्क चळवळीची माहिती सांगा.

## २.८ मार्टिन ल्युथर किंगची भूमिका

निग्रोंचे असह्य जगणे, निग्रोंमध्ये वाढणारी बेकारी, निग्रो कामगारांची होणारी पिळवणूक, निग्रोंना गौरवर्णीयांकडून मिळणारी पक्षपाती वागणूक, उपहारगृह, वाहतुक सेवा, धार्मिक स्थळे, शिक्षण संस्था या सार्वजनिक ठिकाणी त्यांच्यावर होणारे अन्याय हे दिवसेंदिवस वाढू लागल्याने निग्रोंच्या न्याय हक्कासाठी डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांनी लढण्याचा निर्णय घेवून

लढ्याच्या आरंभापासून ते अंतिम श्वासापर्यंत नियोजनबद्ध, विचाराने व कार्यक्षमतेने लढले. त्यांना माहीत होते की निग्रोंसाठी नागरी हक्क कायदे मंजूर झाले आहेत मात्र त्यांची प्रत्यक्ष अमलबजावणी होत नाही. यासाठीच त्यांनी आपला हा लढा सुरू केला होता.

### २.८.१. प्रभावी नेतृत्व :

डॉ. मार्टिन ल्युथर किंग हे एक प्रभावी व प्रेरणादायी नेतृत्व होते. त्यांनी मरगळलेल्या, मागासलेल्या व दयनीय अवस्थेत जीवन जगणाऱ्या निग्रो समाजाला जागृत केले. त्यांच्या मनामध्ये नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्यामध्ये अन्यायाला प्रतिकार करण्याची क्षमता निर्माण केली. याहीपुढे जावून त्यांनी निग्रो समाजातील लोकांना अन्याय , अत्याचार-पक्षपात या विरुद्ध लढण्यासाठी समर्थपणे उभे केले. निग्रो लोकांच्या मनामध्ये विलक्षण आशावाद निर्माण केला.

### २.८.२. अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग:

डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांनी निग्रोंच्या न्याय हक्कासाठी लढा देतांना अहिंसात्मक सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला. सत्याग्रह करत असतांना शांतता व सनदशीर मार्गाने सत्याग्रह केले. मोर्चे काढत असतांना विराट मोर्चे काढले. अहिंसेच्या मार्गाने शिस्तबद्ध निदर्शने केली. सभा भरवत असतांना सुद्धा विशाल सभा भरविल्या. आपल्या प्रभावी वक्तृत्वाने अनेक सभा गाजविल्या. अनेक सभांमधून असंख्य लोकांची मने जिंकली. निग्रोंच्या ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्याचे, अमेरिकन जनमत जागृत करण्याचे व निग्रोंच्या दृष्टीने अनुकुल करण्याचे तसेच निग्रोंच्या प्रश्नाबाबत संघशासनाचे लक्ष वेधण्याचे व संघशासनावर दडपण आणण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. हे सर्व कामगिरी करत असताना त्यांनी आपला अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग यत्किंचितही सोडला नाही. त्यामुळेच अल्पकाळताच त्यांच्या कार्याचा नावलौकिक वाढला.

### २.८.३ ख्रिश्चन लिडरशीप कॉन्फरन्स चे अध्यक्ष :

अटलांटा येथे भरलेल्या ख्रिश्चन लिडरशीप कॉन्फरन्सचे अध्यक्षस्थान भूषवितांना डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांनी आपल्या मावळ धोरणाला अनुसरून आपण नागरी हक्क चळवळ अहिंसात्मक मार्गाने चालविणार असल्याचे ठामपणे जाहीर केले. ख्रिश्चन लिडरशीप कॉन्फरन्स मध्ये आपल्याला ही चळवळ अहिंसेच्या व शांततेच्या मार्गाने पुढे न्यायला पाहिजे असे प्रतिपादन केले. म्हणुनच त्यांना अमेरिकेचे महात्मा गांधी असे म्हटले जाते. त्यानें या कॉन्फरन्स मध्ये आपल्या प्रभावशाली वक्तृत्वाने उपस्थितांची मने जिंकली.

### २.८.४. डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांचे पाहिले यश:

रोझपार्क ही एक प्रौढ निग्रो महिला होती. ही महिला अलबामा राज्यातील मॉंटगोमेरी शहरातून बसमधून प्रवास करत होती. मात्र या महिलेने प्रवास करताना आपल्या शेजारी उभ्या असलेल्या गोऱ्या पुरुषाला आपली जागा दिली नाही. त्यामुळेच या साध्या कारणावरून या महिलेला अटक करण्यात आली. या पक्षपाती घटनेचा निषेध म्हणून डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांच्या नेतृत्वाखाली अलबामा राज्यातील निग्रोंनी संघटीत आंदोलन सुरू केले. व या राज्यातील बस वाहतुकीवर कडकडीत बहिष्कार टाकला. हा बहिष्कार जळजळ वर्षभर चालला. या बहिष्काराचे विपरीत परिणाम लक्षात येताच या बस कंपनीने

निग्रोंबाबत पक्षपाताचे केले जाणारे धोरण बंद केले. हे डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांचे पाहिले यश मानले जाते.

**२.८.५. ग्रीन्सबरो विद्यापिठातील धरणे कार्यक्रम :**

अमेरिकेत मध्ये स्टुडंट नॉन - व्हायलंट कॉऑर्डीनेटिंग कमिटी प्रचलीत होती. या कमिटीने डॉ. मार्टिन लुथरच्या आदेशानुसार ग्रीन्सबरो विद्यापीठात धरणे कार्यक्रम आयोजित केला होता. या धरणे कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थांना अटक करून कोर्टात आणले तेंव्हा या विद्यार्थ्यांना प्रतिकात्म शिक्षा देवून सोडण्यात आले. तसेच या धरणे कार्यक्रमाचे कोर्टाने कौतुक केले. व पुढे १९६० मध्ये नगरी हक्काची अंमलबजावणी करणारा कायदा काँग्रेसने प्रतिनिधी सभागृहाने मंजूर केला.

**२.८.६. वॉशिंग्टनमधील मेळाव्याचे नेतृत्व :**

डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांच्या नेतृत्वाखाली लिंकन स्मृती परिसरात अमेरिकेतील सर्व धर्म विचारी लोकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास २ लाख ५० हजार लोक उपस्थित होते. या मेळाव्यात काळ्या-गोऱ्यांचा 'नैतिकतेचा पेचप्रसंग'दूर करण्याचे विनम्र आवाहन डॉ. अब्राहम लिंकन यांनी केले. या अहिंसात्मक मेळाव्यास संपूर्ण देशातून पाठिंबा मिळाला.

**२.८.७ वॉशिंग्टन मधील मेळाव्याचे पडसाद :**

वॉशिंग्टनमधील मेळाव्यास सर्व धर्मातील समविचारी लोक एकत्र आले होते. याची भीती दक्षिणेत निर्माण झाली. यातून दक्षिणेच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला तर परिस्थिती बिकट होईल म्हणुनच दक्षिणेतील लोकांनी हत्यासत्र सुरू केले. अलबामात विलियम मूर या निग्रोसमर्थक गौरवर्णीयांची एप्रिल १९६३ मध्ये हत्या करण्यात आली. जॅक्सन शहरात मेगर एवर्स या निग्रो नेत्यांची राहत्या घरी गोळ्या घालून हत्या करण्यात आली. मिसिसिपी मध्ये ईव्हर्स या निग्रो नेत्यांची क्रूर हत्या करण्यात आली. हे हत्या सुरू असतांनाच १५ सप्टेंबर १९६३ रोजी बर्मिंगहॅम शहरात माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. या ठिकाणच्या चर्चवर बॉंब फेकण्यात आला यात निष्पाप चार लहान मुलांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे निग्रो आक्रमक झाले व सर्व शक्तीनिशी गरवर्णीयांना प्रतिकार करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

**२.८.८. घटनात्मक कार्यप्रणालीतील यश :**

डॉ. मार्टिन ल्युथर किंग जॉन केनेडी यांचे संबंध अत्यंत निकटचे होते त्यांच्या कारकिर्दीत नागरी हक्क कायदा करण्याचे जाहीर झाले होते मात्र त्यांच्या हत्येनंतर सत्तेवर आलेल्या लिंडन जॉन्सन यांच्या कारकिर्दीत १९६४ मध्ये हा कायदा मंजूर झाला. तसेच ६ ऑगस्ट १९६४ रोजी मतदान हक्क कायदा पास झाला. त्यामुळे निग्रोंना घटनात्मक दृष्टीकोनातून न्याय मिळवून देण्यात डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांना यश आले.

**२.८.९. नागरी हक्क चळवळीत फुट :**

निग्रोंसाठी घटनात्मक बाजू आशादायक व आनंद देणारी होती मात्र त्याची अंमलबजावणी अत्यंत कठीण होती.त्यामुळेच निग्रोंची बेकारी वाढली होती. निग्रो कामगारांची पिळवणूक

थांबली नव्हती. निग्रो लोक बकाल वस्त्यांमध्ये राहत होते. असंख्य आरोग्यविषयक प्रश्नांना ते तोंड देत होते. पोलिसांचे अत्याचार, उदासीन सरकार व गोऱ्यांची वांशिक मानसिकता या सर्वच गोष्टीना निग्रो लोक कंटाळले होते. ही परिस्थिती बदलण्यात मार्टिन लुथर किंग यांनी सुरू केलेली चळवळ अपयशी ठरत आहे असे पडसाद उमटू लागले व अशा विचारांचा एक वेगळा वर्ग तयार झाला व त्यांनी गोऱ्या लोकांना 'जशास तसे' उत्तर देण्याचा निर्णय घेतला व ठीक ठिकाणी छुपे हल्ले, जाळपोळ व नासधूस करण्यास सुरुवात केली. त्यांच्या या आक्रमक धोरणामुळे ३० शहरांमध्ये १०० लोकांचे बळी गेले. मात्र असे असतांनाही डॉ. मार्टिन ल्युथर किंग हे आपल्या धोरणापासून व तत्वांपासून यत्किंचितही ढळले नाहीत. त्यांनी आपली अहिंसेच्या मार्गातील चळवळ अशाही परिस्थितीत चालू ठेवली.

### २.८.१०. डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांची हत्या :

डॉ. मार्टिन ल्युथर किंग अत्यंत संयमाने आपले काम करत होते. निग्रो चळवळीत फुट पडल्यानंतर सुरू झालेला हिंसाचार थांबविण्यासाठी अत्यंत तळमळीने प्रयत्न करत होते. याकामी निग्रो लोकांबरोबरच गोऱ्या लोकांचाही त्यांना पाठींबा मिळत होता. संपूर्ण जगात त्यांच्या कार्याचे कौतुक होत होते. या कामाचा गौरव म्हणून त्यांना १९६७ चा जागतिक शांततेचा  नोबल पुरस्कार ही देण्यात आला होता. अशातच आपल्या कार्याचा एक भाग म्हणून ४एप्रिल १९६८ मध्ये डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांनी टेनेसी राज्यातील मेंफिस शहरात  एक सभा आयोजित केली होती याच सभेत एका निग्रो माथेफिरूने गोळी घालून हत्या केली.

## २.९ विसाव्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यातील निग्रोंची स्थिती

१९ व्या शतकात दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिका यादवी युद्ध झाले तेव्हां पासून निग्रो लोक आपल्या न्याय हक्कसाठी लढत होते अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी, त्यांचे बंधू रॉबर्ट केनेडी, राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन या व्यक्तींचे सहकार्य लाभल्याने व निग्रोंच्या सुधारणा प्रवाहाला घटनात्मक जोर मिळाल्याने तसेच डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांचे कार्यक्षम नेतृत्व लाभल्याने ही चळवळ खऱ्या अर्थाने यशस्वी झाली होती. मात्र असे जरी असले तरी अजूनही अमेरिकेतील काळे-गोरे हा भेदभाव संपला नाही. आजही अमेरिकेत वांशिक संघर्ष सुरू आहे. या संघर्षातून आजही हिंसाचार उद्भवतात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे १९९२ मध्ये चार गोऱ्या पोलिसांनी लॉस इंजेलिस शहरात एका निग्रो ड्रायव्हरला भयानक मारले.शेकडो लोकांनी ही घटना पहिली. याचे चित्रीकरण केले. तरीही या चारही पोलिसांना कोर्टाने निर्दोष सोडले. या घटनेमुळे निग्रो लोकांनी दंगली केल्या या दंगलीतही अनेक लोक मारले गेले याचाच अर्थ असा होतो की आजही ही चळवळ खाऱ्यार्थांने पूर्णत्वाला पोहचली नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१. मार्टिन ल्युथर किंग यांची कामगिरी थोडक्यात सांगा.

## २.१० सारांश

अमेरिकेतील निग्रो लोकांना वांशिक भेदभावामुळे अत्यंत दुःखद व कष्टमय जीवन जगावे लागत होते. म्हणूनच अमेरिकेतील निग्रो लोकांनी आपल्या न्याय हक्कसाठी  नागरी हक्क चळवळ सुरू केली होती. या चळवळीस डॉ. मार्टिन ल्युथर यांच्या सारखे प्रभावी नेतृत्व लाभल्याने ही चळवळ अहिंसेच्या मार्गाने अंतिम टप्प्यापर्यंत पोहचली. या चळवळीला अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी, त्यांचे बंधू रॉबर्ट केनेडी, राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन या व्यक्तींचे सहकार्य लाभले तसेच घटनात्मक कायद्याच्या पाठबळामुळे ही चळवळ कायदेशीर दृष्टिकोनातून यशस्वी झाली. मात्र मानसिक व नैतिक दृष्टीकोनातून या चळवळीला परिपूर्णता प्राप्त झाली नाही. असे जरी असले तरी केवळ अमेरिकेच्या नव्हे तर जगाच्या इतिहासात या चळवळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## २.११ प्रश्न

१. अमेरिकेतील निग्रोंच्या स्थितीचा आढावा घ्या ?

२. अब्राहम लिंकनच्या कामगिरीवर भाष्य करा?

३. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीवर एक दृष्टीक्षेप टाका?

४. डॉ. मार्टिन ल्युथरच्या कामगिरीचे परीक्षण करा ?

## २.१२ संदर्भ

१. प्राचार्य य.ना.कदम, 'विसाव्या शतकातील जगाचा इतिहास'

२. डॉ.धनंजय आचार्य, 'विसाव्या शतकातील जग'

३. एन.एस.तांबोळी, 'आधुनिक जग'

४. डॉ.पी.जी.जोशी, 'आधुनिक जग'

५. डॉ.सुमन वैद्य, 'आधुनिक जग'

*****

# ३

# नेल्सन मंडेला आणि दक्षिण आफ्रिकेतील वंशभेद विरोधी चळवळ

**घटक रचना**

३.० उद्दिष्टये

३.१ प्रस्तावना

३.२ डॉ. नेल्सन मंडेलांचा जीवन परिचय

३.३ वांशिक भेदभावाबाबतचा दृष्टिकोन

३.४ राजकीय प्रवेश

३.५ डॉ. नेल्सन मंडेलांचा वांशिक भेदभावाविरुद्ध लढा

३.६ दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी नियुक्ती

३.७ डॉ. नेल्सन मंडेलांच्या कामगिरीचे मूल्यमापन

३.८ सारांश

३.९ प्रश्न

३.१० संदर्भ

## ३.० उद्दिष्टये

१. डॉ.नेल्सन मंडेलांच्या जीवन परिचयाची माहिती जाणून घेणे.

२. डॉ.नेल्सन मंडेलांचा वांशिक भेदभावाबाबतचा दृष्टिकोन जाणून घेणे.

३. डॉ.नेल्सन मंडेलांच्या राजकीय प्रवेशासंदर्भातील माहितीचा आढावा घेणे.

४. डॉ.नेल्सन मंडेलांच्या वांशिक भेदभावाविरुद्ध लढ्याची माहिती जाणून घेणे.

५. डॉ.नेल्सन मंडेलांच्या अध्यक्षीय कारकिर्दीचा आढावा घेणे.

## ३.१ प्रस्तावना

दक्षिण आफ्रिकेतील डॉ. नेल्सन मंडेलांच्या नेतृत्वाखाली वंशभेद विरोधी चळवळ ही एक जागतिक इतिहासातील महत्त्वपूर्ण चळवळ मनाली जाते. त्यांनी स्वतःवंशभेदाच्या छळाचा अनुभव घेतला होता तसेच आपल्या कृष्णवर्णीय बांधवांवर होणारा अन्यथा, अत्याचार व पिळवणूक अत्यंत जवळून पाहिली होती. अशा वाईट गोष्टींचा व घटनांचा शेवट करण्याच्या उद्देशाने डॉ. नेल्सन मंडेलांनी आपल्या नेतृत्वाखाली अथक प्रयत्न करून वंशभेद विरुद्ध चळवळ उभी केली. प्रस्तुत प्रकरणात आपण डॉ. नेल्सन मंडेलांचा जीवन परिचय त्यांचा वांशिक भेदभावाबाबतचा दृष्टिकोन त्यांचा राजकीय प्रवेश, त्यांचा वांशिक भेदभावाविरुद्ध

लढा तसेच त्यांची दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाची कामगिरी व त्यांच्या सर्वांगीण कार्यप्रणालीचा मूल्यमापणात्मक आढावा आदी बाबतची माहिती पाहणार आहोत.

## ३.२ डॉ. नेल्सन मंडेलांचा जीवन परिचय

दक्षिण आफ्रिकेचे शिल्पकार व आफ्रिकन गांधी म्हणून समजल्या जणाऱ्या डॉ.नेल्सन मंडेलांचा जन्म ट्रान्सकेवी प्रांतातील कुनू गावी १९१८ मध्ये झाला होता. त्यांचे मूळ नावं 'रोलिल्हाल्हा' हे होते. त्यांचे हे नावं झोसा या आफ्रिकन भाषेतील होते. 'रोलिल्हाल्हा' या शब्दाचा अर्थ खट्याळ किंवा उनाड असा आहे. ते इंग्रजी शाळेत दाखल झाल्यानंतर त्यांच्या मॅडमने त्यांचे नावं नेल्सन असे ठेवले. नेल्सन या शब्दाचा अर्थ योद्धा असा आहे. त्यांच्या संघर्षमय आयुष्याकडे जर आपण पाहिले तर त्यांनी योद्धा या शब्दाचा अर्थ खऱ्या अर्थांने यथार्थ बनवला असे दिसते. त्यांचे सुरवातीचे शिक्षण क्लार्कबरी मिशनरी व मेथडिस्ट शाळेमध्ये झाले. नंतर ते कायद्याचे पदवीधर झाले. पुढे नंतर त्यांना स्कॉटलंड विद्यापीठाने डॉक्टरेट पदवी बहाल केली. त्यांच्याकडे उत्तम वक्तृत्व, उत्तम संघटन व प्रशासन कौशल्य होते, राजकीय मुत्सद्दीपणा होता, समयसूचकता व निर्णयक्षमता होती म्हणूनच ते अल्पावधीतच महान देशभक्त व लोकप्रिय नेत बनले. त्यांनी कृष्णवर्णीयांवर होणारे अन्याय, त्यांची होणारी पिळवणूक व त्यांच्या वाट्याला आलेले दयनीय जीवन अत्यंत जवळून पाहिले होते म्हणूनच त्यांनी आपले सर्व आयुष्य कृष्णवर्णीयांच्या उद्धारासाठी खर्च करण्याचा निर्णय घेतला व यातूनच त्यांच्या कार्याचा खऱ्या अर्थाने आरंभ झाला. व आपल्या अतुलनीय कार्याच्या जोरावर समस्त जनसमुदयाची मने जिंकण्यात त्यांना यश आले व ते लोकप्रिय नेते झाले.

## ३.३ वांशिक भेदभावाबाबतचा दृष्टिकोन

दक्षिण आफ्रिकेत गौरवर्णीयांपेक्षा कृष्ण वर्णीयांची संख्या जास्त आहे. मात्र गौरवर्णीय सत्ताधीश कृष्णवर्णीय लोकांना समजून घेत नाहीत. त्यांचे सभा, संचार, भाषण, धर्म व मुद्रण स्वातंत्र्य आदी हक्क नाकारण्यात आले आहेत. त्यांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले आहे, त्यांना पात्रतेप्रमाणे काम करण्याचा हक्क दिला जात नाही समान कामासाठी समान वेतन दिले जात नाही, सप्ताहात त्यांना ४० तास काम करावे लागते या कामाचा मोबदला त्यांना अत्यल्प प्रमाणात दिला जातो, बेकार असलेल्या कृष्णवर्णीय लोकांना बेकार भत्ता दिला जात नाही, त्यांना नि:शुल्क वैद्यकीय मदत मिळत नाही, त्यांचा पूर्ण शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला आहे, त्यांचे उपहारगृह, धार्मिक स्थळे, सार्वजनिक वाहतूक, प्रशासन व राजप्रणालीतील हक्क नाकारण्यात आले आहेत, त्यांना प्रशासकीय सेवेत समाविष्ट करून घेतले जात नाही व त्यांना गुलामप्रमाणे वागणूक दिली जात आहे. ही सर्व वांशिक भेदभावाला अनुसरून गौरवर्णीयांची वर्तणूक अन्यायकारक आहे म्हणूनच डॉ. नेल्सन मंडेला यांनी या वांशिक भेदभावाविरुद्ध आपले धोरण जाहीर केले.

जोपर्यंत शरीरात श्वास राहील तो पर्यंत कृष्णवर्णीय लोकांच्या न्याय हक्कासाठी लढले. त्यांना शिक्षण, सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, व्यवसाय, नोकऱ्या, मूलभूत हक्क, सेवा सुविधा या ठिकाणी सर्व घटकांना अनुसरून हक्क मिळवून देईल. हे हक्क मिळवून देण्यासाठी मी अखंडपणे अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करेल. जोपर्यंत या सर्व गोष्टी कृष्णवर्णीय लोकांना प्राप्त होत नाही तोपर्यंत हा न्याय हक्क लढा अखंडपणे सुरू ठेवले. कितीही संकटे आली तरी न डगमगता या कार्यपूर्तीसाठी सातत्याने नेटाने प्रयत्न करेल.

डॉ. नेल्सन मंडेलांच्या या धोरणामध्ये कृष्णवर्णीय लोकांच्या समस्यांबद्दल आदर होता, त्या सोडविण्यासाठीचा दृढ निश्चय होता, या समस्या सोडविण्यासाठी जो लढा द्यावा लागणार होता त्या लढ्याचे नियोजन होते, लढा कोणत्या मार्गाने द्यावयाचा आहे याची कार्यप्रणाली निश्चित होती. म्हणजेच त्यांनी आपला वांशिक भेदभावाबाबतचा दृष्टिकोन निश्चित केला होता.

## ३.४ राजकीय प्रवेश

डॉ. नेल्सन मंडेलांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते १९४१ मध्ये जो शहरात वास्तव्याला आले .सुरवातीला त्यांनी एका लोफरमध्ये उदरनिर्वाहासाठी करकुणाची नोकरी स्वीकारून आपल्या कामाची सुरुवात केली. हे काम करत असतांनाच सिसुल व वॉटर अल्बटाईन या दोन राजकारण्यां बरोबर परिचय झाला. त्यांच्या सोबत वावर सुरू झाला व या राजकीय लोकांच्या सहवासाने प्रेरित होवून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. त्यांनी जेंव्हा राजकारणात प्रवेश केला तेव्हां दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभाव मोठ्याप्रमाणात वाढलेला होता. म्हणुनच त्यानी १९४४ मध्ये नॅशनल युथ काँग्रेसचे सभासदत्व स्वीकारले व ते दक्षिण आफ्रिकेच्या राजकारणात सक्रिय झाले. वर्णभेद आंदोलनात सहभागी होणे हा त्यांच्या राजकीय प्रवेशाचा सुरुवातीचा उद्देश होता. आपल्या कार्यप्रणालीच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच आपल्या कार्याचा स्वतंत्रपणे ठसा उमटवला व या यशाच्या जोरावरच त्यांनी आफ्रिकन नॅशनल युथ लीगची स्थापना केली व या आफ्रिकन नॅशनल युथ लीगचे ते सचिव बनले. व येथूनच खऱ्या अर्थाने त्यांचा राजकीय प्रवास सुरु झाला.

## ३.५ डॉ. नेल्सन मंडेलांचा वांशिक भेदभावाविरूद्ध लढा

दक्षिण आफ्रिकेतील वांशिक भेदभावावर आधारीत आधारलेली राज्यव्यवस्था अत्यंत कठोर होती. त्यांनी सूरू केलेला वांशिक भेदभावावर आधारीत कायदा मोडण्याचा प्रयत्न केला तर त्यांना कठोर शिक्षा केली जात होती. याशिवाय राजकीय पक्ष स्थापना व संप करण्यास सक्त मनाई होती. अशा परिस्थितीमध्ये तग धरून बसलेला आफ्रिकन नॅशनल काँग्रेस पक्ष सुद्धा या सत्ताधारी पक्षाच्या जाचाला कंटाळला होता. अशा कठीण परिस्थितीत आफ्रिकन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या राजकीय प्रवेशानंतर डॉ. नेल्सन मंडेला दक्षिण आफ्रिकेच्या राजकारणात सक्रिय झाले होते.

### ३.५.१ आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या निषेध मोहिमेत सहभाग :

आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने १९५२ मध्ये प्रचलीत सरकारच्या दडपशाही धोरणाच्या विरोधात एक निषेध मोहीम सुरु केली होती. या मोहिमेत डॉ. नेल्सन मंडेला सहभागी झाले होते. या मोहिमेचा एक भाग म्हणुन कृष्णवर्णीय कामगारांनी काही दिवस काम थांबवले होते या गोष्टीला त्यांनी पाठिंबा दिला होता. तसेच कृष्णवर्णीयांनी गौरवर्णीयांची राखीव स्थळे व दुकाने या ठिकाणी घुसण्याची जी शिस्तबद्ध मोहीम सुरू केली होती त्या मोहिमेला पाठींबा दिला होता. या मोहिमेत ८००० निदर्शकांना अटक करण्यात आली होती. मात्र प्रचलीत सरकारच्या आक्रमक धोरणामुळे ही मोहीम नंतर बंद पडली.

### ३.५.२. प्रचलीत सरकारच्या विरोधात संयुक्त निषेध मोहीम :

आशियायी, बिगर गौरवर्णीय व आफ्रिकन नॅशनल काँग्रेस यांनी प्रचलीत सरकारच्या विरोधात संयुक्त निषेध मोहीम काढण्याचा निर्णय घेतला या साठी ते जोहान्सबर्ग येथील क्लिपटावून येथे एकत्र आले व प्रचलीत सरकारच्या विरोधात निदर्शने करण्यास सुरुवात केली. ही निषेध मोहीम पोलीस उलथून लावतील याची जाणीव निषेधकर्त्यांना होती. म्हणूनच पोलिसानी निदर्शने उधळून लावण्या पूर्वीच निदर्शकांनी 'स्वातंत्र्याची सनद' जाहीरपणे वाचून दाखवली. व पुढे आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने 'स्वातंत्र्याची सनद' हाच कार्यक्रम स्वीकारला. या मोहिमेत सुद्धा डॉ. नेल्सन मंडेलांची भूमिका महत्त्वाची होती.

### ३.५.३ चर्च मिशनऱ्याचे वांशिक भेदभाव विरोधास सहकार्य :

सुरवातीला गौरवर्णीय चर्च मिशनऱ्यांनी वांशिक भेदभाव पाठींबा दिला होता. मात्र बदलत्या परिस्थितीला अनुसरून कृष्णवर्णीय चर्च मिशनऱ्यां बरोबरच गौरवर्णीय चर्च मिशनऱ्यानी वांशिक भेदभावास विरोध करण्यास सुरुवात केली. याचे नेतृत्व ट्रेव्हर हडलस्टन या प्रसिद्ध धर्मप्रमुखाने केले. या संयुक विरोध कार्यक्रमात डॉ. नेल्सन मंडेलांचे योगदान महत्वाचे होते.

### ३.५.४ बस वाहतुक व्यवस्थेवरील बहिष्कार :

आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने डॉ. नेल्सन मंडेलांच्या नेतृत्वाखाली प्रचलीत गौरवर्णीय सरकारला विरोध करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू केले होते. जेंव्हा गौरवर्णीय सरकारने बस भाड्यात मोठ्या प्रमाणात वाढ केली होती तेंव्हा सरकारच्या या धोरणाला विरोध करण्यासाठी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने कृष्णवर्णीय कामगारांना कामावर जातांना बस ऐवजी पायी जाण्यास सांगितले. कामगार रोज १० किलोमीटर अंतर रोज पायी जावू लागले हे धोरण सतत तीन महिने सुरू ठेवले. भाडे कपात होईपर्यंत ही मोहीम तीन महिने सुरू होती शेवटी बस प्रशासनाला आपला निर्णय बदलावा लागला सर्वांसाठी समान तत्वावर बस प्रवासाची संधी द्यावी लागली.

### ३.५.५ : डॉ.नेल्सन मंडेलांना अटक:

सत्ताधारी सरकारच्या अन्यायकारक धोरणाला विरोध करण्यासाठी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने डॉ. नेल्सन मंडेला यांच्या नेतृत्वाखाली राजधानी जोहान्सबर्ग जवळ असलेल्या शार्प व्हील या छोट्या नगरात प्रचंड मोर्चे व निदर्शने आयोजित केली. प्रचंड विरोध लक्षात घेता परिस्थिती नियंत्रनात आणण्यासाठी सत्ताधारी सरकारने निदर्शकांवर गोळीबार केला. या गोळीबारात ६७ निदर्शक मृत्यू पावले. अनेक निदर्शक जखमी झाले. सत्ताधारी

सरकारने १५००० निदर्शकांना अटक केली. यानंतर सत्ताधारी सरकारने आफ्रिकन नॅशनल काँग्रेसवर बंदी घातली. असे असून सुद्धा सत्ताधारी सरकारच्या अमानुष कारवाईला विरोध करण्यासाठी आंदोलकांनी हिंसेला हिंसेने उत्तर देण्यासाठी बॉंबस्फोट, गोळीबार इत्यादी मार्गाचा अवलंब केला. मात्र सत्ताधारी सरकारने बाळाचा वापर करून आंदोलकांचे खच्चीकरण केले. डॉ. नेल्सन मंडेला यांना अटक केली व सत्ताधारी सरकारने ही परिस्थिती नियंत्रणात आणली.

### ३.५.६ डॉ.नेल्सन मंडेलांची सुटका:

आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने डॉ. नेल्सन मंडेला यांच्या नेतृत्वाखाली राजधानी जोहान्सबर्ग जवळ असलेल्या शार्प व्हील या छोट्या नगरात प्रचंड मोर्चे व निदर्शने आयोजित केली होती. व यातून संघर्षमय परिस्थिती उद्भवली होती. तसेच जीवित व वित्तहानी झाली होती याचा ठपका ठेवून सत्ताधारी सरकारने डॉ. नेल्सन मंडेलांना अटक केली होती. डॉ. नेल्सन मंडेलांना जेंव्हा अटक होते तेंव्हा त्यांची पत्नी विना मंडेला हिने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने आंदोलन सुरू ठेवले. मात्र दरम्यानच्या कालखंडात डॉ. नेल्सन मंडेला यांच्यावरील आरोप सिद्ध न झाल्याने त्यांची सुटका करण्यात आली. परिणामी आंदोलकांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

### ३.५.७ डॉ. नेल्सन मंडेलांचा विदेश दौरा :

डॉ. नेल्सन मंडेलांची सुटका झाल्या नंतर त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील व वांशिक भेदभावविरोधी चळवळीस पाठींबा मिळवण्यासाठी इथिओपिया, अल्जेरिया, व इंग्लंड या देशांमध्ये दौरा काढून वांशिक भेदभावा विरोधी चळवळीस पाठींबा मिळविला व या देशांची सहानुभूती मिळविली. परिणामी या लढण्यास नैतिक पाठबळ मिळाले.

### ३.५.८ डॉ. नेल्सन मंडेलांना पुनः अटक व शिक्षा :

डॉ. नेल्सन मंडेलानी आपल्या वांशिक भेदभावा विरोधी चळवळीस जागतिक स्तरावर नैतिक पाठींबा मिळविल्यानंतर त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उमखोंडा संघटनेच्या रिव्हीनिया येथील केंद्रावर ब्रिटिशांनी धाड टाकून क्रांतिकारकांचे क्रांती साहित्य जप्त केले व डॉ. नेल्सन मंडेलासह हजारो नेत्यांना तुरुंगात टाकले. डॉ. नेल्सन मंडेला स्वतः वकील असल्याने त्यांनी स्वतःची व राष्ट्रवाद्यांची बाजू अत्यंत कणखरपणे मांडली व ब्रिटिशांचे वर्णद्वेषी राजकारण जगासमोर उघड केले. मात्र ब्रिटिशांनी डॉ. नेल्सन मंडेलांच्या बाजूकडे दूर्लक्ष करत डॉ. नेल्सन मंडेलांना दोषी ठरवून त्यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप सिद्ध झाल्याचे दाखवून १९६४ ते १९९० पर्यंत कारावासाची शिक्षा जाहीर केली. व त्यांना रॉबन बेटावर बंदिस्त करण्यात आले.

### ३.५.९ डॉ. नेल्सन मंडेलांच्या अटकेनंतरची परिस्थिती :

डॉ. नेल्सन मंडेलाना अटक झाल्यानंतर रिव्हीनियाच्या वांशिक भेदभाव खाटल्याने संपूर्ण जग आश्चर्यचकित झाले. अमेरिका, रशिया, इंग्लंड, आफ्रिकन राष्ट्र व जगातील बऱ्याच राष्ट्रांनी रिव्हीनियाच्या वांशिकभेदभाव खाटल्याचा निषेध केला. उमखोटोने संघटनेने हिंसाचारी कृतिकार्यक्रम हाती घेवून संपूर्ण देशभर हिंसाचार सुरू केला. अशातच नेल्सन मंडेलांची पत्नी विनी मंडेला व मुलगी जिनजिस्वा मंडेला तसेच संडेपोस्ट व काही गौरवर्णीय

लोकांनी हे आंदोलन प्रखरपणे चालू ठेवले. नेल्सन मंडेलांची पत्नी विना मंडेला अत्यंत कष्टदायक परिस्थितीत हे आंदोलन चालवत असतांनाच तिलाही अटक करून १९६० ते १९७० अशी दहा वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली या नंतर १९८३ मध्ये आफ्रिकेतील ६०० संघटनांनी 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट' स्थापन केली व एकत्रितपणे ब्रिटिशांच्या विरुद्ध लढा सुरू केला. परिणामी डॉ. नेल्सन मंडेला व त्यांच्या पत्नी विनी मंडेला यांच्या अटकेनंतरही हे आंदोलन पुढे सुरू राहीले.

### ३.५.१० डॉ. नेल्सन मंडेलांच्या अहिंसक लढ्याचा विजय :

डॉ. नेल्सन मंडेला व त्यांच्या पत्नी विना मंडेला यांच्या अटकेनंतरही हे आंदोलन पुढे सुरू राहीले होते. याचीच दखल घेवून आफ्रिकन राष्ट्रांच्या नासावू परिषदेने तसेच जगतील प्रमुख देशाने व संयुक्त राष्ट्र संघाने मंडेला व त्यांच्या सहकाऱ्यांची मुक्तता करा तसेच त्यांच्या संघटनांवरील बंदी उठवा व आफ्रिकेतील वर्णद्वेष्टी सत्ता संपुष्टात आणा अशी मागणी केली. अशातच दक्षिण आफ्रिकेची सूत्रे डी. क्लार्क यांच्याकडे आली त्यांनी आंतरराष्ट्रीय दडपण व आंदोलनाची तीव्रता लक्षात घेवून राष्ट्रवादी संघटनांना बरोबर वाटाघाटी सुरू केल्या व सन १९९० मध्ये डॉ. नेल्सन मंडेलांची सुटका केली. याही पुढे जावून त्यांनी आफ्रिकेतील सर्व राष्ट्रवादी संघटनांवरील बंदी उठविली वांशिक भेदभावा विरोधी सर्व कायदे रद्द केले. शेवटी डॉ. नेल्सन मंडेलांच्या गांधीवादी अहिंसक लढ्याचा विजय झाला.

**आपली प्रगती तपासा :**

डॉ.नेल्सन मंडेलांच्या वांशिक भेदभाव  विरोधी लढ्याची माहिती थोडक्यात लिहा.

## ३.६ दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी नियुक्ती

डॉ. नेल्सन मंडेलांची सुटका झाल्यानंतर त्यांनी आपल्या कार्याची सुरवात नव्या जोमाने सुरू केली. आरंभी त्यांनी आपल्या आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस पक्ष्याच्या पुनर्बांधणीला महत्त्व दिले. व  अल्पावधीतच त्यांनी आपल्या पक्षाचा कायापालट केला. अशातच अध्यक्ष क्लार्कच्या नेतृत्वाखाली सरकार, डॉ.नेल्सन मंडेलांच्या नेतृत्वाखाली आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस, आफ्रिकन नॅशनॅलिस्ट पक्ष, युनायटेड पार्टी आणि चीफ बुथलेझी यांच्या नेतृत्वाखालील इंकथा फ्रीडम पार्टी यांच्यात १९९१ मध्ये वाटाघाटी सुरू झाल्या व गौरवर्णीयांकडून कृष्णवर्णीयांकडे होणाऱ्या सत्तांतराची यशस्वी सांगता झाली. एप्रिल १९९४ मध्ये दक्षिण आफ्रिकेत अत्यंत खुल्या  व मुक्त वातावरणात सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या व या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. नेल्सन मंडेला यांच्या आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसने संसदेत निर्विवाद बहुमत प्रस्थापित केले. डॉ. नेल्सन मंडेला यांनी १० मे १९९४ रोजी शपथ घेतली व दक्षिण आफ्रिकेत डॉ. नेल्सन मंडेला या पहिल्या कृष्णवर्णीय अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली नव्या दक्षिण आफ्रिका राष्ट्राचा जन्म झाला. पुढे दक्षिण आफ्रिकेत लोकप्रियतेच्या शिखरावर असतांनाच डॉ. नेल्सन मंडेलानी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला व थाबो एम्बेकी याला आपला राजकीय वारस जाहीर करून स्वतः स्वइच्छेने १६ जून १९९९ रोजी  दक्षिण आफ्रिकेच्या सर्वोच्च पदावरून पायउतार झाले व सत्तेची सूत्रे थाबो एम्बेकी यांच्याकडे दिली.

## ३.७ डॉ. नेल्सन मंडेलांच्या कामगिरीचे मूल्यमापन

केवळ दक्षिण आफ्रिकेच्याच नव्हें तर जागतिक इतिहासातील एकआदर्शवत नेतृत्व म्हणून नेल्सन मंडेलांकडे पाहिले जाते. त्यांचे बालपण, शिक्षण, वकिली, रोबेन बेटावरील कोठडी आणि संघर्ष लढ्याचा कालखंड अत्यंत प्रतिकूल होता. असे असतानाही त्यांनी आपल्या आयुष्यातील साम्राज्यवाद, गरिबी व वंशवाद उच्चाटनासाठी दिलेला लढा अतुलनीय होता. २७ वर्ष तुरुंगावसात असतांना त्यांच्या मनोबल खचले नव्हते. किंवा त्यांना निराशेने स्पर्श केला नव्हता. तसेच त्यांच्या मनामध्ये गौरवर्णीयांबाबत तिळमात्र द्वेषभाव नव्हता. त्यांनी कृष्णवर्णीयांच्या न्याय हक्कसाठी लढा देत असतांना आपल्या अहिंसात्मक मार्गापासून ते यत्किंचितही ढळले नाही. शेवटच्या श्वासापर्यंत अंतिम ध्येय साध्य करण्यासाठी लढले, जिंकले व दक्षिण आफ्रिकेत सत्तान्तर घडवून आणणारे पाहिले कृष्णवर्णीय नेतृत्व म्हणून सर्वमान्य झाले. याहीपुढे जावून त्यांनी आपल्या नावासमोर पाहिले दक्षिण आफ्रिकेचे कृष्णवर्णीय अध्यक्ष म्हणून बिरुद लावून घेतले. त्यांच्या कारकिर्दीचे मूल्यमापन करत असताना ते एक कुशल संघटक होते हे आपणां सर्वांना निश्चितच मान्य करावे लागेल कारण त्यांच्या कडे असणाऱ्या उत्तम संघटन कौशल्यामुळेच त्यांना विशाल जनासमुदयाचा पाठिंबा मिळाला होता व अंतिम विजय प्राप्ती पर्यंत टिकला होता. ते एक अनुभवसंपन्न राजकारणी होते कारण त्यांनी कृष्णवर्णीयांच्या न्याय हक्कसाठी जो लढा सुरू केला होता त्या लढण्यास कृष्णवर्णीय, गौरवर्णीय, वेगवेगळे दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष, वेगवेगळ्या जागतिक स्तरावरील संघटना व देश अशा सर्वच स्तरातून पाठिंबा मिळविण्यात त्यांना यश आले होते. सत्तांतरानंतर जेंव्हा त्यांनी दक्षिण आफ्रिकेचे नेतृत्व आपल्या हाती घेतले तेंव्हा दक्षिण आफ्रिकेला कॉमन वेल्थ व युनोचे सभासदत्व प्राप्त झाले. त्यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीत उधोगधंदे, व्यापार, दळणवळण, नोकऱ्या व शिक्षण क्षेत्रात त्यांनी भरीव स्वरूपाची कामगिरी केली.

त्यांच्या कार्याचा गौरव करत असताना त्यांना दक्षिण आफ्रिकेचे शिल्पकार म्हणुन संबोधले जाते. त्यांची गणना महात्मा गांधी व डॉ.मार्टिन ल्युथर किंग या आंतरराष्ट्रीय नेत्यांच्या पंक्तीत केली जाते. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांना 'भारत रत्न'हा सर्वोच्च पुरस्कार बहाल केला. जागतिक स्तरावरील नोबेल प्राईज पुरस्काराने ही त्यांना सन्मानित करण्यात आले होते. वेगवेगळ्या देशाने व दक्षिण आफ्रिकेतील वेगवेगळ्या संस्थाने २५० पेक्षा जास्त पुरस्कार प्राप्त करून त्यांना सन्मानित केले होते. एकंदरीत सर्वसमावेशक विचार केला तर डॉ. नेल्सन मंडेलांची कामगिरी प्रेरणादायी आहे हे आपण नाकारू शकत नाही.

## ३.८ सारांश

दक्षिण आफ्रिकेतील वंशवाद हा अत्यंत गंभीर प्रश्न होता. या वंशवादाला कायदेशीर मान्यता होती त्यामुळे कृष्णवर्णीय लोकांचे जीवन अत्यंत बिकट व कष्टमय झाले होते. त्यांना सार्वजनिक ठिकाणे, कार्यालये, धार्मिक स्थळे, व शिक्षण संस्था या ठिकाणी प्रवेश नव्हता तसेच त्यांना अत्यंत हिनतेच्या वागणूक दिली जात होती.

दक्षिण आफ्रिकेतील हा वंशवाद कायम स्वरूपी नष्ट करण्याच्या उद्देशाने डॉ.नेल्सन मंडेलांनी या प्रतिकुल परिस्थितीविरुद्ध अखंड अहिंसेच्या मार्गाने समर्थपणे लढा दिला. व प्रस्थापितांना त्यांची चूक मान्य करायला लावून परिवर्तन घडवून आणले. व ते दक्षिण आफ्रिकेचे पाहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष बनले. व जागतिक स्तरावर दक्षिण आफ्रिकेला सन्मान प्राप्त करून दिला.

## ३.९ प्रश्न

१. डॉ. नेल्सन मंडेलांचा जीवन परिचय व दृष्टीकोण स्पष्ट करा ?

२. डॉ. नेल्सन मंडेलांच्या वांशिक भेदभाव विरुद्ध लढ्याची माहिती नमुद करा?

३. डॉ. नेल्सन मंडेलांच्या कामगिरीचे थोडक्यात मूल्यमापन करा?

## ३.१० संदर्भ


१. प्राचार्य य. ना. कदम, 'विसाव्या  शतकातील जगाचा इतिहास'

२. डॉ.धनंजय आचार्य, 'विसाव्या शतकातील जग'

३. एन.एस.तांबोळी, 'आधुनिक जग'

४. डॉ.पी.जी.जोशी, 'आधुनिक जग'

५. डॉ.सुमन वैद्य, 'आधुनिक जग'


*****

# ४

# स्त्रीवादी चळवळीची पहिली लाट

**घटक रचना**

४.० उदिष्टये
४.१ प्रस्तावना
४.२ लिंगभाव अर्थ
४.३ लिंगभाव विषमता
४.४ लिंगभावाचे स्वरूप
४.४.१ जैविक स्वरूपातील लिंगभाव
४.४.२ सामाजिक स्वरूपातील लिंगभाव
४.४.२.१ कौटुंबिक लिंगभाव
४.४.२.२ मानसिक लिंगभाव
४.४.२.३ शैक्षणिक लिंगभाव
४.४.२.४ आरोग्य आणि लिंगभाव
४.४.२.५ श्रमविभागांनी आणि लिंगभाव
४.४.२.६ राजकीय लिंगभाव
४.५ स्त्रीवाद
४.६ स्त्रीवादी चळवळीची पहिली लाट
४.६.१ उदारमतवादी स्त्रीवाद
४.६.२ मार्क्सवादी स्त्रीवाद
४.६.३ अस्तित्ववादी स्त्रीवाद
४.७ सारांश
४.८ प्रश्न
४.९ संदर्भ

## ४.० उदिष्टये

१. लिंगभाव धारणा काय आहे याचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

२. लिंग आणि लिंगभाव यांच्यातील संकल्पनात्मक फरक समजून घेणे.

३. स्त्रीवादाची तात्विक बैठक अभ्यासाने.

४. स्त्रीवादी चळवळीच्या पहिल्या लाटेचा आढावा घेणे.

## ४.१ प्रस्तावना

'लिंगभाव' ही एक सामाजिक संकल्पना असून अगदी अलीकडच्या काळात या संकल्पनेचे उपयोजन सामाजिक शास्त्रातील विविध विषयांतर्गत होत आहे. प्रामुख्याने लिंगाधारीत भेदभावाचा व्यवहार या अर्थाने सामाजिक शास्त्रांमध्ये ही संकल्पना अभ्यासली जाते. 'लिंग' जीवशास्त्रीय संकल्पना असल्यामुळे नैसर्गिक आहे. जिवशास्त्रानुसार परूष व स्त्री असे दोन लिंग प्रकार आहेत. मात्र या नैसर्गिक संकल्पनेच्या आधारे समाजामध्ये पुरुषत्व व स्त्रीत्व ह्या सामाजिक संकल्पना निर्माण झाल्या आहेत. पुरुषत्व व स्त्रीत्व हे सामाजिक अभिकरणातून घडत असल्यामुळे ते स्थळ, काळ व संस्कृती परत्वे बदलणारे असते, म्हणजे नैसर्गिक नाही, समाजनिर्मित आहे. प्रामुख्याने समाजातील पुरूषांचे व स्त्रियांचे स्थान व भूमिका निश्चिती करण्या करीता लिंगभेदाचा व्यवहार केला जातो. त्यामुळे स्त्रियांना समाजात कायमचे दुय्यमत्व प्राप्त झाले आहे. स्त्री – पुरुष संबंधांचे आकलन करून घेण्यासाठी 'लिंगभाव' ही संकल्पना वापरली जाते म्हणजेच स्त्री-पुरुषांमधील सामाजिक संबंधांचे आकलन करून घेण्यासाठी व विश्लेषणासाठी एक साधन म्हणून लिंगभाव ही संकल्पना उपयोगात आणली जाते.

पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेमद्धे लिंगाधारीत व्यवहारातून स्त्रियांचे दुय्यमत्व अधोरेखित केल्या गेले आहे. ही दुय्यमत्वाची भावना कुटुंबसंस्था व समाजिकरण प्रक्रिया यांच्या माध्यमातून मुलांमध्ये अगदी लहान वयात रुजविण्याचे कार्य केले जाते. म्हणजे मुलगा व मुलगी हा भेद समाजिकरणाच्या प्रक्रियेतून रुजविला जातो. हा भेद प्रामुख्याने स्त्रीवादी विचार प्रवाह व चळवळी पूर्वी स्त्रियांच्या शरीर रचनेमुळे असल्याचे मानण्याची प्रवृती होती. अर्थात ही प्रवृती अनेक शतकांची असल्यामुळे तिचे रूपांतरण प्रथेमध्ये घडून आले व प्रथेचे रूपांतरण निसर्ग नियमात. यातून स्त्री-पुरुषांमधील जैविक वैशिष्ट्यांच्या आधारावर त्यांचा दर्जा व भूमिका निर्धारित होतात असा प्रघात निर्माण झाला; इतकेच नव्हे तर तो अपरिवर्तनीय निसर्ग नियम मानल्या गेला. यामागील भूमिका पितृसत्ताक समाजातील पुरूषांचे उदात्तीकरण असले तरी, स्त्रियांच्या शरीर रचनेमुळे त्यांना समाजात दुय्यम स्थान असल्याचा निसर्ग नियम झाला. म्हणजे स्त्री-पुरुषांमधील विषमतेची व अन्यायाची दखल घेण्यास जागा उरत नाही. या भूमिकेमुळे लिंगभाव व्यवहारातून स्त्रियांचे अधिक शोषण घडून आले. त्यांच्या शारीरिक रचनेमुळे त्यांच्यावर दुय्यमत्व लादण्यात आले आहे. परंतु अलीकडच्या काळात उभ्या राहिलेल्या अनेक स्त्रीवादी चळवळीनी या भूमिकेचा जोरकस विरोध केला व स्त्रीयांना देखील समाजात वावरताना समानतेची वागणूक मिळावी म्हणून लढे उभारले. जगाच्या इतिहासातील स्त्री कर्तृत्वाला अधोरेखित करण्याकरिता अनेक स्त्रीवादी चळवळी उभ्या राहिल्या या स्त्रीवादी चळवळींनी 'लिंग' आणि 'लिंगभाव' यातील फरक अधोरेखित करून स्त्री शोषणाच्या भौतिक आधाराची उकल करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न लिंगभाव अभ्यासाचा आरंभबिंदू ठरला.

## ४.२ लिंगभाव : अर्थ

'लिंगभाव' संकल्पनेचा अर्थ समजून घेण्या अगोदर 'लिंग' आणि लिंगभाव या दोन संकल्पना मधील फरक समजून घ्यावा लागेल. मराठी भाषेत दैनंदिन व्यवहारात आणि बोली भाषेत 'लिंग' आणि 'लिंगभाव' हे दोन्ही शब्द अनेक वेळा वापरले जातात. हे दोन्ही शब्द इंग्रजीतील 'Gender' या शब्दाचे पर्यय वाचक शब्द असले तरी, या दोन्ही शब्दांचा अर्थ वेग – वेगळा आहे.

**'लिंग' (Sex)** ही शारीरिक व जीवशास्त्रीय संकल्पना असून ती पुरुष आणि स्त्री यांच्यातील जैविक अंतर स्पष्ट करते. माणूस हा जन्मतः एकतर पुरुष असतो किंवा स्त्री असतो. अर्थात 'लिंग' हा मराठी भाषेतील शब्द इंग्रजी भाषेतील 'Sex' या शब्दाचा पर्यय वाचक शब्द आहे. ज्यातून जन्माने प्राप्त झालेले पुरुषत्व अथवा स्त्रीत्व असा अर्थ बोध होतो. म्हणजेच लिंग हे नैसर्गिक असून स्त्रीपुरुषांच्या जननेंद्रियातील फरकामुळे दृश्य स्वरूपात आहे.

**'लिंगभाव' (Gender)** हा शब्द सामाजिक जडणघडणीतून बनलेली एक अस्मिता आहे. लिंगभाव म्हणजे 'लिंगभेदावर आधारित रुजविल्या जाणारी अस्मिता, भूमिका आणि नातेसंबंध होय.' अर्थात बाईपण व पुरुषपण हे सामाजिक जडणघडणीतून साकारले जाते. म्हणजेच लिंगभाव हा 'पुरुषी' किंवा 'बायकी' स्वभावधर्मावर तसेच स्त्री – पुरुषांच्या सामाजिक भूमिका आणि जबाबदारीवर आधारित असतो.

एकूणच इंग्रजी भाषेत 'Gender' आणि 'Sex' हे दोन वेगवेगळे शब्द आहेत व त्यांचे वेगळे अर्थ देखील ध्वनित होतात. मात्र दक्षिण आशियाई भाषांमध्ये या दोन्ही शब्दांकरीता 'लिंग' हा एकच शब्द प्रयोजिला जातो. या दोहोंतील संकल्पनात्मक फरकसाठी 'Sex' म्हणजे नैसर्गिक 'लिंग' आणि 'Gender' म्हणजे 'लिंगभाव' अर्थात सामाजिक लिंग हे शब्द वापरले जातात. लिंग आणि लिंगभाव यातील फरक पुढील तक्त्या द्वारे स्पष्ट करता येई.

**लिंग आणि लिंगभाव यातील फरक**

| लिंग | लिंगभाव |
|---|---|
| लिंग हे नैसर्गिक आहे. | लिंगभाव हा सांस्कृतिक असून मनुष्य निर्मित आहे. |
| लिंग ही जीव शास्त्रीय संकल्पना आहे. | लिंगभाव हा सामाजिक सांस्कृतिक असतो. |
| लिंगतील भेद हे प्रजनन प्रक्रियेतील कार्यावर अवलंबून आहेत. | लिंगभाव भूमिका, गुण, वर्तन प्रकार व जबाबादऱ्या इ. ची विभागणी स्त्रीयोचित व पुरुषोचित आशा प्रकारे करतो. |
| लिंग हे शक्यतो सहजपणे बदलता येत नाही. ते स्थिर असून सर्वत्र सारखे आहे. | लिंगभाव हा बदलता असतो, स्थळ, काळ, संस्कृति इतकेच काय कुटुंब – कुटुंबात तो बदलतो. |

वरील तक्त्या द्वारे लिंग आणि लिंगभाव या दोन वेगवेगळ्या संकल्पना आहेत हे स्पष्ट होते. या फरकाच्या अनुषंगाने लिंगभाव संकल्पनेचा अर्थ पुढील प्रमाणे समजून घेता येईल.

स्त्रीवादी विचारवंत कमला भसीन यांनी आपल्या 'Understanding Gender' पुस्तकात लिंगभावाचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले आहे. " इंग्रजी शब्द 'Gender' या शब्दाचा शाब्दिक अर्थ 'लिंग' असा होतो. परंतु अलीकडच्या काळात 'Gender' हा शब्द एक वेगळ्या अर्थाने वापरला जातो, ज्यास मराठी भाषेत 'लिंगभाव' संबोधले जाते. 'लिंगभाव' ही सामाजिक शस्त्रांमध्ये नव्याने रुजू झालेली संकल्पना आहे. प्रामुख्याने स्त्री -पुरुषांची सामाजिक आणि सांस्कृतिक व्याख्या स्पष्ट करण्याकरिता 'लिंगभाव' या सामाजिक संकल्पनेचा वापर केला जातो. सदर संज्ञेच्या माध्यमातून स्त्री -पुरुष यांचे स्थान व भूमिका यात समाजात कसा भेद केला जातो याचे आकलन करून घेणे या अर्थाने 'लिंगभाव' ही संज्ञा वापरली जाते." म्हणजेच स्त्री – पुरुष यांच्यामधील संबंधाच्या सामाजिक वास्तवाचे आकलन करून घेण्यासाठी व विश्लेषणसाठी एक साधन म्हणून 'लिंगभाव' ही संकल्पना वापरली जाते.

कमला भसीन यांच्या 'Understanding Gender' या पुस्तकाच्या (लिंगभाव समजून घेताना) भाषांतरणाच्या मनोगतात 'लिंगभाव' संकल्पाने विषयी श्रुती तांबे म्हणतात, "भारत आणि दक्षिण गोलार्धातील सामाजिक संदर्भात स्त्री-पुरुष संबंधांची चिकित्सा करण्याचे विश्लेषक साधन म्हणून, चिकित्सक हत्यार म्हणून 'लिंगभाव' ही संकल्पना वापरायला हवी."

लिंगभाव संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना ॲन ओकले यांनी आपल्या 'Sex, Gender and Society' (१९७२), या पुस्तकात म्हणतात, "लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री व पुरुषांची बाईपनात व पुरुषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सूचित होते." एखादी व्यक्ति स्त्री किंवा पुरुष हे जैविक फरकाने ठरते परंतु व्यक्तिचे बाईपण व पुरुषपण मात्र स्थळ-काळानुरूप बदलणाऱ्या सांस्कृतिक निकषांनी ठरते म्हणजेच लिंग हे वैशिष्ट्य स्थिर असते, लिंगभाव मात्र बदलणार असतो.

जागतिक आरोग्य संघटनेने लिंगभाव शब्दाची व्याख्या आपल्या २००२ च्या Gender Policy मध्ये पुढील प्रमाणे केली आहे.

"Gender is used to describe the characteristics of women and man that are socially constructed, while sex refers to those that are biologically determined. People are born female or male, but learn to be girls and boys who grow into women and men. This learned behaviour makes up gender identity and determines gender roles."

अर्थात लिंगभाव ही संकल्पना स्त्रि आणि पुरुष यांच्या सामाजिक गुणवैशिष्ट्यांचे वर्णन करण्यासाठी वापरली जाते, तर लिंग हे जैविक घटकावर आधारित आहे. व्यक्ति स्त्री किंवा पुरुष म्हणून जन्माला येतात, पुढे त्यांच्यात पुरुषत्व किंवा स्त्रीत्व विकसित होते. हीच पुरूषत्वाची किंव स्त्रित्वाची ओळख त्या आधारीत वर्तनातून ठरते. या वर्तनाच्या पाठीमागे भिन्न- भिन्न समाजाणे मुलांमुलींसाठी आखून दिलेल्या वेगवेगळ्या भूमिका, गुणदोष, प्रतिसादाच्या पद्धती असतात ह्या पद्धती म्हणजेच भिन्न सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपात मुलांमुलींकरीता आखून दिलेला कृतीकार्यक्रम होय.

वरील विवेचनाच्या आधारे लिंगभवाची ढोबळमानाने पुढिल प्रमाणे व्याख्या करता येईल, “भिन्न भिन्न समाज व संस्कृतीने मुलांमुलींकरीता निर्धारित केलेल्या वेगवेगळ्या भूमिका, गुणदोष जबाबदाऱ्या व प्रतिसादाच्या पद्धती या आधारे स्त्रीयोचित व पुरुषोचित वर्तनाचा आखून दिलेला कृती कार्यक्रम म्हणजे लिंगभाव होय.”

## ४.३ लिंगभाव विषमता

लिंगाधारीत केल्या जाणाऱ्या विभेदीकरण व्यवहाराला लिंगभाव विषमता म्हटले जाते, ज्यामध्ये लिंगभाव जनित व्यवहारातून स्त्रीयांना त्यांच्या नैसर्गिक अधिकार व संधीपासून वंचित ठेवले जाते. कुटुंब संस्थेतील पितृसत्तेच्या प्रभावातून स्त्रियांवर अनुत्पादक कार्य सोपविली जातात, जसे कपडे धुणे, साफसफाई, स्वयंपाक करणे, लहान मुले व वृद्धांची देखभाल करणे या पद्धतीची मूल्य विरहित श्रम करण्यासाठी प्रोत्साहित केल्या जाते, ज्यास पुनरुत्पादक श्रम संबोधले जातात या उलट पुरुषांना उत्पादक श्रम करण्यास प्रोत्साहित केल्या जाते.

कुटुंब संस्थेच्या व संस्कृतीच्या माध्यमातून मुलांवर लिंगभावात्मक संस्कार केले जातात. दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये तर मुलाच्या जन्माचा आनंद साजरा केला जातो व मुलीच्या जन्माचा शोक केल्या जातो. मुलावर प्रेम, माया, कोड कौतुक, योग्य आहार, आरोग्याची काळजी यांची खैरात असते आणि मुलीला मात्र यातील काहीच मिळत नाही. हल्लीच्या काळातील पालक आम्ही मुला-मुलींमध्ये भेद करीत नाही अशी भूमिका घेतात मात्र मुलगी परक्याचे धन माणण्याची प्रवृत्ती असल्यामुळे वास्तव स्थिति फारशी वेगळी नाही.

मुलाने शूरवीर, कर्तबगार असावे असे सांगितले जाते तर मुलीने प्रेमळ लाजाळू घरगुती असावे असे शिकविले जाते. एकूणच काय तर मुलाने काय केले पाहिजे व मुलीने काय केले पाहिजे याची शिकवण कुटुंबसंस्था व समाज यांच्या कडून बालवयात मुलांना दिली जात असल्यामुळे त्यांच्यामध्ये जबाबदऱ्या, कामाची विभागणी व कर्तव्य यांच्या विषयीची लिंगाधिष्टीत समाज तयार होते व ते लिंगभेदी व्यवहार करावयास लागतात. यावरून हे स्पष्ट आहे की, लिंगभाव नैसर्गिक नाही तो समाजिक व सांस्कृतिक आहे. मात्र हा लिंगभाव जनित व्यवहार स्थल, काल आणि समजपरत्वे बदलत असतो.

स्त्रीवादी विचारवंत सिमॉद बुवा म्हणतात, “स्त्री ही जन्माला येत नाही, तर ती घडविली जाते. समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संस्कारातून तिचे बाईपण घडविले जाते.” ही प्रक्रिया सतत चलनारी असते. स्त्री ही पुरुषापेक्षा वेगळी आणि गौण आहे या गृहितकाचा प्रभाव मुलीच्या मनावर अगदी लहान वयापासून बिंबविला जातो. या प्रक्रियेला समाजशास्त्रीय भाषेत सामाजिकरण संबोधले जाते. समाजशास्त्रीय विचारवंत रूथ हार्टले यांनी सामाजिकरण प्रक्रिया ही १) जडणघडण (Manipulation) २) नियमितीकरण (Canalisation) ३) शब्दसंबोधन (Verbal Appellation) आणि ४) कृतीची व उपक्रमाची ओळख (Activity Exposure) या चार प्रकारे घडते असे म्हटले आहे. या चारही प्रकारातून मुलांमध्ये लिंगभावाची धारणा विकसित करण्याचे कार्य घडून येते.

त्यामुळे या प्रक्रियेला स्त्रीवादी विचारवंत लिंगभाविकरण असे संबोधतात. एकूणच लिंगभाविकरण प्रक्रियेच्या माध्यमातून लिंगभाव विषमता जोपासली जाते त्यामुळे सर्व स्त्रीवादी विचारवंतांनी या प्रक्रियेची एथोचित चर्चा केली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) लिंगभाव म्हणजे काय स्पष्ट करा?

२) लिंग आणि लिंगभाव यातील फरक स्पष्ट करा?

## ४.४ लिंगभावाचे स्वरूप

सद्यकालिन समाज व्यवस्थेमध्ये पुरुषी वर्चस्वाचे मूल्य सर्व पातळीवर आणि संस्थांमध्ये कार्यरत असल्यामुळे विवाहसंस्था, कुटूंबसंस्था, धर्मसंस्था, राज्यसंस्था आणि उत्पादन व्यवहारात स्त्रियांची भूमिका दुय्यम आणि अनुषंगिक मानली जाते. या विवीध स्वरूपात लिंगभाव प्रदर्शित होतो. मात्र लिंगाभावाचे हे स्वरूप सर्वत्र सारखे नसून ते स्थल, काळ, परिस्थिती व संस्कृति परत्वे बदलणारे असते. लिंगभावाचे स्वरूप परिस्थिती सापेक्ष असले तरी काही बाबतीत ते सर्वत्र सारखे दिसून येते. त्या अनुषंगाने लिंगभावाच्या स्वरूपाचा विचार केला असता जैविक आणि सामाजिक अशा दोन प्रमुख प्रकरांतर्गत लिंगभाव संकल्पनेचा विकास होतो.

### ४.४.१ जैविक स्वरूपातील लिंगभाव :

स्त्री पुरुष यांचा शरीर रचना नुसार निसर्गतः त्यांच्यामध्ये काही जैविक कामांची विभागणी केलेली असते ही नैसर्गिक विभागणी त्यांच्या शरीराच्या आधारे घडून आलेली आहे प्रामुख्याने या जैविक बिना तत्वाच्या आधारे स्त्री-पुरुष यांच्यातील कामाची विभागणी परस्परपूरक असून समाजसुधारणेच्या मुळाशी त्यांच्यामधील सलोख्याचे संबंध करीत आहेत. असे असले तरी, प्राचीन काळापासून आजच्या प्रगत समाजापर्यंत पुरुषाने नेहमी स्त्री पेक्षा वरचढ भूमिका मांडण्यात आली आहे.

निसर्गतःच स्त्रियांची शरीर रचना क्लिष्ट असल्यामुळे अस्थिरता स्त्रियांच्या शरीरातील अंतर्गत व्यवहाराचे वैशिष्ट्य आहे. पुनरुत्पादनामुळे कॅल्शियमच्या चयापचनात स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांच्या शरीर नियमितता दाखविली जाते. स्त्रियांच्या मासिक पाळीत खूप कॅल्शिअम शरीराबाहेर फेकले जातात गरोदरपणात गर्भाच्या वाढीसाठी ते वापरले जाते स्त्रियांच्या शरीरात तयार होणारे नानाविध स्त्राव आणि कॅल्शियमची कमतरता यामुळे स्त्रीच्या मज्जासंस्थेमध्ये अस्थिरता निर्माण होते. त्याचा परिणाम म्हणून त्यांचे नियंत्रण कमी असते परिणामी स्त्रिया अधिक भावनाप्रधान असतात. या तुलनेत पुरुषांचे लैंगिक जीवन साधे सरळ व सुटसुटीत असते त्यात कसलेही धोके शारीरिक वेदना अवघड जबाबदाऱ्या, आजारपण अंतर्गत नसतात. तरीदेखील पुरुषांपेक्षा स्त्रियांचे आयुष्यमान सरासरीने अधिक असते.

वजनाच्या संदर्भाने विचार करता पुरुषांच्या स्नायू चे वजन त्यांच्या एकूण वजनाच्या ४२% असते तर स्त्रियांच्या स्नायूंचे वजन त्यांच्या एकूण वजनाच्या ३६% असते. या निसर्गत: मिळालेल्या शातीरिक क्षमतेचे पुरुषीपणाशी नाते जोडले गेले आहे. मूलतः निसर्गतः मिळालेल्या जैविक क्षमतेचा वापर पुरुष स्त्रियांवर स्वामित्व गाजविण्याचे सूत्र पिढ्यानपिढ्या पुरुषांनी आपल्या हातात ठेवल्यामुळे बाईचे भवितव्य वा प्रगती वा अधोगती ठरविण्याचे काम पुरुषांचे आहे असे पुरुषांना वाटते. पर्यायाने तसेच स्त्रियांनाही वाटते. पुरुषांनी बाईवर वर्चस्व गाजविणे ही गोष्ट नैसर्गिक व जैविक नाही, पण तशी आहे असे सतत बिंबविल्या गेल्यामुळे ही गोष्ट कायमची मान्य झाली. शारीरिक उंची, वजन, आकारमान यांच्या अधिक्यामुळे पुरुष स्त्रियांवर शारीरिक वर्चस्व गाजवत आहेत. तरी याचा अर्थ जैविकदृष्ट्या पुरुष स्त्रियांपेक्षा वरच्या दर्जाचे आहेत असा होत नाही.

### ४.४.२ समाजनिर्मित लिंगभाव:

लिंगभावाचे हे दुसरे स्वरूप आहे. अर्थात हे स्वरूप समाज, संस्कृती, स्थळ, कळ या नुसार बदलणारे आहे. या स्वरूपांतर्गत अनेकविध सामाजिक संस्थाच्या माध्यमातुन लिंगभाव होत असताना दिसून येतो. मूलतः हा लिंगभाव मानवी समाजाने निर्माण केलेल्या प्रथा, परंपरा, रूढी, यांच्या पगड्यामुळे घडून येतो. काही अंशी या परंपरांच्या पगड्याखाली स्त्रिया देखील हा लिंगभाव आपल्यावर ओढवून घेताना दिसून येतात. त्यामुळे या लिंगभावाचे स्वरूप विविधांगी आहे. त्यातील काही महत्वाच्या स्वरूपाचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

### ४.४.२.१ कौटुंबिक लिंगभाव:

कोणत्याही देशातील कुटूंबसंस्था मुलीच्या जन्मापासून तिच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर ती मुलांपेक्षा, पुरुषांपेक्षा कशी वेगळी आहे आणि कशी वेगळी राहिली पाहिजे, याची सतत जाणीव करून देण्याचे कार्य करते. मुलीच वागणं, बोलणं, हसणं, बसणं, सर्व काही मर्यादित असावं याची सतत जाणीव तिला करून दिली जाते. या करिता समाजातील आदर्श व्यक्तिमत्वाचे दाखले दिले जातात. मुलगी म्हणजे आज्ञाधारक, मर्यादाशील, वागणारी, कामसू, उलट उत्तर न देणारी किंवा प्रश्न न विचारणारी, जगाचा अनुभव इतरांच्या साहाय्याने घेणारी, घराबाहेर पडतांना सोबत लागणारी अशी असली पाहिजे असा कुटुंबाचा कटाक्ष असतो. आई वडिलांनी तसं मुलीला शिक्षण द्यावं आणि ताब्यात ठेवावं अशी सामाजिक अपेक्षा असते.

या अपेक्षेपोटी कुटुंबसंस्थेकडून मुलगा आणि मुलगी यामध्ये सतत भेद केला जातो. हा भेद अगदी खेळण्याच्या वस्तुपासून आहारापर्यंत असतो. जसे मुलांना खेळण्याकरिता गाड्या, रोबोट इ.सारखी यांत्रिक खेळणी दिली जातात. तर मुलींना बाहुली, खेळभांडी, भातुकली सारखी खेळणी देऊन तिच्या घरकामाच्या भूमिकेचे सामाजीकरण  केले जाते. शिक्षणाच्या बाबतीतही मुलीच्या शिक्षणापेक्षा मुलाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. आहाराच्या बाबतीत देखील मुलांना सकस आहार देण्याचा प्रयन्त केला जातो. मुलींच्या बाबतीत मात्र दुय्यम व अल्प प्रमाणात आहाराचे नियोजन केले जाते. आरोग्याच्या संदर्भाने देखील मुलीने सहनशील असले पाहिजे या भूमिकेतून सहनशीलतेच्या नावाखाली लिंगभाव केला जातो.

**४.४.२.२ मानसिक लिंगभाव:**

मुलगा हा वंशाचा दिवा, म्हातारपणाचा आधार आणि मुलगी परक्याचे धन अशी समाज मानसिकता असल्यामुळे मुलीला सतत दुय्यम वागणूक दिली जाते. स्त्रीचे चारित्र्य हे तिनेच आयुष्यभर जपायला पाहिजे हा संस्कार तिच्या मनावर पक्का बिंबविला गेलेला असतो. त्यामुळे या मानसिक गुलामीचे ओझे स्त्रिया आयुष्यभर वाहतात. बालपणापासून सतत झालेली हेळसांड, उपेक्षा, दुर्लक्ष आणि मुलांपेक्षा वेगळी वागणूक मिळाल्यामुळे मुलीच्या मानसिक जीवनावर त्याचा आघात होतो. तिची मानसिक कुचंबणा होते. या कुचंबनेचा परिणाम म्हणून तिच्या मनामध्ये एक प्रकारची अनामिक भीतीची भावना निर्माण होते. या भावनेतून तिला मानसिक दृष्ट्या असुरक्षित वाटायला लागते. ही असुरक्षितता सतत जाणवत असल्यामुळे स्त्रीला सतत अन्याय सहन करण्याची सवय लागते. पुरुषांच्या वर्चस्वामुळे स्त्रिया मानसिकरित्या दबलेल्या असतात. या प्रकारच्या लिंगभाव विषमतेतून स्त्रियांचे मानसिक जीवन प्रभावित होते.

**४.४.२.३ शैक्षणिक लिंगभाव:**

शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून लिंगभाव जनित शिक्षण क्रमावर अधिक भर देण्यात आलेला दिसून येतो. अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांवर परावलंबित्व व पुरुषी वर्चस्व साधण्यात आले आहे. या अनौपचारिक शिक्षणाचे सर्वात मोठे केंद्र कुटुंबसंस्था आहे. त्याचबरोबर समाज, धर्म, संस्कृती इत्यादी संस्थांच्या अंतर्गत अनौपचारिक पद्धतीच्या शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांचे दुय्यमत्व अधोरेखित करण्याचे कार्य घडून येते. याचाच परिणाम म्हणून कुटुंब, समाज, धर्म संस्था, संस्कृती या अनौपचारिक शिक्षण केंद्रातून स्त्रिया सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक घडनितुन दुय्यम म्हणून घडविल्या जातात. एकूणच भविष्यकाळातील पत्नी व माता या भूमिका योग्य पद्धतीने पार पाडण्याच्या शिक्षणावर या संस्थांच्या माध्यमातून अधिक भर दिला जातो.

समाजात मुलगा आणि मुलगी यांच्यात शिक्षणविषयक भेदभाव सर्रास होत असतो. आजच्या अनेक पाठ्यक्रमातून शिकविल्या जाणाऱ्या बहुतांश विषयातून लिंगभावाधारित विषमतेला खतपाणी घातले जाते. एकूणच काय तर स्त्रियांनी शिक्षण घ्यावे नोकरी करावी मात्र त्यांच्यावर पुरुषी वर्चस्व असावे अशा पद्धतीचे संस्कार शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये रुजवले जातात.

**४.४.२.४ आरोग्य आणि लिंगभाव:**

विकासाच्या संकल्पनेत आरोग्याला खूप महत्त्व आहे स्त्रियांच्या बाबतीत पुरुषसत्ताक समाजव्यवस्था कुटुंब आणि स्वतः स्त्रिया सुद्धा आपल्या आरोग्यविषयक गरजा केवळ पुनरुत्पादक चौकटीतच बघतात स्त्रियांचे आरोग्य म्हटले की डोळ्यासमोर दोन तीनच प्रश्न येतात गरोदरपण, बाळंतपण यामध्ये होणारा त्रास किंवा गर्भाशय पिशवीचे आजार स्त्रियांचे आजार एवढ्यापुरते सीमित मानले जातात. धर्माच्या व पुरुषी वर्चस्वाच्या अवडंबराणे कुचंबना झालेल्या स्त्री वर्गाला अधिक परावलंबित्व स्वीकारण्यास भाग पाडणाऱ्या व्रतवैकल्य मुळे व जैविक रचनेमुळे कॅल्शियमच्या कमतरतेमुळे होणारे आजार, ॲनिमिय, सिकल्सेल सारखे हजार इत्यादी प्रादुर्भावामुळे स्त्रियांच्या आरोग्याचे अनेक प्रश्न उभे राहतात. कुटुंब संस्थेकडून शिकविण्यात आलेली आरोग्यविषयक शिकवण (आजार अंगावर

काढणे) व मुलांच्या आरोग्याचा असलेला प्राधान्यक्रम यामुळे स्त्रियांच्या आरोग्याच्या बाबतीत कुटुंब व समाजाकडून दुजाभाव होत असताना दिसून येतो.

### ४.४.२.५ श्रमविभागणी आणि लिंगभाव:

सामाजिक श्रमाची विभागणी लिंगभेदावर आधारित आहे. समाजाने श्रमाचे विभागणी करताना स्त्री वर्गास अनूत्पादनाची कामे जसे मुलांचे व वृद्धांच्या संगोपन, पालन-पोषण, घरातील कामे, स्वयंपाक, धुणीभांडी इत्यादी कामे सोपवली आहेत. जी स्त्रियांची कर्तव्य म्हणून समाजाकडून लादण्यात आलेली आहेत. अनेक वर्षांपर्यंत ही कामे अशाच पद्धतीने करत आल्यामुळे स्त्रीयांनी देखील या अनुत्पादित कार्याला स्वीकारले आहे. पुरुषांकडे समाजव्यवस्थेने उत्पादनक्षम अर्थात ज्या कामाचे बाजार मूल्य आहे ती कामे करण्यास प्रोत्साहित केले आहे.

लैंगिक भेदा नुसार समाजाची विभागणी याचा अर्थ लिंगभेदाच्या उतरंडीवर आधारलेली श्रमविभागणी ज्यात स्त्रियांना नेहमी खालचे स्थान मिळते. पुरुष म्हणजे कमावते व स्त्रिया म्हणजे गृहीणी हे या श्रमविभागणीच्या मुळाशी असलेले समाज रूढ सूत्र आहे. त्यामुळे दक्षिण आशियाई राष्ट्रातील कमावत्या स्त्रियांच्या कमाईवर देखील पुरुषी नियंत्रण असल्याचे दिसून येते. बहुतांश स्त्रिया असंघटित क्षेत्रात काम करतात त्यामुळे असंघटित क्षेत्रातील एकाच कामाकरिता स्त्री-पुरुषांना मिळणारा मोबदला मात्र भिन्न असतो या क्षेत्रात काम करणाऱ्या पुरुषांपेक्षा स्त्रीयांना मिळणारा श्रमाचा मोबदला कमी आहे. या व्यतिरिक्त नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी होणाऱ्या शोषणाला देखील स्त्रियांना सामोरे जावे लागते.

जागतिक बँकेच्या १७६ देशांमधील परिस्थितीवर आधारित अहवालानुसार काही देशात पतीच्या परवानगीशिवाय स्त्रियांना नोकरी करता येत नाही, मालमत्ता किंवा घर स्त्रीच्या नावावर नसते, असंघटित क्षेत्रातील स्त्रियांना मातृरजा नसतात, असे म्हटले आहे. यानुसार श्रमाच्या आधारावर होणाऱ्या लिंगभावाचे स्वरूप व्यापक व अधिक परिणामकारक आहे.

### ४.४.२.६ राजकीय लिंगभाव:

पितृसत्ताक समाजव्यवस्थेने चार भिंतीच्या आतील क्षेत्र स्त्रियांकरिता मर्यादित करून ठेवले आहे त्यामुळे जोपर्यंत राजकारणात स्त्रियांना आरक्षण नव्हते तोपर्यंत राजकीय क्षेत्रातील स्त्रियांचा टक्का अत्यल्पच होता. परंतु राजकीय क्षेत्रात स्त्रियांकरिता आरक्षणाचा नियम लागू करण्यात आला व हे चित्र हळूहळू बदलू लागले. हा आशादायी बदल असला तरी सत्तेचे सर्व सूत्र पुरुषांच्या हाती असतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे महिलांकरिता आरक्षित स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्वात खालचा घटक असलेल्या ग्रामस्तरावरील ग्रामपंचायतीच्या स्त्रीयांकरिता राखीव असलेल्या जागेतून एखादी स्त्री सरपंच पदावर विराजमान झाली असता, तिच्या सर्व अधिकाराचा वापर तिचा पती करत असताना दिसून येतो.

त्यामुळे स्त्रियांच्या राजकीय आरक्षणाचा टक्का ५०% जरी झाला, तरी देखील स्त्रिया लिंगभावाच्या प्रभावातून मिळालेल्या सत्तेचा उपभोग घेण्यास पितृसत्ता व पुरुषी वर्चस्वावर आधारित समाजरचनेमुळे असमर्थ ठरतात. त्यामुळे लिंगावर आधारीत समाजरचनेत बदल

होणे गरजेचे आहे. तेंव्हा सर्वच क्षेत्रात होणार लिंगभाव थांबेल. अर्थात लिंगभावाच्या आधारे होणारे स्त्रियांवमचे शोषण थांबेल व सत्तामुलक समाजाची निर्मिती होईल. वरील विवेचनावरून हे स्पष्ट आहे की, लिंगभावाच्या आधारे होणारे स्त्रियांचे शोषन विविध स्वरूपाचे आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. लिंगभावाचे स्वरूप स्पष्ट करा

## ४.५ स्त्रीवाद

स्त्रीवाद हा स्त्री स्वातंत्र्याचा उद्घोष करणारा एक राजकीय दृष्टिकोन आहे. स्त्रीवाद ही एक तत्व प्रणाली आहे, ऐतिहासिक कालक्रमांमध्ये स्त्रियांना दास्यत्व किंवा दुय्यमत्व का व कसे प्राप्त झाले याची कारणमीमांसा करणे आणि या दास्य निवारणार्थ चळवळ उभारणे हे स्त्रीवादाच्या कक्षेत येते. शोषण विरहित समाजाची निर्मिती करणे हे स्त्रीवादाचे ध्येय आहे. या अर्थाने स्त्रीवादी लढा हा मानवमुक्तीचा लढा आहे. पुरुषांच्या जोडीने स्त्रियांचा समतेचा धरलेला आग्रह म्हणजे स्त्रीवाद. समान संधी, समान हक्क, समान दर्जा, समान स्वातंत्र्ये, हे स्त्रीवादाचे ब्रीद वाक्य आहेत. त्यमुळे स्त्रीवाद हा एकांगी दृष्टिकोन नाही तर त्यामध्ये अनेक प्रवाह आहेत यातील प्रत्येक प्रवाह काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर उदय पावला त्याने स्त्री प्रश्नावरील सैद्धांतिक बाजू अधिक समृद्ध केली. या प्रवाहाने विकसित केलेला लिंगभाव, लैंगिकता, पितृसत्ता यासारख्या संकल्पनांच्या आधारे राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, धर्म, विकास प्रक्रिया, ज्ञान निर्मिती, कला इ. विषयाचे नवे विश्लेषण केले गेले.

स्त्रियांच्या हक्कासाठी झगडणाऱ्या सर्व चळवळींना स्त्रीवादी चळवळ म्हटले पाहिजे असे बहुतांश पाश्चात्य स्त्रीवादी इतिहासकारांची भूमिका आहे स्त्रीवादी विचार प्रवाहांचा इतिहास पाहिल्यास त्या काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर उदयाला आल्या, जोमाने बहरल्या आणि काही काळानंतर मंदावल्या असे दिसते. म्हणूनच स्त्रीवादी इतिहासकारांनी या टप्प्यांचे वर्णन स्त्रीवादी चळवळीतील लाटा असे केले आहे. स्त्रीवादाची पहिली लाट एकोणविसाव्या शतकाच्या उतरार्धात व विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकांमध्ये विकसित झाली. स्त्रीवादाची दुसरी लाट १९६० ते १९८० या दशकांमध्ये अतिशय जोरकसपणे व प्रभावीपणे उसळली. स्त्रीवादाची तिसरी लाट १९९० मध्ये विकसित झाली आणि आजतागायत अस्तित्वात आहे. असे स्त्रीवादी अभ्यासक मानतात.

**आपली प्रगती तपासा**

१) स्त्रीवाद म्हणजे काय स्पष्ट करा?

## ४.६ स्त्रीवादी चळवळीची पहिली लाट

स्त्रीवादी चळवळीची पहिली लाट ही पाश्चिमात्य जगातात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकामध्ये प्रभावी झाली. स्त्रीवादी चळवळींचा हा टप्पा मुख्यत्वे स्त्रियांना मूलभूत कायदेशीर हक्क मिळवून देण्याकरिता उभ्या राहिलेल्या स्त्रीवादी चळवळीने सुरु झाला. या कालखंडात स्त्रियांमध्ये सर्वं क्षमता असताना देखील व्यवसाय आणि राजकारणाच्या क्षेत्रात दुयमत्व होते. स्त्रियांचे विश्व केवळ घरापुरते मर्यादित आहे, असी साधारण समाज धारणा होती. स्त्रियांकडे केवळ वस्तू म्हणून पाहण्याची समाज प्रवृत्ती असल्यामुळे स्त्री विवाहापुर्वी वडिलांची विवाहानंतर पतीची मालमत्ता म्हणून तिच्याकडे पाहिले जात असे. या काळात पश्यात्या राष्ट्रांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार नसल्याने त्यांना दुय्यम दर्जाचे नागरिक मानले गेले. या सर्वं प्रश्नाचा उदय भांडवली समाजाच्या उदायातून निर्माण झालेल्या समाज व्यवस्थेतून व आधुनिकीकरणाची गरज म्हणून झाला. सरंजामी समाजातून भांडवली समाजात होत असलेल्या स्थित्यंतराने स्त्री आणि स्त्रियांचे विश्व याची चिकित्सा घडून आणली. याच काळात उदयाला आलेल्या समता, स्वतंत्र्य व बंधुता या विचाराच्या प्रभावातून स्त्री प्रश्नाकडे पाहण्याची नवीन दृष्टी विकसित झाली. युरोपियन प्रबोधनातून उदयाला आलेल्या नवीन विचार प्रवाहांनी स्त्रीप्रशानाची चर्चा घडून आणली.

समाजशास्त्रज्ञ रोबेटी हॅमिल्टन यांनी म्हटल्याप्रमाणे 'सरंजामशाही ते भांडवलशाही या स्थित्यंतराचा काळ हा स्त्रियांच्या दर्जातील ठळक बदलाचा आरंभ बिंदू म्हणता येईल.' याचा परिणाम म्हणून पाश्चात्य जगतात अनेक मानवतावादी विचार प्रवाहाचा उदय घडून आला. या विचार प्रवाहांनी स्त्रियांकडे बघण्याची पारंपारिक दृष्टी बदलण्याकरिता पोषक वातावरण निर्माण केले. त्यामुळे या काळातील उदारमतवादी, मार्क्सवादी, अस्तित्ववादी इ. प्रमुख विचार प्रवाह स्त्रीप्रश्नाना प्राधान्य देत स्त्रिमुक्तीचा विचार मांडला.

### ४.६.१ उदारमतवादी स्त्रीवाद (Liberal Feminism):

व्यक्ती स्वतांत्र्य हा उदारमतवादी दृष्टिकोनाचा पाया आहे. उदारमातावाद्यांच्या मते, 'स्त्रीशोषण समाजाच्या पारंपारीकतेबरोबरच स्त्रीला समान संधी, निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, सांपत्तिक अधिकार, कायदेशीर हक्क आणि अत्याचारापासून पुरेसे संरक्षण नसल्यामुळे होते.' साहजिकच स्त्रियांची पारंपारिक बंधनातून मुक्ती झाली व त्या स्वतंत्र वृत्तीच्या बनल्या म्हणजे आत्मनिर्भर झाल्या म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्रीमुक्ती घडून येईल असे उदारमतवाद्यांना वाटते. व्यक्तीचे हित साध्य करण्यासाठी राज्यसंस्था, समाजव्यवस्था, रूढी, परंपरा, धर्म यांचे कमीत कमी नियंत्रण व्यक्तीवर असावे असे उदारमतवादाने मानले आहे. त्यामुळे सामाजिक निर्बंधांमुळे ग्रासलेल्या स्त्री जीवनाकडे सहाजिकच उदारमतवादी विचारवंतांचे लक्ष गेले.

**उदारमतवादी विचार प्रवाहाचे वैशिष्ट्ये:**

- न्याय व्यवस्थेत बदल व्हावा म्हणून संघर्ष उभारणे.

- स्त्रीला व्यक्ती म्हणून आपली भूमिका ठरविण्याचे पुरुषा इतकेच स्वातंत्र्य आहे असे मानणे.
- समान हक्कासाठी व जाचक निर्बंधापासून सुटका हवी यासाठी आग्रह धरणे

अठराव्या शतकात भांडवलशाहीच्या उदयानंतर कुटुंब हे आर्थिक घटक म्हणून हळूहळू नष्ट पावले स्त्रीने शिक्षण घेतले पाहिजे मात्र उत्तम ग्रहिनी व माता हेच ध्येय उराशी बाळगले पाहिजे, ती नवऱ्याची सहचारी असली पाहिजे, असे स्त्रीत्वाचे आदर्श त्याकाळात प्रसृत झाले होते. स्त्री ही नाजूक, हळवी, अविवेकी असते तर पुरुष हा कणखर, विवेकी असतो, अशी कप्पेबंद मांडणी त्या काळात केली जात होती. मेरी वोल्टनस्क्राफ्ट, जॉन स्टुअर्ट मिल व हॅरिएट टेलर यांनी या साचेबंद प्रतिमांविरुद्ध जोरदार आवाज उठवला.

**मेरी वोल्टनस्क्राफ्ट** यांनी लिहिलेला **'ए व्हिण्डीकेशन ऑफ दि राईट्स ऑफ वूमन' (१७९२)** हा उदारमतवादी विचारधारेतील आद्य ग्रंथ होय. मेरी वोल्टनस्क्राफ्ट यांनी स्त्री स्वातंत्र्याचा व स्त्री-पुरुष समतेचा जोरदार पुरस्कार केला. त्यांच्या विचारांचे शक्तिस्थान म्हणजे स्त्री ही तिचा पती व मुले यांची गुलाम असू नये; ती निर्णयक्षम झाली पाहिजे आणि यासाठी तिला पुरुषाप्रमाणे नागरिकत्वाचे अधिकार मिळाले पाहिजेत हे तिने जोरकसपणे मांडले.

**जॉन स्टुअर्ट मिल व हॅरीएट टेलर** या दोघांनी ही स्त्रीपुरूषांना- सारखेच शिक्षण दिले पाहिजे तसेच स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने नागरी हक्क व आर्थिक संधी मिळाली पाहिजे अशी भूमिका घेतली. जॉन स्टुअर्ट मिलचा 'द सब्जेक्शन ऑफ वूमन' (१८६९) हा ग्रंथ उदारमतवादी स्त्रीवादातील महत्वाचा ग्रंथ म्हणून गणला जातो. पत्नी व माता म्हणून स्त्रियांना कराव्या लागणाऱ्या कामांमध्ये स्त्रियांची बहुतांशी शक्ती व वेळ खर्ची होतो बौद्धिक कामे करण्यासाठी लागणारी उसंत व एकाग्रता ही सततच्या कामामुळे स्त्रियांकडून हिरावून घेतली जाते. विवाह हा स्त्री पुरुषांमधला मुक्त असावा स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार असावा. स्त्रियांना घराबाहेर जाऊन नोकरी करण्याचे स्वातंत्र्य असावे. अशी भूमिका मिलने घेतली. यासाठी त्याने ठामपणे कुटंबनियोजनाचा पुरस्कार देखील केला. महिलांना मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून १८६७ मध्ये विधी मंडळाचा सदस्य असताना त्याने विधिमंडळात बिल सादर केले, मात्र ते फेटाळले गेले. मिलच्या मते 'पुरुषाच्या बरोबरीने स्त्रियांचे अधिकार नाकारले जावेत असे कोणतेही सबळ कारण नाही.' मात्र परंपरा आणि पुरुषी वर्चस्वाच्या रेट्यामुळे स्त्रियांच्या अधिकारांची गळचेपी होत असते.

मेरी वोल्टनस्क्राफ्ट, मिल व टेलर यांच्या विचारविश्वातील स्त्री ही प्रामुख्याने मध्यम वर्गीय विवाहित स्त्री होती. ही एकपरीने त्यांच्या विचारांची मर्यादा होती या काळातील कामगार वर्गातील स्त्रियांची परिस्थिती अतिशय शोचनीय होती, मात्र त्या विषयाचा विचार त्यांच्या लेखनात आला नाही. एकोणिसाव्या शतकात एमिली डेव्हिड, फ्लोरेन्स नाईटेंगल, फ्रान्सिस पॉवर कॉल, जोसेफाईन बटलर, मिलिसेंट गॅरेट फॅसेट या स्त्रियांनीही स्त्री स्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केला.

एकूणच उदारमतवादी विचार प्रवाहाला पुरुषांच्या बरोबरीने राजकीय व सामाजिक हक्कासाठी स्त्रियांची एकजूट तसेच भांडवलशाहीला धक्का न लावता त्या चौकटीतच समान अधिकार मिळवून स्त्रीमुक्तिचा विचार अभिप्रेत आहे. याचे फलित म्हणजे 'साफ्रेजेट आंदोलन' होय. हे आंदोलन उदारमतवादी विचाराचे पहिले अपत्य म्हणून ओळखले जाते.

या विचार प्रवाहाचा प्रभाव भारतीय स्त्रीसुधारणा चळवळीवर देखील पडलेला दिसून येतो. प्रारंभिक काळातील भारतीय स्त्री सुधारणावाद्यानी सती पद्धती, विधवा पुनर्विवाह, बहुपत्नीत्व, स्त्रियांचा वारसा हक्क, स्त्रीशिक्षण या मुख्य प्रश्नांच्या अनुषंगाने स्त्रिमुक्तीचा विचार मांडला. एकूणच उदारमतवादी विचार प्रवाहाने स्त्रियांचा मतदानाचा हक्क, शिक्षणाचा हक्क, वारसा हक्क, संतती नियमनाचा हक्क या प्रमुख मागण्याच्या आधारे जगभरात लढे उभे केलेले दिसून येतात.

**४.६.२ मार्क्सवादी स्त्रीवाद (Marxist Feminism):**

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांच्या समाजवादी विचारांच्या प्रेरणेने जगभरातील स्त्रीवादी विचाप्रवाहांमध्ये समाजवादाच्या वैचारिक भूमिकेतून उदारमतवादी स्त्रीवादी विचारधारेतील उणिवांची चिकित्सा करून स्त्री शोषणाच्या विविध संस्था आणि विचार यांच्या विरुद्ध उभ्या राहिलेल्या चळवळींना मार्क्सवादी स्त्रीवादी विचार प्रवाह संबोधले जाते. मार्क्सवाद्यांच्या मते 'शासन संस्था ताब्यात घेऊन उत्पादनाच्या सर्व संसाधनावर सामाजिक मालकी प्रस्थापित करून केवळ समाजवादी स्त्रीमुक्तिवादी विचार प्रवाह विकसित होईल असे नाही, तर त्याला जोडून धर्माचा पगडा व त्यातून तयार झालेल्या मानसिकता, पुरुष प्रधानता या विरुद्ध आर्थिक, सामाजिक, राजकीय लढ्यात स्त्रियांनी हातात हात घालून लढले पाहिजे तरच स्त्रीचे स्त्री म्हणून होणारे शोषण बंद होईल.'

छाया दातार यांनी समाजवादी स्त्रीवादी विचार प्रवाहाचे तीन प्रवाह अधोरेखित केले आहेत.

१) काल्पनिक समाजवादी विचार प्रवाह
२) शास्त्रीय समाजवादी विचार प्रवाह
३) समाजवादी स्त्रीमुक्तीवादी विचार प्रवाह

या तीन प्रवाहाच्या माध्यमातून जगभरातील मार्क्सवादी स्त्रीवादी विचार परंपरेने स्त्री शोषनाच्या विरुद्ध लढा दिल्याचे अधोरेखित केले आहे. स्त्रीवादाच्या पहिल्या लटेतील या परंपरेतील काल्पनिक (स्वप्नाळू) समाजवादी विचार प्रवाहातील विचारवंत फुरिअर, सॉ सिमाँ, रॉबर्ट ओवेन तसेच विल्यम थॉम्प्सन, ॲना व्हीलर, यांनी स्त्री प्रश्नाच्या संदर्भात मौलिक विचारमंथन केले.

मार्क्सवादी स्त्रीवाद्यांच्या भांडवलशाही ही मूलभूतपणे शोषक सत्तासंबंधांवर आधारलेली आहे. या सिद्धांताचा उपयोग करून लिंगभाव सत्तासंबंध आणि समाजातील उत्पादनाच्या व पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेत स्त्रियांचे होणारे शोषण याचे विश्लेषण केले आहे. 'वर्ग' हा मार्क्सवादी स्त्रीवाद्यांना स्त्रियांना दुय्यम स्थान प्रदान करणारा प्रमुख घटक वाटतो.

भांडवलशाही समाज व्यवस्था निर्माण होण्या अगोदर हे शोषण पितृसत्तेच्या माध्यमातून घडत होते, असी मार्क्सवादी स्त्रीवाद्यांची धारणा आहे.

फ्रेडरिक एंगल्स याचा 'द ओरिजिन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड द स्टेट'(१८४५) हा मार्क्सवादी स्त्रीवादी विचारधारेतील महत्त्वचा ग्रंथ मानला जातो. एंगल्सने या पुस्तकांत ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधारे स्त्रीयांचे शोषण हे निसर्गदत्त नसून त्यांचे कालक्रमात कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता व राज्यसंस्था यांच्या उदया बरोबरच कसे सुरु झाले याची मीमांसा केली. म्हणून वर्ग व्यवस्थेचे उच्चटन झाल्यावरच स्त्रीचे पुरुषांवरील आर्थिक परावलंबित्व नष्ट होईल आणि प्रेम संबंधावर आधारलेले वैवाहिक संबंध स्त्री-पुरुषांमध्ये निर्माण होतील, असा त्याचा विश्वास होता. अर्थात पारंपारिक समाज व्यवस्थेच्या जोखडातून मुक्त होण्याकरिता स्त्रियांचे पुरुषावरील अवलंबित्व नष्ट होणे गरजेचे आहे. म्हणजे स्त्रियांकडे निर्णय स्वातंत्र्य येईल. निर्णय स्वातंत्र्यातून लिंगभाव धारणेला आळा बसेल. हे मार्क्सवादी स्त्रीवाद्यांचे पहिल्या लाटेतील विश्लेषण स्त्रीवादाच्या पुढील काळातील चळवळीसाठी महत्वाचे होते.

भांडवली समाजात कुटुंब संस्थेच्या अंतर्गत स्त्रिया जी पुनरुत्पादक श्रम करतात त्यांना कोणत्याही प्रकारचे मूल्य मिळत नाही. पुनरुत्पादक श्रम म्हणजे स्वयंपाक करणे, कपडे धुणे, मुलांना जन्म देणे, त्यांचे संगोपन करणे इ. कामाचा यात समावेश होतो. या श्रमाला कुटुंबात अनुत्पादित श्रम संबोधले जातात. मात्र बाजारपेठेत या कामांच्या विस्तारित स्वरुपाकरिता वेतन मिळते. उदा. नर्सिंग, परिचारिका, शिक्षिका, टंकलेखिका ही कामे, तसेच युद्धजन्य परिस्थिती मध्ये स्त्रियांकडे कामगारांचे राखीव फौज म्हणून बघितले जाते. यांचे बाजारपेठेत निश्चित मूल्य आहे.

स्त्रिया घरामध्ये स्वयंपाक, स्वच्छता, अपत्य संगोपन ही कामे करतात ते त्यांना बाजारपेठेत विकता येत नाहीत. जोपर्यंत या कामाचे सामाजिकरीत्य उत्तरदायित्व घेतले जात नाही, तोपर्यंत स्त्रियांचा सार्वजनिक क्षेत्रातील प्रवेश होणे कठीण आहे. स्वयंपाक, स्वच्छता, अपत्यसंगोपन ही कामे सार्वजनिक रीतीने केली गेली म्हणजे स्त्रीकडे परोपजीवी म्हणून बघणे बंद होईल आणि तिची सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. असे मार्गारेट यांनी विचार मांडले आहेत.

मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी मांडलेला दुसरा महत्त्वाचा मुद्दा हा घरकामाच्या वेतनाचा होता. मॅरीअरोसा डाला कोस्टा व सलेम जेम्स या दोन मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी घरकामाच्या वेतनाचा मुद्दा जोरकसपणे मांडला. स्त्रिया घरी जे काम करतात ते बाजारपेठेत विकता येत नसले तरी त्या कामामुळे बाजारपेठेत अतिरिक्त मूल्य निर्माण होते. अर्थात वरकड निर्माण होते. त्यामुळे स्त्रियांना घरकामाच्या मोबदल्यात वेतन द्यायला हवे अशी त्यांची मागणी होती.

मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी मांडलेला तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे समान कामासाठी समान वेतन. जागतिक बाजारपेठेत एकाच कामासाठी स्त्री-पुरुषांना वेगवेगळे वेतन मिळते ज्यावेळेस स्त्री सार्वजनिक क्षेत्रात काम करते त्यावेळी शिक्षिका, परिचारिका, कारकून,

स्वयंपाकी, शिवणकाम अशी बायकी कामे त्यांना मिळतात घराप्रमाणेच बाहेर त्यांचे काम कमी महत्त्वाचे मानले जाते आणि पुरुषांच्या तुलनेत त्यांना कमी वेतन दिले जाते. बहुतांशी स्त्रिया असंघटीत क्षेत्रात काम करीत असल्यामुळे पुरुषांच्या तुलनेत एकाच कामाकरिता स्त्रियांना कमी वेतन दिले जाते. याचे प्रमुख कारण लिंगभाव आहे. लिंगभाव धारनेमुळे स्त्रियांचे समाजातील दुय्यमस्थान त्यांना पुरुषांच्या तुलनेत कमी मोबदला मिळण्याकरिता कारणीभूत आहे.

एकूणच स्त्रीवादाच्या पहिल्या लाटेतील मार्क्सवाद्यांनी प्रमुख्याने वर्ग धारणेच्या अंतर्गत स्त्रीप्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्न केल्यामुळे स्त्रियांच्या मूल्य विरहित कौटुंबिक श्रमाला मूल्य प्राप्त करून देण्या पर्यंत केला. त्यमुळे लिंगभावाच्या अनुषंगाने इतर महत्वाच्या प्रश्नाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले.

### ४.६.३ अस्तित्ववादी स्त्रीवाद (Existentialist Feminism):

स्त्रीवादाची पहिली लाट ओसरत असताना सिमाँ दि बुव्हा या विदूशीचे 'द सेकंड सेक्स' (१९४९) हे पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाने लिंगभाव जनित स्त्री प्रश्नाची वेगळी मांडणी केली त्यामुळे स्त्रीवादी विचारधारेतील हे अभिजात पुस्तक मानले जाते. विद्युत भागवत म्हणतात, “बुव्हाने स्त्रीत्वाची व्याख्या तिच्या शारीरिक कार्याशी आणि सनातन स्त्रीत्वाशी जोडून करण्याचे नाकारले. स्त्री ही पुरुषा प्रमाणेच स्वायत्त, स्वतंत्र व निर्मितीक्षम माणूस आहे यावर भर देताना तिने अस्तित्ववादी दृष्टिकोनातून पहिले.” बुव्हाच्या मते, पुरुषांच्या संदर्भात स्त्री ‘द अदर’ होते. त्यामुळे पुरुषास कर्ता व सर्जनशील दर्जा समाजाकडून बहाल केला जातो. त्यामुळे स्त्रीच्या वाट्याला निष्क्रियता येते. विवाहसंस्थेच्या माध्यमातून सामाजिकरण व संस्कृतीकरण प्रक्रिया घडत असल्यामुळे लिंगभाव व्यवहाराला चालना मिळते, त्यामुळे बुव्हाने विवाहसंस्थे ऐवजी स्त्री-पुरुषांचे माणूस म्हणून एकत्र येणे महत्वाचे मानले आहे. स्त्रियांना  मातृत्वाची निवड करण्याची संधी मिळायला हावी, असे बुव्हा यांना वाटते.

स्त्री ही पुरुषाच्या इतकीच सचेत जाणिवे सकट जगणारी स्वयंभू व्यक्ती आहे, हे आता पुरुषाने ओळखले पाहिजे असे बुव्हा यांनी ठामपणे मांडले, हे विशेष! कारण स्त्रीवादी चळवळीची पहिली लाट या काळात ओसरली होती आणि स्त्रीवादी चळवळीची दुसरी लाट कुठे दिसत नव्हती. स्त्री हि स्वतःची प्रतिमा स्वतः घडवण्यात समर्थ आहे; कारण स्त्रीत्वाचे म्हणून काहीच शाश्वत असे सारतत्त्व आस्तित्वात नाही. स्त्रीने घराबाहेर पडून काम केले पाहिजे. यातूनच स्त्रीला स्वतःचे भवितव्य स्वतः घडविता येईल असा आशावाद तिने प्रकट केला आहे.

पुरुषी वर्चस्वातून स्त्रीप्रतिमा विभक्त करण्याकरिता स्त्रियांनी स्वतः होऊन पुढाकार घ्यावा असी अस्तीत्ववादी स्त्रीवाद्यांची धारणा होती. प्रामुख्याने हा विचार स्त्रीवादाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेतील  दुवा ठरला.

### अपाली प्रगती तपासा

१) स्त्रीवादाच्या पहिल्या लाटेचे विश्लेषण करा?

२) जॉन स्टूआर्ट मिल यांचे उदारमतवादी स्त्रीमुक्ती चळवळीतील योगदान स्पष्ट करा?

## ४.७ सारांश

स्त्रीवादाच्या पहिल्या लाटेतील विविध विचार प्रवाहाने विकसित केलेल्या विचार विश्वातून लिंगभाव धारणेतून होणाऱ्या स्त्री शोषणाला वाचा फोडण्याचे काम केले आणि त्यातून मुक्तीचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. या कालखंडातील स्त्रीवाद्यांनी प्रामुख्याने लिंगभाव व लिंगभाव आधारित समाज रचनेत बदल करण्याकरिता पाउल उचलले. तत्कालीन समाजचा प्रमुख विचार असणाऱ्या वैचारिक भूमिकांच्या माध्यमातून स्त्री प्रश्नाला वाचा फोडण्याचे कार्य केले. या काळातील उदारमतवादी, मार्क्सवादी व अस्तित्ववादी विचार धारणेच्या अंतर्गत स्त्रियांच्या समाजातील दुय्यमत्वाची चिकित्सा घडवून आणली. स्त्रियांच्या दुय्यामत्वाची कारणमिमांसा करताना वरील विचार प्रवाहातून पितृसत्ता, पुरुषी वर्चस्व त्याच बरोबर सामाजिक चालीरीती, प्रथा - परंपरा, धर्म, संस्कृती आदि सामाजिक संस्थाच्या माध्यमातून होणाऱ्या लिंगभाव जनित व्यवहाराची उकल करण्याचा प्रयत्न केला. या कालखंडातील स्त्रीवादी चळवळीचा मुख्य हेतू स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त करून देण्याचा असल्यामुळे या चळवळींना 'साफ्रेजेट आंदोलन' असे संबोधले जाते.

एकूणच स्त्रीला मालमत्ता धारण करण्याचा अधिकार असला पाहिजे, मतदानाचा अधिकार असला पाहिजे, तिला स्वातंत्र्याचा अधिकर असला पाहिजे आणि त्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याचे धोरण अवलंबिले गेले पाहिजे. तसेच स्त्रियांना गृह कामाचा मोबदला मिळाला पाहिजे. स्त्रियांचे व्यक्तिमत्व पुरुषी वर्चस्वातून मुक्त झाले पाहिजे या करिता कायदेशीर पद्धतीने लढे उभारले गेले.

याचाच परिणाम म्हणून USA मधील 'राष्ट्रीय अमेरिकन महिला मताधिकार संघ' (National American Women's Suffrage Associatio) या संघटनेच्या माध्यमातून उभारलेल्या मताधिकार लढ्याचे फलित १८६९ मध्ये, सर्वप्रथम वायोमिंग राज्यात महिलांना मताधिकार मिळाला. याचे पडसाद हळूहळू युरोपियन जगतात उमटायला लागले १८९३ मध्ये न्यूझीलंड हे पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणारे जगातील पहिले राष्ट्र बनले. तरीदेखिल युरोपातील बहुतांशी राष्ट्रांमध्ये स्त्रीवादाच्या पहिल्या लाटेच्या उत्तरार्धापर्यंत स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला नव्हता. या कालखंडात भारत व भारतासारख्या नव लोकशाही राष्ट्रांनी स्त्रियांना घटनात्मक तरतुदींच्या माध्यमातून मतदानाचा व समानतेचा अधिकार बहाल केला.

## ४.८ प्रश्न

१) लिंगभाव संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करा?

२) लिंगभावाचे स्वरूप विषद करा?

३) स्त्रीवादी चळवळीतील पहिल्या लाटेतील उदारमतवादी विचारवंतांच्या योगदानाची चर्चा करा?

४) स्त्रीवादी चळवळीतील पहिल्या लाटेतील वैचारिक भूमिकांचे मूल्यमापन करा?

५) मार्क्सवादी स्त्रीवादी विचाराची चर्चा करा?

## ४.९ संदर्भ


१. भसीन कामाला, (अनु. श्रुती तांबे), लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०.

२. भागवत विद्युत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड प्रकाशन पुणे.

३. साळुंखे अ. ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

४. वांबुरकर जास्वंदी, इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे, २०१४.

५. सिमाँ दि बोवुआ, (अनु. करून गोखले), द सेकंद सेक्स, पद्मगंध प्रकाशन, पुणे, २०१०.

६. सुमंत यशवंत, स्त्रीवाद : उदारमतवादी आणि मार्क्सवादी/समाजवादी, मिळूनसाऱ्याजणी, मे १९९९.

७) महाजन जयश्री, स्त्रिया आणि लिंगभाव, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२.

८) भोसले नारायण, जात वर्गलिंगभाव इतिहास मीमांसा, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१७.


*****

# ५

# स्त्रीवादी चळवळीची दुसरी लाट

**घटक रचना**


५.० उदिष्टये

५.१ प्रस्तावना

५.२ पार्श्वभूमी

५.३ जहाल स्त्रीवाद

५.३.१ जर्मल ग्रिअर

५.३.२ शुलामिथ फायरस्टोन

५.३.३ केट मिलेट

५.४ मनोविश्लेषणात्मक स्त्रीवाद

५.५ समाजवादी स्त्रीवाद

५.५.१ ज्युलिएट मिचेल

५.५.२ हायडी हार्टमन

५.५.३ आयरिश यांग

५.६ काळा स्त्रीवाद

५.७ पर्यावरणवादी स्त्रीवाद

५.८ सारांश

५.९ प्रश्न

५.१० संदर्भ


## ५.० उद्दिष्टये

१. लिंगभाव चळवळीचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

२. स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेच्या उदयाची करण मीमांसा करणे.

३. इ.स. १९६० नंतरच्या स्त्रीवादी चळवळींचा अभ्यास करणे.

## ५.१ प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या मध्यात स्त्रीवादाची पहिली लाट मंदावली, दुसऱ्या महायुद्धातील स्थित्यांतराचा प्रभाव स्त्रीवादी चळवळीवर देखील पडला. या पार्श्वभूमीवर स्त्रीवादी

चळवळीची दुसरी लाट १९६० ते १९८० या दोन दशकात विकसासित झाली. स्त्रीवादाच्या पहिल्या लाटेने स्त्रियांना शिक्षणाचा व मतदानाचा अधिकार प्राप्त करून देण्यावर लक्ष केंद्रित केले होते; तर दुसऱ्या लाटेत स्त्रियांच्या खाजगी आयुष्यातील पैलू अतिशय सखोलपणे राजकीय आहेत, हे मानणाऱ्या विचारवंतांनी स्त्री-पुरुष समतेचा आणि लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. युरोपियन जगतात दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्ती नंतर स्त्रियांच्या भूमिकांमध्ये बदल घडून आला. या कालखंडातील त्यांच्या जवाबदऱ्या पुनः पुरुषांकडे गेल्या. बहुमतांशी स्त्रीयांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या. त्यामुळे स्त्रियांचे नोकरीतील प्रमाण देखील घटले. स्त्रीयांनी विश्वासू आणि पुरुषीवर्चस्व असलेल्या पत्नी म्हणून शांतपणे त्यांचे जीवन पुन्हा सुरू करावे अशी या काळातील समाज अपेक्षा होती.

अमेरिकन स्त्रियांच्या संदर्भाने विचार केला असता १९६० च्या दशकात नोकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये ३८% स्त्रिया मुख्यत्वे शिक्षिका, परिचारिका किंवा सचिव म्हणून नोकऱ्यांपुरत्या मर्यादित होत्या. त्यामुळे गृहिणी आणि माता म्हणून आपल्या पारंपरिक जवाबदऱ्यांकडे पुनः परतणाऱ्या स्त्रियांची प्रतिक्रिया स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेत दिसून येते. एकूणच लिंगभाव धारणेतून स्त्रियांवर लादलेल्या गृहिणी व मातृत्वाच्या भूमिकांच्या प्रतिकारातून स्त्रीवादाची दुसरी लाट उदयाला आली.

प्रामुख्याने दुसऱ्या लाटेचा प्रारंभ हा जहालवादी स्त्रीवादाच्या वैचारिक भूमिकेतून झाला. या विचारधारेच्या बरोबरीने मनोविश्लेषणवादी, समाजवादी, मानवतावादी व पर्यावरणवादी स्त्रीवादी विचार प्रवाहांनी स्त्रियांच्या समान हक्कासाठी व स्त्रियांचे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रात होणारे शोषण थांबविण्यासाठी लढे उभारले. या लढ्यांच्या माध्यमातून पितृसत्ता व पुरुषीवर्चस्वाला आव्हान दिले. प्रारंभीक काळतील दुसरी लाट ही अमेरिकेत उदयाला आली व त्यानंतर जगभर प्रसारित होत गेली.

प्रस्तुत प्रकरणामध्ये स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेमधील विविध स्त्रीवादी विचार प्रवाहानी लिंगभाव धारणेविरुद्ध दिलेली प्रतिक्रिया आणि त्याच्या परिणामाची चर्चा करण्यात आली आहे. तसेच या कालखंडातील सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील स्त्रीशोषणाचे बलात्कार, पुनरुत्पादक हक्क, घरगुती हिंसाचार आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षा इ. मुद्दे चळवळीच्या माध्यमातून पुढे आणले गेले. तसेच सांस्कृतिक प्रघातातून निर्माण झालेली स्त्रियांची नकारात्मक आणि हीन प्रतिमा सुधारण्यासाठी अधिक सकारात्मक आणि वास्तववादी प्रयत्न केले गेले.

## ५.२ पार्श्वभूमी

स्त्रीवादाची दुसरी लाट १९६० च्या सुरुवातला उदयास आली आणि दोन दशके टिकली. पहिल्या लाटेनंतर स्त्रीवादी चळवळींना आलेली मरगळ व दुसऱ्या महायुध्दानंतरची बदललेली सामाजिक संरचना, यातून लिंगभाव जनित व्यवहारांमध्ये बदल घडून आला. या बदलाचा परिणाम स्त्रियांच्या शोषणाच्या संस्था वाढीच्या स्वरुपात झाला. स्त्रीवादाच्या पहिल्या लाटेने पाश्चिमात्य जगतातील स्त्रियांना मतदानाचा आणि मालमत्तेचा कायदेशीर

हक्क प्राप्त करून दिला. मात्र मतदानाचा आणि मालमत्तेचा हक्क मिळाल्याने स्त्रियांचे लिंगभावाच्या आधारावर होणारे शोषण थांबले नाही. कुटुंब संस्थेतील लिंगभाव, कामाच्या ठिकाणी होणारे शोषण, पुनरुत्पादक हक्क यासारख्या समस्यांनी दुसऱ्या महायुध्दानंतर विस्तृत रूप धारण केले. त्यामुळे दुसऱ्यालाटेतील स्त्रीवाद्यांनी कौटुंबिक हिंसाचार आणि वैवाहिक बलात्काराच्या मुद्यांकडेही जगाचे लक्ष वेधले व त्या विरोधात कायदेशीर लढे उभे केले.

अमेरिकन पत्रकार मार्शा लियर (Martha Lear) यांनी मार्च १८६८ मध्ये न्यूयॉर्क टाइम्स नियतकालिकात "The Second Feminist Wave: What do These Women Want?". या मथळ्याखाली लिहिलेल्या लेखात अमेरिकेतली स्त्रीवादी चळवळींकरीता “स्त्रीवादाची दुसरी लाट" हा शब्द प्रयोग केला आहे. अनेक इतिहसकारांच्या मते खाजगी व सार्वजनिक ठिकाणी लिंगभावाच्या आधारावर होणाऱ्या स्त्रीशोषणाच्या विरुद्ध उभ्या राहिलेल्या दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळींमध्ये १९९० च्या दशकात लैंगिकता व अश्लील प्रदर्शन या मुद्यांवरून दुफळी निर्माण झाली. या मतभेदांचे रुपांतरण दुसरी लाट ओसरून तिसऱ्या लाटेच्या उदयात घडून आले.

विसाव्या शतकातील उदारमतवादी स्त्रीवाद्यांनी स्त्रियांच्या मताधिकाराच्या पलीकडे जाऊन विचार करायला सुरुवात केली. स्त्रीयांना लैंगिक स्वातंत्र्य, संधीची समानता व नागरी स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता १९६० मध्ये संघटनात्मक बाधणीच्या गरजेतून ‘नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर वूमन’ (NOW) ची स्थापना करण्यात आली. पुरुष आणि स्त्रिया यांच्यामध्ये संसाधनाचे समान वितरण झाल्याखेरीज स्त्रियांना लैंगिक न्याय प्राप्त होणार नाही, असा NOW चा तर्क होता. ‘द फेमिनिन मिस्टिक’ या पुस्तकाच्या लेखिका बेट्टी फ्रायडन यांची १९६६ मध्ये NOW च्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

दुसऱ्या लाटेच्या स्त्रीवादी चळवळीला बेट्टि फ्रायडन यांच्या ‘द फेमिनिन मिस्टिक’ (१९६३) या पुस्तकाने गतिमान केले. फ्रायडन ह्या उदारमतवादी स्त्रीवादी होत्या त्यांनी आपल्या पुस्तकात पितृसत्तेच्या प्रभावातून मुलगा व मुलगी असा भेद कुटुंबसंस्थेच्या सहाय्याने केला जातो याचे सविस्तर विवेचन केले आहे. त्याचबरोबर त्यांनी अमेरिकेतील उपनगरात वास्तव्य करणाऱ्या श्वेतवर्णीय मध्यम वर्गीय स्त्रियांच्या समस्यांचे अध्ययन करून, स्त्रियांवर मातृत्व व पत्नीत्वाच्या भूमिका कशा लादल्या जातात याचे विश्लेषण केले आहे. समाज व्यवस्थेने स्त्रियांचा केवळ पत्नी आणि माता म्हणून स्वीकार करावा, एवढ्या पुरते मर्यादित न राहता एक व्यक्ती म्हणून त्यांना समाजात स्थान मिळावे ही त्यांची अपेक्षा होती. त्यांनी या पुस्तकात जाहिरात उद्योग आणि शिक्षण व्यवस्थेतील दोषांवर प्रकाश टाकत लिंगभावाच्या आधारावर होणारे स्त्रियांचे शोषण अधोरेखित केले आहे. या पुस्तकाने संपूर्ण युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेतल्या स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले व अनेक स्त्रीवादी चळवळींना प्रेरीत केले. त्यमुळे हजारो श्वेतवर्णीय मध्यमवर्गीय स्त्रिया १९६० आणि ७० च्या दशकात स्त्रीवादी चळवळीकडे आकर्षित झाल्या व स्त्रीवादाची दुसरी लाट अवतरली.

दुसऱ्या लाटेतील चळवळींचे वेगळेपण म्हणजे कायदेविषयक उपाय योजना. या लाटेच्या प्रभावातून अमेरिकेत अन्न आणि औषध प्रशासनाने १९६१ मध्ये गर्भनिरोधक गोळ्यांना मंजुरी दिली. हे स्त्रियांच्या व्यावसाईक विकासाच्या दृष्टीने महत्वाचे पाउल ठरले. केनेडी प्रशासनाने महिलांच्या स्थितीवर अध्यक्षीय आयोगाची स्थापना केली, ज्याच्या अध्यक्ष माजी फर्स्ट लेडी 'एलेनॉर रुझवेल्ट' होत्या. लिंग असमानता आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अहवालात महिलांना मदत करण्यासाठी सशुल्क प्रसूती रजा, शिक्षण आणि चांगल्या बाल संगोपनाची शिफारस करण्यात आली आहे. 'वूमन स्ट्राइक फॉर पीस' नावाच्या संघटनेने १९६१ मध्ये ५०,००० महिलांना आण्विक बॉम्ब आणि दूषित दुधाच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी एकत्र केले.

**आपली प्रगती तपासा**

१) स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेच्या उदयाची कारण मिमंसा करा?

## ५.३ जहाल स्त्रीवाद (Radical Feminism)

पहिल्या लाटेतील उदारमतवादी स्त्रीवादा विरुद्धची प्रतिक्रिया म्हणून १९६० च्या दशकात जहाल स्त्रीवादी विचार उदयाला आला. पुरुष सत्तेची केंद्रे नष्ट करून त्याला समांतर अशी स्त्रीप्रधान केंद्रे निर्माण करण्यावर या विचारधारेचा भर होता. स्त्रीवाद्यांनी स्त्रीयांच्या समान हक्काच्या मागणीच्या पुढे जाऊन प्रस्थापित समाज व्यवस्थेला नकार द्यायला हवा अशी जहालवाद्यांची धारणा होती. पितृसत्ता आणि पुरुषी वर्चस्वाचे प्रतिक असणारे 'गर्भाशय काढा' असा नारा या विचारधारेने दिला होता. पुरुषसत्ताक समाज रचना संपूर्णपणे मोडून काढल्याशिवाय स्त्री मुक्त होणे शक्य नाही, हा विचार या प्रवाहाची प्रेरणा होती. वर्गीय संघर्षापेक्षा लैंगिक संघर्ष येथे गाभ्याचा माणलेला असल्याने समलिंगी स्त्रीसहवासाचाही या विचार धारेने पुरस्कार केला आहे.

पुरुषशाही ही स्त्रियांच्या दमनाची यंत्रणा असून ती केवळ कुटुंब नव्हे, तर राज्य व्यवस्था, न्याय व्यवस्था, अर्थव्यवस्था, विवाह, धर्म, कला, साहित्य, तत्वज्ञान, इ. सांस्कृतिक विविध अंगे अशा जीवनाच्या सर्व क्षेत्रात व्यापून असते आणि स्त्रीच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, लैंगिक, भौतिक, ज्ञानात्मक व मानसिक शोषणाला कारणीभूत ठरते. गेल्या अनेक वर्षात जहाल स्त्रीवादी विचारधारेने स्त्रियांशी निगडित विविध विषयांचे विश्लेषण करून सामाजिक विश्लेषणामध्ये मौलिक भर घातली आहे. कला, अध्यात्मिकता, अन्न, पर्यावरण, पुनरुत्पादन, मातृत्व, लिंगभाव, लैंगिकता, अश्लील छायाचित्रे, याव्यतिरिक्त धर्म, विज्ञान, काव्य, साहित्य, गाणी, नृत्य, पाककला, पर्यटन, वैद्यकशास्त्र, इतिहास या विषयांची स्त्रियांच्या संदर्भात पुनर्मांडणी केली आहे.

### ५.३.१ जर्मल ग्रिअर:

जर्मल ग्रिअर यांनी पुरूषांचे स्त्रियांवर असणारे लैंगिक वर्चस्व विश्लेषित करताना समाजातील पायाभूत सत्तेवर पुरूषांचे असलेले वर्चस्व अधोरेखीत केले आहे. या पुरुषी

वर्चस्वाला त्या 'पुरुषप्रधान व्यवस्था' असे संबोधतात. पुरुषी वर्चस्व अबाधित राखण्यासाठी कुटुंबात मुलांवर योग्य संस्कार करण्याची जवाबदारी स्त्रियांवर येते.

जर्मल ग्रिअर यांच्या मते, शारीरिक भेदांवर व्यक्तिरेखेचे पैलू ठरविण्याचे कारण नाही. आपण शारीरिकदृष्ट्या कमकुवत आहोत आणि भावनाप्रधान आहोत अशीच स्त्रियांची नेहमी समजूत करून दिली जाते. या सततच्या जाणिवेमुळे स्त्री ही पुरुषांपेक्षा नेहमीच दुय्यम ठरविली जाते.

### ५.३.२ शुलामिथ फायरस्टोन:

शुलामिथ फायरस्टोन या विदुषीने 'द डायलेक्टिक ऑफ सेक्स' (१९७०) या पुस्तकामध्ये पितृसत्ताक व्यवस्थेचे सखोल विश्लेषण केले आहे. फायरस्टोन यांच्या मते, 'स्त्री व पुरुष जगातील आद्य वर्ग आहेत आणि त्यांच्यातील संघर्ष अधिक मूलभूत आहे. स्त्रियांच्या शोषणाचे मूळ जैविक आहे, म्हणून जैविक क्रांती स्त्रीमुक्तीसाठी आवश्यक आहे.' ही जैविक क्रांती तंत्रज्ञानामुळे शक्य होईल, अशी त्यांची धारणा होती. पुनरुत्पादन व मुलांचे संगोपन ही जबाबदारी स्त्रियांकडून एकदा काढून घेतली गेली, तर त्यांना घरी ठेवण्याचे प्रयोजन उरत नाही. त्यामुळे कुटुंब हे एक आर्थिक एकक म्हणून संपुष्टात येईल. वंश सातत्यासाठी भिन्नलिंगी संबंधांची अनिवार्यता अधोरेखित केली जाते, त्याचेही महत्त्व कमी होईल. समलिंगी संबंध हे तेवढेच नैसर्गिक म्हणून गणले जातील. भिन्नलिंगी संबंधातील विषमतेवर आघात करण्यासाठी स्त्री-स्त्री संबंध (Lesbian) हे एक राजकीय हत्यार म्हणून जहाल स्त्रीवाद्यांनी पुढे आणले.

### ५.३.३ केट मिलेट:

केट मिलेट या जहाल स्त्रीवादी विदुषीने स्त्रियांच्या शोषणाचे मुळे पितृसत्ताक लिंगभाव व्यवस्थेमध्ये दडलेली आहेत, असे प्रतिपादन केले. तिने 'सेक्श्युअल पॉलिटिक्स' या पुस्तकामध्ये सर्व सत्ता संबंधांच्या मुळाशी स्त्रीपुरुष - संबंध आहेत आणि म्हणून लिंगभाव हे मुलभूत पणे राजकीय आहे अशी मांडणी केली आहे.

जहाल स्त्रीवाद्याचे दुसरे मोठे योगदान म्हणजे लैंगिकते संबंधी त्यांचे प्रतिपादन, लैंगिकता हे लिंगभावाप्रमाणे एक सामाजिक, सांस्कृतिक रचित आहे अशी त्यांची धारणा आहे. लिंगभाव धारनेत पुरुषप्रधान समाजामध्ये स्त्रियांच्या लैंगिकतेची पुनर्रचना ही पुरुषांच्या गरजेप्रमाणे व इच्छेप्रमाणे केली जाते. स्त्रिया स्वतःच्या शरीराकडे पुरुष निर्मित निकषांच्या चष्म्यातून बघतात. स्त्रीचे शरीर हे शोषणाची जागा ठरते, याचे जहाल स्त्रीवाद्यांनी अतिशय गंभीर व सखोल विश्लेषण केले आहे.

## ५.४ समाजवादी स्त्रीवाद (SOCIALIST FEMINISM)

मार्क्सवादी स्त्रीवादी विचारधारेतील लिंगांधळेपणामुळे असंतुष्ट झालेल्या मार्क्सवादी विचारवंतांनी ऐतिहासिक भौतिकवादाच्या सैद्धांतिक चौकटीमध्ये समाजवादी स्त्रीवादी विचार विकसित केला. प्रामुख्याने या विचारधारेवर मार्क्सवादी जहाल मनोविश्लेषणात्मक

स्त्रीवादी विचारप्रणालीचा प्रभाव पडल्याचे दिसते. काही समाजवादी स्त्रीवादी विचारवंतांची अशी धारणा आहे, की भांडवलशाही व पुरुष प्रधानता या दोन स्वतंत्र व्यवस्था आहेत, त्यांच्या हातमिळवणीतून स्त्रियांच्या शोषणाला बळकटी मिळते.

### ५.४.१ ज्युलिएट मिचेल:

ज्युलिएट मिचेल यांनी 'सेक्शुअल पॉलिटिक्स' (१९७०) आणि 'द वुमन्स इस्टेट' (१९७१) या ग्रंथात भांडवलशाही व पितृसत्ताक समजव्यवस्थेचे विश्लेषण केले आहे. समाजातील स्त्रियांची स्थिती उत्पादन, प्रजनन, लैंगिकता आणि मुलांचे संगोपन व समाजिकिकरण यामधील भूमिकांवर आधारलेली असते. भांडवलशाहीला भौतिक पाया आहे, तर पुरुषशाही ही सामाजिक व सांस्कृतीक विचारप्रणालीवर आधारलेली आहे, अशी मिचेल यांची धारणा होती. स्त्रीची जननक्षमता, मुलांचे संगोपन व लैंगिकता या गोष्टींची आर्थिक क्षेत्रात गणना करून पोथीनिष्ठ मार्क्सवाद्यांनी घोडचूक केली, असे त्यांनी मांडले आहे. त्यांनी कुटुंब संस्थेला स्त्रियांच्या शोषणाचे केंद्र मानले आहे. 'स्त्रिया उत्पादन व्यवस्थेत उतरल्या म्हणजे कुटुंबसंस्था आपोआप नष्ट होईल, असा नारा त्यांनी दिला.' मिचेलच्या मते, पुनरुत्पादन, लैंगिकता व मुलांचे संगोपन या बाबींमुळे स्त्रिया उत्पादन क्षेत्रात उतरल्या तरी पुरुषांच्या मागे पडतात. समाजवादी उत्पादन व्यवस्थेमध्ये कुटुंब हे एक आर्थिक एकक म्हणून नष्ट होते; मात्र वैचारिक व जैव-सामाजिक एकक म्हणून नष्ट होत नाही, अन्यथा सर्व समाजवादी देशांमधून कुटुंब व्यवस्था नष्ट झाली असती.

भांडवलशाही नष्ट होण्यासाठी जशी आर्थिक क्रांतीची गरज आहे, तशी पुरुषशाही नष्ट होण्यासाठी सांस्कृतिक, मानसिक क्रांतीची गरज मिचेल यांनी प्रतिपादित केली आहे. स्त्रीविषयक व पुरुषविषयक धारणा, लैंगिक दृष्ट्या कामाचे विभाजन याविषयीच्या धारणा जोपर्यंत बदलत नाहीत, तोपर्यंत स्त्री-पुरुष समानता अस्तित्वात येणार नाही, असे मिचेलने 'सायकोॲनालिसिस अँड फेमिनिझम' (१९७४) या ग्रंथात मांडले मांडले आहे.

### ५.४.२ हायडी हार्टमन :

हार्टमन यांनी पुरुषशाही म्हणजे भौतिक पायावर उभारलेली व्यवस्था असून स्त्रियांची श्रमशक्ती, लैंगिकता, जननक्षमता यावर असणारे पुरुषी नियंत्रण होय, अशी मांडणी केली पुरुषशाहीतून समाजातील पुरुषा-पुरुषांमधील सामाजिक संबंध साकारतात; त्यांच्यामध्ये उतरंड असते या संबंधातून पुरुषांमध्ये निर्माण होणारे परस्परावलंबित्व व ऐक्यभाव यामुळे ते स्त्रियांवर वर्चस्व गाजवता एकपतिक (monogamous) भिन्नलिंगी विवाह संस्थेतून स्त्रियांचे श्रम, लैंगिकता व जनन क्षमता यावरील नियंत्रण दृढ होते. म्हणून भांडवलशाही व पुरुषशाही या दोन्ही यंत्रणाचा सामना वेगवेगळ्या साधनांनी केला पाहिजे, असे हायडी हार्टमन यांनी मांडले आहे.

### ५.४.३ आयरिश यांग:

या समाजवादी स्त्रीवादी विदूशीला 'दुहेरी-व्यवस्था' सिद्धांतामध्ये अनेक त्रुटी आढळल्या भांडवलशाही व पितृप्रधानता ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे यांग यांनी मांडले. जोपर्यंत भांडवलशाही नष्ट होत नाही, तोपर्यंत स्त्रियांचे शोषण थांबणार नाही; करण पितृसत्ता ही भांडवलशाहीची पूर्वअट आहे, अशी त्यांची भूमिका होती. यापद्धतीने

समाजवाद्यांनी स्त्री शोषणाला पोषक असणाऱ्या भांडवलशाही विचाराचे खंडन करत. पुरुषी वर्चस्व आणि पितृसत्ता यांच्या बंधनातून स्त्रीमुक्तीचा आग्रह धरला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेतील जहाल स्त्रीवादी विचारधारतेचे योगदान स्पष्ट करा?

## ५.५ मनोविश्लेषणात्मक स्त्रीवाद

सिग्मंड फ्रॉइड (१८५६-१९३९) यांनी लैंगिकता या विषयावर सखोल विवेचन केले आहे लिंगभाव ही विभिन्न टप्प्यांमधून झालेली लैंगिक परिपक्वतेची अभिव्यक्ती आहे, असा सिद्धांत मांडला. स्त्री व पुरुष यांच्या शारीरिक भिन्नतेमुळे त्यांच्यात विभिन्न प्रकारची लैंगिकता विकसित होते. स्त्रीयामध्ये असलेल्या लिंगमत्सरांमुळे ही उणीव भरून काढण्यासाठी मातृत्व तिला हवे हवेसे वाटते. 'शरीर हीच नियती' हा सिग्मंड फ्रॉइडने सिद्धांत मांडला. स्त्रियांना प्राप्त असणाऱ्या भिन्न शारीरिक घडणीमुळे त्यांची स्त्रीत्वाची जडण-घडण तसेच लैंगिकतेची जडणघडण पुरुषांच्या जडणघडणीपेक्षा वेगळी असते असे सिग्मंड फ्रॉइड यांनी स्त्री शोषणाची कारण मीमांसा करतांना विश्लेषण केले आहे.

बेटी फ्रिडन, शुलमिथ फयरस्टोन व केट मिलेट या साठोत्तरीतील स्त्रीवादी तत्त्वचिंतकांनी फ्राईडवर जोरदार टीकास्त्र सोडले. पुरुष निसर्गत: आक्रमक असतात या सिद्धांताला कोणताही शास्त्रीय आधार नाही इतर प्राणिमात्रांमध्ये मादीकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याशिवाय नर-मादी मिलन होत नाही हे केट मिलेट यांनी सप्रमाण सिद्ध केले.

सिग्मंड फ्रॉइडच्या यांच्या विचारांचे खंडन सर्वच स्त्रीवाद्यानी केले आहे. त्यामुळे त्यांच्या विश्लेषणात मानसिक जडण घडणीनुसार जोपर्यन्त स्त्री-पुरुष यांच्यातील जैविक भेदामुळे होणारा लैंगिक भेदभाव नष्ट केल्या खेरीज, खऱ्या अर्थाने स्त्रीमुक्ती होणार नाही, अशी मनोविश्लेषणवादी स्त्रीवाद्यांची भूमिका होती.

## ५.६ काळा स्त्रीवाद (BLACK FEMINISM)

"जेव्हा कृष्ण वर्णीय समाजाविषयी लोक बोलतात, तेव्हा कृष्णवर्णीय स्त्रियांच्या हितसंबंधांना लैंगिक भेदभाव (sexism) बाधा आणतो; जेव्हा स्त्रियांविषयी लोक बोलतात, तेव्हा कृष्णवर्णीय स्त्रियांच्या हितसंबंधांना वंशवाद (Recism) बाधा आणतो. जेव्हा कृष्णवर्णीय लोकांबद्दल बोलले जाते, तेव्हा सर्व लक्ष कृष्णवर्णीय पुरुषांवर केंद्रित होते आणि जेव्हा स्त्रियांविषयी बोलले जाते, तेव्हा श्वेतवर्णीय स्त्रियांवर लक्ष केंद्रित होते. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा समृद्ध स्त्रीवादी साहित्यातून याची आधीक साक्ष पटते" बेल हुक्स या कृष्णवर्णीय विचारवंतीने मांडलेले हे विचार स्त्रीवादी चळवळ आणि कृष्णवर्णीयांची चळवळ या पासून फारकत घेत कृष्णवर्णीय स्त्रियांनी आपली वेगळी चूल मांडली, यावर प्रकाश टाकतात.

कृष्णवर्णीय स्त्रियांनी एकत्र येऊन अमेरिकेतील राष्ट्रीय कृष्णवर्णीय स्त्रीवादी संघटनेची १९७३ मध्ये नॅशनल ब्लॅक फेमिनिस्ट ऑर्गनायझेशन (NBFO) ची स्थापना केली. याच धर्तीवर १९७४ मध्ये बोस्टनमध्येही कृष्णवर्णीय स्त्रियांचा एक गट स्थापन झाला. कृष्णवर्णीय स्त्रिया ह्या कायमच समाजातील अधिक शोषीक गट राहिल्या आहे. कारण पितृसत्ता, वंशवाद, वसाहतीक सत्ता अशा तिहेरी पाशामुळे तो पीडित असतो, अशी कृष्णवर्णीय स्त्रीवादी गटाची भूमिका होती. १९७४ साली 'कम्बही रिव्हर कलेक्टिव्ह' या गटाने कृष्णवर्णीय स्त्रियांच्या मुक्ती मुळे वंशवाद, लिंगवाद, वर्गवाद (Recism, Sexism and Classism) यांचा अंत होईल असे घोषित केले. या चळवळीतून जन्माला आलेला एक सिद्धांत म्हणजे 'वूमनिझम' (Womanism).

ॲलिस वाकर व इतर कृष्णवर्णीय स्त्रियांनी असे स्पष्ट केले की श्वेतवर्णीय स्त्रियांपेक्षा काळ्या स्त्रिया भिन्न प्रकारचे व अधिक तीव्र प्रकारचे शोषण अनुभवतात. अँजला डेव्हिस यांनी 'वूमन, रेस ॲण्ड क्लास' या पुस्तकात वंश, लिंगभाव व वर्ग एकमेकांशी जैविकपणे जोडलेले आहेत, याची चर्चा केली आहे. किम्बर्ले क्रेनशॉ या विचारवंतीने 'आंतरविभागीयता' (Intersectionality) या संकल्पनेची मांडणी केली. स्त्री प्रश्नाचे विश्लेषण करताना वर्ग व वंश या कारकामधील आंतरसंबंध तपासले पाहिजे, असे मत तिने व्यक्त केले. कृष्णवर्णीय स्त्रियांच्या व इतर अधिक शोषित स्त्रियांच्या (उदा. भारतातील दलित स्त्रिया) शोषणाचे विश्लेषण करण्याचे एक नवे आयुध यामुळे प्राप्त झाले. श्वेतवर्णीय पुरुषांच्या हातात असलेल्या सत्तेचा बिमोड करायचा असल्यास श्वेतवर्णीय व कृष्णवर्णीय स्त्रीयांनी एकत्रितपणे संघर्ष केला पाहोजे, अशी भूमिका घेतली. कृष्णवर्णीय स्त्रियांनी तिसऱ्या जगतातील स्त्रीवादी गट व उत्तराधुनिकतावदी स्त्रीवादी गट यांच्याशी मैत्री साधून पितृसत्ता व श्वेतवर्णीय पश्चिमी स्त्रीवादी चळवळीविरुद्ध संघर्ष उभा केला.

## ५.७ पर्यावरणवादी स्त्रीवाद

१९७० च्या दशकात पर्यावरनिणीय स्त्रीवादी चळवळींना व विचारांना सुरुवात झाली आपल्या भोवतालचा निसर्ग, त्यातील जैवविविधता, संसाधने यांचा उपयोग करून अनादी अनंत काळापासून मानवाने प्रगती केली. मात्र वैज्ञानिक क्रांतीनंतर भांडवलशाहीने निसर्गाची जी लुटालुट गेल्या दोन-अडीचशे वर्षांत केली, त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. यातूनच पर्यावरणवादी चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळींमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठा होता भांडवलशाही विकासाचे प्रतिमान वरवर फार वस्तुनिष्ठ व कल्याणकारी दिसत असले, तरी प्रत्यक्षात या प्रतिमानाचे समाजातील विविध गटांवर, समूहांवर, तिसऱ्या जगतातील राष्ट्रांवर होणारे परिणाम भयावह आहेत. या प्रतिमानाने पहिल्या जगातील मूठभर श्वेतवर्णीय पुरुषांचे वर्चस्व प्रस्थापित होते. भांडवलशाही निसर्ग व स्त्रिया यावर वर्चस्व गाजवते. भांडवलशाही व पुरुषसत्ता यांच्या हात मिळवणितून स्त्रियांचे व निसर्गाचे शोषण होते. ही पर्यावरणवादी स्त्रीवादाची भूमिका आहे. वंदना शिवा, मारिया मिस यासारख्या पर्यावरणवादी स्त्रीवाद्यांनी आधुनिक पाश्चात्त्य विज्ञान-तंत्रज्ञानाची सखोल समीक्षा केली आहे. स्त्रिया त्यांच्या जैविक जडणघडणी मुळे निसर्गत: भावनाशील, हळव्या

असतात, निसर्गाशी जोडलेल्या असतात. ऋतुचक्र, बाळंतपण, संगोपन या प्रक्रियेशी जोडलेल्या असतात. निसर्गाला न ओरबाडता स्त्रिया निसर्गाचे संवर्धन करतात.

स्त्रियांच्या जननक्षमतेमुळे प्राचीन काळी त्यांना मातृदेवी संबोधले जात होते. पुरुष सत्तेच्या उदयानंतर स्त्रियांचे सामाजिक महत्व घटून समाजात त्यांना दुय्यम स्थान प्राप्त झाले. अशी पर्यावरणवादी स्त्रीवाद्यांची धारणा होती. भांडवलशाही नंतर आलेल्या व्यापारी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तर कष्टकरी स्त्रिया अधिक भरडल्या जात आहेत. म्हणून विकासाच्या प्रतिमानाची चिकित्सा व फेरमांडणी स्त्रियांचे हितसंबंध लक्षात घेऊन झाली पाहिजे. तसेच केवळ स्त्रियाच नव्हे तर बहुजनांच्या हितासाठी शासनाने कल्याणकारी योजना राबवल्या पाहिजेत. अशी भूमिका पर्यावरणवादी स्त्रीवाद्यांनी घेतली आहे. या भूमिकेतून जन चळवळीतून व्यापक मानवमुक्तीचा लढा उभारण्याचा प्रयत्न पर्यावरणवादी स्त्रीवादी करताना दिसून येतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे आफ्रिकेतील वंगारी मथाई व भारतातील मेधा पाटकर यांच्यासारख्या पर्यावरणवादी नेत्या आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१) कळा स्त्रीवाद म्हणजे काय? स्पष्ट करून स्त्रीवादी चळवळीतील त्यांचे योगदान अधोरेखित करा?

## ५.८ दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळीवरील टीका

स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेतील विचार प्रवाहानी स्त्रियांच्या शिक्षण व मताधीकाराच्या पुढे जात स्त्रियांच्या सार्वजनिक व खाजगी ठिकाणी काम करण्याच्या अधिकाराचा आणि पुनरुत्पादन अधिकाराच्या विस्ताराचा पुरस्कार केला. या दृष्टीने विचार केला असता अमेरिकेत कृष्णवर्णीय आणि गरीब स्त्रिया पिढ्यानपिढ्या घराबाहेरची सर्वच प्रकारची कामे व नोकऱ्या करत होत्या. तसेच आफ्रो - अमेरिकन स्त्रिया सक्तीच्या नसबंदी कार्यक्रमामुळे त्रस्त होत्या. याची दाखल दुसऱ्या लेटेतील स्त्रीवादी चळवळीने घेतली नाही. अशी टीका २० व्या शतकाच्या उत्तरार्धात ऑड्रे लॉर्डेड आणि विनोना ला ड्युक सारख्या स्त्रिवाद्यांनी दुसऱ्या लाटे संदर्भात केली आहे. प्रामुख्याने ही टीका स्त्रीवादी इतिहासात कृष्ण वर्णीय आणि कामगार वर्गातिल स्त्रियांच्या योगदानाकडे दुर्लक्ष केल्यागेल्यामुळे झाली आहे.

युनायटेड स्टेट्समधील दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळीवर कृष्णवर्णीय महिलांचे अधिकार ओळखण्यात अपयशी ठरल्याबद्दल टीका केली गेली आहे. युरोपातील गोऱ्या स्त्रीवाद्यांनी त्यांचे आवाज अनेकदा शांत केले किंवा त्याकडे दुर्लक्ष केले. स्त्रीवादी चळवळीचे प्रबळ ऐतिहासिक कथन श्वेतवर्णीय आणि मुख्यतः मध्यमवर्गीय स्त्रियांच्या चेतना वाढवणाऱ्या गटांवर केंद्रित होते. यात कृष्णवर्णीय तसेच कामगार वर्ग आणि निम्नवर्गीय महिलांचे अनुभव आणि योगदान वगळण्यात आले आहेत. दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी असे गृहीत धरले की, सर्व स्त्रियांना गोऱ्या मध्यमवर्गीय स्त्रियांसारखेच अत्याचार अनुभवावे

लागतात. परंतु हे अर्धसत्य आहे. कारण इतर स्त्रिया आणि त्यांचे प्रश्न गोऱ्या मध्यमवर्गीय स्त्रियांपेक्षा वेगळे आहेत.

केवळ गोऱ्या स्त्रियांच्या संदर्भातील मर्यादित दृष्टिकोणाने कृष्णवर्णीय स्त्रियांना त्यांच्या वंश आणि वर्गानुसार उद्भवणाऱ्या शोषणाला तोंड द्यावे लागले, याकडे दुर्लक्ष केले गेले. यामुळे स्त्रियांच्या कृष्णवर्णीय स्त्रीवाद्यांनी आपली वेगळी चूल मांडली. स्त्रियांच्या मुक्ती चळवळीपासून वेगळ्या झालेल्या या गटाने काळा स्त्रीवाद आणि आफ्रिकन स्त्रीवाद या नवविचार प्रवाहांना जन्म दिला. किम्बर्ली क्रेनशॉ यांनी १९८९ मध्ये "इंटरसेक्शनॅलिटी" हा शब्द स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेवर वर्चस्व असलेल्या श्वेतवर्णीय मध्यमवर्गीय स्त्रियांच्या विचारांना प्रतिसाद म्हणून वापरला. पुष्कळ स्त्रीवादी विद्वान दुसऱ्या लाटेची पिढीजात विभागणी समस्याप्रधान मानतात व दुसऱ्या लाटेला सामान्यत: बेबी बूमर पिढी म्हणून वर्गीकृत करतात. याचे कारण द्वितीय विश्वयुद्ध संपण्यापूर्वी या लाटेतील अनेक स्त्रीवादी नेत्यांचा जन्म झाला होता.

प्रामुख्याने स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांचे लक्ष केवळ मध्यमवर्गीय गोऱ्या स्त्रियांच्या प्रश्नापुरते मर्यादित असल्यामुळे काळ्या व आफ्रो-अमेरिकन स्त्रियांच्या शोषणाची जाणीव त्यंच्यामध्ये तेवढ्या तीव्र प्रमाणात नव्हती. त्यातून या वर्गाच्या इतिहासाकडे व त्यांच्या कार्य कर्तुत्वाकडे दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी दुर्लक्ष केले त्यांच्या जाणिवांची दाखल न घेतली गेल्यामुळे या काळात त्यांनी आपली स्वतंत्र चळवळ उभी करत इतिहासाची पानर्मांडणी करण्याचा प्रयत्न केला.

## ५.९ सारांश

स्त्रीवादाची दुसरी लाट सामान्यतः १९६० ते १९८० च्या दशकात विकसित झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर युरोपियन स्त्रीपुरुषांच्या भूमिकांमध्ये घडून आलेल्या स्थित्यांतराचा परिणाम म्हणून गृहिणी आणि माता म्हणून आपल्या भूमिकांकडे परतणाऱ्या स्त्रियांच्या प्रतिक्रियेच्या स्वरुपात दुसरी लाट उदयाला आली. दुसरी लाट १९६० च्या दशकात सुरू झाली आणि १९९० च्या दशकापर्यंत चालू राहिली. ही लाट युद्धविरोधी आणि नागरी हक्क चळवळी आणि जगभरातील विविध अल्पसंख्याक गटांच्या वाढत्या आत्म-चेतनेच्या संदर्भात उलगडली गेली. ही चळवळ सुरुवातीला युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेत केंद्रित झाली आणि नंतर इतर पाश्चिमात्य देशांमध्ये पसरली. पहिली लाट मुख्यत्वे मताधिकार संघर्षाशी संबंधित होती, तर दुसरी लाट सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रातील शोषण व अन्यायावर अधिक केंद्रित होती. बलात्कार, पुनरुत्पादकता, घरगुती हिंसाचार आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षा हे मुद्दे दुसऱ्या लाटेतील स्त्रियांच्या चळवळीने समोर आणले. समाज आणि सांस्कृतिक परिघात स्त्रियांची करण्यात आलेली नकारात्मक आणि हीन प्रतिमा सुधारण्यासाठी अधिक सकारात्मक आणि वास्तववादी प्रयत्न केले गेले. पुरुषी वर्चस्व आणि पितृसत्तेला आव्हान देण्याकरिता स्त्रियांची स्वतःची लोकप्रिय संस्कृती निर्माण करण्यावर या लाटेत अधिक भर देण्यात आला.

दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांमध्ये जहालवादी स्त्रीवादाचा विचार अधिक प्रभावी असल्यामुळे पुरुषी वर्चस्वाची सर्व सत्ता केंद्रे उधवस्त करत समाज परिवर्तनाचा विचार पुढे आण्याचा प्रयत्न केला गेला. पहिल्या लाटेतील उदारमतवादी आणि स्वप्नाळू मार्क्सवादी प्रवाहातील उणीवांवर बोट ठेवत या कालखंडात जहाल स्त्रीवादी, समाजवादी, मनोविश्लेशनवादी, पर्यावरणवादी, काळा स्त्रीवाद इ. विचार प्रवाहाच्या वैचारिक जडण घडणीतून दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळींचा स्त्रीशोषणाविरुद्धचा विचार अधिक प्रगल्भ झाला.

युरोपियन स्त्रीवाद्यांनी मुख्यतः मध्यमवर्गीय स्त्रियांच्या शोषणाच्या विरुद्ध उभ्या केलेल्या चळवळीतून वेगळे होत कृष्णवर्णीय स्त्रियांनी NBFO सारख्या संघटनाची स्थापना करून स्त्री शोषणा बरोबर होणाऱ्या वांशिक शोषनाच्या विरुद्ध या कालखंडात आपला स्वतंत्र लढा उभा केला. पर्यावरण संरक्षणाच्या भूमिकेतून पर्यावरणाचे व स्त्री शोषणाचे भांडवली सत्तेच्या व पुरुषी वर्चस्वाच्या तत्वचौकटीतून होणारे शोषण थांबविण्याकरिता संघर्ष उभा केला.

एकूणच स्त्रीवादी चळवळीतील पहिल्या लाटेतील मर्यादा ओलांडत दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळींनी आपल्या हक्कासाठी सर्व समावेशक लढा उभारून स्त्रीमुक्तीची चळवळ विकसित केली.

## ५.१० प्रश्न

१) स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेचे योगदान स्पष्ट करा?

२) स्त्रीवादी चळवळीतील समाजवादी विचार प्रवाहाची भूमिका स्पष्ट करा?

३) स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेच्या उदयाची चिकित्सा करा?

४) स्त्रीवादी चळवळीतील दुसऱ्या लाटेतील मनोविश्लेशनवादी विचार प्रवाहाची भूमिका स्पष्ट करा?

## ५.११ संदर्भ


१. भसीन कामाला, (अनु. श्रुती तांबे), लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०.

२. भागवत विद्युत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड प्रकाशन पुणे.

३. साळुंखे अ. ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

४. वांबुरकर जास्वंदी, इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे, २०१४.

५. सिमाँ दि बुव्हा, (अनु. करून गोखले), द सेकंद सेक्स, पद्मगंध प्रकाशन, पुणे, २०१०.

६. सुमंत यशवंत, स्त्रीवाद : उदारमतवादी आणि मार्क्सवादी/समाजवादी, मिळूनसाऱ्याजणी, मे १९९९.

७. महाजन जयश्री, स्त्रिया आणि लिंगभाव, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२.

८. भोसले नारायण, जातवर्गलिंगभाव इतिहास मीमांसा, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१७.


*****

# ६

# स्त्रीवादी चळवळीची तिसरी लाट

**घटक रचना**

६.० उद्दिष्टये
६.१ प्रस्तावना
६.२ पार्श्वभूमी
६.३ स्त्रीवादी चळवळीची तिसरी लाट
६.४ तिसऱ्या लाटेतील महत्वाचे मुद्दे
६.५ उत्तर अधुनिकतावादी व उत्तर संरचनावादी स्त्रीवाद
६.५.१ हेलेन सिक्सन
६.५.२ ज्यूडीथ बटलर
६.६ बहूसांस्कृतिक व उत्तर वसाहतवादी स्त्रीवाद
६.७ स्त्रीवादी चळवळीच्या तिसऱ्या लाटेची वैशिष्ट्ये
६.८ स्त्रीवादी चळवळीच्या तिसऱ्या लाटेवरील टीका
६.९ सारांश
६.१० प्रश्न
६.११ संदर्भ

## ६.० उद्दिष्टये

१. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळीचा विकास समजून घेणे.

२. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळीतील विचार प्रवाहांचा अभ्यास करणे.

## ६.१ प्रस्तावना

स्त्रीवादी चळवळीतील तिसरी लाट १९९० मध्ये उसळली. या लाटेचे नेतृत्व दुसऱ्या लाटेच्या प्रारंभी जन्माला आलेल्या व दुसऱ्या लाटेतील प्रभावित कुटुंबातील पिढीने केले. स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेतून आलेल्या अपयशाची चर्चा करण्यासाठी किंवा या चळवळी विरुद्धची कटू प्रतिक्रिया म्हणून ही तिसरी लाट उदयाला आली. दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादी विचार मंथन हे प्रामुख्याने पहिल्या जगातील मध्यमवर्गीय श्वेतवर्णीय स्त्रियांच्या अनुभवावर आधारलेले होते, अशी जोरदार टीका या लाटेच्या प्रारंभी होऊ लागली. कृष्णवर्णीय स्त्रीवादी नेत्या या चळवळीच्या अग्रस्थानी होत्या. या काळातील स्त्रीवादाच्या महा कथांना छेद देत आणि राजकारणावर भर देत स्थानिक पातळीवर स्त्री प्रश्न समजावून

घेताना स्त्रीवादी विचारधारेपेक्षा स्थानिक पातळीवरील प्रश्नांची बहुआयामी चर्चा केली पाहिजे अशी धारणा स्त्रीवाद्यांमध्ये बळावू लागली होती.

१९८० मधील कोपनहेगन येथील तसेच १९८५ मधील नैरोबी येथील स्त्रीवादी परिषदांनी असे निदर्शनास आणून दिले की, स्त्रीवादी चळवळीमध्ये अनेक प्रवाहानुसार स्त्री प्रश्नाचे विविध अग्रक्रम आहेत. तसेच पहिल्या जगातील स्त्री समस्या विरुद्ध तिसऱ्या जगातील स्त्री समस्या असे अनेक भेद आहेत. नैरोबी येथील परिषदेत असे अधोरेखित केले गेले की, स्त्री वादांमध्ये अनेक प्रवाह आहेत आणि असलेच पाहिजे, कारण प्रदेश, वर्ग, राष्ट्र, वांशिक गटानुसार स्त्रियांचे प्रश्न व त्याचे अग्रक्रम वेगळे आहेत. या विधानातून स्त्रीवादी गटांमधील सामंजस्य व एकोपा वृद्धींगत व्हायला हवा आणि लिंगभाव विषमतेविरुद्ध सर्व स्त्रीवादी गटांचा समान लढा तीव्र व्हायला हवा, असा विचार या परिषदेतून मांडण्यात आला. या पार्श्वभूमीवर जगभरातील विविध देशांमधील विविध गटानुसार स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी करण्याला प्रोत्साहन दिले गेले.

या नवीन दृष्टिकोनाचे काही सुरुवातीचे समर्थक खरेतर दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांच्या मुली होत्या. त्यांनी १९९२ मध्ये 'थर्ड वेव्ह डायरेक्ट ॲक्शन कॉर्पोरेशन' ची स्थापन केली. पुढे १९९७ मध्ये त्याचे रूपांतरण 'थर्ड वेव्ह फाउंडेशन' मध्ये करण्यात आले. हे फाउंडेशन लिंग, वांशिक, आर्थिक आणि सामाजिक न्यायासाठी काम करणाऱ्या गटांना आणि व्यक्तींना समर्पित होते. या दोन्ही संस्थांची स्थापना कादंबरीकार आणि दुसऱ्या लाटेतील कार्यकर्त्या ॲलिस वॉकर यांची मुलगी रेबेका वॉकर यांनी केली होती. या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या 'मॅनिफेस्टा: यंग वुमन' (२०००) च्या लेखिका जेनिफर बॉमगार्डनर आणि 'फेमिनिझम ॲन्ड द फ्यूचर' (२०००) एमी रिचर्ड्स यांनी च्या दोन्ही लेखिका १९७० मध्ये जन्माला आल्या आणि दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांच्या कुटुंबात वाढल्या. त्यांचा संबंध संघटित स्त्रीवादी गटांशी होता. त्यांनी त्यांच्या घरातील लिंग आधारित श्रम विभागणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि त्यांच्या मुलींना आत्म-जागरूक, सशक्त, वक्तृत्ववान, उच्च विद्या प्राप्त स्त्रिया बनविले.

तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळ उत्तर-आधुनिकतावादी विचाराने प्रभावित झालेल्या, तिसऱ्या लाटेच्य स्त्रीवाद्यांना इतर गोष्टींबरोबरच स्त्रीत्व, लिंग, सौंदर्य आणि पुरुषत्व याविषयीच्या कल्पना आणि शब्दांची पुनर्रचना करायची होती. त्याची मांडणी त्यांनी स्त्रीवादाच्या विकासा पासून विविध क्षेत्रांमध्ये पसरलेल्या विचारांच्या आधारे केली. तिसरी लाट समजून घेण्यासाठी, प्रथम अमेरिकेतील दुसऱ्या लाटेनंतर उद्भवलेली 'लैंगिक युद्धे' समजून घेतली पाहिजेत. 'लैंगिक युद्ध' हे अश्लीलतेवर स्त्रीवादाच्या गटांमधील खुल्या चर्चेला दिलेले नाव होते. पॉर्नोग्राफी विरोधी चळवळीतून स्त्रीवाद्यांना पॉर्न उद्योग मर्यादित ठेवायचा होता. कारण त्यांचा असा विश्वास होता की पॉर्न उद्योग प्रसारित होणाऱ्या स्त्री चित्रणामुळे स्त्रियांवरील हिंसाचाराला प्रोत्साहन मिळते. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांना वेश्याव्यवसाय संपवायचा होता. ते या व्यवसायकडे कोणत्याही स्त्रीसाठी सर्वात वाईट परिस्थिती म्हणून पाहत होते. दुसरीकडे काही स्त्रीवाद्यांनी असा युक्तिवाद केला की लैंगिक मुक्ती हा स्त्रियांसाठी समानतेचा एक महत्त्वाचा घटक आहे. पोर्नोग्राफीवर बंदी घालणे

दडपशाही आणि अलोकतांत्रिक आहे. त्यांचा असा विश्वास होता की अशा स्त्रिया आहेत, ज्यांनी स्वतः अशा प्रकारचा व्यवसाय निवडला आहे.

तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी विचारधारेने सामाजिक शास्त्रांमधील मुख्यप्रवाही सिद्धांतांना आणि मांडणीला आव्हान दिले. इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, साहित्य अशा सर्वच विद्याशाखा अंतर्गत स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून नवी मांडणी होत आहे. एव्हाना या मांडणीची सुरुवात झाली असली तरी, स्त्रीवादी चळवळीला आणि मांडणीला अजून मोठा पल्ला गाठायचा आहे हे निश्चित. एकूणच तिसरी लाट परिभाषित करणे आणि या कालावधीतील चळवळींच्या कार्याच्या आधारावर स्त्रीवादाच्या तिसऱ्या लाटेची व्याख्या करणे अधिक कठीण आहे.

## ६.२ पार्श्वभूमी

स्त्रीवादाची तिसरी लाट, दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादासह मोठ्या झालेल्या पिढीद्वारा सुरू झाली. या लाटेत पहिल्या आणि दुसऱ्या लाटेच्या कष्टाने मिळवलेल्या कामगिरीला गृहीत धरले गेले. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी पूर्वीच्या स्त्रीवाद्यांवर टीका करण्यास आणि त्यांच्या कार्यातील दोष दर्शविण्यास तत्पर होते. त्या संदर्भाने चळवळीच्या अनन्य स्वरूपाचा आणि अल्पसंख्याकांना वादविवादांमधून आपला विचार प्रगल्भ केला.

१९९१ मध्ये अनिता हिल यांनी सर्वोच्च न्यायालयाचे नामनिर्देशित न्यायधीष क्लॅरेन्स थॉमस यांच्यावर लैंगिक छळाचा आरोप केला. या प्रकरणातील दोन्ही पक्ष आफ्रो-अमेरिकन वंशाचे होते. हिलने अमेरिकन सिनेटच्या समोर केलेले सर्व आरोप थॉमसने नाकारून आपणास या प्रकरणाचा बळी ठरविल्या जात असल्याचा दावा उपेक्षित ठेवण्याचा युक्तिवाद अनेकदा केला जात असे. अशा प्रकारे तिसऱ्या लाटेने प्रामुख्याने अशा समुदायांना प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला, जे पूर्वी स्त्रीवादी ध्येयांपासून दूर राहिले होते. या लाटेतील स्त्रीवाद्यांनी वंश आणि लिंग यावर लक्ष केंद्रित केले. दुसऱ्या लाटेच्या लैंगिक-सकारात्मक करून प्रतिक्रिया दिली. या प्रकरणामुळे हिलला प्रचंड विरोधाचा सामना करावा लागला. तिच्या साक्षीवर विश्वास ठेवण्याऐवजी तिच्या चारित्र्यावर हल्ला करण्यात आला. तिची चाचणी टेलिव्हिजनवर प्रसारित करण्यात आली. एका कृष्णवर्णीय महिलेने सिनेटला छळाची तक्रार केल्यामुळे संपूर्ण अमेरिकेतील महिलांवर त्याचा परिणाम घडून आला. मात्र हिलचे आरोप असूनही थॉमस यांची नियुक्ती करण्यात आली. याला प्रतिसाद म्हणून, रेबेका वॉकरने 'एमएस मॅगझिनमध्ये' हिलला पाठिंबा देणारा भाग प्रकाशित केला. एमएस मॅगझिनमध्ये प्रकाशीत हिल प्रकरणाने तिसऱ्या लाटेची सुरूवात झाली. या मॅगझिनमध्ये तिने लिहिले की, हिल प्रकरण हे स्त्रीवादानंतरची स्त्रीवादी भूमिका नसून, ती स्त्रीवादाची तिसरी लाट आहे.

तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांना दुसऱ्या लाटेतिल स्त्रीवाद्यांनी निर्माण केलेल्या संस्थात्मक शक्तीचे स्थान वारशाने मिळाले. त्यामुळे आपले विचार प्रसारित करण्याची माध्यमे त्यांना उपलब्ध झाली. या माध्यमातून त्यांनी अतिशय कठोर भाषा, अपशब्द वापरले आणि त्याचा

त्यांना अभिमान देखील वाटला. इव्ह एन्स्लरच्या नाटकातील प्रामाणिकपणा, विनोद आणि भयपटातून तिसऱ्या लाटेची चेतना निर्माण झाली. गुरिल्ला गर्ल्स हा त्यातील महिला कलाकारांचा एक गट होता, ज्यांनी महिला विषयीची पारंपारिक कल्पना उघड करण्यासाठी आणि महिला कलाकारांवरील भेदभावाशी लढा देण्यासाठी गोरिला मास्क घातले होते.

पहिल्या व दुसऱ्या लाटेपेक्षा तिसरी लाट कृष्ण वर्णीय महिला आणि मुलींसाठी अधिक समावेशक होती. निष्क्रिय, कमकुवत आणि अविश्वासू म्हणून स्त्रियांच्या रूढीवादी प्रतिमांना प्रतिक्रिया आणि विरोध म्हणून, तिसऱ्या लाटेने स्त्रिया आणि मुलींना खंबीर, सामर्थ्यवान आणि स्वतःवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रोत्साहित केले. लोकप्रिय संस्कृतीत या पुनर्परिभाषेने शक्तिशाली महिलांच्या प्रतिमांना जन्म दिला, ज्यात गायिका मॅडोना, क्वीन लतीफा आणि मेरी जे. ब्लिगे यांचा समावेश होता. मुलांसाठी मीडिया प्रोग्रामिंगमध्ये अधिकाधिक स्मार्ट, स्वतंत्र मुली आणि महिलांना मुख्य भूमिकेत चित्रित केले गेले, ज्यात हेलन पार आणि तिची मुलगी व्हायलेट (द इनक्रेडिबल्स, २००६), आणि डोरा (डोरा द एक्सप्लोरर १९९९-२००६) सारख्या टेलिव्हिजन पात्रांचा समावेश आहे. या काळात “गर्ल पॉवर” नावाने सजीव स्वरूप देखील लोकप्रिय ठरले.

इंटरनेटवर प्रकाशनाच्या वाढत्या सुलभतेमुळे इलेक्ट्रॉनिक मासिके आणि ब्लॉग विपुल प्रमाणात प्रकाशित व्हायाला लागली. अनेक लेखक आणि संस्थांना इंटरनेटच्या माध्यमातून माहितीची देवाणघेवाण आणि व्हिडिओं प्रकाशनासाठी एक माध्यम उपलब्ध झाले. या माध्यमामुळे या काळातील स्त्रीवाद्याना आपले म्हणणे मोठ्या प्रेक्षक वर्गापर्यन्त पोहोचविता आले. स्त्रीवादाची तिसरी लाट ९० च्या दशकाच्या मध्यापासून सुरू झाली, या चळवळीने उत्तर वसाहतवादी व उत्तर आधुनिकतावादी विचाराने प्रभावित झालेल्या या टप्प्यातील स्त्रीवाद्यांनी "वैश्विक स्त्रीत्व," शरीर, लिंग आणि विषमता या संकल्पनांसह अनेक रचना नव्याने मांडण्याचा प्रयत्न केला. पूर्वीच्या स्त्रीवादी चळवळीचे पहिले दोन टप्पे पुरुष दडपशाहीचे म्हणून ओळखले गेले आहेत.

तिसऱ्या लाटेतील मुली बळकट आणि सशक्त म्हणून स्त्रीवादी चळवळीच्या मंचावर उतरल्या, त्यांनी स्त्रीयांचे होणारे उत्पिडण टाळून स्त्रीसौंदर्य स्वतःसाठी विषय म्हणून परिभाषित केला. वेब हे "गर्ली फेमिनिझम" चे एक महत्त्वाचे साधन आहे. ई-झिन्सने "सायबरगर्ल्स" आणि "नेटगर्ल्स " सारख्या माध्यमातून आणखी एक प्रकारची स्त्रियांसाठी आपले विचार प्रगट करण्यासाठी हक्कची जागा उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमांच्या साह्याने तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी स्त्रीवादाच्या संकल्पना जागतिक व बहु-सांस्कृतिक निर्मान करण्याचा प्रयत्न केला.

**आपली प्रगती तपासा**

१) स्त्रीवादाच्या तिसऱ्या लाटेची संकल्पना स्पष्ट करा?

## ६.३ स्त्रीवादी चळवळीची तिसरी लाट

स्त्रीवादी चळवळीची तिसरी लाट म्हणजे स्त्रीवादी चळवळीची पुनर्रचना होय. ही तिसरी लाट १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला युनायटेड स्टेट्समध्ये सुरू झाली आणि २०१० च्या दशकात चौथ्या लाटेच्या उदयापर्यंत चालू राहिली. या लाटेतील स्त्रीवाद्यांनी दुसऱ्या लाटेच्या नागरी-हक्कांच्या चळवळींच्या पुढे जाऊन व्यक्तिवाद स्वीकारला आणि स्त्रीवाद नव्याने परिभाषित करण्याचा प्रयत्न केला. तिसऱ्या लाटेत स्त्रीवादाच्या नवीन सिद्धांतांचा उदय झाला, जसे की अंतर्विद्याशाखिय, इकोफेमिनिझम, ट्रान्सफेमिनिझम आणि उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद, उत्तर संरचनावाद यासारख्या नव सिद्धांताच्या सहाय्याने स्त्री शोषणाच्या भूमिकांची पुनर्मांडणी करण्यात आली. स्त्रीवादी अभ्यासक एलिझाबेथ इव्हान्स यांच्या मते, स्त्रीवादाची तिसरी लाट म्हणजे स्त्रीवादाच्या स्वरूपाभोवती असलेला गोंधळ हे त्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

तिसरी लाट १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस ऑलिम्पिया, वॉशिंग्टन येथिल दंगलीतून उदय पावली, १९९१ मध्ये आफ्रिकन-अमेरिकन न्यायाधीश आणि श्वेतवर्णीय सिनेट न्यायिक समितीला अनिता हिल यांनी टेलिव्हिजन साक्षीच्या माध्यमातून केलेल्या प्रतिकारातून तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादाची संकल्पना रूढ झाली. ‘स्त्रीवादाची तिसरी लाट’ या शब्दाच्या उत्पतीचे श्रेय रेबेका वॉकर यांना दिले जाते, त्यांनी ‘Ms Magazin’ मध्ये "Becoming the third Wave" या मथळ्याखाली लिहीलेल्या लेखात थॉमस यांच्या सर्वोच्च न्यायालयातील नियुक्तीला प्रतिक्रिया दिली. या लेखाद्वारे वॉकरने हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, स्त्रीवादाची तिसरी लाट ही केवळ एक प्रतिक्रिया नव्हती, तर ती स्वतःच एक चळवळ होती.

किम्बर्ली विल्यम्स क्रेनशॉ यांनी लिंग, वंश आणि वर्ग यांच्यामुळे स्त्रियांना अनेक स्तरांवर भोगाव्या लागलेल्या अत्याचाराच्या कल्पनेचे वर्णन करण्यासाठी ‘इंटरसेक्शनॅलिटी’ हा शब्द १९८९ मध्ये प्रस्तुत केला होता. तिसऱ्या लाटेदरम्यान ही संकल्पना विस्तारीत होत गेली. १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि २००० च्या दशकाच्या सुरुवातीला तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी ऑनलाइन आले व त्यांनी ब्लॉगच्या माध्यमातून जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करत स्त्रीवादाचे ध्येय व्यापक केले.

दुसऱ्या लाटेच्या स्त्रीवाद्यांनी मिळवलेले अधिकार आणि कार्य तिसऱ्या लाटेचा पाया म्हणून उपयोगात आणले. या लाटेतील स्त्रीवाद्यांनी शिक्षणासाठी समान प्रवेश, महिलांच्या अत्याचाराविषयी सार्वजनिक चर्चा, गर्भनिरोधक आणि इतर पुनरुत्पादक सेवांमध्ये प्रवेश, महिला आणि मुलींसाठी घरगुती-अत्याचार प्रतिबंधक आश्रयस्थानांची निर्मिती, बाल संगोपन सेवा, तरुण महिलांसाठी शैक्षणिक निधी आणि महिला अभ्यास कार्यक्रम इ. करिता चळवळी उभ्या केल्या. दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादाने प्रामुख्याने गोऱ्या स्त्रियांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले होते. या पुढे जाऊन तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी वंश आणि लिंग या मुद्द्यांवर अधिकाधिक भर दिला आहे.

तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादासमोरील सर्वात मोठे आव्हान हे दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादाचे महत्त्व समजून घेण्याचे होते. मूलत: दावा असा होता की पहिल्या दोन लाटेद्वारे लैंगिक समानता आधीच साध्य केली गेली होती. त्यामुळे स्त्रियांच्या हक्कांसाठी लैंगिक समतेचे लढे सुरू ठेवणे अवास्तव आणि अनावश्यक होते. प्रामुख्याने लिंगभाव विषमता नष्ट होण्याकरिता सकारात्मक कृती म्हणून लैंगिक समानता निर्माण होत या सकारात्मक बदलाच्या आधारे स्त्रीवादाने स्त्री चेतना वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले.

स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेवर अनेकदा अभिजातवादी असल्याचा आरोप केला जातो. दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी कृष्णवर्णीय आणि ट्रान्सजेंडर स्त्रियांसारख्या गटांकडे दुर्लक्ष केले, त्याऐवजी श्वेतवर्णीय मध्यमवर्गीय स्त्रियांवर लक्ष केंद्रित केले. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी त्यांच्या पूर्वजांच्या विश्वासांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून स्त्रीवादी सिद्धांत विविध प्रकारच्या स्त्रियांना लागू करण्यास सुरुवात केली. ज्या शोषित स्त्रियांना पूर्वीच्या स्त्रीवादी चळवळींमध्ये समाविष्ट केले गेले नव्हते त्यांना या लाटेत समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. प्रामुख्याने तिसरी लाट ही रॉक, हिप-हॉप, उपभोक्तावाद आणि इंटरनेटच्या संस्कृतीतून उभी राहिली. त्यामुळे स्त्रीशोषनाच्या विविध मुद्याना त्यांनी हात घातला.

## ६.४ तिसऱ्या लाटेतील महत्वाचे मुद्दे

तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी निर्माण केलेल्या चळवळीतून स्त्री शोषणाचे काही महत्वाचे मुद्दे या काळात पुढे आले यामध्ये प्रामुख्याने महिलांवरील अत्याचार, प्रजननाचा अधिकार, वंश, सामाजिक वर्ग, ट्रान्सजेंडर समस्या या महत्वपूर्ण मुद्यांच्या आधारे लिंगभावाच्या विरूद्ध चळवळ उभी केली व स्त्रियांना त्याने हक्क प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला गेला. घरगुती हिंसाचार आणि लैंगिक छळासह महिलांवरील हिंसाचार हा तिसऱ्या लाटेचा मध्यवर्ती मुद्दा बनला. या काळात V-Day सारख्या संस्था लैंगिक हिंसा नष्ट करण्याच्या उद्देशाने स्थापन झाल्या. या संस्थेने कलात्मक अभिव्यक्तीच्या माध्यमातून या हिंसाचारच्या विरूद्ध स्त्रियांमध्ये जागरूकता निर्माण केली. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांना लिंगभावाच्या पारंपारिक संकल्पना बदलायच्या होत्या.

गर्भनिरोध आणि गर्भपात हा स्त्रियांच्या पुनरुत्पादनाचा अधिकार आहे, हे दाखवून देणे हे तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादाचे प्राथमिक ध्येय होते. आईच्या जीवाचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गर्भपातास वगळता सर्व प्रकारच्या गर्भपातावर बंदी घालण्याचा साउथ डकोटाचा २००६ मधील प्रयत्न आणि आंशिक गर्भपात बंदी कायम ठेवण्यासाठी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश, याकडे महिलांच्या नागरी आणि प्रजनन अधिकारांवर निर्बंध म्हणून पाहिले गेले. १९७३ मधील अमेरिकेन सर्वोच्च न्यायालयाच्या गर्भपात निर्बंध निर्णयामुळे गर्भपातावरील निर्बंध कायदेशीर ठरविला गेला. त्यामुळे देशभरातील अनेक राज्यांमध्ये हा निर्बंधचा नियम लागू करण्यात आला. यामध्ये अनिवार्य प्रतीक्षा कालावधी, पालक-संमती कायदे आणि पती-पत्नी संमती कायदे यांचा देखील समावेश करण्यात आला.

तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी वंश, सामाजिक वर्ग आणि ट्रान्सजेंडर यांच्या अधिकारांना केंद्रस्थानी मानत असत. अयोग्य मातृत्व-रजा धोरणे, एकल मातांना कल्याण आणि बाल संगोपनाद्वारे मातृत्व समर्थन, कार्यरत मातांचा आदर, करिअर सोडण्याचा निर्णय घेतलेल्या मातांचे हक्क या सारख्या कामाच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या समस्यांवर लक्ष केंद्रीत केले गेले.

**आपली प्रगती तपासा**

१) स्त्रीवादाच्या तिसऱ्या लाटेतील चळवळींचा आढावा घ्या?

## ६.५ उत्तर आधुनिकतावादी व उत्तर संरचनावादी स्त्रीवाद

२१ व्या शतकाच्या सुरूवातीस उत्तर आधुनिकतावादी विचारांची रुजवणूक सर्वच क्षेत्रात घडून आली होती. या विचारधारेचा प्रभाव स्त्रीवादी विचारांवर देखील पडला त्यामुळे या काळातील स्त्रीवाद हा काही बाबतीत पूर्वीच्या स्त्रीवादी विचार धारेपेक्षा काहीसा वेगळा होता. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळी प्रामुख्याने उत्तर आधुनिकतावादी व उत्तर संरचनावादी विचारवंतांच्या विचाराने प्रभावित होत्या. यामध्ये मांनोविश्लेषणवादी जेक्स लैकैन, अस्तित्ववादी सिमॅ दि बुव्हा, विखंडणवादी जैक्स देरीदा आणि उत्तर संरचंनावादी मिशेल फुको सारख्या विचारवंताच्या विचारांचा प्रभाव अधिक होता. या प्रवाहातील हेलेन सिक्सन ही विदुषी देरीदा यांच्या विचाराने प्रभावित होती, तर ज्यूडीथ बटलर ही विदुषी मिशेल फुको यांच्या विचाराने प्रभावित होती.

### ६.५.१ हेलेन सिक्सन:

हेलेन सिक्सन ही उत्तर संरचनावादी विचारवंत जैक्स  देरीदा यांच्या 'भिन्नत्व' सिद्धांताने प्रभावित होती. हेलेन सिक्सनच्या मते पुलिंग या शब्दाचा अर्थ स्त्रीलिंग शब्दाच्या अनुषंगाने व त्याच्या विरुद्धार्थी शब्दाच्या रूपाने घेतला जातो. हेलेन यांनी पुरुषी वर्चस्वातुन केलेली स्त्रीत्वाची व्याख्या ही पुरूषांचे स्त्रियांवरील विशेष अधिकार प्रस्थापित करून देण्याकरिता निर्धारित केलेली आहे, अशी पारंपरिक स्त्रीत्वावर टीका केली आहे. हेलेन सिक्सन यांनी पुरुष वर्ग आणि स्त्रीवर्ग असी सामाजिक विभागणी खोडून काढण्यासाठी स्त्रीवादाच्या संदर्भाणे लेखन करणाऱ्या नव लेखकांना प्रोत्साहित केले.

### ६.५.२ ज्यूडीथ बटलर:

ज्यूडीथ बटलर यांनी लिंग आणि लैंगिक श्रेणीला 'विखंडणवादी' विचाराच्या परिप्रेक्षातून प्रस्तुत केले आहे. त्यांच्या मते, लैंगिकते प्रमाणेच एखाद्या व्यक्तीची लिंग धारणा निर्माण केली जाऊ शकते. समाजात स्त्री आणि पुरुष त्यांच्या लिंगानुसार व्यवहाराच्या माध्यमातून स्वीकारले जातात. लिंगाच्या विपरीत व्यावहार करणारे स्त्री-पुरुष समाज स्विकृत होत नाहीत. ज्युडिथ बटलर ह्या अस्तित्ववादी सिमॅ दि बुव्हा यांच्या, 'कोणतीही स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही' या विचाराशी सहमत होत्या. मानवी शरीराला त्यांच्या लिंगाच्या माध्यमातून चिन्हांकित केले जाते. त्यांच्या मते लिंगभाव लिंग धारणे पेक्षा वेगळा नाही, तो संस्कृतिक स्वरुपात निर्धारित होतो. त्यांच्या मते, लिंग, लिंगभाव आणि लैंगिकता यांच्या

विषयीच्या समजधारणेच्या पलीकडे जाऊन विचार केल्या खेरीज संपूर्ण स्त्री मुक्तिचे उदिष्ट साधणे शक्य होणार नाही.

एकुणच उत्तर आधुनिकतावादी व उत्तर संरचनावादी विचार प्रवाहाने स्त्रीवादाची नवी संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न केला. ज्यातून स्त्री प्रश्नाच्या अनुषंगाने २१ व्या शतकात निर्माण झालेल्या लिंगभाव धारणांची उकल करण्यात आली.

## ६.६ बहूसांस्कृतिक व उत्तर वसाहतवादी स्त्रीवाद

बहूसांस्कृतिक स्त्रीवादी स्त्रियांमधील भिन्नत्व प्रदर्शित करतात. उत्तर वसाहतवादी स्त्रीवादी विकसनशील जगतातील महिलांचे जीवन विकसित जगतातील महिलांच्या जीवनमाणापेक्षा भिन्न आहे, अशी धारणा बाळगतात. या भिन्नत्वाची कारण मीमांसा केली असता, प्रत्येक राष्ट्रातील महिलांच्या समस्या वेगळ्या आहेत, त्यांची संस्कृती भिन्न आहे. त्यामुळे स्त्रीवादासंदर्भातील धारणा भिन्न आहेत. उदा. भारतातील स्त्रीवाद यूरोपियन स्त्रीवादाच्या परिप्रेक्षत आपल्या समस्यांचे निराकरण शोधण्याचा प्रयत्न करतात. मात्र पश्चिमी जगतातील स्त्रीवादी चळवळी समोरील आव्हाने व भारता सारख्या विकसनशील देशातील स्त्रीवादा समोरील आव्हाने भिन्न स्वरूपाची आहेत. त्यामुळे पश्चिमी जगतातील स्त्रीवाद आणि विकसनशील देशातील स्त्रीवाद भिन्न स्वरुपात परिभाषित करावा लागतो. वसाहतिक प्रभावातून भारतात उदयाला आलेल्या राष्ट्रवादी विचार धारेने भारतीय स्त्रीवादाचे वेगळेपण अधोरेखित केले आहे. पाश्चिमात्य स्त्रीवाद्यांनी पितृसत्ताक संस्था स्त्रियांवर अत्याचार करतात, हा अत्याचार लिंगभाव प्रणालीच्या माध्यमातून अधोरेखित केल्या जातो. भारताच्या संदर्भाने विचार केला असता भारतात पितृसत्ते बरोबर वर्ग, जात, धर्म, लिंग. जनजाती आणि समुदाय या परिप्रेक्षाद्वारे लिंगभाव धारणेच्या विविध संरचना आणि पितृसत्ताक समाज व्यवस्था आजही स्त्रीयांच्या शोषणात अग्रस्थानी आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१) उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी विचार प्रवाहाचा आढावा घ्या?

## ६.७ तिसऱ्या लाटेतिल स्त्रीवादी चळवळीची वैशिष्ट्ये

स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेच्या प्रभावातून युएसए मध्ये राजकीय प्रतिनिधित्वाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात सुधारणा घडून आल्या. राजकीय क्षेत्रात महिलांना प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे १९९३ पर्यंत सिनेटमध्ये ५ महिला सदस्यांना सामील करून घेण्यात आले. पहिल्या महिला ॲटर्नी जनरल आणि पहिल्या महिला राज्य सचिव म्हणून स्त्रियांनी पदभार स्वीकारला. तसेच रूथ बॅडर गिन्सबर्ग सर्वोच्च न्यायालयातील दुसऱ्या महिला न्यायाधीश ठरल्या. १९९३ च्या कौटुंबिक वैद्यकीय रजा कायद्याने कर्मचाऱ्यांना कौटुंबिक आणि वैद्यकीय आणीबाणीसाठी बिनपगारी रजा घेण्याची परवानगी दिली. अत्याचाराचा सामना करणाऱ्या महिलांसाठी १९९५ मध्ये 'महिला हिंसाचार कायदा' मंजूर करण्यात आला. ही तिसऱ्या लाटेची महत्त्वाची कामगिरी होती.

यूएसएच्या इतिहासातील स्त्रीवादाची तिसरी लाट स्त्रियांच्या पुनरुत्पादक अधिकारांवर केंद्रित होती. या काळातील स्त्रीवाद्यांनी स्त्रीच्या शरीराबद्दल स्वतःच्या निवडीच्या हक्काची बाजू मांडतांना असे म्हटले की, जन्म नियंत्रण आणि गर्भपात हा मूलभूत अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाने २००४ च्या कायद्याने अर्धवट जन्म गर्भपात बंदी आणि गर्भपातावरील निर्बंधांना मान्यता दिली. या विरोधात वॉशिंग्टन डीसीमध्ये 'मार्च फॉर वुमेन्स लाइव्ह्स' नावाचा एक प्रचंड निषेध मोर्चा निघाला होता. या मोर्च्याला तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांबरोबर दुसऱ्या लाटेतील स्त्रीवादी आणि अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली. या मोर्चातिल प्रतिसादाणे प्रजनन अधिकारांचा मुद्दा तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांकरिता किती महत्त्वाचा होता हे दाखवून दिले. या चळवळीचा परिणाम म्हणून गर्भपात निर्बंध कायद्यात सुधारणा करण्यात आली.

स्त्रीवादाची तिसरी लाट पहिल्या आणि दुसऱ्या लाटेपेक्षा वेगळी होती, कारण ती पॉप संस्कृती आणि इ-माध्यमांमधुन पसरली. या लाटेने Riot Grrrl सारख्या गर्ल बँडने रॉक अँड पॉप संगीताद्वारे महिला सक्षमीकरणाचे संदेश प्रसारित केले. त्यांचे संगीत ऐकणाऱ्या किशोरवयीन मुलिंमध्ये पितृसत्ता आणि शरीराच्या प्रतिमेची चर्चा सुरू झाली. चित्रपट आणि दूरचित्रवाणी कार्यक्रमांनी थेलमा आणि लुईस, बफी द व्हँपायर स्लेयर, ३० रॉक अँड पॉप या सारख्या मनोरंजन कथेवर देखील तिसऱ्या लाटेचा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो.

ट्रान्स फेमिनिझमला मुख्य प्रवाहात आणले हे तिसऱ्या लाटेच्या उद्दिष्टा पैकी एक उद्दीष्ट होते. ट्रान्स जेंडरचे अधिकार अगदी अलीकडच्या काळापर्यंत स्त्रीवादामध्ये समाविष्ट नव्हते. ट्रान्स जेंडर समूहाला कायदेशीररित्या त्यांचे हक्क संपादित करून देण्याकरिता तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी लिंग आणि लिंगभाव जनित शरीर प्रतिमेच्या चर्चेतून ट्रान्स जेंडर समूहांना स्त्रीवादाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. आजही ट्रान्स जेंडरच्या ओळखीबद्दल समाजातील मोठ्या वर्गात अज्ञान आहे, परंतु या संदर्भाने इतरांना शिक्षित करण्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलण्यात तिसरी लाट महत्त्वाची ठरली, हे तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणता येईल.

भारता संदर्भाने विचार केला असता, १९८० आणि ९० च्या दशकात बलात्कारांच्या विरोधात राष्ट्रीय निषेध नोंदविला गेला, हे तिसऱ्या लाटेचे वैशिष्ट्य होते. या कालखंडात अनेक भारतीयांच्या मानसिकतेतिल ढोंगीपणा आणि महिलाच्या स्वतःच्या बलात्कारामध्ये दोषीपणाची अनेक प्रकरणे पुढे आली. या विरूद्ध तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी आंदोलने उभी केली. याचे उत्तम उदाहरण भारतातील हेतल पारेख, भंवरी देवी आणि प्रतिभा मूर्ती यां सारख्या बलात्कार प्रकरणांमुळे देशभरात निदर्शने झाली. ज्यामध्ये भारतीय महिला गटांना कायदेशीर विजय मिळाला. याचा परिणाम भारतातील राजकीय क्षेत्रावर घडून आला व भारतीय राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले. १९९५ मध्ये मायावती पहिल्या अनुसूचित जातीच्या मुख्यमंत्री झाल्या; तर १९९९ मध्ये सोनिया गांधी पहिल्या महिला विरोधी पक्षनेत्या बनल्या. २००७ मध्ये प्रतिभाताई पाटील ह्या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती झाल्या आणि मीरा कुमार पहिल्या महिला सभापती झाल्या. भारतातील स्त्रियांना अजूनही शिक्षणाची अनुपलब्धता, मालमत्तेवर अल्प अधिकार, घरगुती हिंसाचार आणि केवळ काही नावांसाठी लैंगिक छळ अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागतो आहे.

भारतीय कायदा आणि राजकारणात महत्त्वपूर्ण बदल झाले असले तरी विविध पार्श्वभूमीतील महिलांचे प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत. "स्त्रीवाद" ही संकल्पना पाश्चिमात्य देशातून निर्माण झाली असली तरी भारताच्या संपूर्ण इतिहासात महिलांच्या चळवळींचा मोठा इतिहास आहे. आजचा भारतीय स्त्रीवाद केवळ तेव्हाच प्रभावी ठरू शकतो जेव्हा तो भारतीय स्त्रियांच्या ऐतिहासिक आणि भौगोलिक अनुभवांद्वारे सूचित केला जाईल.

अगदी कट्टरपंथी होण्यापासून ते त्याच्या पूर्ववर्तींच्या कार्याचा अनादर करण्यापर्यंत, स्त्रीवादाच्या तिसऱ्या लाटेला अनेक आघाड्यांवर टीकेला सामोरे जावे लागले आहे. प्रथम आणि द्वितीय लाटेपेक्षा या लटेतील स्त्रीवादी कमी एकत्रित होते. त्यांची उद्दिष्टे कमी स्पष्ट आणि कारणे अधिक अस्पष्ट होती. २१ व्या शतकात स्त्रीवादाची अत्यांतीक गरज आणि सामाजिक त्याचा प्रभाव यामुळे पूर्वीपेक्षा अधिक क्षेत्रांना समानतेच्या जवळ आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या लाटेत घडून आले. २०१२ मध्ये सोशल मीडिया-केंद्रित 'चौथी लाट' सुरू झाल्यावर ही लाट ओसरली असे म्हटले जाते.

## ६.८ तिसऱ्या लाटेतिल स्त्रीवादी चळवळीवरील टीका

स्त्रीवादाच्या तिसऱ्या लाटे विषयी टीकाकारांनी मांडलेला एक महत्वाचा मुद्दा म्हणजे एकीचा अभाव हा होय. तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी चळवळीचे प्रदेश व परिथिती परत्वे ध्येय वेगवेगळी असल्यामुळे त्यांच्यामध्ये ऐक्याचा अभाव होता. किंवा एकाच कारणासाठी सर्वत्र सारखी चळवळ उभारण्यात आली नाही. जसे पहिल्या लाटेने महिलांना मतदानाचा हक्क मिळवून देणे हे प्रमुख उद्दीष्ट सर्वत्र सारख्याच स्वरुपात विकसित केले होते. दुसऱ्या लाटेत महिलांना कार्यबलांमध्ये समान संधी मिळण्याच्या अधिकारासाठी, तसेच कायदेशीर लैंगिक भेदभावाच्या समाप्तीसाठी लढा दिला गेला. तसे तिसऱ्या लाटेमध्ये सातत्यपूर्ण ध्येय नसल्याचा आरोप करत काही अभ्यासकांनी तिसऱ्या लाटे संदर्भात ती दुसऱ्या लाटेचा दूसरा भाग असल्याचा युक्तिवाद केला आहे.

तिसरी लाट ही केवळ तरुण स्त्रीवादी संस्कृतीची परिणीती होती.त्यामुळे तिसऱ्या लाटेच्या स्त्रीवादाच्या समीकरणामुळे चळवळ वाढण्यापासून आणि राजकीय ध्येयांकडे जाण्यापासून रोखली गेली असा देखील एक युक्तिवाद केला जातो.

कॅथलीन पी. आयनेलो यांच्या मते, 'कामाचे ठिकाण आणि घर यांच्यातील महिलांचे हक्क निवडण्याच्या सैद्धांतिक आणि वास्तविक जगातील युक्तीमुळे महिलांनी पितृसत्ते ऐवजी एकमेकांना आव्हान दिले आहे. निवड म्हणून कल्पिलेला व्यक्तिवाद महिलांना सक्षम करत नाही; तो त्यांना शांत करतो आणि स्त्रीवादाला राजकीय चळवळ बनण्यापासून आणि संसाधनांच्या वितरणाच्या वास्तविक समस्यांना संबोधित करण्यापासून प्रतिबंधित करतो.'

शिरा टेरंट सारख्या स्त्रीवादी विद्वानांनी "वेव्ह कंस्ट्रक्ट" वर आक्षेप घेतला, कारण त्याने कालखंडातील महत्त्वाच्या प्रगतीकडे दुर्लक्ष केले जाते. शिवाय, जर स्त्रीवाद ही एक जागतिक चळवळ असेल, तर तिने असा युक्तिवाद केला की, प्रथम, द्वितीय आणि तृतीय

लाटेचा काळ अमेरिकन स्त्रीवादी घडामोडीशी अगदी जवळून संबंधित आहे. यामुळे जगभरातील राजकीय समस्यांचा इतिहास ओळखण्यात स्त्रीवाद अपयशी ठरतो. ही तिसऱ्य लाटेतील स्त्रीवादाच्या अभ्यासातील महत्वाची समस्या आहे. या संदर्भातील टीकाकारांनी असा युक्तिवाद केला की, "वेव्ह कन्स्ट्रक्ट" च्या माध्यमातून केवळ श्वेतवर्णीय स्त्रियांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यांनी कृष्ण वर्णीय व खालच्या वर्गाच्या स्त्रियांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले आहे.

स्त्रीवादाच्या तिसऱ्या लाटेतील स्त्रीवादी स्वतःला सर्व समावेशक म्हणून घोषित करतात. मात्र  पुरोगामी असतानाही, त्यांच्या कडून कृष्ण वर्णीय स्त्रियांना वगळण्यात आले आहे. काळ्या स्त्रीवाद्यांचा असा युक्तिवाद आहे, की काळ्या स्त्रीवाद्यांच्या महिला हक्कांच्या चळवळी केवळ काळ्या महिलांच्या स्वातंत्र्यासाठी नव्हत्या. उलट, स्त्रियांचा मतदानाचा हक्क आणि गुलामगिरीचे उच्चाटन यासारखे प्रयत्न या चळवळीतून करण्यात आले . ज्याचा लाभ गोऱ्या  स्त्रियांना देखील झाला आहे.

स्त्रीवादाच्या तिसऱ्य लाटेची समीक्षा करणाऱ्या समीक्षकांद्वारे या लाटेला "लिपस्टिक" किंवा "गर्ली" किंवा "पॉप संस्कृती" च्या विशेषणांनी संबोधित केले जाते. याचे कारण असे की, या नवीन स्त्रीवाद्यांनी स्त्रीत्वाच्या अभिव्यक्तीला वस्तुस्थितीचे आव्हान म्हणून समर्थन दिले. त्यानुसार, यात महिला किंवा मुलींनी कसे कपडे घालावेत, कसे वागावे किंवा सामान्यपणे कसे व्यक्त व्हावे, हे निर्धारित करण्यासाठी किंवा नियंत्रित करण्यासाठी कोणत्याही संयमाचा समावेश नसावा, यावर भर दिला आहे.  ही उदयोन्मुख स्थिती १९८० च्या दशकात प्रचलित स्त्रीवादाच्या पोर्नोग्राफीविरोधी भूमिकेच्या अगदी विरुद्ध होती. दुसऱ्या स्त्रीवादी लाटेने पोर्नोग्राफीकडे स्त्रियांवरील हिंसाचाराला प्रोत्साहन देणारे साधन म्हणून पाहिले. नवीन स्त्रीवाद्यांनी असे सुचवले की आत्म-अभिव्यक्तीबद्दल स्वतंत्र, निवड करण्याची क्षमता ही केवळ अंतर्गत दडपशाही नसून प्रतिकाराची एक सशक्त कृती असू शकते.

सशक्तीकरण आणि स्वातंत्र्याच्या वैयक्तिक स्वरूपामुळे अशा मतांवर टीका झाली आहे. सशक्तीकरण सर्वोत्तम शक्ती आणि कृतीच्या अंतर्गत भावना म्हणून किंवा शक्ती आणि नियंत्रणाचे बाह्य उपाय म्हणून मोजले जाते की नाही, हे या लाटेतील विद्वानांना स्पष्ट नव्हते. स्त्रीवादाच्या तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी मांडलेले स्त्रीवादी विचार व दृष्टिकोन केवळ "गर्ली" स्त्रीवाद या लेबलने मर्यादित नसावा किंवा "पॉप संस्कृती" चे समर्थन करणारे मानले जाऊ नये.  त्याऐवजी, त्यांनी पार पाडलेल्या विविध भूमिकांचा समावेश या संरचणेत करण्यात यावा.

एकूणच इतर कोणत्याही सामाजिक किंवा राजकीय चळवळीप्रमाणेच, स्त्रीवादाच्या प्रत्येक लाटेत मतभेद होते. या लाटेमध्ये लिंग, जातीय आणि वर्गीय ओळख, अनुभव आणि स्वारस्य असलेल्या अनेक लोकांचा समावेश होता. यालाटेची सर्वात मोठी ताकद सर्वसमावेशकता होती. काही विद्वानांनी सर्व समावेशकता हीच या लाटेची सर्वात मोठी कमजोरी म्हणून टीका केली आहे. ही टीका खोडून काढण्यासाठी तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी एक एकीकृत अजेंडा किंवा तत्त्वज्ञान तयार करणे हे प्रमुख लक्ष्य ठेवले होते.

साधारणपणे तिसऱ्या लाटेची सुरुवात दोन गोष्टींशी जोडलेली आहे. १) १९९१ मधील अनिता हिल प्रकरण आणि २) सुरुवातीच्या काळातील पॉप संगीत गर्ली गटांचा उदय.

१९९१ मध्ये, अनिता हिल यांनी सिनेट न्यायिक समितीसमोर साक्ष दिली, की सर्वोच्च न्यायालयाचे नामनिर्देशित न्यायाधिष क्लॅरेन्स थॉमस यांनी कामाच्या ठिकाणी तिचा लैंगिक छळ केला होता. या विरुद्ध थॉमसने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली, परंतु हिलच्या साक्षीने लैंगिक छळाच्या तक्रारींचा पूर आला, त्याच प्रकारे हार्वे वाइनस्टीनच्या आरोपांनंतर इतर उच्च पदस्थ पुरुषांविरुद्ध लैंगिक गैरवर्तनाच्या आरोपांचा पूर आला. अनिता हिलने ११ ऑक्टोबर १९९१ रोजी कॅपिटल हिलवरील सिनेट ऑफिस बिल्डिंगच्या कॉकस रूममध्ये साक्ष दिली. थॉमस विरोधात हिलची साक्ष असूनही त्याचे नामनिर्देशन सर्वोच्च न्यायालयात झाले. या प्रकरणाच्या परिणामाचे स्वरूप १९९२ मध्ये प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकीत महिलांनी २४ व सिनेट मध्ये ३ जागा जिंकल्या त्यामुळे या वर्षाला "स्त्रीं वर्ष" म्हणून संबोधले गेले.

अनिता हिल प्रकरणातून प्रेरणा घेत ५ एप्रिल १९९२ रोजी वॉशिंग्टन डीसी मध्ये नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर वुमन (NOW) द्वारा आयोजित 'मार्च फॉर वुमेन्स लाइव्ह' या आंदोलनासाठी हजारो निदर्शक एकत्र आले. यामुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या विरोधातील लढा अधिक तीव्र झाला. लिंग आणि वंश सिद्धांताचे अभ्यासक किम्बर्ली क्रेनशॉ यांनी स्त्री संदर्भातील जुलमाचे विविध प्रकार एकमेकांना छेदतात या छेदन मार्गाचे वर्णन करण्यासाठी 'इंटरसेक्शनॅलिटी' हा शब्द उपयोगात आणला. तर ज्युडिथ बटलर, यांनी लिंगभावाची नव्याने व्याख्या करण्याचा प्रयत्न केला.

## ६.९ सारांश

दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांच्या कुटुंबात वाढलेल्या पिढीच्या विचार विश्वातून स्त्रीवादाची तिसरी लाट उदयाला आली. या लाटेतील स्त्रीवाद्यांनी पहिल्या व दुसऱ्या लाटेतील स्त्रिवाद्यांनी केलेल्या कार्याला गृहीत धरून त्यांच्या उणीवा शोधल्या व त्यांच्या विचारावर टीका केली. आजवर स्त्रीवादाच्या कक्षे बाहेर असलेल्या उपेक्षित गटाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता नव्या वैचारिक भूमिकांचा स्वीकार करत स्त्रीवादी विचाराला प्रगल्भ केले.

एकविसाव्या शतकातील प्रभावी असलेल्या उत्तर आधुनिकतावादी, उत्तर संरचनावादी, बहुसांस्कृतिक व उत्तर वसाहतवादी विचारांच्या प्रभावातून स्त्री शोषणाच्या वर्तमान व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तिसऱ्या लाटेतील स्त्रिवाद्यांनी स्त्रीशोषणाच्या संदर्भाने विचार मांडत असताना वर्ग, जात, वर्ण, धर्म, संस्कृती यांचा बहुआयामी विचार स्वीकारत स्त्री प्रश्नाची विविधता अधोरेखित केली. केवळ अमेरिकेतील गोऱ्या स्त्रियांच्या समस्याच्या आधारे पहिल्या व दुसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी उभ्याकेलेल्या स्त्रीवादाच्या कक्षा तोडत स्थल, काल परत्वे या समस्यांचे स्वरूप भिन्न असल्याचे अधोरेखित केले.

१९९१ मधील अनिता हिल प्रकरणाने लैंगिक छळाची नवी व्याख्या केली. पुरुषी वर्चस्वाच्या बडग्याखाली या प्रकरणाचा निकाल क्लॅरेन्स थॉमस यांच्या बाजूने लागला. मात्र या प्रकरणात हिलाने दिलेल्या साक्षी मुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाचे स्वरूप जगजाहीर झाले. याचा परिणाम म्हणून अमेरिकेतील अनेक उच्च पदस्थ पुरुषांच्या विरुद्ध लैंगिक छळाच्या प्रकरणांचा पूर आला. त्याचबरोबर एप्रिल १९९२ मध्ये वॉशिंग्टन डीसी मध्ये नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर वुमन (NOW) द्वारा कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या विरोधात हजारो स्त्रियांनी मोर्चा काढला.

स्त्रीवादाची तिसरी लाट स्त्रियांच्या पुनरुत्पादक अधिकारांवर केंद्रित होती. या काळात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने गर्भपात बंदी कायदा आणि गर्भपातावरील निर्बंधांना मान्यता दिली. या विरुद्ध २००४ मध्ये वॉशिंग्टन डीसीमध्ये 'मार्च फॉर वुमेन्स लाइव्ह' नावाचा एक प्रचंड निषेध मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात दुसऱ्या आणि तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांबरोबर अनेक रंगकर्मी देखील सहभागी झाल्या होत्या.

या आंदोलनात स्त्रिवाद्यांनी स्त्री शरीराबद्दल स्वतःच्या निवडीच्या हक्काची बाजू मांडतांना असे म्हटले की, जन्म नियंत्रण आणि गर्भपात हा मूलभूत अधिकार आहे, त्याच्या निवडीचे स्वातंत्र्य स्त्रियांना असले पाहिजे. या करिता त्यांनी कायदेशीर लढा उभारला. या आंदोलनाच्या परिणामा मुळे सरकारला गर्भपात निर्बंध कायद्यात सुधारणा करावी लागली.

तिसऱ्या लाटेतील पॉप संस्कृतीच्या माध्यमांमधून Riot Grrrl सारख्या गर्ल बँड द्वारे महिला सक्षमीकरणाचा संदेश प्रसारित करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. त्यामुळे त्यांचे संगीत ऐकणाऱ्या किशोरवयीन मुलांमध्ये पितृसत्ता आणि शरीराच्या प्रतिमेची चर्चा सुरू झाली. या लाटेतील स्त्रीवाद्यांनी ट्रान्स फेमिनिझमला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला व ट्रान्स जेंडरच्या अधिकारांचा स्त्रीवादात समावेश केला. आजही ट्रान्स जेंडर बद्दल समाजात अनेक गैर समज आहेत. परंतु ट्रान्स जेंडर बद्दल समाजाला शिक्षित करण्याच्या दिशेने तिसऱ्या लाटेतील स्त्रीवाद्यांनी उचललेले हे पहिले पाऊल महत्त्वाचे आहे.

भारतात, स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेच्या माध्यमातून कायद्याने स्त्री-पुरुष समानतेचे सूत्र रुजविण्यात आले, असले तरी भारतीय समाजात खोलवर रुजलेल्या सांस्कृतिक आणि धार्मिक श्रद्धेने ब्रिटीश सत्तेनंतर स्त्री-पुरुष समानतेचे स्वप्न साकार होण्यास प्रतिबंध केला. भारतीय स्वातंत्र्याच्या प्रारंभिक काळात सामाजिक प्रथा, परंपरांच्या बडग्याखाली कायद्याची अंमलबजावणी कमकुवत ठरली. त्यमुळे स्त्रियांच्या शोषणाचे सत्र सुरुच राहिले. १९८०-९० च्या दशकातील हेतल पारेख, भंवरी देवी आणि प्रतिभा मूर्ती बलात्कार प्रकरणाने देशभरात निदर्शने झाली ज्यामुळे भारतीय स्त्रीवाद्यांनी कायदेशीर लढ्याच्या माध्यमातून भारतीय स्त्रीशोषणाची नव्याने मांडणी केली. याचा परिणाम म्हणून १९८० च्या पंचवार्षिक योजनेत महिलांच्या आरोग्य, रोजगार आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**आपली प्रगती तपासा**

१) स्त्रीवादी चळवळीतील तिसऱ्या लाटेचे वैशिष्टये स्पष्ट करा?

## ६.१० प्रश्न

१) स्त्रीवादी चळवळीच्या तिसऱ्या लाटेचे योगदान स्पष्ट करा?

२) स्त्रीवादी चळवळीतील उत्तर आधुनिकतावादी व उत्तर वसाहतवादी विचार प्रवाहाची भूमिका स्पष्ट करा?

३) स्त्रीवादी चळवळीच्या तिसऱ्या लाटेच्या उदयाची चिकित्सा करा?

४) स्त्रीवादी चळवळीतील तिसऱ्या लाटेतील बहुसांस्कृतिक विचार प्रवाहाची भूमिका स्पष्ट करा?

५) स्त्रीवादी चळवळीच्या तिसऱ्या लाटेच्या वैशिष्ट्यांचे टीकात्मक परीक्षण करा?

## ६.११ संदर्भ


१. भसीन कामाला, (अनु. श्रुती तांबे), लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०.

२. भागवत विद्युत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड प्रकाशन पुणे.

३. साळुंखे अ. ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

४. वांबुरकर जास्वंदी, इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे, २०१४.

५. सिमाँ दि बुव्हा, (अनु. करून गोखले), द सेकंड सेक्स, पद्मगंध प्रकाशन, पुणे, २०१०.

६. सुमंत यशवंत, स्त्रीवाद : उदारमतवादी आणि मार्क्सवादी/समाजवादी, मिळूनसाऱ्याजणी, मे १९९९.

७. महाजन जयश्री, स्त्रिया आणि लिंगभाव, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२.

८. भोसले नारायण, जात वर्गलिंगभाव इतिहास मीमांसा, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१७.


*****

# ७

# जात : व्याख्या आणि अर्थ

**घटक रचना**


७.० उद्दिष्टये

७.१ प्रस्तावना

७.२ सारांश

७.३ टीपा (Glossary)

७.४ प्रश्न

७.५ संदर्भ


## ७.० उद्दिष्टये

१. विद्यार्थ्यांना जात या संकल्पना चा परिचय करून देणे

२. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या तज्ज्ञांनी केलेलया जातीच्या व्याख्येचा अर्थ समजावणे.

३. विद्यार्थ्यांना जाती आणि जातिसंस्था यांची समज करून देणे.

## ७.१ प्रस्तावना

जातींचे भारतीय समाजात असलेले अढळ स्थान पाहिल्यास आपल्याला असे आढळून येते की, जातींच्या शिवाय भारतीय समाज व्यवस्था चालूच शकणार नाही. भारतीय समाज हा हजारो जाती आणि त्याच्या अनेक पटीने पोटजातीमध्ये विभागला गेलेला आहे. या सर्व जाती आणि पोट जाती एकमेकांकडे अशा दृष्टीने पाहतात की, आपण एका देशाचे नागरिक आहोत, त्यामुळे आपल्याला एकत्र एकजुटीने, एक दिलाने राहिले पाहिजे हे अनेक वेळा ते विसरून जातात. आधुनिक काळामध्ये ते रोटी व्यवहार तर करतात परंतु ज्यावेळेस आंतर-जातीय विवाह आणि आंतर-धर्मीय कलह निर्माण होतात त्यावेळेला त्यांचे रोटी व्यवहाराचे असलेले संबंध विसरून जातात आणि धार्मिक दंगली, जातीय दंगली, याशिवाय जातीय स्वाभिमान यांना ते बळी पडतात. आत्ताच्या काळामध्ये जर आपण पाहिले तर अनेक जातींना आरक्षण हवे आहे आणि त्यासाठी अनेक वर्षे त्यांची आंदोलने सरकार विरोधी चालूच आहेत. त्यांच्या मागण्यांसाठी ते मोर्चे काढत आहेत. नव्हे सरकारला इशारा देत आहेत की, जर त्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर ते कायदा हातात घेतील आणि त्यामुळे सरकारची जबाबदारी आणि कायदा-सुव्यवस्था यंत्रणांवरचा ताण वाढत आहे.

अगदी अलीकडच्या काळामध्ये म्हणायचे झाल्यास जातींवर आधारित आरक्षण आणि त्याची मागणी ही महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा इत्यादी राज्यांमध्ये सुरू आहे. सदर मागणी करणाऱ्या जातींना आरक्षण तर हवे आहे परंतु आपल्या जातींचे प्राबल्य किंवा

या जातीतून समानतेच्या तत्वाकडे त्यांचा ओढा दिसत नाही. याशिवाय त्यांना जाती श्रेष्ठत्व हवे आहे परंतु त्या जाती दूर करण्यासाठी त्यांनी कधीही प्रयत्न केलेले दिसत नाहीत. काही लोक आर्थिक निकषांवर आरक्षणाची मागणी करत आहेत. कारण त्यांच्या मते, आरक्षण हा गरिबी निर्मूलनाचा कार्यक्रमच जणू आहे की काय? परंतु ते ही गोष्ट विसरतात की, जगातल्या अनेक देशांबरोबरच भारतीय समाजामध्ये सुद्धा सरकारी यंत्रणांमध्ये भ्रष्टाचार शिगेला पोहोचलेला आहे. किंबहुना, ही आरक्षणाची मागणी करणारे आंदोलक सुद्धा आपला आर्थिक फायदा होत असेल तर भ्रष्टाचाराला खतपाणी घालत आहेत. त्यामुळे सरकारी कार्यालयांमधून आर्थिक मागासलेपणाचा म्हणजेच उत्पन्नाचा दाखला मिळण्यासाठी तहसीलदार कार्यालयाच्या बाहेर दलाल उभे आहेत. आज घरी बसलेली व्यक्ती उद्या श्रीमंत होऊ शकते आणि आज श्रीमंत असलेली व्यक्ती त्याच्या वाईट सवयी मुळे केव्हाही गरीब होऊ शकते. त्यामुळे त्यांच्या अनेक पिढ्यांमध्ये ही गोष्ट आज-उद्या होतच राहील. परंतु सामाजिक मागासलेपणा हा भारतीय समाज व्यवस्थेला लागलेला कलंक आहे आणि तो मात्र हजारो वर्षापासून काही मिटता मिटत नाही याची मात्र दखल घेतली पाहिजे. सामाजिक दृष्ट्या मागास असलेल्या जाती आरक्षणामुळे प्रगती करून आर्थिक दृष्ट्या सक्षम झालेल्या आहेत परंतु त्यांच्याकडे जातीय दृष्टिकोनातून मागासलेपणाच्या भावनेतून पाहणे मात्र काही बंद झालेले नाही. त्यामुळे जातींची संकल्पना समजून घेत असताना आपल्याला जातींची निर्मिती, त्यांचे व्यवस्थापन, त्या कुठून निर्माण झाल्या? भारतातील जाती विरोधी लढे कसे निर्माण झाले? आणि शेवटी या जातिव्यवस्थेचे निर्मूलन करता येईल काय? हे समजून घेणे महत्वाचे आहे.

### ७.१.२ जाती – व्याख्या:

जात या शब्दाचे इंग्रजी भाषांतर ‘Caste’ असे असून तो शब्द मूळ स्पॅनिश आहे. याशिवाय तो पोर्तुगीज शब्द ‘Casta’ यापासून तयार झालेला असून त्याचा अर्थ वंशावळ किंवा वंश असा होतो. याशिवाय सध्याचा प्रचलित ‘Caste’ हा शब्द 'Castus ' या लॅटिन शब्दावरून आलेला असून त्याचा अर्थ 'शुद्ध' असा होतो. स्पॅनिश लोकांनी या शब्दाचा प्रथम वापर केला आणि भारतामध्ये १५ व्या शतकामध्ये आलेल्या पोर्तुगीजांनी तो भारतात वापरण्यास सुरुवात केली. परंतु त्या संदर्भीय अर्थानुसार भारतीय समाजात ही जातीव्यवस्था अगोदरच कार्यरत होती हे आपणास विसरून चालणार नाही. पोर्तुगीजांनी त्याला फक्त पर्यायी शब्द दिला असे म्हणावे लागेल.

सध्या जो "Caste" शब्द वापरला जातो आहे तो फ्रेंच शब्द असून साधारणपणे तेथील शिक्षण क्षेत्रात तो वापरला जात होता. असे असले तरी इ.स. १८ व्या शतकाच्या अगोदर सापडत नाही. त्या अगोदर त्याचा उल्लेख 'Cast' याच अक्षरांनी केला जात होता. याशिवाय, मनुष्य जाती किंवा वंश या अर्थाने हा शब्द फार तर इ.स. १५५५ च्या दरम्यान वापरला गेल्याचे आढळते. या व्यतिरिक्त स्पॅनिश शब्द 'Casta' याचा वापर युरोपियन आणि भारतीय व अमेरिकन आणि निग्रो यांच्या संमिश्र वंशासाठी वापरल्याचे आढळते.

भारतीय परिप्रेक्ष्यात जातीचा अर्थ १७ व्या शतकापर्यंत वापरला जात नव्हता असे श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे म्हणणे आहे

१) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, “Caste is mainly the custom of endogamy that has preserved the castes and prevented one caste from fusing into another.”

मूलतः जातींची संकल्पना ही ‘इंडोगामी’ म्हणजेच ‘आपल्याच जातीतील व्यक्तीशी विवाह करण्याचे आणि ते पाळण्याचे बंधन होय.’ त्याच बंधनामुळे जातिप्रथेचे कठोर पालन केले जात होते आणि केले जात आहे आणि म्हणूनच आज आपल्याला वर्तमानपत्रे आणि इंटरनेटवर विवाह संस्था ज्या जाहिराती देते त्यामध्ये 99% स्थळांसाठी आपल्याच जातीला प्राधान्य दिले जाते. पुढे जाऊन आपल्याला धक्का असा बसतो की, उच्च जाती जाहीरपणे असे लिहीत आहेत….. ‘अनुसूचित जाती-जमातीचे उमेदवार क्षमस्व.’ याचा अर्थ सरळ आहे की रोटी व्यवहार करणारे लोक, जाहीर सभांमधून भाषण देणारे तत्त्ववेत्ते आणि राजकारणी जाती न पाळण्याबद्दल आवाहन करतात. मात्र त्यांच्यामध्ये इंडोगामीच्या विरुद्ध जाऊन जाती निर्मूलन करण्यासाठी लायक उमेदवार असल्यास कोणत्याही जातीत विवाह करण्याची तयारी मात्र ते दाखवीत नाहीत.

२) सुप्रसिद्ध इतिहासकार सुविरा जैस्वाल यांनी असे मत मांडले आहे की, “caste endogamy was not a borrowing or survival of aboriginal practice. It evolved and consolidated in the process of regulating hierarchical subordination of groups and reproduction of patriarchy. Hierarchy defined as separation and superiority of the pure over the impure.” इंडोगामी ही संकल्पना आदिम जमाती मध्ये अस्तित्वात नव्हती किंवा त्यांच्याकडून घेतलेली नाही. तर केवळ गटा गटा मध्ये वर्गीकरण करताना एखाद्या विशिष्ट गटाचे वर्चस्व कसे राहील आणि पुरुषसत्ताक पद्धतीची पुनर्रचना वर्षानुवर्षे कशी राहील यावर विचार केलेला आहे. त्यामुळे जाती जातीमधील वर्गीकरण म्हणजेच तथाकथित अशुद्ध मानल्या जाणाऱ्या जातींवर शुद्ध मानल्या जाणाऱ्या जातींची वर्चस्व आणि विलगीकरण होय."

३) दीपंकर गुप्ता यांनी जातींबाबत असे विवेचन केले आहे की, “The caste system may be defined as a form of differentiation in which the constituent units justify endogamy, on the basis of putative biological difference which are semaphored by the realization of multiple social practices.

जातिव्यवस्थेचा अर्थ लावताना आपल्याला असे दिसून येते की, जातीचा असा एखादा घटक जो आपला वेगळेपणा दर्शवतो आणि त्या वेगळेपणासाठी तो बंदिस्त जाती विवाह पद्धती चे समर्थन करतो. त्यासाठी जैविक वैविध्याच्या आधारावर सामाजिक चालीरीतींचे अस्तित्व पुढे करत करतो.

४) डॉ. रोमिला थापर या जातींच्या कठोरतेबद्दल अशी मांडणी करतात की, भारतीय समाज व्यवस्था ही नेहमीच जातींच्या संरचनेनुसार न बदलणारी किंवा अपरिवर्तनीय असल्याचे दिसते. किंबहुना, ते दमन कार्य असल्याचे आणि बदलाला सामोरे न जाणारी किंवा कोणताही पर्याय न उभी करणारी दिसून येते.

परंतु तरीदेखील वक्ते आपल्या भाषणांमध्ये नेहमीच सहिष्णु म्हणून भारतीय समाज व्यवस्थेचा उल्लेख करीत असतात आणि इतिहासाचा उपयोग सुद्धा त्याच पद्धतीने केला जातो. प्रत्येक जाती-जातींचा गट आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्याला आपल्या जातीचा अभिमान असल्याचे शेखी सुद्धा मिरवत असतो.

### ७.१.२ जाती-समज:

जातींची व्याख्या जरी पाहिली तरी देखील त्या विषयी योग्य ती समज प्राप्त होणे आवश्यक आहे. कारण काही तज्ज्ञांनी खूप सखोल अभ्यास करून जाती संस्थेविषयी संशोधन केले आहे. त्यामध्ये काही परकीय तर काही भारतीय आहेत. त्यामुळे त्यांनी कशा प्रकारे जाती आणि जाती संस्था विषयक मांडणी केली हे आपल्याला समजून घेणे अवश्य बनते आणि ते आपण पुढीलप्रमाणे पाहू या:

**७.१.२.१. श्रीधर** व्यंकटेश केतकर त्यांच्या “हिस्ट्री ऑफ कास्ट इन इंडिया” या पुस्तकामध्ये म्हणतात, “जो पर्यंत भारतात जातींचे अस्तित्व राहील, तो पर्यंत हिंदू लोक चुकूनच आंतरजातीय विवाह करतील किंवा हिंदू बाह्य समाजाशी कौटुंबिक संबंध प्रस्थापित करतील. याशिवाय, जर हिंदूंनी या पृथ्वीच्या कोणत्याही भागावर स्थलांतर केले, तर भारतीय जातीव्यवस्था हि एक जागतिक समस्या होऊन बसेल.” अशा पद्धतीचे जातिव्यवस्थेविषयीचे अत्यंत मार्मिक अनुमान केतकर त्यांच्या १९०९ साली लिहिलेल्या पुस्तकात करतात. त्यांचे हे अनुमान आजच्या २१ व्या शतकात किती लागू पडते हे आपणास अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅली मधील स्थलांतरित भारतीयांमध्ये जातीभेद पाळणाऱ्या तथाकथित उच्च वर्णीय भारतीय व्यवस्थापकाविरुद्ध सिस्को (CISCO) कंपनीतील ३० महिला अभियंत्यांनी कंपनीला पत्र लिहिले जे २७ ऑक्टोबर २०२० च्या प्रतिष्ठित 'वॉशिंग्टन पोस्ट' नावाच्या वर्तमान पत्रात प्रसिद्ध झाले.

जातींचा उगम व विकास हा कमीत कमी ३००० वर्षांचा काळ आहे. त्यामुळे या एवढ्या वर्षातील भारतीय समाजातील रूढी, परंपरा, चाली रीती, या केवळ आणि फक्त जातींशींच जोडलेल्या आहेत. केतकरांच्या मते, जाती संस्थेच्या इतिहासाबद्दल योग्य माहिती नसणे हे जाती संस्थेचे सर्वात मोठे प्रबळ स्थान आहे. त्यामुळे त्या विषयी अनेक विद्वानांनी केलेले लेखन पाहावे लागते आणि तरीही एका खात्रीलायक निष्कर्षाप्रत येत येत नाही.

**७.१.२.२. तज्ज्ञ** सेनार्ट ( Senart ) यांच्या मते, “Caste is a closed corporation, in theory at any rate rigorously hereditary; equipped with a certain traditional and independent organization including a chief and a council, meeting on occasion in assemblies of more or less plenary authority and joining together at certain festivals; bound together by common occupations, which relate more particularly to marriage and to food and to questions of ceremonial pollution, and ruling its members by the exercise of jurisdiction the extent of which varies but which succeeds in making the authority of the community more felt by the sanction of

certain penalties and, above all, by final irrevocable exclusion from the group."

याचे ढोबळ मानाने भाषांतर करायचे झाल्यास असे करता येईल की, "जाती ही एक वंशपरंपरा पालन करणारी संस्था असून तिच्या परंपरा आहेत. याशिवाय ती स्वतंत्र संस्था असून तिची प्रमुख किंवा एक मुख्य परिषद असते. तो प्रमुख उत्सव प्रसंगी किंवा सार्वत्रिक बंधन म्हणून विशेष म्हणजे विवाह प्रसंगी भोजन करणे, संस्कार शुद्धीसाठी, आपल्या परिषदेतील सर्व उपस्थित सभासदांना आपल्या या परंपरांची माहिती, त्यांचे अनुपालन, किंवा उल्लंघन झाल्यास प्रायश्चित्त, त्याची अंमलबजावणी आणि सरते शेवटी आपल्या परिषदेतून किंवा गटातून बहिष्कृत करणारी संस्था होय. "

**७.१.२.३. नेसफिल्ड Nesfield defines,**

"Cast is a class of the community which disowns any connection with any other class and can neither intermarry nor eat nor drink with any but persons of their own community."

नेसफिल्ड यांच्या व्याख्येनुसार, "जाती म्हणजे एखाद्या जमातीमधील वर्ग म्हणजेच कोणत्याही वर्गाबरोबर कोणतेही असे संबंध ज्यामध्ये आंतर-जमातीय किंवा आंतर-वर्गीय विवाह न करणे, रोटी व्यवहार न करणे, पाणी सुद्धा न पिणे अशी कडक बंधने असतात आणि केवळ आपल्याच जमातीमधील वर्गाबरोबर हे संबंध प्रस्थापित करण्याचे कडक नियम असतात".

**७.१.२.४ सर हर्बर्ट रिझले Sir Herbert Risley**

"A caste may be defined as a collection of families or groups of families bearing a common name which usually denotes or is associated with specific occupation, claiming common descent from a mythical ancestor, human or divine, professing to follow the same professional callings and are regarded by those who are competent to give an opinion as forming a single homogeneous community."

सर हर्बर्ट रिझले यांनी जातीची व्याख्या करताना त्या जातीच्या व्यवसायाचा संबंध जोडला आहे. ते म्हणतात, "जात म्हणजे कुटुंबांचा संग्रह किंवा कुटुंबांचा गट ज्याला एखादे सामायिक नाव दिलेले असते जे त्या गटाच्या पारंपरिक व्यवसायाशी संबंधित असते. याशिवाय त्यांचे मूळ हे एखादा दंतकथात्मक पूर्वज असतो, जो महामानव किंवा दैवीरूपी असू शकतो. त्याने दिलेल्या मार्गावर हा संग्रह किंवा गट आपला व्यवसाय पिढ्यान-पिढ्या अनुसरत असतो. त्यामुळे हा गट किंवा संग्रह आपली स्वतःची एकमेव आणि स्वतंत्र ओळख निर्माण करतो."

रिझले याच व्याख्येचे पुढे अजून स्पष्टीकरण देतो आणि म्हणतो, " जात हि एक सततची टोळीबद्ध विवाह पद्धतीचे पालन करणारी व्यवस्था असून तिचे एखादे सामायिक नाव असते आणि त्यामुळे ते आपल्या याच गटाच्या बाहेर किंवा आपल्या गटाच्या वर्तुळाबाहेर विवाह

करू शकत नाहीत. एवढेच नव्हे तर, या छोट्या गटांमध्ये काही उपगट किंवा लहान लहान गट असतात आणि त्यांना सुद्धा टोळीबद्ध विवाह पद्धतीचे पालन करणे बंधनकारक असते."

७.१.२.४ **Shridhar** Venkatesh Ketkar says, "A caste is almost invariably endogamous in the sense that a member of a large circle denoted by a common name may not marry outside the circle; but within the circle there are smaller circles, each of which is also endogamous……"

श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी जातिसंस्थेचा अत्यंत गाढा अभ्यास केला होता. त्यांनी जातीचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले आहे की, "जात हा एक सामाजिक गट असून त्याची दोन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत आणि ती म्हणजे….

१. जातीच्या गटांचे सभासदत्व हे त्याच जातीमध्ये जन्म झालेल्याला प्राप्त होते आणि त्यानुसारच इतर जातींचे सदस्यत्व सिद्ध होते आणि
२. याच गटांच्या जातींवर आपल्या गटाच्या बाहेर विवाह न करण्याची कठोर बंधने पाळण्याचे सामाजिक कायदे लावलेले असतात.

यावरूनच त्या प्रत्येक गटाचे विशिष्ट असे नाव असते व त्यावरूनच त्याची ओळख ठरलेली असते. या गटांमध्ये मोठे आणि छोटे गट असतात आणि पुन्हा त्यांचे सुद्धा अजून लहान लहान गट तयार होतात व त्यांनाही विशिष्ट नाव दिलेले असते.

**जाती संकल्पनेचा उगम:**
वैदिक समाजातील अस्तित्वात असणाऱ्या चातुर्वर्ण सिद्धांतामधूनच जाती संकल्पनेचा उगम झाल्याचे केतकरांचे मत आहे. याशिवाय समाजातील विविध स्तरांमध्ये सुद्धा तिचा उगम सापडतो. याशिवाय पुरोहित वर्गाचे धुरिणत्व आणि त्यांची इतर वर्गातील एकमेवाद्वितियत्व यामधून सुद्धा जाती संकल्पनेचा उगम दिसून येतो. या व्यतिरिक्त शुद्धता आणि अशुद्धता या कल्पनांमध्ये आपल्याला जाती संकल्पना सापडते. एवढेच नव्हे तर त्यातूनच पुढे टोळीबद्ध विवाह पद्धती सुद्धा विकसित झाली. किंबहुना, जर ऐतिहासिक मानसशास्त्राचा विचार केला तर जाती संकल्पना आपणास अहंगंड म्हणून गर्व आणि न्यूनगंड भावना याची जाणीव करून देतात. त्यामुळेच जो पर्यंत या संकल्पना समाजात राहतील, तो पर्यंत आपणास जाती किंवा जाती संस्था यांची सतत आठवण आणि पडताळा येत राहील व तिचे पालन करणे हे त्या त्या समूहाचे आद्य कर्तव्य राहील.

**जात आणि व्यवसाय संबंध :**
आज आपण पाहतो की, जात न बदलता कोणीही व्यक्ती कोणताही व्यवसाय सुरु करू शकते. परंतु हि गोष्ट सुद्धा तेवढीच खरी मानवी लागेल कि, स्वतःला उच्च समजणाऱ्या जाती पादत्राणे दुरुस्ती (चर्मकार) किंवा मैला वाहक किंवा सफाई कामगार अशा सारखे व्यवसाय करू शकत नाही. नव्हे, जी व्यक्ती ब्राह्मण जातीमध्ये जन्माला आलेली नाही त्या व्यक्तीला पुरोहित म्हणून एखादा सामाजिक किंवा जातीय समूह स्वीकारत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती विषयक खूप सखोल संशोधन करून मांडणी केली आहे. ९ मे १९१६ रोजी न्यूयॉर्क येथे गोल्डनवायझर अँथ्रोपोलॉजिकल सेमिनार मध्ये त्यांनी त्यांचा संशोधन निबंध " Castes in India : Their Mechanism, Genesis and Development " या शीर्षकाने सादर केला होता. त्यामुळे सदर शीर्षकातच आपल्याला यामध्ये काय आशय असू शकतो हे समजून येते. याशिवाय त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जाती निर्मूलन लढ्यासाठी वेचले त्यानंतर १९३६ साली त्यांनी लाहोर येथील जात पात तोडक मंडळाने बहाल केलेल्या अध्यक्षीय भाषणासाठी "Annihilation of Castes " हा मुद्दा निवडून ते त्या मंडळाकडे पाठवले होते. परंतु ते अत्यंत सटीक वाटल्यामुळे मंडळाने त्यात बदल करण्यास सुचविले होते. परंतु डॉ. बाबासाहेब त्यात बदल करण्यास तयार झाले नाहीत व ते नंतर स्वतंत्रपणे प्रकाशित करण्यात आले. हे करत असताना त्यांनी अगोदरच्या सर्व अभ्यासकांचे वाचन केलेले होते आणि जातींच्या उगमाविषयीची मूळ साधने तपासली होती. त्यामुळे जातीविषयक त्यांची मांडणी जगातील प्रत्येक विद्यार्थ्याने नक्कीच अभ्यासली पाहिजे.

डॉ. बाबासाहेबांच्या मते, वरील तज्ज्ञांच्या व्याख्या ह्या अपूर्ण आहेत. त्यांनी या प्रत्येक तज्ज्ञांच्या अर्थान्वयाचे सटीक परीक्षण केले आणि त्यांचा आढावा घेतला आहे.

सेनार्ट यांनी जातीच्या संदर्भात ‘विटाळ’ ( Pollution) संकल्पनेवर भर दिला आहे. परंतु जाती संस्थेमध्ये पुरोहित वर्गाला आणि त्याने प्रतिपादित केलेल्या कर्मकांडांना जे महत्व आहे, त्यामुळेच विटाळ किंवा शुद्ध-अशुद्ध या कल्पना पुढे आल्या आहेत आणि त्यांना धार्मिक अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की , विटाळ संकल्पना तोपर्यंत राहील जोपर्यंत तिला धार्मिक रंगरूप दिले जाईल आणि धर्माचे अर्थन्वयन करणारे पुरोहित वर्ग हा सतत शुद्ध-अशुद्ध या कल्पना समाजात दृढ करत राहील.

नेसफिल्ड यांच्या व्याख्येबाबत विश्लेषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की नेसफिल्ड यांनी जातिसंस्थेचा घेतलेला अर्थ जो ‘जातिसंस्थेच्या बाहेरच्या गटाशी एकरूप न होणे’ हा चुकीचा आहे. कारण गटाशी एकरूप न होणे हे कोणत्याही प्रकारचे सकारात्मक बंधन नसून जातीचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे जे एकमेवाद्वितिय आहे आणि त्याला धार्मिक अधिष्ठान आहे.

सर हर्बर्ट रिझले यांनी केलेल्या जातीच्या व्याख्येबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, रिझले यांनी कोणताही नवीन मुद्दा पुढे केलेला नाही आणि त्यामुळेच त्यांच्या व्याख्येकडे अधिक लक्ष देण्याची गरज नाही.

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या व्याख्येबाबत विश्लेषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, केतकरांनी अधिक चांगले विवेचन केल्याचे आढळते. डॉ. केतकर हे केवळ भारतीयच नाहीत तर त्यांनी त्या जोडीला जातीच्या अभ्यासाकडे सटीक आणि

खुल्या मनाने पाहिल्याचे दिसते. त्यामुळेच त्यांची व्याख्याही काही प्रमाणात चांगली असल्याचे जाणवते.

याशिवाय केतकरांनी केवळ जाती या संज्ञेवर लक्ष केंद्रित न करता जाती संस्थेवर आणि तिच्या जातिसंस्था अंतर्गत वैशिष्ट्यांवर लक्ष केंद्रित केलेले आहे आणि दुय्यम गोष्टींकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. असे जरी असले तरी त्यांचा थोड्या प्रमाणात वैचारीक गोंधळ झालेला दिसतो. नाही तर त्यांची व्याख्या अत्यंत सुलभ आणि स्पष्ट झाली असती. केतकर हे जातीची दोन प्रमुख वैशिष्ट्ये सांगतात आणि ती म्हणजे 'आंतरजातीय विवाहावर बंधन' आणि 'फक्त आपल्याच जातीचे सदस्यत्व स्वीकारणे.' परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "ही दोन वैशिष्ट्ये वेगळी नसून एकच आहेत. कारण जर तुम्ही आंतरजातीय विवाह करण्यास मनाई केली की आपोआपच तुम्हाला तुमच्याच जातीचे सदस्यत्व स्वीकारावे लागणे हे ओघानेच आले. त्यामुळेच त्यांच्या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, " अंतर्जातीय विवाह पद्धती नसणे म्हणजेच 'गटांतर्गत विवाह पद्धती' (Endogamy) होय आणि जातीची संकल्पना समजून घ्यायची झाल्यास तेच जातींचे आणि जातीसंस्थेचे सार असल्याचे दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जाती संकल्पनेविषयी स्वतःचे विश्लेषण करताना असे म्हणतात, "भारतातील जातीचा अर्थ म्हणजे भारतीय लोकसंख्येचे कृत्रिमपणे केलेले तुकडे जे एका विशिष्ट गटात किंवा घटकात साचेबंद पणे राहतात आणि गटांतर्गत विवाह पद्धतीचे पालन करून एकमेकांत मिसळत नाहीत." आणि त्यामुळेच जातीसंस्थेचे प्रमुख आणि एकमेव वैशिष्ट्य म्हणजे गटांतर्गन विवाह पद्धती म्हणजेच इंडोगामी ( Endogamy) होय.

## ७.२ सारांश

आपण पाहिले की, भारतीय समाज हा जातींनी व पोटजातींनी भरलेला समाज असून त्याच्या दैनंदिन जीवनाचा पायाच जातिसंस्थेने व्यापला असल्यामुळे सर्व धार्मिक कार्यांमध्ये त्याला जातीनुसार असलेली बंधने पाळावी लागतात. किंबहुना, जन्मापासून ते मृत्यूपर्यंत जातीला दिलेली विधी व्यवस्था त्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग झालेला आहे. भारतामध्ये जातीचा संदर्भ आपणास १७ व्या शतकात आला असल्याचे डॉ. केतकरांनी म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीविषयक चिंतन करून तिच्या निर्मूलनाचे उपाय सुद्धा सुचविले आहेत. जाती संस्था आजही दृढ होण्यामागे 'गटांतर्गत विवाह पद्धती' (Endogamy ) हेच कारण असल्याचे त्यांचे विश्लेषण आहे. जातींचा अर्थ समजून घेताना तटस्थ आणि चिकित्सक दृष्टिकोन ठेवला तरच तो समजेल.

## ७.३ टीपा (Glossary)

- आदिम जमाती: भटक्या अवस्थेत राहणारा प्राचीन मानव किंवा अश्मयुगीन मानव, आदिवासी जमाती

- आरक्षण: राखीव जागा किंवा राखीव पद शिक्षण आणि नोकरीमध्ये विशिष्ट जातीला दिले जाते.
- 'इंडोगामी': टोळीबद्ध विवाह पद्धती किंवा आपल्याच जातीच्या गटामध्ये विवाह करण्याचे बंधन
- निग्रो: अमेरिकेमधील कृष्णवर्णीय लोक
- पुरुषसत्ताक पद्धती: घरातील वयाने वरिष्ठ किंवा करता पुरुष कुटुंबप्रमुख असणे आणि स्त्रीला दुय्यम स्थान प्राप्त होणे
- सिलिकॉन व्हॅली: अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील संगणक क्षेत्रातील नोकरी आणि सेवा देणारा शहरी भाग
- विटाळ: जातिभेदांमुळे खालच्या जातीशी संपर्क आल्याने वरची जातीची व्यक्ती अशुद्ध होते असे मानणारी भावना किंवा परंपरा

## ७.४ प्रश्न

१. भारताच्या संदर्भात जाती शब्दाचा वापर कधी केला गेला असे श्रीधर केतकरांना वाटते?

२. सेनार्ट यांची जाती विषयीची व्याख्या लिहा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीविषयक विचार स्पष्ट करा.

## ७.५ संदर्भ


१. Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol.9, Maharashtra Govt, 1990.

२. Jaiswal Suvira, Caste, Gender and Ideology in the making of India, General Presidential Address, 68th Session of Indian History Congress, Delhi University, 2007.

३. Gupta Dipankar, Continuous Hierarchies and Discrete Castes, Economic and Political Weekly, No.46, 17 November ,1984.

४. Thapar Romila, The Past and Prejudice, National Book Trust, New Delhi,1972.

५. Ketkar Shridhar Venkatesh, Castes in India, Low Price Publications, Delhi 2015, Originally published in 1909.

६. https://www.indiatoday.in/technology/news/story/explosive-report-reveals-caste-discrimination-in-silicon-valley-30-dalit-engineers-call-out-indian-bosses-1735792-2020-10-28.


*****

# ८

# जात : परंपरा, सत्तासामर्थ्य आणि मानहानी

**घटक रचना**


८.० उद्दिष्टये

८.१ प्रस्तावना

८.२ जात एक परंपरा

८.३ जात : एक सत्तासामर्थ्य

८.४ चार पुरुषार्थ

८.५ जात: एक मानहानी

८.६ सारांश

८.७ टीपा

८.८ प्रश्न

८.९ संदर्भ


## ८.० उद्दिष्टये

१. जात ही संकल्पना परंपरागत कशी स्थापन झाली हे समजणे.

२. वर्णव्यवस्थेमुळे जातींचे प्राबल्य आणि सत्तासामर्थ्य कसे निर्माण झाले याचे विश्लेषण करणे.

३. जातीसंस्थेमुळे एका निवडक जातींना सत्ता आणि ठराविक जातींना मानहानी कशी प्राप्त झाली याचा आढावा घेणे.

## ८.१ प्रस्तावना

जातींचा इतिहास पाहिल्यास तो तीन हजार वर्षांपेक्षाही अधिकचा असल्याचे दिसून येते. या जाती वर्णव्यवस्थेतूनच उगम पावलेल्या दिसतात. त्यानुसार जेव्हा चातुर्वर्ण्य व्यवस्था होती त्यावेळेला ऋग्वेद काळामध्ये एक वर्ण दुसऱ्या वर्णांमध्ये आपल्या गुण व कर्तव्याच्या जोरावर स्थलांतर करू शकत होता. परंतु त्यामुळे उच्च वर्णाचे स्थान खालच्या पातळीवर ढळू लागल्याचे दिसू लागताच वर्णा -वर्णांमध्ये मध्ये होऊ लागलेले स्थलांतर बंद करण्यात येऊन 'वर्णबद्ध विवाह पद्धती' (वर्णबंदिस्त) किंवा 'गटांतर्गत विवाह पद्धती' निर्माण करण्यात आली. याच वर्णांतर्गत काही ठराविक जाती निर्माण करण्यात आल्या आणि या जातींमध्ये सुद्धा पोट जाती आणि त्यांच्यामध्ये गटांतर्गत विवाह पद्धती आणि तीही कडक करण्यात आली. एवढेच नव्हे तर या पद्धतीमध्ये रोटी-व्यवहार आणि जल- व्यवहार सुद्धा बंद करण्यात आले आणि ती परंपरा चालू ठेवण्यासाठी अधिष्ठान म्हणून काल्पनिक

साहित्याची निर्मिती करण्यात आली. त्यामध्ये हेच जाती-भेद किंवा 'जातीबद्ध विवाह पद्धती' पाळण्याची आवश्यकता का आहे याचे समर्थन करण्यात आले आणि मग परंपरेने जातीप्रथा पाळण्याचे बंधन लादण्यात येऊ लागले.

जातींची परंपरेच्या दृष्टिकोनातून तिच्या प्रबलतेच्या व शक्ती म्हणून वापर करण्याच्या प्रभावाचा विचार करणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून आणि त्यामुळे खालच्या जातींच्या होणाऱ्या मानहानीच्या दृष्टिकोनातून आपल्याला वर्णव्यवस्थेची चर्चा करणे आवश्यक ठरते.

## ८.२ जात एक परंपरा

### ८.२.१ वर्णव्यवस्थेचा उगम व विकास:

वर्णव्यवस्थेचा उगम आपल्याला ऋग्वेदातील दहाव्या मंडलामध्ये सापडतो. त्यामधील संस्कृत मंत्रामध्ये हा वर्णसिद्धान्त मांडण्यात आलेला आहे. त्याबद्दल काही तज्ज्ञांच्या मते, हा मंत्र मूळ ऋग्वेदामध्ये नव्हता व तो नंतर त्यामध्ये घुसडवण्यात आलेला आहे. परंतु आपणास हे सत्य नाकारता येणार नाही की, चातुर्वर्ण व्यवस्था अस्तित्वात होती आणि त्यानुसार भारतीय समाजाची विभागणी करण्यात आलेली होती आणि आजही त्याचे खूप मोठ्या प्रमाणामध्ये बदलत्या स्वरूपानुसार पालन करण्याचा रिवाज आहे. त्या सिद्धांताप्रमाणे, यज्ञप्रसंगी या यज्ञ कुंडामधून एक महापुरुष बाहेर येतो आणि त्याच्या मुखातून, खांद्यातून, मांड्यातून आणि पायातून अनुक्रमे चार वर्णांचा जन्म होतो.

- मुखातून जन्म झालेला वर्ण म्हणजे ब्राह्मण
- खांद्यातून जन्म पावलेला वर्ण म्हणजे क्षत्रिय
- मांड्यातून जन्म पावलेला वर्ण म्हणजे वैश्य आणि
- पायातून जन्म झालेला वर्ण शूद्र होय.

म्हणून त्यांची वर पासून ते खालपर्यंत रचना करण्यात आली. त्या महापुरुषाच्या मुखाचा भाग सर्वात वरचा म्हणून ब्राह्मण वर्ण सर्वात वरचा किंवा उच्च ठरविण्यात आला. त्या खालोखाल त्या महापुरुषाच्या शरीराचा खांदा म्हणून त्यातून जन्म झालेला वर्ण हा क्षत्रिय म्हणजेच दुसऱ्या क्रमांकावर- वरून खाली ठरविण्यात आला. मांडीचा भाग हात खांद्याच्याही खाली असल्यामुळे त्यातून जन्म झालेला तिसरा वर्ण वैश्य व त्याचे स्थान तिसऱ्या क्रमांकावर वरून खाली ठरविण्यात आले. तर सर्वात खालचा भाग म्हणजे पाय व पायातून जन्म झालेला वर्ण म्हणजे शुद्र असे स्थान ठरविण्यात आले. त्यानुसारच भारतीय समाज जीवन रचनाबद्ध केलेले दिसून येते आणि आजही जाती संस्थेसाठी त्याचाच आधार घेतला जातो.

**आकृती१: वर्णांचा (जातींचा) त्रिकोण (सौजन्य: Saylor Foundation: https://courses.lumenlearning.com/atd-fscjworldreligions/chapter/caste-system-in-ancient-india/)**




सेलर फाऊंडेशन (Saylor Foundation) ने संकल्पित केलेल्या वरील वर्णव्यवस्थेच्या त्रिकोणानुसार आपल्याला चार वर्ण, त्यातील वरील तीन वर्णांना 'आर्य' ही संज्ञा वापरली असल्याचे दिसून येते कारण ते तीनही वर्ण 'द्विज' (Twice Born ) मानले गेले होते. याशिवाय, चौथ्या वर्णाला अनार्य ही संज्ञा वापरल्याचे दिसून येते. त्यांची संख्या म्हणजेच समाजातील संख्यात्मक व्याप्ती, ज्यांच्या पायावर नव्हे तर शिरावर उर्वरित तीन वर्ण कसे उभे आहेत? अशा गोष्टींचा उलगडा होतो. वरील त्रिकोणातून आपल्याला अजून एक गोष्ट दिसून येते आणि ती म्हणजे चार वर्णांच्या बाहेर असलेला अस्पृश्य वर्ग होय. म्हणजे त्यांना या चार वर्णांमध्येसुद्धा स्थान नव्हते.

### ८.२.२ वर्णानुक्रमे दर्जा व कामाची विभागणी:

चातुर्वर्ण पद्धतीनुसार चार वर्णांना त्यांचे हक्क व कर्तव्ये (कामे ) वाटून देण्यात आली होती ती पुढीप्रमाणे:

**१. ब्राह्मण:**

हा वर्ण म्हणजे ज्ञानाचा महामेरू आणि त्याला पहिल्या तीन वर्णांना शिक्षण देणे हे कार्य करावे लागे. अर्थात कोणत्या वर्णास कोणत्या प्रकारचे ज्ञान द्यावयाचे हे सुद्धा तेच ठरवीत असत. शिक्षकी पेशा म्हणजेच गुरु होण्याचा अधिकार त्यानांच असे. सर्व प्रकारची धार्मिक कार्ये, कर्मकांड, धार्मिक विधी, संस्कार कारण्याची मक्तेदारी त्यांच्याकडेच होती. त्यामुळे समाजामध्ये अत्यंत आदराचे व मनाचे स्थान त्यांना होते. पुरोहित म्हणून राजाला सल्ला देणे, युद्धप्रसंगी यश मिळावे म्हणून मुहूर्त पाहणे, यज्ञ करणे अशी कामे त्यांनी आपल्याकडे ठेवली होती. किंबहुना, पृथ्वीलोकावरील ईश्वर म्हणजेच 'भूदेव ' म्हणून त्यांची भूमिका असे. त्यांना जन्मतःच हे महाप्रतिष्ठेचे स्थान प्राप्त होत असे. व्यक्तीच्या गर्भधारणेपासून ते मृत्यूपर्यंत सर्व संस्कार करण्याचा अधिकार त्यांच्याकडे होता.

**२. क्षत्रिय:**

क्षत्रिय हा नेहमी राजा असे. या वर्णासाठी कर्तव्य हे राजपाट चालविणे आणि आपल्या प्रजेच्या जीवन आणि मालमत्तेचे रक्षण करणे हे होते. युद्धाचे प्रशिक्षण घेणे, युद्ध भूमीवर शत्रूशी सामना करणे, ब्राम्हण वर्णाचे रक्षण करणे, पुरोहिताच्या सल्ल्यानुसर राज्यकारभार करणे, न्यायदान करणे, कायदा व सुव्यवस्था राखणे ही कर्तव्ये त्याला पार पाडावी लागत असत. राजा हा ब्राह्मण वर्णाला कोणताही अपराध झाला तरी देहदंड देऊ शकत नव्हता.

**३. वैश्य:**

या वर्णाचे प्रमुख काम म्हणजे व्यापार व वाणिज्य यांची भरभराट करणे, अर्थव्यवस्थापन करणे, राजाला प्रसंगी आर्थिक मदत देणे, इतरांना कर्ज पुरवठा करणे ही होती. असे असले तरी सामाजिक उतरंडी मध्ये त्याचे स्थान तिसऱ्या क्रमांकावर होते.

**४. शूद्र:**

या वर्णाचे प्रमुख कर्तव्य म्हणजे वरील तीनही वर्णांची सेवा करणे हे होते. त्याला शिक्षण घेण्यावर बंदी होती, धन कमावण्यावर बंदी होती, शस्त्र बाळगण्यावर बंदी होती. याशिवाय वरील तीन वर्णांबरोबर विवाह संबंध, रोटी आणि जल व्यवहार निषिद्ध होते. गावातील कामे करणे आणि त्या बदल्यात केवळ खाण्यापुरते धान्य त्यांना वर्षाकाठी दिले जाई . म्हणजेच वरील तीन वर्णांच्या भिक्षेवर त्याला जगावे लगे आणि सर्व शारीरिक कष्टाची आणि हीन दर्जाची कामे त्याच्या वाट्याला देण्यात आली होती.

याशिवाय, या वर्णाच्या बाहेर अवर्ण म्हणजेच वर्णबाह्य लोक होते. त्यांना स्पर्श करणे किंवा त्यांची सावली सुद्धा निषिद्ध मानली गेली होती.

अशा पद्धतीने परंपरेने ह्या चार वर्णांचे रूपांतर पुढे अधिक कडक अशा जाती संस्थेमध्ये झाले व पुढे या जातींमधूनच हजारो पोटजाती निर्माण झाल्या आणि प्रत्येक जातीची आपली धार्मिक व सामाजिक परंपरा निर्माण होऊन त्याप्रमाणे या जाती समाजात वागू लागल्या. किंबहुना, परंपरांचे उल्लंघन करणे पाप मानले जाऊ लागले आणि उल्लंघन करणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद धर्मशास्त्रात करण्यात आली.

आपल्याला असे वाटेल की, आपण जाती व्यवस्थेचा अभ्यास करताना वर्णव्यववस्थेचा संदर्भ का घेतो? परंतु वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. किंबहुना, वर्णव्यवस्थेचा उगम असल्याचे ऋग्वेदामध्ये पुरावे तरी उपलब्ध आहेत. परंतु जातीव्यवस्था केव्हा अस्तित्वात आली याबद्दल कोणीही दावा करू शकत नाही. त्यामुळे वर्णव्यवस्थेचे सर्व नियम, नव्हे, त्याहीपेक्षा अधिक जाचक नियम जातिव्यवस्थेमध्ये घेण्यात आले आहेत आणि त्यांचे पालन परंपरागतरीत्या करणे हे प्रत्येक जातीचे कर्तव्य मानले जाऊ लागले आहे. त्यामुळे परंपरा म्हणजेच वर्णव्यवस्थेने घालून दिलेले नियम आणि तेच जातींनी सुद्धा समाजामध्ये पालन करणे आवश्यक मानले गेले आहे.

## ८.३ जात : एक सत्तासामर्थ्य

### ८.३.१ आश्रमव्यवस्था:

वर्णव्यवस्थेमुळे चारही वर्णांना त्यांची कर्तव्ये विभागून देण्यात आली होती आणि त्यानुसार 'वर्णाश्रमधर्म' ही संकल्पना पुढे करण्यात आली व तिचे परंपरेने पालन करण्याची सक्ती समाजामध्ये करण्यात आली.

सामाजिक जीवनामध्ये प्रत्येक मानवाच्या आयुष्याचे चार टप्पे करण्यात आले. याना चार आश्रम म्हटले जाऊ लागले. प्रत्येक व्यक्तीने या चार आश्रमातून जायचे असते नव्हे त्या चार आश्रमांमध्ये प्रवेश करायचा असे ठरविण्यात आले व त्यासाठी धर्मशास्त्राचा आधार देण्यात आला होता. मग हे चार आश्रम पुढीलप्रमाणे :

**१. ब्रह्मचर्याश्रम (वय ८ वर्षे ते २५ वर्षे) :**

व्यक्ती जन्माला आल्यानंतर तिचे शिक्षण सुरु होईपर्यंत बालपण अवस्था आणि वयाच्या ८ व्या वर्षी शिक्षण घेण्यास सुरुवात होई. परंतु ८ व्या वर्षी केवळ ब्राह्मण वर्णाला शिक्षण घेण्यास परवानगी असे. त्यावेळी हा एक संस्कार मानला जाई व त्याला काही ठिकाणी 'उपनयन संस्कार' असेही म्हटले आहे. मग गुरुकुल शिक्षण पद्धतीप्रमाणे हा शिष्य शिक्षण घेण्यासाठी गुरूच्या आश्रमामध्ये प्रवेश करीत असे आणि आपले शिक्षण पूर्ण करीत असे. या सर्व कालावधीमध्ये गुरुची आणि गुरुपत्नीची सेवा करणे, आज्ञापालन करणे आणि अध्ययन करणे हेच त्याचे आयुष्य असे. अध्ययन पूर्ण झाल्यानंतर गुरुदक्षिणा देऊन त्याला घरी परतावे लागत असे. या आश्रमाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शिष्याला ब्रह्मचर्य व्रताचे पालन करावे लागे. क्षत्रिय वर्णाच्या शिष्याला वयाच्या ११ व्या वर्षी तर वैश्य वर्णाच्या शिष्याला वयाच्या १३ व्या वर्षी गुरुगृही अध्ययनासाठी प्रवेश घेण्याचे बंधन होते.

**२. गृहस्थाश्रम (वय २५ वर्षे ते ५० वर्षे) :**

गुरूच्या आश्रमातून घरी आल्यानंतर त्या तरुणाचा विवाह केला जाई आणि त्याचे गृहस्थ जीवन सुरु होत असे. जीवनातील या टप्प्यादरम्यान उदरनिर्वाहासाठी धन कमावणे, संतती निर्माण करणे, बायको-मुलांचे संगोपन करणे आणि मुले त्यांची कौटुंबिक जबाबदारी पेलण्यास सक्षम होईपर्यंत त्यांची देखभाल करणे ही कर्तव्ये त्या व्यक्तीला पार पाडावी लागत असत. त्यानंतरच्या जीवनाच्या अवस्थे मध्ये म्हणजेच आश्रमामध्ये प्रवेश करण्यापूर्वी आपल्या मुलीचा विवाह लावून देण्याची महत्वाची जबाबदारी पूर्ण करावी लागत असे.

**३. संन्यासाश्रम (वय ५० वर्षे ते ७५ वर्षे) :**

मुले स्थिरस्थावर झाल्यानंतर त्या व्यक्तीने संन्यास घ्यावा अशी योजना करण्यात आलेली होती. मग सर्व घरदार आणि कुटुंब सोडून गुरूच्या आश्रमात सेवा करण्यासाठी आणि अध्यात्मिक तत्वज्ञानाचे अध्ययन करण्यासाठी जावे अशी अपेक्षा होती. या दरम्यान, मोक्षप्राप्तीसाठी अध्यात्म अध्ययन आणि शेजारच्या गावांमध्ये संन्यासी बनून केवळ भिक्षा

मागून जीवन व्यतीत करावे लागत असे. मात्र या दरम्यान सदरचा संन्यासी आपल्या कुटुंबाची भेट घेऊ शकत होता.

**४. वानप्रस्थाश्रम (वय ७५ वर्षे ते मृत्यू होई पर्यंत) :**

या आश्रमामध्ये प्रवेश करणारी व्यक्ती गुरूच्या सेवेस आपले जीवन अर्पण करीत असे व केवळ फळे, कंद-मुळे यावरच आपला उदरनिर्वाह करीत असे. याशिवाय, संपूर्ण जीवन तपश्चर्या करण्यामध्ये घालवून मोक्ष प्राप्तीकडे वाटचाल करीत असे. या अवस्थेमध्ये कुटुंबाशी किंवा समाजाशी त्या व्यक्तीचा अजिबात संबंध राहत नसे आणि केवळ अध्यात्म हेच जीवनाचे ध्येय मानून मृत्यू पर्यंत याच आश्रमामध्ये जीवनाचा शेवट होत असे.

परंतु, सुरुवातीचे दोन आश्रम तर सर्वांनाच आवश्यक होते आणि बहुसंख्य लोक या दोनच आश्रमामध्ये आपले जीवन व्यतीत करीत असत. तिसऱ्या आणि शेवटच्या आश्रमामध्ये प्रवेश करणाऱ्या व्यक्ती संख्येने अत्यंत कमी होत्या.

## ८.४ चार पुरुषार्थ

वरील चार वर्णांनुसार, व्यक्ती चार आश्रमांतून जात असे आणि त्याच्या जीवनामध्ये या चार पुरुषार्थांचे त्याला पालन करावे लागत असे. ढोबळ मानाने पाहिल्यास, हे चार पुरुषार्थ म्हणजे त्याची मानवी जीवनातील ध्येये होती आणि ती त्याला प्राप्त करावी लागत असत. ती चार ध्येये म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष होय.

**१. धर्म:**

म्हणजे कर्तव्य आणि धर्म शास्त्रांमध्ये प्रस्तुत करण्यात आलेला धर्म होय. त्यांचे पालन करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य मानले जात असे. त्यानुसर, प्रत्येक वर्णाने आपल्या समाजातील उगम स्थानानुसार वागणे आणि आपल्याला दिलेली कर्तव्ये पार पाडणे होय. तसेच आश्रमव्यवस्थेचे पालन करण्याचे कर्तव्य सुद्धा करावे लागत असे. उदा. ब्रह्मचर्याश्रमामध्ये असताना गुरुची आज्ञा पाळणे आणि अविवाहित राहणे हाच त्याचा धर्म मानला गेला होता आणि त्याचे उल्लंघन करणे हा अपराध मानण्यात आला होता.

**२ अर्थ :**

या मध्ये उदरनिर्वाहासाठी धन कमावणे आणि तेही नैतिक मार्गांचा वापर करून असे अपेक्षित होते. ब्राह्मणास दान करणे हे पुण्याचे काम मानले जाई. त्यामधूनच कुटुंबाचे पालनपोषण करणे हे जीवनाचे ध्येय साध्य केले जात असे.

**३. काम:**

या पुरुषार्थामध्ये मानव वंश सुरु राहण्यासाठी स्त्री-पुरुष म्हणजेच पती-पत्नी एकत्र येणे आणि त्यातूनच संतती निर्माण करणे हे अपेक्षित होते. परंतु याशिवाय जीवनाकडे सौंदर्यदृष्टीने पाहणे सुद्धा महत्वाचे होते. त्याप्रमाणे खेळ व कला यांचा आस्वाद घेणे आणि त्यांची निर्मिती करणे हे सुद्धा अपेक्षित होते.

**४. मोक्ष:**

जीवनाचा सर्वात महत्वाचा पुरुषार्थ म्हणजे मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करणे होय. मोक्ष म्हणजे मानवाने जीवन आणि मृत्यू यांच्या चक्रातून मुक्त होणे असा अर्थ होतो. मग त्यासाठी आपण अगोदरच शेवटच्या दोन आश्रमांमध्ये त्याची चर्चा केलेली आहे.

वरील प्रकारे जातिसंस्थेची परंपरा वर्णव्यवस्थेच्या क्रमाने समाजात रूढ करण्यात आली. त्यामुळे जातिसंस्थेचे काटेकोरपणे पालन करणे हे धर्मशास्त्राचा आदेश आहे अन्यथा पाप-पुण्याची भीती, देवांचा कोप, संकट, अपशकुन, रोगराई, व चुकून उल्लंघन झाले तर त्याबद्दल प्रायश्चित्त किंवा पुरोहित वर्गाने सुचविलेला यज्ञ किंवा कर्मकांड करणे असे पिढ्यान-पिढ्या चालत असलेले आपल्याला भारतीय समाजात दिसून येते. आज आपल्याला काही प्रमाणात जातिव्यवस्थेला सुधारणेचे धक्के बसत असल्याचे दिसते परंतु ते अत्यंत नगण्य असून त्यासाठी अनेक जणांचा 'Honour Killing ' म्हणून बळी जात असल्याचे दिसते.

जाती संस्थेच्या उतरंडीमुळे समाजामध्ये भेदभावाची बीजे पेरली गेली आहेत आणि त्यांच्यामध्ये उच्च आणि नीच अशा कल्पना रूढ झालेल्या आहेत. त्यानुसार जी जात वरच्या स्थानी असेल तिच्याकडे सर्व शक्ती असल्याचे आपल्याला दिसून येते. उदा. ब्राह्मण जाती या इतर सर्व जातींपेक्षा जन्मजात श्रेष्ठ मानल्या गेल्या आणि आजही आधुनिक भारतात त्यांचे स्थान अढळ आहे असेच आपल्याला दिसते. त्यामुळे राजा हा कितीही मोठा असला तरी त्याला आपल्या राजपुरोहिताच्या सल्ल्याबाहेर जाणे पाप मानण्यात आले होते. त्यातूनच त्या जातीचे समाजातील असलेले प्राबल्य सिद्ध होते. त्यातूनच राजा अशा जातीच्या लोकांना आणि त्यांच्या धर्मसंस्थाना शेकडो एकर जमिनी दान देत असे. त्यामुळे काही भागात या जाती जमीनदारी आणि सावकारी करत असल्याचे दिसते. इतर वर्णांमध्ये आढळणाऱ्या जातींना सुद्धा ब्राह्मण जातींचा सल्ला घ्यावा लागे. नव्हे, मनुष्याच्या गर्भधारणेपासून ते अंत्यसंस्कार होई पर्यंत केवळ धार्मिक मंत्र पठण शक्तीच्या जोरावर संपूर्ण समाजात ब्राह्मण जातींचे वर्चस्व होते आणि ते आजही अबाधित आहे. ब्राह्मण जाती ह्या त्यामुळेच सर्व शक्तिमान म्हणून गणल्या गेल्या होत्या. म्हणजेच जातींची उतरंड ही त्या वर्गासाठी एक शक्तीस्थान होऊन बसले होते.

क्षत्रिय वर्णाचे लोक हे राज्यकारभार करणे आणि प्रजेची व राज्याची मालमत्ता तसेच जनतेच्या जीविताचे रक्षण करण्याची जबादारी या वर्गावर होती. याशिवाय इतर शूद्र वर्णाचे लोक आणि वर्णाबाहेरचे लोक यांना त्यांची सतत सेवा करावी लागत असे. त्यामुळे राज्यसंस्थेवर संपूर्ण वर्चस्व हे याच वर्णाचे होते परिणामी या वर्णामध्ये समाविष्ट असणाऱ्या जातींचे होते. त्यामुळे प्रशासनव्यवस्था आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम याच वर्गाचे असल्यामुळे त्यांच्यामध्ये उरलेल्या दोन वर्णांतील जातींवर प्रभुत्व होते. त्यामुळे हा वर्ग त्याला हवे तसे कायदे ब्राह्मण जातींच्या सल्ल्याने तयार करीत असे आणि त्याला हवे तसे ते राबवित असे. त्यामुळे राजेशाही परंपरा ही अनुवांशिक दृष्ट्या त्याच जातींमध्ये पिढ्यानपिढ्या चालत राहिली आणि इतर जातींना तो अधिकार कधीच मिळाला नाही. त्यामुळे ठराविक जातींचे प्राबल्य राहिले.

वैश्य वर्णात मोडणाऱ्या जाती आपल्याला धर्मशास्त्रांनी घालून दिलेल्या हक्क व कर्तव्यानुसार व्यापार व वाणिज्य यामध्ये अमाप पैसे कमाऊ लागल्या. त्याबरोबर त्यांची धनसंपत्ती वाढू लागली. त्याबरोबर राजदरबारी सुद्धा त्यांचा प्रभाव चांगलाच वाढू लागला. प्रसंगी व्यापारी वर्गाच्या श्रेणी ह्या राजाला सुद्धा धनाचा पुरवठा करू लागल्या. ब्राह्मण जातींना यज्ञप्रसंगी भरघोस दक्षिणा देऊ लागल्या. त्यामुळे त्यांच्याकडे असलेली धनसंपत्ती हे त्यांचे समाजातील एक प्रभावक्षेत्र बनले म्हणजेच एक शक्तीस्थान बनले.

## ८.५ जात: एक मानहानी

चौथ्या शूद्र वर्णामध्ये आणि वर्ण व्यवस्थेबाहेरील जातींमध्ये मात्र प्रभाव क्षेत्राचा पूर्णपणे अभाव होता. यामध्ये येणाऱ्या जाती या शेतकरी आणि कामकरी होत्या. त्यांना आपल्या वरील तीन वर्णांची इमाने इतबारे सेवा करावी लागे. त्यामुळे या जातींना सर्व प्रकारची शारीरिक आणि मेहनतीची कामे करावी लागत असत. असे असूनही त्यांना पदरी अपमान आणि निराशा येत असे. शेतामध्ये घाम गाळणारा वर्ग याच जातींमधून असे आणि जमीनदार वर्ग मात्र वरील तीन वरिष्ठ जातींमधून असत. शूद्र जातींना धन कमविणे, शिक्षण घेणे आणि शस्त्र बाळगणे निषिद्ध होते. त्यातच चुकून एखाद्याने जर शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला देहांत शासन मिळत असे. वरच्या तीन जातींनी दिलेल्या उदर्निर्वाहापुरत्या धान्यावर त्यांना जगावे लागे. वर्णबाह्य जातींना तर अस्पृश्य मानले जात असे म्हणजेच त्यांचा स्पर्श होणे किंवा त्यांची सावली इतर तीन वर्णातील जातींच्या सदस्यावर पडणे सुद्धा विटाळ मानला जात असे.

वरील तीन वर्णांतर्गत जातीना 'द्विज' म्हणजे दोनदा जन्म होणाऱ्या जाती असे मानले गेल्यामुळे त्यांना जानवे परिधान करण्याचा अधिकार प्राप्त झालेला होता. त्यामुळेच त्यांना शिकण्याचा अधिकार सुद्धा प्राप्त झाला होता. महात्मा फुले यांनी त्यांच्या 'गुलामगिरी' ग्रंथामध्ये सांगितले आहे की, हि जातीव्यवस्था भट-ब्राह्मणांनी त्यांचे समाजातील उच्च स्थान कायम राहावे म्हणून निर्माण केली. रोझालिंड ओहानलॉन यांनी त्यांच्या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, ख्रिश्चन मिशनरी लोकांनी धर्मशास्त्रांचा अभ्यास करून त्यांचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले व ते प्रसिद्ध करून सर्वांना वाचनासाठी उपलब्ध करण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे जाती वर्चस्वाची योजना कशा प्रकारे दूरदृष्टीने करण्यात आली होती हे दिसून आले.

शूद्र आणि अतिशूद्र (वर्णबाह्य जाती ) यांचे हाल म्हणजे गुलामापेक्षाही वाईट होते. कारण एक वेळ जागतिक परिस्थितीमध्ये आपल्याला असे दिसेल की, गुलामांना सुद्धा त्यांच्या कर्तृत्वामुळे मुक्ती मिळत होती आणि त्यांचा मालक त्यांना आपल्या जवळील वरचे स्थान सुद्धा देत होता. नव्हे, मध्ययुगीन भारतावर सुलतान घराण्याने जे राज्य केले त्यातील सुरुवातीस अनेक सुलतान गुलाम होते. परंतु शुद्रांनी कितीही चांगले काम केले तरी त्यांना मानसन्मान मिळत नव्हता.

आजच्या संदर्भात जात या संकल्पनेचा एकत्रित विचार केल्यास तथाकथित उच्च वर्णीय जाती या आजही आपली प्रतिष्ठा म्हणून सतत मिरवीत असतात. आजही आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक सत्तासामर्थ्य याच जातींकडे एकवटले आहे. त्यामुळे सत्ता आणि संपत्तीचे अधिकार याच जातींकडे एकवटले आहेत. आजच्या युगात जातीभेद पाळला नाही पाहिजे असे सर्वांना ते भासवीत असतात. परंतु तथाकथित शूद्र जातींमधील एखादी जात जर त्यांच्या बरोबरीने प्रगती करू लागली तर त्याला जातीच्या वर्चस्वी बहुमताने व पक्षपाती राजकारणी वृत्तीने नेस्तनाबूत करण्याचे प्रयत्न केले जातात. एवढेच नव्हे, तर त्याला सतत खालची जात म्हणून हिणविले जाते. क्षत्रिय वर्णातील जाती आज अस्तित्वात नाहीत आणि त्यासाठी कारण दिले जाते ते म्हणजे परशुरामाने या पृथ्वीवरून २१ वेळा क्षत्रियांचा नाश केला आणि त्यांना नष्ट केले हे सुद्धा धार्मिक ग्रंथांमध्ये नमूद करण्यात आलेले दिसते. त्यामुळे खरे तर आज तीनच वर्णातील जाती अस्तित्वात आहेत असे मानावे लागते. म्हणून तर पिढ्यानपिढ्या स्वतःला राजेशाही समजणाऱ्या जाती आज काल भारतभर आरक्षण मागण्यासाठी आंदोलन करीत असलेल्या दिसतात. परंतु, या उच्च जातींना त्यांचे जातीय वर्चस्व हवे आहे. कारण, आजही आपणास जातीअंतर्गत विवाहच लावण्याची प्रथा जवळजवळ सर्वच जातींमध्ये असलेली दिसते.

या जातीय वर्चस्वामुळे आरक्षण हटविण्यासाठी आंदोलने करण्यात उच्च जाती पुढे राहिल्या असे इतिहास सांगतो. परंतु तेही जमले नाही म्हणून आता याच जाती आरक्षण मागून खुले आरक्षण आणि घटनात्मक आरक्षण असे दोन्ही प्रकारचे आरक्षण घेऊ लागल्या आहेत. आज कोणतेही सरकार असो, १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानुसार, सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करून शूद्र जातींचे आरक्षण नष्ट करण्याचे षडयंत्र रचले जात आहेत. खेडेगावात तर तथाकथित खालच्या जातींवर सतत अन्याय केला जात आहे. त्याचे स्वरूप आता बदलले आहे. परंतु आजही अनेक खेड्यांमध्ये स्मशान भूमी मध्ये या जातींच्या मृत प्रेताला सुद्धा अग्नी देण्यासाठी जागा मिळत नाही आणि मेल्यावर सुद्धा हा जातीभेद संपत नाही. जातीय बहिष्कार टाकण्याचे प्रकार असतील, जमीन लुबाडण्याचे प्रकार असतील, पोलिसात दरोडेखोरीची तक्रार दाखल करण्याचे प्रकार असतील, मंदिरांमध्ये प्रवेश बंदी असेल, उच्च जातीच्या मुलीबरोबर प्रेमविवाह केला म्हणून अमानुष खून करण्याचे आणि इतर प्रकारचे मानहानी कारक प्रसंग या शूद्र जातींना भोगावे लागतात.

मानवी जीवनाला काळिमा फासणारे २९ सप्टेंबर २००६ चे खैरलांजी हत्याकांड सर्वांनाच माहित आहे. ते केवळ खैरलांजी गावातील तथाकथित उच्च जातींनीं घडवून आणलेले हत्याकांड होते. म्हणजेच जातिसंस्थेने भारतीय लोकांच्या रक्तात एक जातीचा जणू रक्तगटच तयार केला आहे आणि तो आजही शरीरात व पर्यायाने मनात सळसळत आहे असे खेदाने येथे नमूद करावेसे वाटते. ही उदाहरणे महाराष्ट्रातील आहेत. परंतु आपण जर भारतीय परिप्रेक्ष्यातून पहिले तर भारताच्या प्रत्येक गावात आणि शहराच्या प्रत्येक वस्तीत आपणास हा जातीभेद कोणत्या ना कोणत्या प्रकारे दिसून येतो. उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये तथाकथित खालच्या जातींनी चांगले कपडे वापरणे, पायात चपला व बूट वापरणे, नवरदेवाची घोड्यावर वरात काढणे, शाळेतील मुलांना वेगळे बसवणे आणि माध्यान्ह भोजन सुद्धा वेगळे वाढणे, मोटार सायकल चालवणे इत्यादी गोष्टींसाठी मानहानी, अपमान, मारहाण, जीवे मारणे असे प्रकार केले जातात. खालच्या या जातींची अजून

दयनीय परिस्थती नमूद करावयाची झाल्यास आपणाला असे दिसून येईल की, भारतातील सफाई कामगारांचे आणि मैला वाहून नेणे आणि मैला साफ करण्याच्या नोकऱ्यांमध्ये केवळ या मागास जातीच आपल्याला दिसून येतात. याचे कारण म्हणजे उच्च जातीय ही कामे स्वतः करीत नाहीत तर याच जातींकडून करून घेतात.

## ८.५ सारांश

वरील प्रकारांचे विवेचन पाहिल्यास आपल्याला असे दिसून येते की, जाती या वर्णव्यवस्थेमधून निर्माण झाल्या आणि वर्णव्यवस्थेचा उगम आपल्याला ऋग्वेदातील १० व्या मंडलातील पुरुषसुक्त मंत्रामध्ये सापडतो. परंतु या जाती नेमक्या कोणत्या काळात निर्माण झाल्या हे कोणत्याही तज्ज्ञाला सांगता आलेले नाही. परंतु काहीही असले तरी आजही जाती या भारतातील समाजाचे अभिन्न अंग आहे. त्यामुळे भारतीय समाजाला परंपरा पालन करण्याच्या अभिमानामुळे आणि सामाजिक भयामुळे जातींचे पालन करावे लागते. किंबहुना, प्रत्येक जात ही  ज्या क्रमांकाने वरची मानली गेली आहे, ती त्या क्रमांकावर खुश असून आपल्या खाली दुसरी कोणती तरी जात आहे यामध्येच ते खुश असल्याचे चित्र दिसून येते.

जातींच्या अस्तित्वामुळे भारतीय समाजामध्ये तथाकथित उच्च जातींचे नेहमीच खालच्या जातींवर आणि एकूणच समाजामध्ये प्रभावाचे, शक्ती सामर्थ्याचे स्थान राहिले आणि या उच्च जाती समाजातील सर्वच स्थरांवर आपले प्रभुत्व टिकवून राहिलेल्या दिसतात. राजकीय, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अशा अनेक आघाड्यांवर या उच्च जाती प्रबळ बनलेल्या आणि तथाकथित खालच्या जातींचा आपल्याला सर्वच क्षेत्रात पाठिंबा मिळविण्यामध्ये यशस्वी झालेल्या आहेत. जर ठिकाणी आव्हान निर्माण झाले तर बहिष्कार आणि बळाचा वापर करून त्यांना गप्प केले जाते.
याशिवाय, खालच्या जातींना कमी लेखून सतत अपमानित केले जाते, त्यांच्यावर अन्याय व अत्याचार केले जातात. त्यांच्याकडून शारीरीक कामे करून घेतली जातात. म्हणजेच जाती आणि त्यांचे अस्तित्व हे काही जातींसाठी सत्तासामर्थ्य तर काही जातींसाठी केवळ मानहानी हेच दिसून येते.

## ८.६ टीपा

परंपरा: समाजामध्ये पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या चालीरीती आणि दैनंदिन सोपस्कार. या परंपरा पालन करण्यामागे काही धर्मशास्त्रे महत्वाची भूमिका पार पाडतात. समाजाला धर्मशास्त्रांचा अव्हेर करणे जमत नाही. त्यामळे या परंपरांकडे बहुसंख्य समाज चिकित्सक दृष्टिकोनातून पाहत नाही आणि या परंपरा वडील, आजोबा, पणजोबा, खापर पणजोबा अशा पिढ्या दर पिढ्या अनुकरण करीत असतो. त्यातील जातींची परंपरा सुद्धा त्याला पालन करावी लागते.

**सत्तासामर्थ्य:** एखाद्या जन्मजात अधिकारांमुळे समाजातील एखाद्या वर्गाला किंवा जातींना सत्तासामर्थ्य प्राप्त होते आणि त्याचा पाया धर्मशास्त्रांत दिसतो. जशा परंपरा समाज अनुसरतो त्याचाच अर्थ विशिष्ट जातींना या धर्मशास्त्रानी दिलेले अधिकार आणि त्यामुळे त्यांचे वर्चस्व समाजात निर्माण होते. त्याची फळे त्यांच्या पिढ्यानपिढ्या प्राप्त होत असतात. त्यातूनच मग शोषक वर्गाची निर्मिती होते आणि सत्तेच्या राज्यावर त्याच वर्गाची मक्तेदारी निर्माण होते. अर्थात, आधुनिक लोकशाही राज्यामध्ये त्या सत्तेला धक्के नक्कीच बसत असले तरीही, शोषित वर्गाची सामाजिक अवस्था काही हवी त्या प्रमाणात बदलेली दिसत नाही.

**मानहानी :** जातींच्या परंपरेमुळे विशिष्ट जाती या शोषक आणि सत्ताधारी होऊन त्या सत्ताबाह्य आणि तथाकथीत खालच्या जातींचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक शोषण करतात आणि त्यांना पदोपदी अपमानित करीत असतात.

**ऋग्वेद:** वैदिक साहित्य परंपरेमधला सर्वात पहिला आणि प्राचीन ग्रंथ.

**मंडल :** ऋग्वेदामधील विषयाच्या प्रकरणांना मंडल असे म्हटले जाते.

**पुरुषसुक्त मंत्र :** ऋग्वेदामध्ये सर्व ऋचा या संस्कृत भाषेत मंत्रांच्या स्वरूपात आहेत आणि वर्णव्यवस्थेच्या उगमाबद्दलचा सिद्धांत या पुरुषसुक्त मंत्रामध्ये सांगण्यात आला आहे.

**चातुर्वर्ण :** ब्राह्मण , क्षत्रिय , वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण ऋग्वेदामधील पुरुषसुक्त मंत्रामध्ये सांगितले आहेत.

**आश्रम:** प्राचीन ऋग्वेदिक परंपरेनुसार वर्णव्यवस्थेतील तीन वर्णाचे लोक गुरूच्या आश्रमात जाऊन शिक्षण घेत असत. व्यक्तीचे जीवन हे चार टप्प्यामध्ये विभागले जात होते. ते चार टप्पे म्हणजे चार आश्रम होत. जीवनाचा पहिला टप्पा म्हणजे ब्रह्मचर्याश्रम , दुसरा टप्पा म्हणजे गृहस्थाश्रम, तिसरा टप्पा म्हणजे सन्यासाश्रम आणि शेवटचा टप्पा म्हणजे वानप्रस्थाश्रम.

**पुरुषार्थ :** याच प्राचीन भारतीय वैदिक परंपरेनुसार जीवनाची चार ध्येये ठरविण्यात आली होती. ती साध्य करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य मानले जात होते. अर्थात त्यातील सर्वच ध्येये सर्वानाच साध्य करता येतील असे नाही. परंतु जास्तीत जास्त ध्येये साध्य करण्याकडे प्रत्येकाने वाटचाल करावी असे अपेक्षित होते.

## ८.७ प्रश्न

१. समाजामध्ये जाती या परंपरेनं कशा रूढ झाल्या?

२. जातींच्या प्राबल्यामुळे सत्तासामर्थ्याची व्यवस्था कशी कार्य करते?

३. जाती व्यवस्था आणि मानहानी याबद्दल निबंध लिहा.

## ८.८ संदर्भ


१. Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol.9, Maharashtra Govt, 1990.

२. Jaiswal Suvira, Caste, Gender and Ideology in the making of India, General Presidential Address, 68th Session of Indian History Congress, Delhi University, 2007.

३. Gupta Dipankar, Continuous Hierarchies and Discrete Castes, Economic and Political Weekly, No.46, 17 November ,1984.

४. Gupta Dipankar, Interrogating Caste Understanding Hierarchy & Difference in Indian Society, Penguin Books India, Haryana, 2000.

५. Thapar Romila, The Past and Prejudice, National Book Trust, New Delhi,1972.

६. Ketkar Shridhar Venkatesh, Castes in India, Low Price Publications, Delhi 2015, Originally published in 1909.

७. Rajshekhar V.T., Caste-A Nation within the Nation, Books for Change, Bangalore, 2004.

८. Rosalind O’Hanlon, Caste, Conflict and Ideology Mahatma Jyotirao Phule and Low Caste Protest in Nineteenth Century Western India, Permanent Black, Fourth Impression, 2016.


*****

# ९

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार रामास्वामी यांची जाती-विरोधी चळवळ

**घटक रचना**


९.० उद्दिष्टये

९.१ प्रस्तावना

९.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जाती-विरोधी चळवळ

९.३ महाडचा चवदार तळे सत्याग्रह, १९२७:

९.४ काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, नाशिक, १९३०

९.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीविरोधी लेखन

९.६ इ .व्ही. रामास्वामी नायकर उर्फ पेरियार रामास्वामी

९.७ अस्पृश्यतेविरोधी चळवळ: वायकोम सत्याग्रह

९.८ गुरुकुलम (चेराणमहादेवी) प्रकरण

९.९ सारांश

९.१० प्रश्न

९.११ संदर्भ


## ९.० उद्दिष्टये

१. जाती-विरोधी लढ्याचे स्वरूप स्पष्ट करणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जाती-विरोधी चळवळ समजून घेणे.

३. पेरियार रामास्वामी यांची जाती-विरोधी चळवळ आकलन करून घेणे.

## ९.१ प्रस्तावना

मागील दोन प्रकरणांमध्ये आपण अनुक्रमे जातीची संकल्पना आणि जात परंपरा म्हणून जातींचे सत्तासामर्थ्य व इतर खालच्या जातींची मानहानी-शोषण हे पाहिले. त्यामधून आपण वर्ण पद्धती आणि त्यातून एका विशिष्ट वर्णातील जातींचे जन्मजात वर्चस्व आणि काही विशिष्ट जातींचे शोषण कशा प्रकारे केले गेले आणि आजही होत आहे याचा आढावा घेतला. परंतु मानव ही एकच जात असूनही त्यामध्ये जातींच्या उतरंडीने भेदभाव निर्माण केले. काही ठराविक जातींनी सामाजिक, आर्थिक, राजकीय सत्तासामर्थ्यामध्ये मक्तेदारी स्थापन करून खालच्या जातींना नेहमीच आणि जन्मजात खालचा दर्जा दिला. परंतु, महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने याच अशा जाती

वर्चस्वाविरुद्ध लढ्याची पायाभरणी केली आणि शोषित जातींमध्ये जागृती करून शोषक वर्ग कोणता आहे हे उदाहरणासह दाखवून दिले व त्यासाठी साहित्याची निर्मिती केली. उदाहरणार्थ, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब इत्यादी. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच ज्योतिबा फुले यांना आपले गुरु मानून त्यांची जाती निर्मूलनाची चळवळ चालवली. परंतु त्यांच्या चळवळीचे स्वरूप काहीसे वेगळे होते. याशिवाय, तामिळनाडू सारख्या दक्षिण भारतातल्या राज्यामध्ये पेरियार इरोड रामास्वामी यांनी सुद्धा शोषक वर्गाची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी आणि शोषित वर्गाला त्यांचे शोषण करणारे कोण आहेत याची जाणीव करण्यासाठी आंदोलन केल्याचे आढळते. या दोन महत्वाच्या महामानवांच्या जाती-विरोधी चळवळींचा आपण या प्रकरणामध्ये आढावा घेणार आहोत.

## ९.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जाती-विरोधी चळवळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म मध्यप्रदेशातील महू (MHOW-Military Headquarter of War) या ठिकाणी १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी सकपाळ आणि आईचे नाव भीमाबाई होते. रामजीबाबा ब्रिटिश लष्करी शाळेत मुख्याध्यापक आणि सुभेदार पदापर्यंत पोहोचले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव भिवा उर्फ भीमराव असे ठेवण्यात आले होते. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले आणि पुढील उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठामध्ये दाखल झाले. त्यांनी एम. ए., पी . एच. डी ., डी . एस. सी ., बॅरिस्टर अशा अनेक पदव्या मिळवल्या. ज्या वेळी परदेशी शिक्षण घेणे हे एक प्रत्येक भारतीयांचे स्वप्न होते, किंबहुना, आजही अनेकांचे ते आहेच, त्यावेळी भीमराव परदेशी शिक्षण घेण्यासाठी गेले. विशेष म्हणजे ते शिक्षण त्यांनी लीलया पूर्ण केले.

त्यांचा जन्म ज्या जातीमध्ये झाला ती जात वर्णबाह्य असल्यामुळे अतिशूद्र म्हणून गणली जाई . त्याचा परिणाम असा झाला की, बालपणात आणि बॅरिस्टर झाल्यावर सुद्धा त्यांना या जातीभेदाचे चटके सोसावे लागले. त्यामुळे जाती संस्थेचे रक्त कशा प्रकारे भारतीय समाजामध्ये भिनले आहे याचा त्यांना कटू अनुभव आला आणि त्याविरुद्ध त्यांनी आपली चळवळ उभी केली आणि अशा लाखो लोकांना आणि सन्मानाचे जीवन जगता यावे म्हणून प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी या जाती विरोधी चळवळीचे जे कार्य केले ते जगातल्या प्रत्येक मानवी हक्क मागणाऱ्या वर्गासाठी प्रेरणादायी आहे हे या ठिकाणी नमूद करणे महत्वाचे आहे.

**बहिष्कृत हितकारिणी सभा:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. अस्पृश्यांची सरकार दरबारी कैफियत मांडणे हा तिच्या स्थापनेचा उद्देश होता. या सभेचे ब्रीदवाक्य 'Educate, Agitate and Organize ' असे होते. त्याचे भाषांतर बाबासाहेबांचे चरित्र लेखक चांगदेव भवानराव खैरमोडे यांनी 'शिका, चेतवा आणि

संघर्ष करा' असे केले आहे. परंतु आजकाल काळाच्या ओघात त्याचे रूपांतर 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असे करण्यात आले आहे असे दिसते.

सर चिमणलाल सेटलवाड तिचे अध्यक्ष तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभेच्या व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष होते. त्या सभेच्या कार्यकारी मंडळामध्ये चार सॉलिसिटर होते हे विशेष. सभेच्या स्थापनेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

१) सर्व बहिष्कृत आणि अस्पृश्य वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे आणि त्यासाठी वसतिगृहे उघडून त्यांना निवासी शिक्षणाची सोय करणे.

२) बहिष्कृत वर्गामध्ये सांस्कृतिक प्रसार करणे.

३) औद्योगिक आणि कृषी शाळा सुरु करून बहिष्कृत वर्गाची आर्थिक परिस्थिती सुधारणांसाठी प्रयत्न करणे.

४) बहिष्कृत वर्गाच्या समस्या मांडणे.

अशा प्रकारे जाती संस्थेमुळे ज्या वर्गाला हाल अपेष्टांना सामोरे जावे लागत होते, त्यांच्यासाठी प्रयत्न करण्याच्या उद्देशाने त्यांनी ही सभा स्थापन केली होती.

सभेने सोलापूर येथे बहिष्कृत वर्गाच्या मुलांसाठी ४ जानेवारी १९२५ रोजी वसतिगृह सुरु केले आणि त्याची जबाबदारी सोलापूर येथी सामाजिक कार्यकर्ते जिवाप्पा सुभा आयदाळे याना सोपविली.

**आपली प्रगती तपासा :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय द्या.

२. बहिष्कृत हितकारिणी सभेची थोडक्यात माहिती लिहा.

## ९.३ महाडचा चवदार तळे सत्याग्रह, १९२७

बाबासाहेब आंबेडकरांना स्वतःला पाणी प्राशन करण्यावरून भेदभावाला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे सामान्य अस्पृश्य समाजाची काय अवस्था असेल याची त्यांना गंभीर जाणीव होती. म्हणून त्यांनी पाण्यासाठी लढा उभारण्याचे ठरविले. जे पाणी पशु-पक्षी सुद्धा पितात त्याच तळ्याचे पाणी मात्र अस्पृश्य जनतेला पिण्यास मिळू नये आणि तो हक्क आपलाही आहे याची जाणीव जागृती स्पृश्य आणि अस्पृश्य दोघांमध्ये निर्माण व्हावी हा उद्देश या लढ्यामागे होता. अन्यथा, पाण्यावाचून लोक मरत होते असे काही नव्हते. त्यासाठी ठिकाण रायगड जिल्यातील महाड नगरपरिषदेच्या हद्दीतील चवदार तळे याची निवड करण्यात आली.

साधारणपणे ऑगस्ट १९२३ मध्ये मुंबई कायदे मंडळाने असा ठराव पारित केला की , जे सार्वजनिक तलाव, विहिरी, पाणवठे यांची देखभाल दुरुस्ती सरकारी खर्चातून सरकारी संस्था करतात त्या ठिकाणी अस्पृश्य जनतेला पाणी वापरण्यास संपूर्ण मुभा देण्यात येईल.

जानेवारी १९२४ मध्ये महाड नगरपरिषदेला त्या ठरावाची अंमलबजावणी करण्याचे मुंबई कायदेमंडळाने निर्देश दिले. परंतु महाड परिसरातील सवर्ण हिंदूंच्या विरोधामुळे महाड नगरपरिषद त्याची अंमलबजावणी करू शकली नाही. हे सर्व सुरु असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ साली या अन्यायाविरुद्ध आणि नैसर्गिकरित्या उपलब्ध असणारे आणि कायद्याने आदेशित केलेले सार्वजनिक पाणवठ्यांचे पाणी पिण्याचे आणि वापरण्याचे हक्क बजावण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहासाठी निवडले गेले आणि त्यामागे तेथील काही समविचारी सवर्णांचा सुद्धा या सत्याग्रहाला पाठिंबा मिळाला होता. त्यामध्ये ए. व्ही. चित्रे, जी. एन. सहस्त्रबुद्धे आणि सुरेंद्रनाथ उर्फ सुरबानाना टिपणीस यांचा समावेश होता. सुरेंद्रनाथ टिपणीस हे तर महाड नगरपरिषदेचे अध्यक्ष होते. त्यानुसार, २० मार्च १९२७ रोजी सवर्ण समाजाचा विरोध पत्करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्यात उतरून त्याचे पाणी ओंजळीने भरले आणि पिले. त्याबरोबरच तेथे संपूर्ण महाराष्ट्रातून जमलेल्या अस्पृश्य बांधवानी सुद्धा ते जल प्रश्न केले आणि आपल्याला सुद्धा माणूस म्हणून हक्क आहेत याची सवर्ण समाजाला जाणीव करून देऊन हक्काची अंमलबजावणी केली. परंतु या सत्याग्रहाला हिंसेचे गालबोट सुद्धा लागले होते हे विसरता काम नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसकट अनेकांना आपली माथी सवर्ण हिंदूंच्या लाठी हल्ल्यासह फोडून घ्यावी लागली होती.

## ९.४ काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, नाशिक, १९३०

जाती संस्थेच्या प्राबल्यामुळे भारतीय समाजात स्पृश्य आणि अस्पृश्य असे विभाजन करण्यात आले होते. ठराविक जातींना अस्पृश्य मानले जात होते. त्यामुळे ते धार्मिक चौकटीनुसार हिंदू असले तरी त्यांना हिंदूंच्या मंदिरांमध्ये प्रवेश मिळत नव्हता. तसा प्रयत्न जरी त्यांनी केला तरी त्यांना कठोर शासन केले जात असे. याच्या विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर प्रवेश सत्याग्रह चळवळ सुरु करण्याचे ठरविले. त्यासाठी नाशिक येथील रामाचे मंदिर जे काळ्या रामाचे मंदिर म्हणून प्रसिद्ध होते तेथे मंदिर प्रवेश सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्या अगोदर बाबासाहेबानी आपले वर्तमानपत्र 'बहिष्कृत भारत' मध्ये झणझणीत अग्रलेख लिहिला. त्यानंतर २ मार्च १९३० रोजी सत्याग्रहाला सुरुवात झाली. योजना अशी होती की, सकाळी मंदिराचे दरवाजे उघडले की, आतमध्ये प्रवेश करायचा. परंतु जातीवादी मंदिर उघडीत नव्हते. संध्याकाळपर्यंत जवळ १५००० पेक्षाही सत्याग्रही नाशिक परिसरात जमा झाले. पुन्हा दुसऱ्या दिवशी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली शहरभर मिरवणूक निघाली आणि जंगी सभा झाली. ३ तारखेला मंदिराच्या चार दरवाजांकडे १५० जणांच्या प्रत्येकी चार तुकड्या तैनात करण्यात आल्या आणि दरवाजे उघडल्याबरोबर मंदिरामध्ये प्रवेश करायचा असे निश्चित झाले. परंतु सनातनी मंदिर उघडू इच्छित नव्हते. म्हणजे रामाला कोंडून राहावे लागले तरी चालेल पण त्याचे दर्शन अस्पृश्य लोकांना घेऊ द्यायचे नाही असा निर्धार करण्यात आला होता. शेवटी रामाचे मंदिर उघडले गेलेच नाही. पुढे ९ एप्रिल १९३० रोजी रामनवमी होती आणि त्या दिवशी रामाची मिरवणूक निघणार होती. या संधीचा फायदा घेण्याचे बाबासाहेब व सत्याग्रहींनी ठरविले. सत्याग्रही काही जागचे हलायला तयार नव्हते म्हणून एक तडजोड सुचवण्यात आली. मंदिराच्या पूर्वेकडून रथ हा सवर्ण हिंदूंनी आणावयाचा आणि तेथून पुढे तो सत्याग्रही व सवर्ण यांनी दोघांनी

मिळून ओढत नेऊन मिरवणूक काढायची असे ठरले. परंतु सत्याग्रहींची फसवणूक करण्यात येऊन ठरलेल्या वेळेच्या आधीच रथ बाहेर काढण्यात आला व तो घाईघाईने सवर्ण हिंदू ओढत नेऊ लागले. तशी चाहूल लागताच सत्याग्रही पुढे सरसावले आणि त्यांनीसुद्धा रथाला हात घातला व तो ओढण्यास सुरुवात केली. परंतु याचा परिणाम असा झाला कि, दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. सवर्ण हिंदूंनी सत्याग्रहींवर हल्ला करण्यास सुरुवात केली. अनेक जण रक्तबंबाळ झाले. त्यातच एक सत्याग्रही भास्कर कद्रे मंदिरच्या आता घुसले आणि आतील सवर्णांच्या हल्ल्यात रक्तबंबाळ होऊन बेशुद्ध पडले. बाबासाहेबांवर सुद्धा दगड फेकल्यामुळे ते ही जखमी झाले होते.

पुढे हा लढा इ.स. १९३५ पर्यंत चालू होता परंतु सवर्ण हिंदूंना पाझर फुटला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ही गोष्ट माहित होती की, मंदिरात जाऊन काही आपल्या लोकांचे भले होणार नाही. कारण ज्या देवाला ते आपले मानतात त्याला सुद्धा त्यांची दया येत नाही. परंतु मानव म्हणून आपले हक्क आपल्याला प्राप्त झाले पाहिजेत आणि प्रत्येक माणसाने आपल्या मनुष्य बांधवाला मानवाप्रमाणे वागणूक दिली पाहिजे अशी त्यांची धारणा होती. पुढे जाऊन हा लढा त्यांनी सोडून दिला असे आपल्याला दिसते.

**आपली प्रगती तपासा :**

१. चवदार तळे सत्याग्रहाची पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करा.

२. काळाराम मंदिर सत्याग्रह कशासाठी करण्यात आला होता? आढावा घ्या.

## ९.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीविरोधी लेखन

### ९.५.१ 'भारतातील जाती....':

जातीचे चटके बाबासाहेबाना बसले होते आणि म्हणून त्यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठामध्ये शिकत असताना तेथील गोल्डन वाइजर मेमोरियल अँथ्रोपोलॉजिकल सेमिनारमध्ये आपला संशोधन निबंध 'Castes In India Their Mechanism, Genesis and Development " या नावाने सादर केला. त्यामध्ये त्यांनी भारतातील जातींचा अभ्यास ज्या तज्ज्ञांनी केला, त्यांच्या विश्लेषणाचा आढावा घेतला आहे. मात्र त्यामध्ये त्यांनी सटीक मूल्यमापन करून आपले स्वतःचे निष्कर्ष मांडले आहेत. ते म्हणतात. जाती संस्था अस्तित्वात येण्याचे मुख्य कारण म्हणजे उच्च वर्णातील जातींना त्यांच्या जातींमध्ये खालच्या वर्णातील जातींची होणारी सरमिसळ आणि त्यामुळे त्यांच्या शुद्ध वंशाच्या रक्तामध्ये अशुद्ध वंशातील रक्त येऊन त्यांच्याही जातींमध्ये खालच्या दर्जाची बीजे रोवली जातील ही त्यांना भीती वाटत होती. म्हणून त्यांनी 'गटांतर्गत विवाह पद्धतीची' सुरुवात केली. त्यामधून त्यांनी Endogamy या तत्वाचा अवलंब करून आपल्या वंशाची शुद्धता राखण्याचे प्रयत्न केलेले डॉ. बाबासाहेब मांडतात. म्हणूनच आजही जातिसंस्थेची बंधने आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जाती विरोधी लढा हा त्यांच्या 'भारतातील जाती....' .या प्रबंधापासूनच सुरु झाल्याचे आपणास दिसते. परंतु त्यानंतर प्रत्यक्षात त्यांनी काही सभा-

संघटना स्थापन करून आणि वृत्तपत्रे सुरु करून त्यांच्या माध्यमातून जातीच्या वरवंट्याखाली दाबल्या जाणाऱ्या लोकांना त्यांचे जाती आधारित अस्पृश्यत्व दूर करण्यासाठी प्रयत्न सुरु केले.

**जातींचे निर्मूलन:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती विरोधी लढ्यामध्ये सत्याग्रह करूनच थांबले नाहीत तर त्यांनी अनेक ग्रंथ लिहून जाती संस्थेची सुरुवात आणि तिचे दृढीकरण कोणी केले असेल आणि त्यामागे कोणत्या वर्गाचे षडयंत्र असेल हे वेळोवेळी सिद्ध केले. त्यातील सर्वात महत्वाचे लेखन म्हणजे त्यांनी लाहोर येथील जात पात तोडक मंडळाच्या मेळाव्यासाठी लिहिलेले भाषण म्हणजे 'जातींचे निर्मूलन' (Annihilation of Caste) होय. १२ डिसेंबर १९३५ रोजी लाहोरच्या मंडळाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भाषणाचे निमंत्रण १२ डिसेंबर १९३५ रोजी पात्र पाठवून दिले होते. त्यानुसार हे भाषण बाबासाहेबानी तयार करून ते लाहोरच्या जात पात तोडक मंडळाकडे पाठविले. परंतु त्या मंडळाला त्यातील मजकूर आक्षेपार्ह वाटला. किंबहुना, तो ब्राह्मण वर्गाच्या विरुद्ध वाटल्यामुळे त्यांनी यातील बराचसा आक्षेपार्ह मजकूर गाळावयास बाबासाहेबाना सांगितले. परंतु, बाबासाहेबानी जे उत्तर त्यांना दिले ते असे, "काही मजकूर वगळण्याचे तर सोडाच, मी माझ्या भाषणातील स्वल्पविराम सुद्धा बदलणार नाही. "खरे म्हणजे एवढे परखड मत फार क्वचितच एखादा नेता किंवा वक्ता व्यक्त करतो. पुढे या मंडळाने त्यांची परिषद भरविण्याचा कार्यक्रम रद्द केला. मग पुढे जाऊन १५ मे १९३६ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या खर्चाने या भाषणाच्या १५०० प्रति छापल्या आणि त्या संपूर्ण भारतात जनतेला व महत्वाच्या व्यक्तींना वितरितही केल्या.

अशा या लेखनामध्ये बासाहेबानी हिंदू धर्म, सनातनी पुरोहित वर्ग, धार्मिक शास्त्रे आणि पुरुषी वर्चस्व यावर अत्यंत कठोर टीका केली होती. त्यामध्ये सनातनवादी धर्म मार्तंडांचे पितळ त्यांनी उघडे केले होते. त्याबद्दल संस्कृत धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास त्यांनी केला होता. त्या अभ्यासात वेद आणि स्मृती वाङ्मय यांचा प्रामुख्याने समावेश होता आणि त्यातीलच पुरावे सादर करून त्यांनी एक बुद्धिप्रामाण्यवादी विचार मांडला होता. त्यातील त्यांची मांडणी अशी होती की, जातींच्या निर्मूलनासाठी केवळ आंतरजातीय रोटी आणि बेटी व्यवहार पुरेसा नाही तर हिंदू धर्म ज्या धर्मशास्त्राच्या पायावर उभा आहे, तो पायाच सुधारला पाहिजे किंवा वेळ आल्यास तो नष्ट करून नवीन पायाभरणी केली पाहिजे. नक्कीच, बाबासाहेबानी आंतरजातीय विवाह हा सुद्धा महत्वाचा उपाय सुचवला होता ज्यामुळे रक्ताची नाती निर्माण होऊन वेगळेपणाची भावना नष्ट होण्यास मदत होणार होती.

बाबासाहेबांनी त्यांची मांडणी करताना असे म्हटले की, हिंदू लोक जाती का पाळतात? ते अमानवी आहेत किंवा ते बिनडोक आहेत? तर याचे उत्तर नाही असेच येते. मग त्याचे खरे कारण ते सांगतात. हिंदू जातींचे कठोर पालन का करतात तर ते स्वतः धार्मिक वृत्तीचे आहेत. त्यामुळे जाती पाळणे म्हणजे ते स्वतः वाईट ठरत नाहीत तर ते ज्या धर्मामुळे तसे करतात तो त्यांचा धर्म त्यांना हे चुकीचे करण्यास भाग पडतो. कारण जातींचा पगडा त्यांच्या मनामध्ये हा धर्मानेच बिंबवला आहे. पुढे जाऊन ते म्हणतात की, धर्म कुठे आहे ? तर हा धर्म शास्त्रामंध्ये आहे. त्यामुळे एखाद्या प्रसंगी आंतरजातीय रोटी व्यवहार आणि

आंतर-जातीय विवाह करून जातींचे निर्मूलन होणार नाही. तर ज्या शास्त्रांनी धर्माच्या माध्यमातून लोकांवर हे संस्कार केले आहेत आणि ज्या शास्त्राना पवित्र मानले गेले आहे, त्याच शास्त्रांवर पुन्हा एकदा विचार करून तीच नष्ट केली पाहिजेत.

त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबडकर यांची ही जाती विरोधी चळवळ आपल्याला वेगवेगळ्या माध्यमातून अभ्यासता येते. इतरही अनेक उदाहरणे बाबासाहेबांच्या चळवळीतील देता येऊ शकता. परंतु या ठिकाणी आपण थोडक्यात आढावा घेतला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. भारतातील जाती या शोधनिबंधा विषयी थोडक्यात लिहा.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'जातींचे विध्वंसन' या ग्रंथातील विषयावर थोडक्यात भाष्य करा.

## ९.६ इ .व्ही. रामास्वामी नायकर उर्फ पेरियार रामास्वामी

आधुनिक भारताच्या सामाजिक सुधारणांच्या इतिहासामध्ये महात्मा ज्योतिबा फुले याना अग्रणी मानले जाते. त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने पुढे त्यांचे कार्य बऱ्यापैकी चालविले. त्यानांतर विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, भाऊराव पाटील यांनी सुद्धा मोलाची भर घातली. छत्रपती शाहू महाराज यांनी तर सत्यशोधक समाजाला जणू राजाश्रय दिला होता. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्या बडोदा संस्थानामध्ये अनेक समाज सुधारणांना पायवाट करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर महात्मा फुलेंना आपले वैचारिक गुरु मानून पुढे जाती अंताचा लढा सुरु करून जाती विध्वंसनाची चौकट तयार केली आणि हजारो वर्षे जातीच्या गर्तेमध्ये पिचलेल्या समाजाला त्यांचे मानवी हक्क मिळवून देण्यासाठी आपली हयात खर्ची केली. हे सर्व समाजसुधारक महाराष्ट्रामध्ये होऊन गेले खरे. परंतु दक्षिण भारतामध्ये पेरियार रामास्वामी नायकर यांनी जातीविरोधी आणि ब्राह्मणी वर्चस्व विरोधी खूप मोठे आंदोलन चालवले आणि आयुष्यभर ते आपल्या तत्वांशी निष्ठावान राहिले. त्यामुळे त्यांची ही चळवळ समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

रामास्वामी यांनी गरिबीचा संबंध वंश आणि वंशाचा संबंध जातीबरोबर लावून द्रविडीयन चळवळीची सुरुवात केली. या चळवळीची मूळ संकल्पना ही आर्य प्रभुत्व म्हणजेच ब्राम्हण प्रभुत्व आणि ब्राह्मणवाद याच्याशी संघर्ष करणे ही होती. महाराष्ट्रातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजातील मुळ तत्वे ही रामस्वामी नायकर यांच्या ब्राम्हण विरोधी चळवळीचा पाया होती.

इ. स. १९१९ साली नायकर पेरियार सर्व धार्मिक दौरे करून आपल्या निवासी शहरी इरोड मध्ये परतले आणि ब्राह्मण विरोधी चळवळ सुरू करण्याचा त्यांनी चंग बांधला. चेरण महादेवी आश्रमामध्ये हरिजन मुलांना भेदभावाची वागणूक दिली जात होती. याविरुद्ध

पेरियार यांनी गांधीजींकडे नाराजी व्यक्त केली होती परंतु गांधीजींनी त्यावर कोणतीही कृती केलेली नव्हती.

१९२५ साली पेरियार यांनी काँग्रेस सोडली आणि 'स्वाभिमान' चळवळ सुरू केली व ती चळवळ म्हणजे ब्राम्हण विरोधी चळवळ होती. त्यातूनच पुढे हिंदू धर्मातील जाती विरोधी लढा त्यांनी सुरू केल्याचे आपल्याला दिसून येते.

नायकर यांनी 'कुदियारासू' (Republic), 'पागुत्तरिकु' (Commonsense or Discernment), विदुथळाई (Liberation) अशी नियतकालिके सुरू केली आणि हिंदू धर्मातील जाती संस्थेवर त्यांच्या माध्यमातून सतत आघात केले.

पेरियार यांचा जन्म १७ सप्टेंबर १८७९ रोजी तामिळनाडू मधील इरोड येथे एका धनाढ्य कुटुंबात झाला. त्यांचे वडील व्यंकट नायकर हे एक उद्योगपती होते. त्यांचे कुटुंब अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते आणि सर्व प्रकारची धार्मिक कारकांड आणि विधी पालन करण्यात अग्रेसर होते. त्यामुळेच समाजामध्ये त्यांच्या कुटुंबाला अत्यंत आदराचे स्थान होते. याचा परिणाम असाही झाला की, त्यांच्या घरी पुरोहित आणि ब्राह्मण पंडितांचे नेहमी येणे जाणे होत असे. शाळेमध्ये रामास्वामी अत्यंत खोडकर म्हणून प्रसिद्ध होते. त्यामुळे त्यांना नेहमी आपल्या शिक्षकांचा मार बसत असे. ते स्वतः एके ठिकाणी म्हणतात, "शाळेमध्ये माझा सर्व वेळ वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा भोगण्यातच अधिक जात असे. "केवळ दोन वर्षानंतर त्यांना शाळेतून काढण्यात आले आणि आपला पारंपरिक व्यवसाय करण्यामध्ये गुंतवले गेले. त्यातच फावल्या वेळामध्ये ते धार्मिक ग्रंथ आणि पुराणे वाचत असत. परंतु त्या धार्मिक ग्रंथांमधील अद्भुतपणा आणि फोलपणा त्यांच्या लक्षात आला आणि ते थोतांड ते सर्व लोकांना सुद्धा सांगू लागले. नव्हे, त्यातील अंधश्रद्धा आणि आंधळी शिकवण कशी चुकीची आहे हे ते लोकांनां सांगू लागले. त्यामुळे ते संपूर्ण बुद्धिप्रामाण्यवादी बनले. त्यांचे स्वतःचे कुटुंब अत्यंत धार्मिक असल्यामुळे त्यांच्यासारख्या व्यक्तीचा अशा कुटुंबामध्ये फार काळ निभाव लागणे कठीण होते. त्यांनी उपवासाच्या दिवशीच मांसाहार प्राशन करण्यास सुरुवात केली आणि आपल्या पत्नीला व घरातील सदस्यांना मंदिरात जाण्यास मनाई करण्यासही सुरुवात केली. एकदा तर त्यांनी आपल्या पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र काढण्याचा प्रयत्न केला आणि मंगळसूत्र हे पत्नीवर लादलेले एक बंधन आहे जे तिला गुलाम बनवते. म्हणजेच त्यांचे विचार स्त्रीवादी आणि स्त्रीमुक्तीवादी होते हे दिसून येते. परंतु घरच्या मंडळींना एवढा मोठा विद्रोह करणे शक्य नसल्याने रामास्वामी याना घर सोडावे लागले.

पेरियार यांनी एखाद्या भिकारी वेषामध्ये अनवाणी पायानी कलकत्त्यासह उत्तर भारतातील बनारस आणि इतर शहरे पादाक्रांत केली आणि धर्मशास्त्राचे असे काही वेगळे ज्ञान मिळविण्याचे प्रयत्न केले. त्यांनी एखाद्या सन्याशाप्रमाणे शारीरिक यातना आणि तपश्चर्या सुद्धा करण्यास सुरुवात केली. कित्येक दिवस उपवास केले आणि झोप व विश्रांती घेतली नाही. पावसाळा, कडक उन्हाळा, वादळ वारा यांची पर्वा न करता भटकत राहिले. परंतु त्यांना ज्ञान प्राप्ती होण्याऐवजी तब्येत कमालीची खालावली. सामाजिक परिवर्तन

करण्यासाठी हा संन्यासी मार्ग व्यर्थ असल्याचे त्यांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. त्यामुळे पुन्हा त्यांनी कौटुंबिक जीवनात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

आता मात्र त्यांचे पूर्ण मानसिक परिवर्तन झाले आणि सामाजिक समस्यांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन संपूर्णपणे बदलला. संन्यासी जीवनामध्ये असताना त्यांना काही सामाजिक प्रश्नांबद्दल एक जाणीव निर्माण झाली होती. त्यामुळे आता मात्र सामाजिक सुधारणा करण्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरविले. त्यांनी पुन्हा आपला कौटुंबिक व्यवसाय सुरु करून त्यात यश मिळवले व नाव कमावले. त्यांच्या नि:स्वार्थी सामाजिक सेवेमुळे ते अत्यंत लोकप्रिय झाले. त्याच वेळी प्लेग या रोगाची साथ सुरु असताना त्यांनी अनेक बाधितांना इस्पितळात दाखल करून त्यांच्यावर मोफत उपचार केले. त्यासाठी अनेक जणांची त्यांनी मदत घेतली. त्यामुळे लोकांमध्ये त्यांच्याबद्दल एक आदराची भावना निर्माण होऊन ते सामाजिक कार्यकर्ते आणि सामाज सुधारक म्हणनून नवा रूपाला आले. परंतु , एखाद्या वाईट सामाजिक प्रथेवर हल्ला बोल करण्याची संधी ते शोधात होते.

प्रसिद्ध काँग्रेस नेते चक्रवर्ती राजगोपालाचारी हे तामिळनाडूमधील सेलम महानगरपालिकेचे नगराध्यक्ष होते. त्यांनी पेरियार रामास्वामी यांच्याबद्दल खूप काही ऐकले होते म्हणून त्यांनी पेरियार याना काँग्रेस पक्षामध्ये आणले. परंतु काँग्रेसमध्ये येण्याअगोदर पेरियार यांनी जवळ जवळ २९ प्रकारच्या वेगवेगळया पदांवर कामे केली होती आणि त्यामागे त्यांचे कामासाठी झोकून देणे ते महत्वाचे तत्व होते. दक्षिण भारतामध्ये पेरियार यांनी चांगल्याप्रकारे काँग्रेसला नेतृत्व दिले आणि तिला मोठ्या प्रमाणात लोकप्रिय बनविले. ते स्वतः अस्पृश्यता विरोधी चळवळीमध्ये सहभागी झाले. लोकांनी मद्यपान करू नये म्हणून त्यांनी आपल्या शेतामधून ताडीची ५०० झाडे तोडून टाकली. त्यांनी तामिळनाडूमध्ये अस्पृश्यता विरोधी सत्याग्रह सुद्धा सुरु केले.

**आपली प्रगती तपासा :**

१. इ. व्ही. रामास्वामी नायकर यांचा पूर्व परीचय द्या.

२. पेरियार यांनी आपल्या विचारांच्या प्रचारासाठी कोणती नियतकालिके सुरु केली?

## ९.७ अस्पृश्यतेविरोधी चळवळ: वायकोम सत्याग्रह

केरळमध्ये, जनता त्यांच्या राजाचा वाढदिवस अत्यंत थाटामाटात आणि दिमाखात साजरा करत असतात. इ.स. १९२४ मध्ये हा वाढदिवसाचा उत्सव चालू असताना राजाची मिरवणूक मुख्य रस्त्यावरील एका मंदिराजवळून जाणार होती. केरळमध्ये 'इझावा' जातीच्या लोकांना अस्पृश्य मानले जात होते. आयोजकांनी तेथील 'इझावा' जातीच्या लोकांना त्या मंदिराच्या जवळील रस्त्यावरून चालण्यास मनाई केली होती. परंतु याविरूद्ध जाऊन इझवा लोकांनी रास्ता चालण्यासाठी खुला करण्याच्या बाजूने आंदोलन सुरु केले आणि अशी बंधने दूर करण्याची मागणी केली. परंतु जातीवादी लोकांना तेथील सरकारचीच बाजू असल्यामुळे सरकारने त्यांचे हे आंदोलन दडपून टाकण्याचे प्रयत्न केले. या आंदोलनाचे नेतृत्व वकील जॉर्ज जोसेफ यांनी केले होते. परंतु काही कार्यकर्त्यांसोबत

त्यांना सरकारने अटक केली. महात्मा गांधी यांनी जोसेफ यांना एक पत्र लिहिले आणि सल्ला दिला, "वायकोमच्या आंदोलनाबाबत तुम्ही हे कार्य हिंदूंवर सोपवले पाहिजे आणि त्यांना जे काही करायचे आहे ते करू द्यावे. ते स्वतः हिंदू असल्यामुळे पवित्र होणे हे त्यांचे स्वतःचे काम आहे. तुम्ही त्यांच्याप्रती सहानुभूती व्यक्त करून आणि काही लेखन करून पाठिंबा देऊ शकता. परंतु एखादे आंदोलन करणे किंवा सत्याग्रह करणे हे तुमचे कामच नव्हे.

त्यानंतर जॉर्ज जोसेफ यांनी तुरुंगामधूनच पेरियार यांना पत्र लिहिले आणि या सत्याग्रहाचे नेतृत्व करण्यास सांगितले. त्यामुळे पेरियार यांनी ताबडतोब हा सल्ला स्वीकारून वायकोम येथे निघाले. तेथील महाराजांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या सरबराईसाठी पोलीस आयुक्त श्री. पिट यांची नेमणूक सुद्धा केली. त्यांच्या राहण्यासाठी विशेष बंगल्याचीसुद्धा व्यवस्था करण्यात आली. हे एवढे भव्य स्वागत आणि सरबराई कशासाठी? तर पेरियार हे तामिळनाडू काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते. जेव्हा कधी त्रावणकोरचे  महाराज हे इरोड (तामिळनाडू) येथे जात असत तेव्हा ते पेरियार यांच्याच बंगल्यावर मुक्काम करीत असत. परंतु हे सर्व  स्वागत अनावधानाने केले जात होते. परंतु जेव्हा महाराजांना हे माहित झाले कि, पेरियार अस्पृश्यता-विरोधी आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी आले आहेत, त्यांचे सर्व प्रशासन चिंतेमध्ये पडले.

वायकोम मंदिराला खूप मोठे कुंपण होते आणि टप्प्याटप्प्यावर व जागोजागी सरकारी अधिकारी आणि न्यायालये यांची कार्यालये सुद्धा होती. मंदिराकडे प्रवेश करण्याच्या मार्गाच्या दोन्ही बाजूला ब्राह्मण जातीची वस्ती होती. त्यामुळेच त्या रस्त्यावरून अस्पृश्य इझावा जातीच्या लोकांना जाण्यास बंदी करण्यात अली होती. याशिवाय तेथील सरकारी कार्यालये आणि न्यायालयीन कार्यालये यांच्यामध्ये बहुसंख्य कर्मचारी व अधिकारी हे ब्राह्मण जातीमधील होते. एकदा तर असा प्रसंग घडला कि, इझवा जातीतील वकील बॅरिस्टर माधवन यांना न्यायालयीन खटल्यामध्ये उपस्थित राहायचे असल्यामुळे त्यांनी न्यायालयात जाण्यासाठी त्या रस्त्याने प्रवेश करण्यास सुरूवात करताच त्यांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आणि त्यांना त्यांच्या खटल्याच्या कामी उपस्थित राहून वादविवाद करण्यापासून वंचित राहावे लागले.

यावरून आपल्याला असे दिसून येते की, बॅरिस्टर असलेल्या व्यक्तीला सुद्धा उच्चभ्रू लोकांच्या वस्तीतून जाणाऱ्या रस्त्याचा वापर करण्यास मनाई करणे म्हणजे किती हास्यास्पद होते? किंबहुना, आजही आपल्याला असे दिसेल की, भारतातल्या अनेक ठिकाणी तथाकथित शूद्र जातींची सामाजिक परिस्थिती आणि त्यांची बंधने अशीच आहेत. याच खालच्या जातींनी चप्पल घालून तथाकथित उच्चभ्रू जातींच्या वस्तीतून न जाणे, पिळदार  मिशी न ठेवणे, घोड्यावर बसून लग्नाची वरात न काढणे, नव वधूवरांनी गावदेवाच्या मंदिरामध्ये दर्शन न घेणे, अशी बंधने आढळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सुद्धा बॅरिस्टर असताना अशाच जातीय भेदभावास सामोरे जावे लागले होते.

पेरियार यांनी लोकांनां आपल्या आंदोलनाची दिशा समजावून सांगितली आणि त्यांच्या नेतृत्वामुळे तर लोकांमध्ये एक प्रकारची ऊर्जा व उत्साह निर्माण झाला होता. असे असले

तरी सरकार यामध्ये हस्तक्षेप करीत होते आणि पोलिसांनी पेरियार यांना अटक करून एक महिन्याचा तुरुंगवास ठोठावला. त्यांच्या अटकेनंतर त्यांची पत्नी आणि बहीण सुद्धा वायकोम येथे आले आणि ते सुद्धा सत्याग्रहामध्ये सहभागी झाले. त्यामुळे सत्याग्रहींच्या अंगामध्ये पुनश्च उत्साह संचारला. एक महिन्यानंतर पेरियार यांची तुरुंगातून सुटका झाली आणि त्यांनी पुन्हा या सत्याग्रहाचे नेतृत्व केले. आता मात्र या सत्याग्रहाला खूप मोठा प्रतिसाद मिळू लागला आणि त्याला नियंत्रणात करणे सरकारच्या क्षमतेपलीकडे जाऊ लागले. पेरियार दररोज सत्याग्रहींसमोर भाषणे देऊ लागले आणि त्यामुळे सत्याग्रहींचा उत्साह दिवसेंदिवस द्विगुणित होऊ लागला होता. आता मात्र सत्याग्रहींना त्यांच्या हक्काच्या अमलबजावणीबद्दल पूर्ण खात्री होऊन आत्मविश्वास वाढू लागला. श्री. टी . के. रवींद्रन म्हणतात, "पेरियार यांच्या स्फूर्तिदायक भाषणांनी वायकोम आणि त्याच्या परिसरातील गावांमध्ये व त्रावणकोर परिसरामध्ये लोकांच्या मनामध्ये एक प्रकारची जागृती होऊन आपणही या सत्याग्रहामध्ये सामील होऊन आपले हक्क प्राप्त केले पाहिजेत असे त्यांना वाटू लागले.

दिवसेंदिवस लोक या सत्याग्रहा ठिकाणी मोठ्या संख्येने जमा होऊ लागले. परंतु सरकारने पेरियार यांना पुन्हा अटक केली आणि सहा महिन्याचा तुरुंगवास सुनावला. दरम्यान, त्रावणकोरचे महाराज यांचे निधन झाले आणि त्यांच्या जागी त्यांची महाराणी गादीवर आल्या. त्यामुळे त्यांनी ताबडतोब सर्व कैद्यांची सुटका करण्याचे आदेश दिले. त्यामुळे इतर कैद्यांसोबत पेरियार यांचीही सुटका झाली. महाराणी खरे तर जरा आधुनिक विचारांच्या आणि कृतिशील असल्यामुळे त्यांनी लगेच वायकोम सत्याग्रहाच्या प्रश्नाकडे लक्ष घातले आणि तथाकथित अस्पृश्यांसाठी मंदिराकडे जाणारा रस्ता खुला करण्याचे आदेश काढले. याशिवाय,त्यांनी हा रस्ता खुला करण्यासाठी सत्याग्रह करू नये अशी आटही घातली. त्यामुळे पेरियार यांनी सुद्धा तसे आश्वासन दिले आणि आता सत्याग्रह हा प्रश्नच उरलेला नाही असे सांगितले. या यशामुळे पेरियार यांना अती आनंद झाला. के. वीरमणी यांच्या मते, "वायकोम मंदिर प्रवेश सत्याग्रह आंदोलनाने जातीवाद्यांच्या बालेकिल्ल्याच्या पायाला मोठा हादरा बसला. हे आंदोलन म्हणजे भारतातील मानवी हक्क चळवळीला मिळालेले एक वरदानच होते. " दक्षिण भारतामध्ये पेरियार रामास्वामी हे जाती-विरोधी आणि अस्पृश्यता-विरोधी आंदोलनाचे एक अग्रणी बनले. पेरियार स्वतः त्यांच्या आत्मचरित्रामध्ये म्हणतात, "माझ्यासाठी कोणताही मनुष्य शूद्र नाही. त्यामुळे सर्वांनी इतरांसारखेच सामान पातळीवर राहिले पाहिजे. यासाठी जाणीव जागृती निर्माण केली पाहिजे आणि त्यानंतर जातींचेच संपूर्ण उच्चाटन केले पाहिजे. "

**आपली प्रगती तपासा :**

१. वायकोम सत्याग्रहाचे ठिकाण कोणत्या राज्यात आहे?

२. वायकोम सात्यत्यगृहाचा थोडक्यात आढावा घ्या.

## ९.८ गुरुकुलम (चेराणमहादेवी ) प्रकरण

गुरुकुलम ही  एक अशी संस्था होती जी स्वदेशी आणि सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात कार्य करीत होती. काँग्रेस नेते व्ही. व्ही. एस. अय्यर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस कार्यकर्त्या

सरमादेवी या थिरुनेवेली जिल्ह्यामध्ये या संस्थेचे काम पाहत होत्या. या संस्थेमध्ये काही तथाकथित मागास जातींचे लोकही काम करीत होते. या संस्थेला समाजाच्या सर्वच घटकांकडून देणग्या मिळत असत. त्यानुसार भारतीय राष्ट्रीय कांग्रेसने सुद्धा या संस्थेला १०००० रुपयांची देणगी देण्याची घोषणा केली होती आणि त्यापैकी ५००० रुपयांचा पहिला हप्ता अगोदरच देण्यात आला होता. दरम्यान, पेरियार यांच्याकडे या संस्थेच्या गैरकारभाराबद्दल काही तक्रारी येत होत्या. म्हणून त्यांनी या संस्थेला भेट दिली. जेव्हा त्यांनी तेथे आल्यावर चौकशी केली असता त्यांना असे आढळले की, या संस्थेमध्ये ब्राह्मण आणि इतर कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळी व्यवस्था करण्यात आलेली होती. त्यांना याचा मोठा धक्का बसला की , जी संस्था स्वदेशी आणि देशभक्तीच्या नावाखाली जनतेकडून निधी गोळा करते आणि आपल्या समाजसेवा व देशसेवेचा डंका मिरवते तेथेच अशा पद्धतीने भेदभावपूर्ण वातावरण असून तथाकथित मागास जातीच्या लोकांना हीन वागणूक दिली जाते? ब्राहमण जातींच्या लोकांसाठी उच्च प्रतीचे अन्न तर मागास जातीच्या लोकांसाठी निकृष्ट दर्जाचे अन्न तयार केले जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याशिवाय, ब्राम्हण जातीच्या लोकांसाठी वेगळी व उत्तम व्यवस्था आणि मागास जातीच्या लोकांसाठी निकृष्ट व्यवस्था करण्यात आलेली होती. पेरियार यांनी या सर्व व्यवस्थेबद्दल सटीक नाराजी व्यक्त केली आणि या संस्थेला (गुरूकुलम) उर्वरित ५००० रुपयांचा हप्ता न देण्याचे ठरविले. विशेष म्हणजे काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी या व्यवस्थेबद्दल थोडीही नाराजी व्यक्त केली नाही. या उलट ही व्यवस्था चांगली असल्याचे मत व्यक्त केले. गुरुकुलमच्या या जातीवादी व्यवस्थेबद्दल पेरियार यांनी प्रचार करण्यास सुरुवात केली आणि हळूहळू गुरुकुलम कडे येणारे दान कमी होऊ लागले. शेवटी तर हे गुरुकूलम बंद करावे लागले. अशा प्रकारे पेरीयार यांच्या या लढ्यालाही यश मिळाले.

### ९.८.३ आरक्षण चळवळ:

पेरियार यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मध्ये प्रवेश इ.स. १९१९ साली केला होता. त्यामागे एक महत्वाचे कारण म्हणजे काँग्रेस ही मागासवर्गीयांच्या हक्कांसाठी संघर्ष करणारी संस्था आहे याबद्दल त्यांचे अनुकूल मत तयार झालेले होते. इ. स. १९२० साली थिरुनेवेली येथे भरलेल्या काँग्रेसच्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनामध्ये पेरियार यांनी एक प्रस्ताव मांडला आणि तो म्हणजे शिक्षण व नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांना आरक्षण असले पाहिजे. परंतु, या अधिवेशनामध्ये त्यांचा हा प्रस्ताव नाकारण्यात आला. पुढे तसा प्रस्ताव १९२१, १९२२ आणि १९२३ या तिन्ही वर्षी सलगपणे पारित झाला नाही. इ.स. १९२४ च्या थिरुवण्णामलाई येथील काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाचे पेरियार स्वतः अध्यक्ष म्हणून निवडण्यात आलेले होते. या ठिकाणी सुद्धा त्यांचा हा मांडलेला प्रस्ताव नाकारण्यात आला. पुढच्या वर्षी इ.स. १९२५ साली काँग्रेस अध्यक्ष टी. व्ही. के. मुदलियार यांनी आरक्षणाचा हा प्रस्ताव ३० जणांनी मांडण्याचे ठरविले. पेरियार यांनी त्यासाठी एकूण ५० जणांच्या साह्य घेतल्या. याशिवाय, ब्राह्मणेत्तर गटाचे एक शिष्टमंडळ गांधीजींना सुद्धा भेटले. परंतु त्याचा सुद्धा काही उपयोग झाला नाही. यावेळी मात्र पेरियार यांची खात्री झाली की, काँग्रेस केवळ ब्राह्मण वर्गाचेच हित जपण्याचे काम करत आहे आणि मागासवर्गीय जातींच्या आरक्षणाकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे त्यांनी काँग्रेसला रामराम ठोकला. के. व्ही. वीरमणी यांच्या म्हणण्यानुसार, "काँग्रेसमधील ब्राह्मण गट हाच पेरियार इ. व्ही. रामास्वामी आणि त्यांच्यासारख्या निःस्वार्थी कार्यकर्त्यांना काँग्रेस सोडून जाण्यासाठी जबाबदार

ठरला." कांचीपुरम येथील अधिवेशन सोडून जाताना पेरियार यांनी काँग्रेसला आव्हान दिले की, "यापुढे ब्राह्मण वर्गाचे हित जपणाऱ्या काँग्रेसला नष्ट करणे हे माझे पवित्र कर्तव्य राहील."

तामिळनाडूमध्ये एक वटहुकूम काढून सत्ताधारी 'जस्टीस पार्टी' ने मागासवर्गीयांना शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण घोषित केले. परंतु काही तथाकथित उच्चवर्गीय लोकांनी या प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण केले. पेरियार यांनी त्यांचे वर्तमान पत्र 'कुडी अरसु' यामध्ये उच्चवर्गीयांच्या या वागण्याबद्दल टीका केली आणि आरक्षणाच्या बाजूने लेख लिहिण्यास सुरुवात केली. त्यातील एका लेखामध्ये ते लिहितात, नोकऱ्यांच्या भारतीयीकरणाच्या संदर्भामध्ये जातीय प्रतिनिधित्वाच्या म्हणजेच आरक्षणाच्या विरोधामध्ये केवळ ब्राह्मण वर्गच विरोध करीत आला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. गुरुकुलम हि संस्था कशा संदर्भात कार्य करत होती ?

२. १९२० सालच्या तिरुनेवेल्ली येथील काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये पेरियार यांनी कोणता प्रस्ताव मांडला?

**९.८.४ स्त्रियांचा सहभाग:**

पेरियार यांनी सतत लेखन केले की, स्त्रिया ह्या गुलाम नाहीत आणि त्यांचे हक्क हे पुरुषवर्गाइतकेच समान आहेत. त्यांच्या मते, 'मंगळसूत्र' हे स्त्रियांच्या गुलामीचे प्रतीक आहे. त्यांनी पुरुषसत्ताक सामाजिक व्यवस्थेमधील 'पतिव्रता धर्म' या बंधनाबद्दल सुद्धा कडक टीका केली. कारण त्यांच्या मते हि प्रथा पुरुषांना मात्र व्यभिचार करण्यास मुभा देते कारण त्यांच्यासाठी तसे कोणतेही विवाहित असल्याचे प्रतीक आढळून येत नाही. पुरुष असूनही पेरियार यांच्या मते, व्यभिचार करणाऱ्या पुरुषांना सुद्धा स्त्रियांसारखीच शिक्षा मिळाली पाहिजे. त्यांनी 'देवदासी-प्रतिबंधक' विधेयकाला आपला जाहीर पाठिंबा दिला. त्यांच्या विचारानुसार स्त्रियांना सुद्धा आपली बुद्धिमत्ता, क्षमता, गुणवत्ता आणि दर्जा सिद्ध करण्याची संधी मिळाली पाहिजे. एका लेखामध्ये ते लिहितात, "समाजातील दहा पुरुषांना सवलत देण्यापेक्षा समाजातील केवळ दोन स्त्रियांना जरी त्यांची बुद्धिमत्ता आणि स्वाभिमान सिद्ध करण्याची संधी मिळाली तरी पुरेसे होईल." स्त्रियांना संपत्तीमध्ये ५०% वाटा मिळाला पाहिजे यावर त्यांनी भर दिला.

**स्वाभिमान विवाह योजना:**

पेरियार यांनी हिंदू विवाह पद्धतीमधील कर्मकांडांवर कडक टीका केली. त्यांनी स्वाभिमान विवाह योजनेची संकल्पना मांडली ज्यामध्ये विवाह हा नवरा -बायको मधील एक करार मानला गेला पाहिजे जसे एखाद्या व्यवसायामध्ये करार केला जातो तसा. त्यानुसार करारातील अटी व शर्ती या जोडप्यांमध्ये स्वाक्षरीत केल्या जात होत्या. सुरुवातीला मात्र ही विवाह पद्धती लोकांना आवडली नाही आणि त्यावर कठोर टीकाही झाली. कारण अशा पद्धतीला पारंपरिक समाजमान्यता सुद्धा नव्हती. परंतु जेव्हा अण्णादुराई तामिळनाडूमध्ये सत्तेवर आले तेव्हा त्यांनी या विवाह पद्धतीला कायदेशीर मान्यता दिली.

### ९.८.५ कुटुंबनियोजन संकल्पना:

इ.स. १९२८ मध्ये पेरियार यांनी 'कार्प अच्छी ' या नावाचे एक पुस्तक लिहिले ज्याची मुख्य संकल्पना जन्म नियंत्रण अशी होती. त्याद्वारे लोकांमध्ये कुटुंबनियोजन संकल्पनेचा प्रचार व प्रसार करण्याची त्यांची भावना होती. यामागे छोट्या कुटुंबाची संकल्पना असल्यामुळे छोटे कुटुंब आपल्या मुलांना चांगले अन्न आणि शिक्षण देऊ शकते असा मुख्य गाभा यामागे होता. कमी मुले जन्माला घातल्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे चांगले लक्ष देता येत आणि त्यांच्या शिक्षणाची वाटचाल सुद्धा चांगली होऊन त्यांचा बौद्धिक विकास सुद्धा होण्यास मदत होते. त्यांच्या मते, बालविवाह आणि अधिक मुले जन्माला घालणे यामुळे मातेचे आरोग्य धोक्यात येते. मुलामध्ये आई-वडील स्वतःच कुपोषित असल्यामुळे त्यांची मुले सुद्धा कुपोषित निपजतात. त्यामुळे राष्ट्राच्या प्रगतीचा वेग सुद्धा मंदावतो. आपण पाहतो की , पुढच्याच काळामध्ये भारत सरकारने ह्याच धोरणाचा अवलंब केलेला आपल्याला दिसून येतो आणि ते राष्ट्रीय धोरण झालेले दिसते. पेरियार यांनी मुलींच्या लग्नाचे संमती वय २२-२५ करण्याचे सरकारला सुचविले होते. तेव्हाचे कुटुंब कल्याण मंत्री डॉ. चंद्रशेखर यांनी याबद्दल पेरियार यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली आणि त्यांचा याविषयी सल्ला घेतला. त्यांनी मंत्री महोदयांना सांगितले, "सरकारच्या सर्व विभागांमध्ये स्त्रियांसाठी ५०% आरक्षण ठेवा. आपण जर हे अनिवार्य केले तर मुलगी झाली म्हणून पालकांना वाईट वाटणार नाही आणि वंशाचा दिवा म्हणजे केवळ मुलगाच असतो हि भावनासुद्धा काहीशी नाहीशी होईल. पुढे त्यांनी असा वादविवाद केला की, स्त्रियांना जर ५०% आरक्षण मिळाले त्यांच्यावर अधिक मुले जन्माला घालण्याचे बंधन कमी होईल आणि पालकांना सुद्धा मुलगा झाला नाही म्हणून पश्चाताप होणार नाही किंवा मुलांसाठीचा त्यांचा अट्टाहास सुद्धा कमी होईल.

१८ ऑगस्ट १९७२ रोजी कुटुंब नियोजन संचालक डॉ. वेणुगोपाल हे या संदर्भात चर्चा करण्यासाठी पेरियार यांच्या भेटीस गेले. त्यावेळी पेरियार यांनी त्यांना असे सुचविले की , "सरकारी सेवेत असणाऱ्यांनी दोन अपत्यानंतर कुटुंबनियोजन केले पाहिजे अन्यथा त्यांना बढती मिळणार नाही. त्यामध्ये काहीही चूक नाही." आजही सरकारी कर्मचाऱ्यांसाठी अशी तरतूद असल्याचे आपल्याला आढळते. एवढेच नव्हे तर छोट्या कुटुंबाच्या प्रचार व प्रसारासाठी पेरियार यांनी पाश्चिमात्य देशांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमान पत्रातील कुटुंबनियोजनासंबंधी कात्रणे जागोजागी लावण्याचे कार्य सिद्ध केले.

## ९.९ सारांश

भारतीय समाजरचेनचे महत्वाचे वैशिट्य म्हणजे चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि त्यातून झालेली सामाजिक विभागणी हे होय. आज जरी वर्णव्यवस्था नसली, तरी त्याच वर्णव्यवस्थेचे नवे रूप म्हणजे भारतातील जातीव्यवस्था होय. या संदर्भात इंग्रज अभ्यासक आणि भारतातील प्रमुख म्हणजे श्रीधर व्यंकट केतकर यांचे जातीसंस्थेविषयीचे विचार व चिंतन-सिद्धांत फार महत्वाचे असल्याचे आपल्याला आढळते. भारतातील जातीविरोधी लढ्यामध्ये आपणास असे दिसून येते की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्वप्रथम जातिसंस्थेच्या अस्तित्वाबद्दलची मांडणी केली. त्यानंतर छत्रपती शाहू महाराज यांनी सुद्धा

जातीविरोधी कार्य केले. नंतरच्या काळामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तसेच दक्षिण भारतात पेरियार रामास्वामी यांनी मोलाचे कार्य केल्याचे दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः जातीचे चटके भोगले होते. ते परदेशी शिक्षण घेऊन, बॅरिस्टर होऊन भारतात आल्यानंतरसुद्धा येथील जातीवादी समाजामध्ये काहीही फरक पडला नाही आणि तेव्हाही त्याना अपमान सहन करावा लागला. त्यामुळे त्यांनी ज्या भारतीय धर्मशास्त्रांमध्ये या जाती संस्थेचा उगम सापडतो त्यांचा संस्कृत भाषा शिकून स्वतः अभ्यास केला आणि त्यातील फोलपणा दाखवून दिला. त्यासाठी त्यांनी १९१६ साली 'भारतातील जाती....'आणि' जातींचे निर्मूलन' या नावानी ग्रंथ लिहून सैद्धांतिक मांडणी केली. याशिवाय 'शूद्र पूर्वी कोण होते?' , 'अस्पृश्य आणि त्यांना कोणी अस्पृश्य बनविले' अशा ग्रंथांची मांडणी केली. ते केवळ सैद्धांतिक मांडणी वर थांबले नाहीत तर प्रत्यक्ष कृतीची त्यांनी त्यांच्या कार्याला जोड दिली. त्यातूनच पुढे त्यांच्या काही संस्था आणि काही मानवी हक्क आंदोलने यांचा आपण आढावा घेतलाच आहे. परंतु आज संपूर्ण भारतात ज्या ज्या समाजाचे मानवी हक्क पायदळी तुडविले जातात अशा समाजाला डॉ. बाबासाहेबांचे तत्वज्ञान आणि विचार तारक ठरत आहेत आणि तो लढा संपूर्ण भारतात आणि जगामध्ये चालू आहे.

दुसरे एक विचारवंत म्हणजे पेरियार रामास्वामी नायकर होय. त्यांनी तामिळनाडू आणि केरळ राज्यामध्ये अस्पृश्यता आणि जातीविरोधी आंदोलने करून ब्राह्मणी वर्चस्वाला आव्हान उभे केले. मात्र या ठिकाणी एक गोष्ट दिसून येते आणि ती म्हणजे त्यांना स्वतःला या जातीयतेचे चटके बसले नव्हते किंवा त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती गरिबीची सुद्धा नव्हती. त्यांच्या घरी वातावरण अत्यंत धार्मिक असूनही त्याच धर्मशास्त्राचा त्यांनी अभ्यास करून त्यातील अंधश्रद्धा आणि ब्राह्मणी वर्चस्व याबद्दल त्यांचे स्वतःचे परिवर्तन झाले. ते सुद्धा भारतभर फिरून सर्व धार्मिक क्षेत्रांना भेटी देऊन आल्यानंतर त्यांनी त्यांचा हा जातीविरोधी लढा उभा केला. त्यांनी काँग्रेस पक्षात अध्यक्ष पदापर्यंत जाऊनही त्यांचा मात्र अपेक्षाभंग झाला आणि तो पक्ष त्यांना सोडवा लागला. कारण जातीविरोधी लढा किंवा वंचित आणि मागास जातींना शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यास काँग्रेस पक्ष तयार नव्हता. एवढेच नव्हे तर स्वदेशी आणि राष्ट्रवाद शिकविणारी संघटना मात्र भेदभाव निर्मूलनासाठी काहीच करीत नाही हे त्यांना दिसून आले. त्यांनी वायकोम मंदिर रास्ता प्रवेश सत्याग्रह केला आणि तेथील अस्पृश्याना केवळ त्या रस्त्याच्या दुतर्फा ब्राह्मण वर्गाची वस्ती आहे आणि म्हणून त्या रस्त्याचा वापर करण्यास बंदी होती या विरोधी आंदोलन केले व त्याना यशही मिळाले. त्यानंतर मग गुरुकुलम आश्रम शाळा असेल, स्वाभिमान आंदोलन असेल, जातीय आरक्षण असेल, स्त्रीवादी चळवळ असेल या सर्वांमध्ये त्यांची महत्वाची भूमिका आपल्याला दिसून येते.

## ९.१० प्रश्न

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेचे कार्य स्पष्ट करा.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चौदार तळे सत्याग्रह का सुरु केला? सटीक परीक्षण करा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा रामाच्या दर्शनासाठी नव्हता तर आपले मानवी हक्क बजावण्यासाठी होता.' या विधानाचे विश्लेषण करा.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या ' भारतातील जाती ' आणि ' जातींचे निर्मूलन' या मधील सैद्धांतिक आशय विवेचन करा.

५. इ. व्ही. पेरियार रामास्वामी नायकर यांचा थोडक्यात परिचय करून द्या.

६. पेरियार यांनी सुरु केलेला वायकोम सत्याग्रह कशासाठी होता? मूल्यमापन करा.

७. पेरियार यांच्या चळवळींमधील गुरुकुलम प्रकरण आणि आरक्षण चळवळ याबद्दल माहिती लिहा.

८. पेरियार रामास्वामी यांचे स्त्रीवादी विचार-कार्य आणि कुटुंबनियोजन कार्य यांचा आढावा घ्या.

## ९.११ संदर्भ


1. Khairmode C.B., Dr.Bhimrao Ramji Ambedkar, Sugava Prakashan, Pune.
2. Kamble B.C., Samagra Ambedkar Charitra, Sugava Prakashan, Pune.
3. Keer Dhanajay, Dr.Ambedkar, Life and Mission, Popular Prakashan Mumbai, 1990(1954),
4. Zelliot Eleanor, Ambedkar’s World, The Making of Babasaheb and the Dalit Movement, Navayana, New Delhi, 2013(2004).
5. Dr.Babasaheb Ambedkar Writings and Speeches, Govt.of Maharashtra.
6. Kuber W.N., Ambedkar A Critical Study, People’s Publishing House, New Delhi, 2009(1973),
7. Kshirsagar, R.K., Political Thought of Dr.Babasaheb Ambedkar, Intellectual Publishing House, New Delhi, 1992.
8. Dongre M.K., Dimensions of Ambedkarism, Vinay Publications, Nagpur, 2005.
9. Mohan Ram, Ramaswami Naicker and the Dravidian Movement, Article in Economic and Political Weekly, Annual Number, February 1974.

10. सरवदे भीमराव, पेरियार रामास्वामी , समता प्रकाशन, नागपूर, १९९५

11. Periyar E.V.R., Reform of Education, translated by A.S.Venu, Periyar Self Respect Propaganda Institution, Madras, 1983,

12. M.K.Gandhi, Removal of Untouchability, Young India, dated 1/5/1924, Navjivan House, Ahmedabad, 1954, p.108.

13. Seeje, The True Story of Vykom Agitation, Article in Modern Rationalist, (ed.) by K.Veermani, Periyar Self-Respect Propaganda Institution, Madras, issue of March/April, 1993, pp.11-12.

14. K.Veermani, Presidential address, published in Modern Rationalist, issue of Feb.1994, p.5.

15. Periyar E.V.Ramaswami, An Admirer, A Pen Portrait, Periyar Self-Respect Propaganda Institution, Madras, 1982, p.127.

16. K. Veermani, The History of the Struggle for Social Justice in Tamilnadu, The Dravidar Kazgam Publications, Madras, 1982, p.33.

17. Periyar E.V.Ramaswami- A Pen Portrait, op.cit. p.4.

18. K.Veermani, The History of Struggle for Social Justice in Tamilnadu, editorial by Periyar E.V.Ramaswami, dated 21/11/1928, p.35.

19. K.Veermani, Periyar on Women’s Rights, Emerald Publishers, Madras, 1992, p.78.

20. Periyar E.V.R., Periyar on Family Planning, translated by A.S.Venu, The Periyar Self-Respect Propaganda Institution, Madras, 1986,p.20)

*****

# १०

# मार्क्सवादी व नव-मार्क्सवादी वर्गाची ओळख

**घटक रचना**

१०.० उद्दिष्टये

१०.१ प्रस्तावना

१०.२ वर्गाचा अर्थ

१०.३ वर्गाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१०.४ कार्ल मार्क्सचा वर्ग

१०.५ मार्क्सच्या वर्गाचे गंभीर विहंगावलोकन

१०.६ नव मार्क्सवादी वर्ग

१०.७ नव मार्क्सवादी वर्गाची टीका

१०.८ सारांश

१०.९ प्रश्न

१०.१० संदर्भ

## १०.० उद्दिष्टये

१. वर्ग संकल्पना कल्पना समजून घेणे.

२. मार्क्सचा वर्ग सिद्धांत समजून घेणे.

३. नव-मार्क्सवादी सिद्धांत समजून घेणे.

## १०.१ प्रस्तावना

मानव हा सामाजिक प्राणी आहे म्हणून एकटा राहू शकत नाही. मानवी गरजांची नैसर्गिक शक्ती लोकांना एका गटात बांधते ज्याने हळूहळू समाज आकार घेतो. मानवी संस्कृतीतील वाढ ही एका साध्या समाजाचे रूपांतर एका गुंतागुंत असलेल्या समाजात करत असते. किंबहुना समाजामधील गुंतागुंत केवळ समाजामुळेच होत नाही तर ती विशिष्ट क्रमाने विभागलेले समाजातील विविध सामाजिक गटांमुळे होत असते. मार्क्सवादी दृष्टिकोनातून समाजाचे विशिष्ट गटांमध्ये विभाजन करणे याला वर्ग म्हणतात. तुमच्या आजूबाजूला तुम्ही त्यांचा व्यवसाय, धर्म, अर्थव्यवस्था, समुदाय, संस्कृती इत्यादींवर आधारित विविध अनन्यसाधारण गटांमध्ये समाजाचे विभाजन आपण पाहू शकता. सामाजिक विभाजन हे आजचे चित्र नाही तर जगाच्या प्रत्येक प्राचीन संस्कृती व इतिहासात खोलवर रुजलेले असते. पुढील सर्व ऐतिहासिक स्त्रोत सामाजिक गटांमधील संबंध दर्शवितात.

या संदर्भात नव-मार्क्सवादी सिद्धांत आणि मार्क्सवादी सिद्धांत हे सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाचे संशोधन आहे. जुना मार्क्सवादी वर्ग सिद्धांत किंवा नवमार्क्सवादी सिद्धांत हा सर्व कालखंडातील समाजाचे स्वरूप समजून घेण्यास मदत करतो. वर्ग ही संकल्पना भांडवलशाही समाजातील सामाजिक रचनेच्या घटकांवर प्रकाश टाकते. हे स्पष्ट करते की एक समाज त्याच्या अंतर्गत शक्तींद्वारे किंवा अर्थव्यवस्था, संस्कृती आणि राजकारण इत्यादी बाह्य शक्तींद्वारे कसे कार्य करतो.

कथित वर्ग सिद्धांताला शैक्षणिक जगात आणि लोकांमध्ये प्रचंड मान्यता मिळाली आहे. ऐतिहासिक दृष्टिकोनातून, मार्क्सवादी वर्गाला समाजशास्त्राचा सिद्धांत किंवा तत्व मानू नये. कारण विस्तृत पातळीवर सामाजिक चळवळींशी संबंधित बहुतेक ऐतिहासिक घटना, कामगार चळवळी वर्गाच्या कल्पनेद्वारे समजल्या जाऊ शकतात. एवढेच नाही तर साम्यवाद, समाजवाद या सारख्या काही शासकीय यंत्रणेवर मार्क्सवादी वर्ग सिद्धांताचा प्रभाव आहे.

मार्क्सच्या मते जगातील सर्व सामाजिक इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे. खरं तर सामाजिक वर्गावरील मार्क्सची मते श्रम आणि सामाजिक व आर्थिक इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक घटना समजून घेण्यास मदत करतात. या पेपरचा उद्देश कार्ल मार्क्सच्या वर्ग सिद्धांतातील महत्त्वाच्या बाबी आणि या कल्पनेचा नंतरच्या वर्गाचा नव मार्क्स सिद्धांत म्हणून विकास करणे हे आहे.

## १०.२ वर्गाचा अर्थ

विविध प्रकारे 'वर्ग' हा शब्द वापरला जातो हे आपल्याला माहिती आहे. शाळेत मुलाच्या पातळीबद्दल विचारण्यासाठी आम्ही सहसा म्हणतो - "तुम्ही कोणत्या वर्गात शिकता?" त्याचप्रमाणे नोकरी, सार्वजनिक वाहतूक, व्यावसायिक उत्पादने, ब्रॅण्ड्स इत्यादी पदांमध्ये वर्ग हा शब्द नेहमी वापरला जातो. Classis या लॅटिन शब्दापासून बनलेला वर्ग या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. इतिहासात रोमन लोकांनी त्यांचे वय आणि मालमत्तेनुसार वर्णन करण्यासाठी प्रथमच रोमन लोकांनी या शब्दाचा वापर केला. अशाप्रकारे कार्ल मार्क्सच्या आधी वर्गाची संकल्पना केवळ समाजात वर्गवारी करण्यापुरती मर्यादित होती. कार्ल मार्क्सच्या वर्ग संकल्पनेच्या हस्तक्षेपामुळे वर्गाच्या अर्थात मोठा बदल झाला. हे केवळ समाजातील विभाजनाबद्दल नाही. खरं तर हे समाजाच्या सामाजिक-आर्थिक संरचनेचे मिश्रण असून अर्थव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या लोकांच्या समूहाच्या संरचनात्मक चौकटीमधील वैयक्तिक प्रतिक्रिया, वर्तन आणि जाणीव-जागृती यांचे मिश्रण आहे. मार्क्सच्या वर्गाची संकल्पना समजून घेण्यासाठी भारताचे उदाहरण घ्या. भारतीय समाजात एखाद्या व्यक्तीचे स्थान निश्चित करण्यासाठी जात ही महत्वाची आहे. परंतू मार्क्सच्या वर्ग सिद्धांतामध्ये आर्थिक घटक हा समाजातील वर्ग निर्धारित करणारा निर्णायक घटक आहे.

अशाप्रकारे मार्क्सच्या वर्गवारीनुसार संपत्तीच्या असमान वितरणामुळे भांडवलदार समाजाची विभागणी दोन व्यापक वर्गांत झाली आहे.

## १०.३ वर्गाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

सामाजिक रचनेत विभाजनाच्या दृष्टीने सामाजिक मांडणी समाजशास्त्रज्ञानीं आधीच लक्षात घेतली आहे शिवाय समाजशास्त्रातील या प्रसिद्ध विषयावर कार्ल मार्क्सने लक्ष वेधले आहे. याची सुरवात १८ व्या शतकात ब्रिटनमध्ये सुरू झालेल्या युरोपातील औद्योगिक क्रांतीच्या युगापासून झाली आणि तेथून ते युरोपमधील इतर भागांत पसरले. १७ व्या आणि १८ व्या शतकाचा काळ अनेक कारणांमुळे बराच संक्रमणशील आहे. कारण या काळात त्याने सर्व क्षेत्रात पुनरुत्थान आणले होते. त्याची तुलना आजच्या आधुनिक जगाच्या पाया घालण्याशी केली जाऊ शकते. तथापि जागतिक संभाव्यतेमध्ये या ऐतिहासिक घटनेने साम्राज्यवाद, भांडवलशाही, सांप्रदायिकता, औद्योगिकीकरण इत्यादी अफाट बदल घडवून आणले आहेत. सामाजिक संरचनेच्या क्षेत्रात आणखी एक परिणाम दिसून आला. पूर्वी सामाजिक विभाग किरकोळ होता परंतु औद्योगिकीकरणा नंतर सामाजिक स्तरीकरण पुढे विभक्त झाले आणि अखेरीस समाजाचे दोन ध्रुवांमध्ये म्हणजे भांडवलदार आणि कामगारांच्या संरचनात्मक विभागांत रूपांतर झाले.

वर्गाचा ऐतिहासिक प्रवास दोन व्यापक श्रेणींमध्ये विभागला जाऊ शकतो.

१. समाजातील स्थान वाटपाद्वारे परिभाषित वर्ग

२. उत्पादन आणि मालमत्तेच्या संदर्भात परिभाषित वर्ग

समाजाच्या भांडवली वातावरणाव्यतिरिक्त हेगेलची द्वंद्वात्मक पद्धत आणि फ्यूरबॅशियन भौतिकवादाने मार्क्सच्या वर्गाची कल्पना देखील प्रभावित झाली. मार्क्सच्या आधी ॲडम फर्ग्युसन आणि मिलर यांनी १८ व्या शतकात प्रथमच "वर्ग" हा शब्द वापरला होता. ज्यामध्ये नोकऱ्या किंवा संपत्तीच्या बाबतीत कोणत्याही दर्जाबद्दलच्या आपल्या सध्याच्या समजुतीप्रमाणे सामाजिक पातळीचे वर्णन केले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या आगमनाने "वर्ग" या शब्दाचा हळूहळू सामाजिक स्तरांव्यतिरिक्त इतर सखोल अर्थाने अंदाज लावला गेला. जसे ॲडम स्मिथ यांचे लिखाण "कामगार वर्ग" यावर प्रकाश टाकते. त्यामुळे मार्क्सच्या वर्ग या संकल्पनेचा विकास सामाजिक रचनेच्या सुरुवातीच्या दिवसांपर्यंत व मार्क्सवर प्रभाव टाकणाऱ्या अनेक तत्त्वज्ञांच्या कल्पनांचा मागोवा घेतो.

## १०.४ कार्ल मार्क्सचा वर्ग

कार्ल मार्क्सचा जन्म ५ मे १८१८ रोजी ट्रायर, प्रशिया याठिकाणी झाला. तो एक तत्वज्ञानी आणि अर्थशास्त्रज्ञ होता. वर्ग सिद्धांत हा समाजशास्त्राच्या सर्वात मूलभूत सिद्धांतांपैकी एक आहे. तथापि त्याची वर्ग संकल्पना केवळ समाजशास्त्र किंवा अर्थशास्त्राच्या मर्यादेपर्यंत मर्यादित असू शकत नाही. त्यांच्या मते एका समाजाचे दोन भागांत विभाजन झाले आहे. एक म्हणजे जुलूमशाही किंवा भांडवलदार, ज्याला त्याने बुर्जुआ म्हटले आहे. तर दुसरा अन्यायग्रस्त किंवा कामगार वर्ग ज्याला तो उत्पादक म्हणतो. तो असेही म्हणतो की हे दोन वर्ग आर्थिक क्रिया किंवा उत्पादनाच्या माध्यम म्हणून तयार होतात. तो पुढे म्हणतो की

भांडवलदारांच्या शोषणामुळे वरील दोन वर्गांमध्ये संघर्ष निर्माण होतो. अशा प्रकारे मार्क्सच्या वर्ग संकल्पनेतून खालील मुद्दे प्रकट होतात.

अ) वर्ग हे भांडवलशाही समाजाचे वैशिष्ट्य आहे.

ब) उत्पादन साधनांशी असलेल्या संबंधावरून वर्ग निश्चित केला जातो .

क) मार्क्स समाजातील विभाजनाबद्दल बोलतो. ते विभाजन म्हणजे वर्ग होय, जे परस्पर विरोधी स्वरूपाचे आहेत. म्हणूनच या दोन प्रमुख गटांमध्ये संघर्ष आहे.

वर्ग संकल्पनेद्वारे त्यांनी अर्थव्यवस्था, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्रातील इतर अनेक सिद्धांतांचा पुरस्कार केला. त्यांच्या मते वर्ग आणि वर्ग संघर्ष हे घटक आहेत. जे समाजाच्या उत्क्रांतीसाठी पिढ्यानपिढ्या जबाबदार आहेत. कार्ल मार्क्सचा "वर्ग" सामाजिक व्यवस्थेच्या आतील बाबींचे गंभीरपणे परीक्षण करतो. हे अर्थव्यवस्था, राजकारण आणि संस्कृतींवर प्रभाव टाकणाऱ्या समाजाची रचना आणि अंतर्गत कार्ये उघड करते. अशा प्रकारे मार्क्सवादी वर्गाचे विश्लेषण तीन प्रबंधांच्या दृष्टीने स्पष्ट केले जाऊ शकते.

अ) वर्ग आणि सामाजिक क्रांती

ब) वर्ग आणि भांडवलदार समाज

क) वर्ग आणि राजकीय क्रांती

**अ) वर्ग आणि सामाजिक क्रांती:**

मार्क्सने समाजाची व्याख्या वर्गाच्या परिघात केली जी द्वंद्वात्मक रेषेचा उदय झाल्यामुळे उद्भवते. भारताच्या विपरीत चार वर्णव्यवस्थेचा उगम (जाती) वेगवेगळ्या व्यवसायांमुळे झाला परंतु नंतर त्यावर द्वंद्वात्मक रेषा चालल्या कारण विभाजन सौहार्दपूर्ण नव्हते परंतु सर्वात कमी वर्ग आणि उर्वरित तीन उच्च वर्गांमध्ये विरोधाभासी होते. समाजात अशा द्वंद्वात्मक रेषा दोन विरुद्ध वर्गामध्ये संघर्ष निर्माण करतात जे कालांतराने सामाजिक क्रांतीमध्ये बदलतात. वर्ग आणि सामाजिक क्रांतीची मार्क्स संकल्पना इंग्रजी समाजाच्या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आली होती जिथे तो असा युक्तिवाद करतो की भांडवलशाही व्यवस्था लोकांना दोन वर्गांपैकी एक म्हणजे सर्वहारा आणि बुर्जुआ वर्गात भाग पाडते. त्यांचा असा युक्तिवाद आहे की सर्वहारा (दडपशाही) आणि बुर्जुआ (जुलूम) हे समाजाचे दोन विरुद्ध ध्रुव आहेत जे नेहमी त्यांच्या स्वार्थासाठी एकमेकांशी संघर्ष करतात. चालू संघर्ष, विशेषत: भांडवलशाही समाजासारख्या अत्यंत टप्प्यात, दडपलेल्या वर्गाच्या वंचित आणि शोषणाच्या माध्यमांद्वारे मिळवलेले उत्पादन प्रमाण. दोन वर्गामधील फरक अधिकाधिक वाढेल याचा अर्थ श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत आहेत. यामुळे दोघांमध्ये मोठी दरी निर्माण होईल आणि समाजाचे ध्रुवीकरण होईल. मार्क्स म्हणतो की भांडवलदार नेतृत्वाखालील वर्ग चेतनाद्वारे शोषण ज्यामध्ये सर्वहारा वर्गाला त्यांच्या शोषित स्थितीची जाणीव झाली. कार्यरत गटातील वर्गभावनेने क्रांती निर्माण केली. क्रांतीद्वारे पूर्वीच्या उत्पादन पद्धतीची शक्ती, सामाजिक संस्था उलथून टाकली, नवीनद्वारे जी अधिक स्वीकारार्ह आणि जनतेला पसंत आहे ती म्हणजे दडपलेला वर्ग. अशा प्रकारे सामाजिक व्यवस्थेतील वर्ग क्रांतिकारी टप्प्यावर पोहचण्यास बांधील आहे जे संपत्तीचे समान वितरण करण्यासाठी संपुष्टात येते जे वर्गहीन समाजाकडे नेईल.

ते म्हणाले की, जागतिक स्तरावरील संघर्षा संपूर्ण इतिहासात अस्तित्वात आहे, परंतु जुन्या काळात ते बुर्जुआ होते ज्यांच्या क्रांतिकारी युद्धांनी राजकीय सत्ता मिळवण्यासाठी समाज बदलला. तर बुर्जुआ क्रांती ही भूतकाळाची सामाजिक उठाव होती आणि सर्वहारा क्रांती ही भविष्यातील सामाजिक क्रांती आहे. या संदर्भात मार्क्सच्या सामाजिक उत्क्रांतीच्या टप्प्यांचा उल्लेख योग्य आहे ज्यात तो तीन सामाजिक टप्पे म्हणजे गुलाम राज्य, सरंजामी समाज आणि शेवटचा भांडवल समाज याबद्दल बोलतो.

**ब. वर्ग आणि भांडवलदार समाज:**

सामाजिक -आर्थिक पार्श्वभूमीवर आधारित असलेल्या वर्गाचा हा आणखी एक परिणाम आहे. मार्क्स समाज वगळता अर्थशास्त्राच्या कोनातून वर्ग स्पष्ट करतो. त्याच्यासाठी अर्थव्यवस्थेतील प्रगतीमुळे समाजाची रचना बदलते जिथे वर्ग महत्वाची भूमिका बजावतो. मार्क्सच्या मते भांडवलाची कल्पना केवळ अर्थव्यवस्थेशी संबंधित नाही तर ती अर्थव्यवस्था आणि समाज या दोघांशी संबंधित आहे. तर भांडवल हा उत्पादनाचा सामाजिक संबंध आहे. दुसऱ्या शब्दांत भांडवल समाज हा वर्ग समाज व्यतिरिक्त काहीच नाही. येथे वर्ग म्हणजे दोन पट विभागणी ज्यामध्ये एकीकडे मालमत्ता असलेला वर्ग आणि दुसरीकडे मालमत्ता नसलेला वर्ग जो आपले श्रम विकतो. मार्क्सने त्यांना अनुक्रमे भांडवल किंवा बुर्जुआ आणि सर्वहारा किंवा मजुरी कामगार म्हटले.

भांडवलाच्या मालमत्तेमध्ये औद्योगिक उत्पादनाची विविध साधने असतात जसे की जमीन, कारखाने, मशीन, खाण, संपत्ती तर मजुरी मजुरांकडे फक्त मनुष्य शक्ती असते आणि भांडवलदारांवर अवलंबून असते. तथापि भांडवलदारही औद्योगिक उत्पादनासाठी श्रमावर अवलंबून आहे. अशा प्रकारे दोन्ही वर्गांमध्ये परस्परावलंबी परंतु विरोधी संबंध आहे. परिणामी त्यांच्यामध्ये एक विरोधाभासी परिस्थिती निर्माण झाली ज्यात एक मालमत्ता ताब्यात घेण्याच्या वैधतेचे समर्थन करतो तर दुसरा मालमत्तेच्या समान वितरणाची किंवा नफ्यात मोठ्या वाटा देण्याची मागणी करतो.

मार्क्स भांडवलदार समाजात शेतकरी, विचारवंत, वकील, डॉक्टर आणि जमीनदार म्हणून राहणाऱ्या आणखी एका वर्गाबद्दल बोलतो. समाजातील त्यांची भूमिका केवळ त्यांच्या सेवेपुरती मर्यादित आहे आणि म्हणूनच ते दोन वर्गांच्या विरोधी नात्यात येत नाहीत. ते संख्येने अल्पसंख्य असल्याने म्हणूनच वर्ग संघर्षाच्या वेळी त्यांची मोजणी दोन विरोधी वर्गावर फारसा परिणाम करत नाही.

**क. वर्ग आणि राजकीय क्रांती:**

राजकीय क्रांती हा वर्गाचा दुसरा परिणाम आहे. मार्क्स सरळ म्हणतो की, वर्ग संघर्षात लोक राजकीय शक्तीद्वारे जुनी व्यवस्था बदलतात. म्हणून, एका बाजूला भांडवल समाज हा वर्गाचा तात्काळ प्रभाव आहे आणि सामाजिक क्रांती ही भांडवल समाजाची प्रतिक्रिया आहे तर दुसरीकडे राजकीय क्रांती हा वर्गाचा अंतिम परिणाम आहे. या संदर्भात राजकीय क्रांतीची मार्क्सची कल्पना म्हणजे केवळ नेतृत्व, सरकारमधील बदल नव्हे तर सामाजिक स्तर देखील समाविष्ट आहे. तर राजकीय क्षेत्रात होणारा बदल स्वतःमध्ये येत नाही तर राजकीय क्रांतीमध्ये एक सामाजिक रचना फुटते. सखोल अर्थाने सामाजिक क्रांतीचा

मार्क्सचा सिद्धांत राजकीय क्रांतीसाठी वापरला जातो जो राज्य सत्तेच्या नवीन राजकीय संरचनेत रूपांतर करून सामाजिक पुनरुज्जीवन दर्शवतो.

अशा प्रकारे, सामाजिक क्रांती राजकीय क्रांती कशी आणू शकते? या प्रश्नाचे उत्तर मार्क्स असा युक्तिवाद करतात की नवीन सरकारचे स्वरूप सर्वहारा वर्गाच्या मुक्तीसह विसर्जित झाले आहे. जर सर्वहारा वर्ग बुर्जुआंशी संघर्ष करताना, दयनीय परिस्थितीच्या बळावर शक्ती जमा करू शकला तर तो स्वतःला शासक वर्ग बनवतो. अशा स्थितीत सर्वहारा वर्ग जुन्या समाज रचनेला वर्गविरहित समाज आणि उत्पादनाच्या जुन्या अटीमध्ये बदल करेल. मार्क्सच्या साम्यवादी जाहीरनाम्यात राजकीय क्रांतीची कल्पना चांगल्या प्रकारे स्पष्ट केली आहे.

मार्क्सच्या कम्युनिस्ट जाहीरनाम्यात त्यांनी असे सुचवले की सर्वहाराच्या नेतृत्वाखालील राजकीय क्रांती जी सर्व प्रकारच्या वैयक्तिक मालमत्ता आणि उत्पादन आणि दळणवळणाची मालकी, वाहतूक राज्यव्यवस्थेच्या हातात हस्तांतरित करेल.

## १०.५ मार्क्सच्या वर्गाचे गंभीर विहंगावलोकन

मार्क्सची बहुतेक वर्ग संकल्पना अजूनही लागू आहे जसे सामाजिक बदल आणि वर्ग संघर्ष, सामाजिक रचना आणि सामाजिक बदल इ. पण मार्क्सच्या वर्ग सिद्धांतातील काही पैलू नाकारावे लागतील. आर्थिक क्रियाकलाप, संघटना, श्रमशक्ती बदलल्यामुळे मार्क्सचा वर्ग सिद्धांत सध्याच्या सामाजिक -आर्थिक स्थितीमध्ये बसू शकला नाही. सामाजिकरचनेतही इतर विभागांनी आर्थिक क्रियाकलापांमध्ये वाढ करण्यासाठी मालकी वाढवली आहे. अर्थव्यवस्था केवळ उद्योगांपुरती मर्यादित नाही. खरं तर सेवा क्षेत्र- सरकारी आणि खासगी यांना आजच्या अर्थव्यवस्थेत प्रमुख स्थान मिळाले आहे. परिणामी, सामाजिक रचना झपाट्याने बदलली आहे. अगदी राज्याची भूमिकाही खूप बदलली आहे. नवीन मध्यमवर्गाचा उदय, समाज आणि राजकारणात त्याची भूमिका वाढली आहे. मार्क्सच्या वर्ग सिद्धांताद्वारे नवीन मध्यमवर्गाशी संबंधित प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देता येत नाहीत. अशा प्रकारे आजच्या सामाजिक -आर्थिक स्थितीमध्ये मार्क्सचा वर्ग सिद्धांत पूर्णपणे स्वीकारला जात नाही.

मार्क्सच्या वर्ग सिद्धांताने जात, वंश, धर्म इत्यादी सामाजिक विभाजनाच्या इतर परिमाणांकडे दुर्लक्ष केले आणि उत्पादनाला अधिक महत्त्व दिल्याबद्दलही मार्क्सवर टीका केली जाते. खऱ्या अर्थाने भांडवलामध्ये उत्पादन आणि वापर या दोन्ही गोष्टींचा समावेश होतो. दोन आयामांमध्ये अर्थव्यवस्था चालते म्हणून केवळ अर्थव्यवस्थेच्या एका पैलूच्या आधारावर वाद घालणे चुकीचे निष्कर्ष काढू शकते.

**आपली प्रगती तपासा**

**१.** मार्क्सच्या वर्गाच्या तीन पैलूंचे वर्णन करा.

## १०.६ नव मार्क्सवादी वर्ग

वर्गाचा नव मार्क्सवादी सिद्धांत हा मार्क्सवादी वर्ग सिद्धांताचा विकास आहे जो मार्क्सवादाच्या काही मुद्द्यांशी सहमत आहे जसे उत्पादनाचे स्वरूप, समाजाचे वर्गात विभाजन. खरं तर नव मार्क्सवादी वर्ग सिद्धांत त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो ज्याला मार्क्सवादी वर्ग सिद्धांत उत्तर देऊ शकत नाही. नव्या मार्क्सवादी वर्गाची संकल्पना विसाव्या शतकात विकसित झाली आहे. नव मार्क्सवादी वर्गाचा सिद्धांत खालील पैलूंवर विचार करून समजू शकतो.

अ. नव मार्क्सवादी वर्ग सामाजिक संरचना आणि समाजाच्या विभाजनाशी सहमत आहे परंतु आधुनिक शिक्षणामध्ये सामाजिक संरचनेच्या बांधणीसाठी जबाबदार असणारे एक रचनात्मक साधन म्हणून शिक्षणाची शक्ती देखील मानते. समाज हे स्थान निश्चित करण्यासाठी शिक्षण अधिक प्रभावी आहे. शैक्षणिक पात्र व्यक्ती त्याच्या कौशल्यानुसार नोकरी ठरवून सामाजिक रचनेत आपले स्थान किंवा वर्ग निवडण्यास अधिक सक्षम आहे. त्यामुळे नव मार्क्सवादी वर्ग सिद्धांत समाजात स्थान निश्चित करण्यासाठी उत्पादनापेक्षा शिक्षणाला अधिक महत्त्व देतो.

ब. नव मार्क्सवादी वर्ग समाजाच्या विभाजनाच्या पारंपारिक मार्क्सवादी संकल्पनेशी सहमत आहे पण बुर्जुआ आणि सर्वहारा या दोन विभागांची व्याप्ती नाकारतो. नवीन मार्क्सवादी वर्गाच्या मते उत्पादनाच्या विविध माध्यमांमुळे कामगारांचा एक नवीन वर्ग तयार झाला जो कामगार आणि भांडवलदार यांच्यामध्ये येत आहे. ते पात्र, सुशिक्षित आणि कुशल आहेत. व्यवस्थापक, प्रशासक, सेवा पुरुष या वर्गात येतात. ते कामगार आणि भांडवलदार यांच्यात आल्यामुळे त्यांना मध्यमवर्गीय नावाने ओळखले जाते. नवीन मध्यमवर्गाचा उदय हा सामाजिक रचनेतील विकासाचे संकेत देखील देतो. यामध्ये नोकरशहा, लिपिक, व्यवस्थापक, शिक्षक, डॉक्टर, वकील इत्यादी मोठ्या संख्येने कार्यरत गटांचा समावेश आहे. या नवीन वर्गाला व्हाईट कॉलर कामगार किंवा ब्लॅक कोट कामगार म्हणूनही ओळखले जाते.

क. नवीन मार्क्सवादी वर्ग सिद्धांत समाजाचे ध्रुवीकरण नाकारतो आणि सामाजिक एकत्रीकरणाचे समर्थन करतो. या तत्त्वानुसार, आर्थिक क्रियाकलापांच्या विस्तारामुळे कामगार वर्गाला नोकरीच्या विविध संधी मिळतात, परिणामी कामगार एका वर्गातून दुसऱ्या वर्गाकडे जातो. उदाहरणार्थ कारखान्यात काम करणारा कामगार बँकेत मॅनेजरच्या नोकरीत जातो. त्यामुळे ध्रुवीकरणाची प्रक्रिया होत नाही. सामाजिक गतिशीलता आधुनिक समाजाचा अविभाज्य भाग बनली आहे. अशाप्रकारे सामाजिक गतिशीलतेने कौटुंबिक व्यवसायात बदल केला कारण एक पिढीनंतर कोणताही सामाजिक वर्ग स्थिर राहत नाही. आधुनिक समाजात एखादी व्यक्ती गतिमानता वरच्या दिशेने तसेच खालच्या दिशेने आणि कधीकधी समान पातळीवर एकाच पिढीमध्ये आणि आंतर पिढीमध्ये पाहू शकते.

ड. नव मार्क्सवादी वर्गाच्या मते कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्गाच्या रचनात्मक मार्गाने काम करण्याची विरोधी स्थिती म्हणजे दोन्ही वर्गाची स्थिती उत्पादनात निर्णायक भूमिका बजावते आणि ती स्थिती व्याज, शिक्षण, कौशल्य, मालमत्ता इत्यादी द्वारे निश्चित केली जाते.

इ. नव मार्क्सवादी वर्ग देखील वर्गात नसलेल्या संबंधांना कार्यप्रणालीमध्ये समाविष्ट करतो आणि वर्ग समाजात परिवर्तन करतो. वर्ग नसलेला संबंध म्हणजे वंश, लिंग, समुदाय इ.

## १०.७ नव मार्क्सवादी वर्गाची टीका

नव मार्क्सवादी वर्गाच्या संकल्पनेकडे बघून समाधानाची भावना मिळते कारण ज्यांना पारंपारिक मार्क्सवादी वर्गाच्या सिद्धांताची खात्री आहे ते मार्क्सवादी सिद्धांतांच्या नजरेतून आधुनिक समाजाच्या प्रश्नांची उत्तरे देतील. परंतु आधुनिक समाजाच्या न सुटलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, नव मार्क्सवादी वर्ग सिद्धांत पद्धतशीर संशोधनाशिवाय तयार केला गेला आहे असे दिसते. अशा प्रकारे नव मार्क्सवादी सिद्धांतावर मूळ मार्क्सवादी सिद्धांतात फेरफार केल्याबद्दल टीका केली गेली.

नव मार्क्सवादी वर्ग सिद्धांत पुढे वर्ग संघर्षाच्या युक्तिवादावर नाकारला गेला आहे. नव मार्क्सवादी वर्ग सुचवतो की वर्ग संघर्ष हा सामाजिक रचनेचा परिणाम आहे जो द्वंद्वात्मक रेषेत मांडला जातो. परंतु काही अभ्यासकांसाठी हे सामाजिक कार्याचा परिणाम आहे.
तथापि आधुनिक समाजाचे सामाजिक स्तरीकरण स्पष्ट करण्यासाठी नव मार्क्सवादी वर्ग खूप प्रभावी आहे. वर्गाच्या दोन विभागांमध्ये वाद न घालता नव मार्क्सवाद सामाजिक वर्गीकरणात लवचिकतेकडे अधिक उदारता दर्शवितो म्हणूनच मध्यमवर्गीयांना दोन विद्यमान वर्गाच्या चौकटीत सहज सामावून घेतो.

**आपली प्रगती तपासा**

१. नव मार्क्सवादी वर्ग सिद्धांतावर चर्चा करा.

## १०.८ सारांश

हा वर्ग कार्ल मार्क्सच्या सामाजिक -आर्थिक अभ्यासाची मध्यवर्ती कल्पना आहे. वर्गाच्या संकल्पनेतून तो भांडवलशाही समाजाच्या अडकलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो. तथापि, मार्क्सच्या वर्ग सिद्धांताने प्रामुख्याने सामाजिक रचना, सामाजिक चेतना, सामाजिक क्रांती आणि वर्ग संघर्ष स्पष्ट केला आहे. त्यांचा असा युक्तिवाद आहे की समाजाचा वर्ग घटक प्रभावित होतो आणि कधीकधी सरकारी समाज आणि अर्थव्यवस्थेचे भवितव्य ठरवतो.

मार्क्सच्या वर्गाचा विकास नव मार्क्सवादी वर्गाच्या सिद्धांतात दिसून येतो. हे मुळात नवीन मध्यमवर्गीय, सामाजिक जमवाजमव आणि भांडवली उत्पादनापेक्षा शिक्षणाच्या श्रेष्ठतेबद्दल बोलते.

## १०.९ प्रश्न

१. मार्क्सवादी वर्ग म्हणजे काय? वर्ग चेतना सामाजिक क्रांती कशी आणेल?

२. नवीन मध्यमवर्गीय आणि सामाजिक गतिशीलतेच्या संदर्भात नव मार्क्सवादी वर्गाचे वर्णन करा.

३. नव मार्क्सवादी वर्गातील शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

४. मार्क्सच्या वर्ग सिद्धांताचे दोष काय आहेत?

## १०.१० संदर्भ


१. अनुपम सेन, भारतातील राज्य औद्योगीकरण आणि वर्ग निर्मिती: वसाहतवाद, अविकसित आणि विकास यावर एक नवीन मार्क्सवादी दृष्टीकोन, भारतातील रूटलेज लायब्ररी संस्करण ब्रिटिश, २०१७.

२. राजू जे दास, मार्क्सवादी क्लास थिअरी फॉर अ स्केप्टिकल वर्ल्ड, हेमार्केट बुक्स, २०१८

३. एरिक ओलिन राइट, डिबेट ऑन द क्लासेस, वर्सो, लंडन 1990

४. एरिक ओलिन राईट (संपादित), वर्ग विश्लेषणासाठी दृष्टिकोन, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, २००९

५. अँड्र्यू अराटो, नव मार्क्सवादापासून लोकशाही सिद्धांतापर्यंत, रूटलेज, लंडन २०१६.


*****

# ११

# भारतातील कामगार चळवळीचे स्वरूप

**घटक रचना**

११.० उद्दिष्टये
११.१ प्रस्तावना
११.२ कामगार चळवळीची व्याख्या आणि अर्थ
११.३ भारतातील भांडवलशाहीची वाढ
११.४ भारतातील कामगार चळवळीची वाढ
११.५ स्वातंत्र्यपूर्व भारतातील कामगार चळवळ
११.६ स्वतंत्र भारतातील कामगार चळवळ
११.६ सारांश
११.७ प्रश्न
११.८ संदर्भ

## ११.० उद्दिष्टये

या प्रकरणामध्ये विद्यार्थ्यांना पुढील मुद्दे समजून घेता येतील.

१. कामगार चळवळीचा अर्थ समजून घेणे.
२. भारतातील कामगार चळवळीचे स्वरूप जाणून घेणे.
३. स्वातंत्र्यपूर्व आणि नंतरच्या भारतातील कामगार चळवळीच्या विविध टप्प्यांचे विश्लेषण करणे.

## ११.१ प्रस्तावना

युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीच्या काळात विशेषतः इंग्लंडमध्ये १८ व्या आणि १९ व्या शतकाच्या सुरुवातीला कामगार चळवळ सुरू झाली. यानंतर इंग्लंडमध्ये हळूहळू औद्योगिक क्रांती घडून आली व हळूहळू ती इतर युरोपीय देशांमध्ये पसरली. ब्रिटिश संसदेत इ. स. १८०८ मध्ये 'किमान वेतन विधेयक' अयशस्वी झाल्यामुळे संघटित कामगार चळवळीचा उगम झाला. यापूर्वी ब्रिटनमध्ये कोणताही राजकीय गट किंवा संघटना अस्तित्वात नव्हती. त्यामुळे कामगार चळवळीचे मूळ हे ब्रिटनमध्ये होते. १९ व्या आणि २० व्या शतकात, युरोपातील इतर देशांमध्ये औद्योगिकीकरण झपाट्याने पसरले, परिणामी कामगार वर्ग वाढला.

आशिया आणि आफ्रिकेतील इंग्लंड व इतर साम्राज्यवादी देशांच्या वसाहतींमध्ये औद्योगिक क्रांतीचा प्रभाव सुरू झाला. भारतासारख्या वसाहतींमध्ये विविध उद्योगांची स्थापना झाली. त्यामुळे असमान वर्ग व्यवस्था निर्माण झाली आणि त्यातून कामगार वर्गाचा जन्म झाला. कामगारांचे सामाजिक जीवन विस्कळीत झाले. मालक किंवा भांडवलदार वर्गाच्या शोषण धोरणामुळे मालक आणि मजूर यांच्यात संघर्ष सुरू झाला. त्यामुळे कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी कामगार संघटना अस्तित्वात आली. कामगारांच्या छोट्या गटाचे जनआंदोलनात रूपांतर झाले. कामगार चळवळीचे उद्दिष्ट भांडवलशाहीमध्ये कामगारांच्या हिताचे संरक्षण आणि बळकटीकरण करणे आणि भांडवलशाहीची जागा पूर्णपणे समाजवादाने घेणे हे होते. दरम्यानच्या काळात मार्क्सवादाचा युरोप खंडातील कामगार चळवळींच्या उदयावर मोठा प्रभाव पडला. इ.स. १८६९ मध्ये समाजवादी राजकीय पक्षांची स्थापना ही याच विचारांचा परिणाम होती.

जरी कामगार चळवळीचा उगम भारतात इ.स. १८६० च्या दशकात झाला असला तरी, भारताच्या इतिहासातील पहिले कामगार आंदोलन इ.स. १८७५ मध्ये बॉम्बे(मुंबई) येथे झाले. ते एस. एस. बंगाली यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले होते. हे आंदोलन कामगारांच्या, विशेषतः महिला आणि लहान मुलांच्या दुरावस्थेवर आधारित होते. ब्रिटिश सरकारने आंदोलनाची गंभीर दखल घेऊन इ.स. १८७५ मध्ये पहिला कारखाना आयोग नेमला. त्यानंतर भारतात पहिला कारखाना कायदा इ.स. १८८१ मध्ये संमत झाला. इ.स. १८९० मध्ये कामगार चळवळीचे प्रणेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन या नावाने भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. त्यांनी स्थापन केलेली ही पहिली संघटित कामगार संघटना होती. मुंबईतील गिरणी कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी त्यांच्यात जागृती निर्माण करण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट होता.
Vcb12n1

## ११.२ कामगार चळवळीची व्याख्या आणि अर्थ

केंब्रिज शब्दकोशामध्ये कामगार चळवळीचा अर्थ चांगल्या प्रकारे परिभाषित केला आहे. तो म्हणजे "कामगार लोकांचा एक संघटित गट जो त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या वेतन आणि कामाच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी एकत्र येतो." या व्याख्येनुसार, कामगार चळवळीचा मुख्य हेतू होता की कोणत्याही संस्थेतील कामगार किंवा कर्मचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करा. मेरियम-वेबस्टर या दुसऱ्या शब्दकोशाने कामगार चळवळीची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे: "कामगार संघटनांच्या माध्यमातून एकत्रित कृती करून त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी कामगारांचा संघटित प्रयत्न म्हणजे कामगार चळवळ होय." याचा अर्थ मजुरांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कामगार संघटनांद्वारे एकत्रित प्रयत्न आणि सामूहिक कृतीवर लक्ष केंद्रित करणे असा आहे. जर आपण समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून कामगार चळवळीचा अभ्यास केला तर ती एक व्यापक संकल्पना आहे, एक बहुआयामी सामाजिक निर्मिती आहे. जी समाजातील कार्य आणि उद्योगाच्या सामाजिक संरचनांमधून निर्माण होते.

कामगार संघटनांचा मुख्य उद्देश कामगार संघटनांचा आत्मा असलेल्या सामूहिक सौदेबाजीद्वारे कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबांना अनुकूल कामाची परिस्थिती आणि सामाजिक-आर्थिक लाभ व कल्याणकारी योजना निर्माण करण्यासाठी, वाटाघाटीसाठी चांगल्या सुविधा आणि सामर्थ्य प्रदान करणे आहे.

## ११.३ भारतातील भांडवलशाहीची वाढ

भारतात १९ व्या शतकात वसाहतवादी राजवटीत भांडवलशाहीची सुरुवात झाली. ही सुरुवात रेल्वे इ. मार्फत केली गेली. कारण ते सुरुवातीचे उद्योग होते. १८३९ मध्ये आसाम टी कंपनीच्या नावाने चहा आणि कॉफी कंपन्या स्थापन करण्यात आल्या तर १८४० मध्ये दक्षिण भारतात कॉफीचे मळे सुरू झाले. १८५७ च्या उठावानंतर रेल्वेचा विस्तार सुरू झाला, ज्याला भांडवलशाहीच्या विकासासाठी अनुकूल वातावरण मिळाले. भारतातील उद्योग. मुंबई, कोलकाता आणि मद्रास सारखी भारतातील प्रमुख बंदरे व शहरे भारतातील भांडवलशाही उद्योगांची आधुनिक केंद्रे बनली आहेत. वसाहतींतील नियमाने वाहतूक आणि कच्चा माल यावर लक्ष केंद्रित केले. जे प्रमुख उत्पादन आणि वाहतुकीसाठी उपयुक्त ठरू शकतात आणि तयार उत्पादन खुल्या बाजारात विकण्यासाठी त्याच सेवांचा वापर केला. त्यामुळे बंदरे व शहरे ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेची केंद्रे बनली. त्यामुळे कामगार वर्ग वाढला आणि कारखान्यांच्या मालकांच्या अत्याचाराला बळी पडला. परिणामी त्यांच्यात संघर्ष सुरू झाला व कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी तसेच त्यांचे मुलभूत हक्क आणि उपजीविकेच्या सुविधा मिळवण्यासाठी कामगार संघटनांची स्थापना करण्यात आली.

## ११.४ भारतातील कामगार चळवळीची वाढ

भारतातील कामगार संघटनांची वाढ ही औद्योगिकीकरण आणि उद्योगातील मजुरांची झपाट्याने झालेल्या वाढीचा परिणाम होता. अशा परिस्थितीत उद्योग मालकांचा मजुरांकडे पाहण्याचा दृष्टीकोन जाचक होता, तो पुरोगामी नव्हता. त्यामुळे मालक आणि कामगार वर्ग निर्माण झाला. हळूहळू दोन्ही वर्गांमधील दरी झपाट्याने वाढत गेली ज्याचे रूपांतर वर्गसंघर्षात झाले. कार्ल मार्क्स या जर्मन तत्ववेत्याने जगातील वर्गसंघर्षाच्या रचनेची उत्तम व्याख्या केली आहे.

कार्ल मार्क्सच्या मते, "समाजात दोन महत्त्वाचे वर्ग होते, ते म्हणजे बुर्जुआ आणि कामगार वर्ग. भांडवलदार वर्ग नेहमीच भांडवल आणि उत्पादन साधनांवर नियंत्रण ठेवतो आणि कामगार वर्गावर त्याच्या फायद्यासाठी नियंत्रण ठेवतो. तर कामगार वर्ग नेहमीच भांडवलदारांकडून अत्याचार आणि शोषण सहन करतो. त्यामुळे समाजातील या दोन्ही वर्गांमधील दरी वाढत गेली आणि दोन्ही वर्गांमध्ये संघर्ष सुरू झाला. ज्याला वर्गसंघर्ष म्हणतात". अशा प्रकारचा वर्गसंघर्ष जगभर आढळून येतो. भारतात या दोन वर्गांमधील संघर्ष वेगवेगळ्या स्वरुपात आहे. ज्याला जातीगत श्रेणीबद्ध व्यवस्था म्हणून ओळखले जाते. या व्यवस्थेत भारतीय समाजातील उच्च जातीच्या लोकांकडून अशा प्रकारच्या

शोषणावर नियंत्रण ठेवले जाते. या शोषणाला खालच्या जातीचे लोक नेहमीच बळी पडतात. समान संधी आणि समान अधिकार प्राप्त करण्यासाठी व कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी कामगार संघटना आवश्यक होत्या, म्हणून १९ व्या शतकाच्या शेवटी भारतात विविध कामगार संघटना आणि संस्था स्थापन झाल्या. भारतातील कामगार संघटनांच्या चळवळीच्या वाढीची सुरुवात नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबई येथे केली. सध्या, सुमारे १ कोटी कामगारांच्या सामूहिक सदस्यत्वासह १६००० पेक्षा अधिक कामगार संघटना अस्तित्वात आहेत. मजुरांची ही सभासदत्वे भारतातील विविध उद्योगांमध्ये सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील अगदी लहान-उद्योगांमध्येही उपलब्ध आहेत. कामाची अनिश्चितता, कमी वेतन, १२ ते १५ कामाचे तास, कामाची अस्वच्छ परिस्थिती, खराब राहणीमान, अपघात किंवा मृत्यूच्या घटनांविरूद्ध विमा नाही, पेन्शन नाही, यासारख्या मजुरांच्या अनेक समस्यांमुळे भारतातील कामगार संघटनांमध्ये झपाट्याने वाढ झाली. कामगारांच्या कुटुंबातील कमवते सदस्य कमी झाल्यानंतर कुटुंबातील सदस्यांच्या कल्याणासाठी कोणतीही तरतूद नाही.

दिवसेंदिवस मजुरांच्या समस्या वाढत गेल्याने त्यांच्यात फूट पडली. गिरणी मालकांनी कामगारांचे  वेगवेगळ्या स्वरूपात शोषण केले. वसाहतवादी सरकार मार्फत कामगारांच्या समस्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात होता पण तो कामगारांसाठी समाधानकारक नव्हता.

वसाहतवादी सरकारच्या काळात महात्मा फुले यांच्यासारख्या काही प्रमुख नेत्यांनी व त्यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी १८८० मध्ये सुरू झालेल्या 'दिनबंधू' या वृत्तपत्रातून कामगारांमध्ये जागृती निर्माण करण्यास सुरुवात केली. एन. एम. लोखंडे हे कामगारांमध्ये अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी जागृती निर्माण करणारे महान पुरुष होते. कामगारांमधील एकजूट आणि जागरुकता यामुळे १८८२ ते १९०१ या काळात बॉम्बे लेबर युनियनने सुमारे २६महत्त्वाचे संप पुकारले होते. मजुरांमध्ये जागृती करून त्यांच्या शोषणाविरुद्ध त्यांना संघटित करण्याचे एन. एम. लोखंडे यांचे कार्य कौतुकास्पद होते. ज्ञानोदय या वृत्तपत्राद्वारे केलेल्या जनजागृतीमुळे नारायण मेघाजी लोखंडे यांची ताकद वाढली होती.

एन. एम. लोखंडे हे गिरणी मालक आणि शासनाकडे कामगारांच्या प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा  करत होते. परिणामी, सरकारने कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी १८९२ मध्ये कारखाना कायदा पारित केला. परंतू मुंबईतील काही गिरणी मालक कामगारांना मूलभूत हक्क देण्यास तयार नव्हते. गिरणी मालक किंवा भांडवलदारांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले त्यांचे मूलभूत हक्क मिळवण्यासाठी कामगारांनी नाईलाजाने संपाचा शस्त्र म्हणून वापर केला. १८८९ मध्ये एन. एम. लोखंडे यांनी टाटा मिल मालकाला मजुरांच्या समस्यांबाबत आणि ते त्यांच्या मूलभूत हक्कांपासून कसे वंचित आहेत. तसेच कामगार सुरक्षा ही गिरणी मालकांना त्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी कशी उपयुक्त ठरेल हे समजावून सांगितले. एन. एम. लोखंडे यांनी पुढे २४ एप्रिल १८९० रोजी महालक्ष्मी रेसकोर्सवर सुमारे १०,००० मजुरांची बैठक बोलावली. त्या बैठकीत कामाच्या ठिकाणी 'रविवार' या साप्ताहिक सुट्टीचा एकजुटीने ठराव मंजूर करण्यात आला. एन. एम. लोखंडे

यांनी कामगार प्रश्नांबाबत घेतलेला पुढाकार हा कामगारांसाठी अतिशय समर्पक होता, त्यामुळे नारायण मेघाजी लोखंडे यांचे नेतृत्व उदयास आले आणि ते कामगारांचे नेते बनले. परिणामी, नंतर मुंबईच्या गव्हर्नरने कारखाना कामगार आयोग नेमला ज्यामध्ये सोराबजी शहारपूरजी बंगाली आणि नारायण मेघाजी लोखंडे यांना मुंबईचे प्रतिनिधित्व देण्यात आले. आयोगाने त्यांचा अहवाल सादर केला आणि तो सरकारने स्वीकारला. ज्यामध्ये महिला आणि बालमजुरीबद्दल काही सकारात्मक शिफारसी सुचवल्या आहेत. त्यांनी कामाच्या ठिकाणी थोडी विश्रांती दिली होती. महिलांसाठी कामाच्या ठिकाणी कामाची वेळ निश्चित करण्यात आली होती, ९ ते १४ वयोगटातील महिला व मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी ११ तास देण्यात आले होते. नारायण मेघाजी लोखंडे यांचे श्रमिकांसाठी मोठे योगदान होते. त्यांनी भारतातील कामगार चळवळीचा पाया निर्माण केला आहे. त्यामुळे नारायण मेघाजी लोखंडे हे भारतातील कामगार चळवळीचे प्रणेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्यामुळे भारतात कामगार चळवळीची वाढ आणि विकास सुरू झाला.

**आपली प्रगती तपासा:**

१. फॅक्टरी लेबर कमिशनमध्ये कोणत्या भारतीय नेत्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले?

### ११.४.१ १९२६ पूर्वीची कामगार चळवळ:

१८९२ मध्ये कारखाना कायदा पारित झाल्यानंतर कामगार चळवळीने जोर धरला आणि ती व्यवस्थितपणे कार्य करू लागली व संघटित झाली. नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईतील गिरणी कामगारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली होती. त्यामुळे विविध उद्योगधंद्यांमध्ये विविध संघटना आणि छोट्या संघटनांनी पुढे येऊन त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आवाज उठवला. अशा प्रकारे, मुंबई आणि कलकत्ता येथील कामगार चळवळींनी १९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या सुरूवातीला त्यांच्या शोषणाच्या विरोधात अनेक संप पुकारले होते. १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीनंतर स्वदेशी चळवळीने देशात अनुकूल वातावरण निर्माण केले होते ज्यामुळे विविध उद्योगांतील कामगार वर्गामध्ये अधिक जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या नेत्यांनी स्वदेशी चळवळीत सक्रिय सहभाग घेतला, बाळ गंगाधर टिळक यांच्या तुरुंगवासानंतर, १९०८ मध्ये टिळकांच्या ६ वर्षांच्या तुरुंगवासाच्या विरोधात मजुरांनी ६ दिवसांचा संप जाहीर केला. त्यामुळे मजुरांची शक्ती दिवसेंदिवस वाढिस लागून ती जनचळवळ बनू लागली होती.

### ११.४.२ भारतातील कामगार संघटनांचा उदय:

पहिल्या महायुद्धानंतर कामगारांच्या ज्वलंत प्रश्नांच्या विरोधात कामगार चळवळी पुढे आल्या, कमी वेतन, कामाचे दीर्घ तास, कामाच्या ठिकाणी अमानुष परिस्थिती, कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना नाहीत, कामगारांच्या गंभीर अपघातानंतर सुरक्षा नाही. परंतु विविध उद्योग आणि गिरणी मालकांच्या संघटना अशा सुविधा सहजासहजी देण्यास तयार नव्हते. त्यामुळे ब्रिटिश सरकारने १९११ मध्ये डॉ. स्मिथ कमिशनची नियुक्ती केली होती. आयोगाने त्यांचा अहवाल सादर केला आणि कामगारांच्या बाजूने वैध शिफारशी सुचवल्या होत्या. त्यामुळे कामगारांचे काही प्रश्न मार्गी लागले.

कामगार चळवळीचा रोडमॅप ना. मो. लोखंडे यांनी सुरू केला होता. नारायण मल्हार जोशी यांनी कामगार संघटना चळवळीला योग्य आकार दिला. १९०९ मध्ये गोपाळ कृष्ण गोखले यांनी स्थापन केलेल्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीशी ते जोडले गेले आणि १९११ मध्ये त्यांनी सोशल सर्व्हिस लीग सुरू केली. कामगार नेते म्हणून, त्यांनी कामगारांच्या समस्यांमध्ये रस घेण्यास सुरुवात केली आणि मुंबईमध्ये कामगार क्षेत्रात कामगार कल्याण केंद्रे, रात्रशाळा, वैद्यकीय केंद्रे आणि औद्योगिक वर्ग सुरू केले. लाला लजपत राय यांच्या अध्यक्षतेखाली १९२१ मध्ये ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या स्थापनेत त्यांचा महत्वाचा सहभाग होता. त्यांनी १९२९ पर्यंत लाला लजपत राय यांचे सचिव म्हणून काम केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे, १९२६मध्ये ब्रिटिश सरकारने ट्रेड युनियन कायदा मंजूर केला. त्यामुळे कामगार संघटनांना या कायद्यांतर्गत मान्यता मिळाली आणि त्या कायद्याने सुरक्षित झाल्या.

भारतात कामगार संघटनांचा उदय पहिल्या महायुद्धानंतर झाला. त्या आधी कामगार संघटित झाले होते व ते देशाच्या विविध भागांतील विविध कामगार संघटनांशी संबंधित होते.

युद्धानंतरच्या काळात कामगार संघटनांच्या उदयास अनेक घटक कारणीभूत ठरले, त्यात प्रामुख्याने कामगारांच्या वास्तविक वेतनातील जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, औद्योगिक उत्पादनांच्या मागणीत झालेली वाढ यामुळे भारतीय उद्योगांचा विस्तार झाला, गांधीजींचे आवाहन, असहकार चळवळ, १९१७ ची रशियन क्रांती इत्यादी घटना भारतातील कामगार संघटनांच्या उदयाचे प्रमुख घटक होते.

**आपली प्रगती तपासा**

१. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना आणि कार्य सांगा?

## ११.५ स्वातंत्र्यपूर्व भारतातील कामगार चळवळ

या भागात भारतातील कामगार संघटनांची वाढ आणि विकास व कामगारांच्या कल्याणासाठी त्यांचे योगदान यावर चर्चा करूया. पहिले महायुद्ध १९१८ मध्ये संपले, त्यानंतर भारतात कामगार संघटनांची निर्मिती सुरू झाली. मद्रास येथे १९१८ मध्ये 'द मद्रास लेबर युनियन' या नावाने पहिली कामगार संघटना स्थापन झाली. डॉ. ॲनी बेझंट आणि राष्ट्रवादी श्री बी. पी. वाडिया या चळवळीशी संबंधित होते. या संघटनेच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. ही संघटना मद्रास मधील कर्नाटक आणि बकिंगहॅम मिल्सच्या कामगारांचे नेतृत्व करत होती. जरी ती गिरणी कामगारांसाठी स्थापन करण्यात आली होती तरी  फील्ड वर्कर्स देखील सुरुवातीच्या टप्प्यात या संघटनेमध्ये सामील झाले होते. ही पहिली संघटित कामगार संघटना होती जी सदस्यांच्या सदस्यत्वाच्या योगदानाच्या मदतीने कार्यरत होती. संघटनेने त्यांची मासिक सदस्य वर्गणी म्हणून ०१ आणा ठरवला होता. याच काळात अहमदाबाद गिरणी कामगारांनी भाववाढीची भरपाई म्हणून बोनससाठी आंदोलन सुरू केले. या आंदोलनाचे नेतृत्व  अनुसयाबेन

साराभाई या पहिल्या महिला कामगार संघटनेच्या नेत्या करत होत्या. त्या कामगारांच्या प्रश्नाबाबत महात्मा गांधी यांच्याशी संपर्कात होत्या. गिरणी कामगारांच्या वैध मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी त्यांनी महात्मा गांधींना अहमदाबादला भेट देण्याची विनंती केली. त्यानुसार महात्मा गांधींनी अहमदाबादला भेट देऊन गिरणी कामगारांच्या बाजूने उभे राहून कामगारांना ३५ टक्के बोनस मिळावा, अशी मागणीही केली. परंतु गिरणी मालकांनी मजुरांची मागणी नाकारली. त्यामुळे गांधीजींनी कामगारांसाठी शांततेने संप पुकारला आणि लवादाचे तत्व मान्य केले पाहिजे असा आग्रह धरला. कामगारांच्या प्रश्नासाठी गांधींजींनी स्वतः उपोषण केले. शेवटी, गिरणी मालकांनी लवाद स्वीकारला आणि तडजोड म्हणून लवादाने त्यांच्या वेतनात २७.५ टक्के वाढ करण्याची शिफारस केली. अनुसयाबेन साराभाई यांचा संघर्ष कामगार संघटनेच्या इतिहासात अद्वितीय होता. अनुसयाबेन साराभाई त्यांच्या हक्कांसाठी आणि सर्व लोकांसाठी लढणाऱ्या म्हणून अनेक भारतीयांसमोर आदर्श होत्या.

अशा प्रकारे कामगार संघटना खूप मजबूत होत गेल्या आणि या चळवळीने वेग घेतला. १९२० पर्यंत, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विविध ठिकाणी अनेक कामगार संघटना स्थापन करण्यात आल्या. या कालावधीत भारतात २५०,००० सदस्य असलेल्या सुमारे १२५ युनियन्सची स्थापना करण्यात आली. सर्व कामगार संघटनांचे स्वरूप अगदी वेगळे होते, काही युनियन्स खूप लहान होत्या आणि तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत होत्या आणि कामगारांचे प्रश्न सोडविण्यास त्या फारशा सक्षम नव्हत्या, त्यांच्या कार्यपद्धतीत सुसंगतताही नव्हती. बहुतेक युनियन नियमित सदस्यत्व जमा करू शकल्या नव्हत्या. त्यामुळे त्या काळात कामगारांच्या हक्कांचे रक्षण, कल्याण, सुरक्षितता व कायदेशीर लढा देण्यासाठी राष्ट्रीय संघटना निर्माण होणे आवश्यक होते. त्यानुसार १९२० मध्ये ' ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC) ची स्थापना बी. जी. टिळक, एन. एम. जोशी, बी.पी. वाडिया, दिवाण चमनलाल, लाला लजपत राय, जोसेफ बाप्टिस्टा, मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल आणि अनेक भारतीय नेत्यांच्या प्रयत्नातून झाली. लाला लजपत राय हे AITUC चे पहिले अध्यक्ष झाले तर जोसेफ बाप्टिस्टा हे AITUC चे पहिले उपाध्यक्ष झाले आणि एन. एम. जोशी हे AITUC चे पहिले सचिव होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सहकार्याने राष्ट्रीय स्तरावर स्थापन झालेली ही पहिली संघटित ट्रेड युनियन होती, अल्पावधीतच AITUC ला कामगार आणि इतर संघटनांकडून मोठा पाठिंबा मिळाला. AITUC शी १०७ युनियन संलग्न होत्या. ही संघटना १९२९ मध्ये संघटनेत फुटपडेपर्यंत कायम होती.

मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर, अहमदाबाद इत्यादी प्रगत औद्योगिक केंद्रांवर AITUC खूप मजबूत होती. संपूर्ण भारतभर कामगारांनी अनेक संप पुकारले होते. कापूस, ज्यूट टेक्सटाइल, रेल्वे, जहाजबांधणी, लोह आणि पोलाद, पोस्ट आणि टेलीग्राफ हे संघटन खूप मजबूत होते.

भारतीय राजकारणाच्या दृष्टीने, भारतातील कामगार चळवळीच्या क्षेत्रातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचा उदय. १९१७ मधील रशियन क्रांतीनंतर, कार्ल

मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारसरणीचा प्रभाव भारतीय कामगार चळवळ आणि त्यांच्या नेत्यांवर पडला.

पुढे, १९२० मध्ये भारतीय कम्युनिस्ट पार्टी (CPI) च्या स्थापनेत त्याचे प्रतिबिंब दिसून आले. एम. एन. रॉय हे CPI च्या स्थापनेमागे असलेली शक्ती होते. CPI च्या स्थापनेनंतर, कम्युनिस्ट नेते भारतातील कामगार चळवळीत सक्रिय झाले.

कम्युनिस्ट नेत्यांनी मुंबई आणि कोलकाता येथील कापूस व ज्यूट मिलमध्ये काम करणाऱ्या मजुरांवर लक्ष केंद्रित केले. कामगार चळवळीत डाव्या नेत्यांचे वर्चस्व स्वातंत्र्यपूर्व आणि नंतरच्या काळात होते. परंतु १९९१ नंतर जागतिकीकरण आणि खाजगीकरण सुरु झाल्यामुळे हळूहळू त्यांचा प्रभाव कमी होत गेला. १९२८-२९ मध्ये, कम्युनिस्ट नेत्यांना AITUC मध्ये किरकोळ बहुमत मिळू शकले, त्याचा परिणाम नागपूर येथे एआयटीयूसीच्या १० व्या अधिवेशनात दिसून आला, ज्यामध्ये ते जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालील या अधिवेशनात रॉयल कमिशनवर बहिष्कार टाकण्याचा ठराव मंजूर करू शकले. म्हणून, AITUC ने १९२९ मध्ये ILO पासून पृथक्करणाची मागणी केल्यामुळे साम्राज्यवादाच्या विरोधात लीगशी संलग्नता निर्माण केली. ज्येष्ठ सुधारणावादी नेते एन. एम. जोशी, दिवाण चमनलाल, व्ही. व्ही. गिरी, आणि बी. शिवाराव यांना या हालचाली पचवता आल्या नाहीत आणि त्यांनी ९५ हजारांहून अधिक सदस्य असलेल्या ३० संघटनांसह AITUC सोडली आणि 'इंडियन फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन' नावाची नवीन संघटना स्थापन केली. त्यांनी (IFTU) ही संघटना स्थापन केली. कामगारांच्या राष्ट्रीय संघटनेत ही उभी फूट होती. १९३१ मध्ये राष्ट्रवादी आणि कम्युनिस्ट नेत्यांमध्ये मतभेद झाल्यामुळे कामगार संघटनेत आणखी एक फूट पडली. कम्युनिस्ट नेत्यांनी महात्मा गांधी आणि गोलमेज परिषदेवर कठोर टीका केली जिथे काँग्रेस सहभागी झाली होती. असा प्रकार अनेकवेळा समोर आला आणि त्यामुळे युनियनमध्ये आणखी एक फूट पडली. कम्युनिस्ट नेत्यांच्या गटाने 'रेड ट्रेड युनियन काँग्रेस' (RTUC) नावाने एक नवीन कामगार संघटना स्थापन केली. १९३१ मध्ये, कामगार संघटनांचे तीन राष्ट्रीय महासंघ अस्तित्वात होते. AITUC, IFTU आणि RTUC.

### **११.५.१ ट्रेड युनियन कायदा १९२६:**

देशातील कामगार संघटना आणि कामगार संघटना यांच्या संघर्षाचे फलित म्हणजे ब्रिटिश सरकारने ट्रेड युनियन कायदा १९२६पास केला. या कायद्याने कामगार संघटनांना एक संवैधानिक संरक्षण प्रदान केले होते. जे कामगारांच्या हक्कांचे कल्याण आणि संरक्षणासाठी केले गेले होते. या कायद्यात कामगार संघटनांची अधिकृत नोंदणी, नियमन, फायदे आणि कामगार संघटनांना भांडवलदार आणि सरकार यांच्याविरुद्ध त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी संरक्षण देण्याची तरतूद आहे. ट्रेड युनियन कायदा १९२६पास झाल्यानंतर, या कायद्यांतर्गत नोंदणीकृत कामगार संघटनांची संख्या आणि मजुरांचे सदस्यत्वही वाढले. या कायद्यांतर्गत नोंदणीकृत कामगार संघटनेच्या संरक्षणासाठी हा कायदा आजही अस्तित्वात आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर या कायद्यात २०१९ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

### ११.५.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय कामगार चळवळ:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताच्या इतिहासातील प्रमुख, बहुआयामी नेत्यांपैकी एक होते. देशाच्या सामाजिक-आर्थिक आणि राजकीय विकासात त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण तर योगदान उत्कृष्ट आहे. कामगार नेते म्हणून त्यांनी अनेक कामगार समस्या सोडवल्या आहेत आणि कामगारांमध्ये चेतना निर्माण केली आहे. आपल्या वैज्ञानिक दृष्टिकोन, कामगार जाणीव आणि भारतीय कामगार चळवळीला बळकटी देण्याच्या महान दृष्टीच्या बळावर त्यांनी भारतीय समाजातील उपेक्षित वर्गाच्या उत्थानासाठी स्थिर, प्रभावी आणि लोकशाही संवैधानिक पद्धतींचा अवलंब केला.

डॉ. आंबेडकरांनी कामगार वर्गाच्या उत्थानासाठी विविध क्षेत्रांमध्ये मोठे योगदान दिले. गोलमेज परिषदेत, त्यांनी राहणीमान, मजुरी, योग्य कामाची परिस्थिती आणि क्रूर जमीनदार आणि भांडवलदारांच्या तावडीतून भारतीय मजूर आणि शेतकऱ्यांची मुक्तता यासाठी प्रयत्न केले. डॉ. आंबेडकर हे एक व्यावहारिक नेते होते जे नेहमी कामगार आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकशाही मार्गावर विश्वास ठेवतात, म्हणूनच त्यांनी कामगार, शेतकरी, गरीब भाडेकरू, शेतकरी यांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून ते सोडविण्यासाठी १९३६ मध्ये 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र मजूर पक्षाला भारतीय जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत होता, परिणामी १९३७ च्या मतदानात त्यांच्या पक्षाला मुंबई विधानसभेत १७ पैकी १५ जागा जिंकून मोठे यश मिळाले. कोकणातील खोती प्रथेविरुद्ध त्यांचा सततचा लढा उल्लेखनीय होता. त्यांनी १९३७ मध्ये कोकणातील खोती प्रथा रद्द करून कोकणातील गरीब शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सरकारला भाग पडले. त्यांनी १९३७ मधील औद्योगिक विवाद विधेयकालाही विरोध केला कारण त्यामुळे कामगारांचा संप करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला होता. डॉ. आंबेडकर १९१९ पासून सातत्याने दलितांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत होते आणि १९३७ च्या निवडणुकीत त्यांनी आपले जन नेतृत्व सिद्ध केले. त्यामुळे त्यांच्या उत्कृष्ट कामांना शासनाकडून गौरविण्यात आले. १९४२ मध्ये, कामगार आणि शेतकऱ्यांच्या समस्यांबद्दलचे त्यांचे सखोल ज्ञान सार्वत्रिकपणे मान्य केले गेले आणि १९४२ ते १९४६पर्यंत व्हॉईसरॉयच्या कार्यकारी परिषदेत कामगार सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तो एक अत्यंत निर्णायक काळ होता, दुसरे महायुद्ध चालू होते. संपूर्ण जग महायुद्धात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी झाले होते. यावेळी डॉ. आंबेडकर भारतीय मजुरांना मार्गदर्शन करत होते. व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेत कामगार मंत्री या नात्याने त्यांनी सरकारच्या कामगार धोरणाच्या मूलभूत संरचनेचा पाया घालून कामगार कल्याणासाठी उपाययोजना सुरू केल्या. त्यांनी नोव्हेंबर १९४३ मध्ये इंडियन ट्रेड युनियन (सुधारणा) विधेयक सादर केले, ज्याने मालकांना कामगार संघटना मान्य करण्यास भाग पाडले. कामगार मंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांचे आणखी एक उल्लेखनीय योगदान, त्यांनी 'औद्योगिक शांतता' राखण्यासाठी पुढाकार घेतला आहे, त्यांनी प्रत्येक प्रांतात सरकारचे प्रतिनिधी, मालकांचे प्रतिनिधी आणि कामगारांचे प्रतिनिधी, यांचा समावेश असलेल्या 'त्रिपक्षीय' कामगार परिषदेच्या गरजेवर भर दिला. कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी कामगार समस्यांवर चर्चा करून त्यांचे निराकरण करण्यासाठी, औद्योगिक शांतता सुनिश्चित करण्यासाठी, शक्तिशाली यंत्रणा विकसित करण्यासाठी. लोकप्रतिनिधींना एकत्र आणून समस्या सोडवण्याचा हा एक उत्तम उपक्रम होता.

त्यांनी महिलांच्या समस्यांवरही लक्ष केंद्रित केले आणि त्यांना मातृत्व लाभ, समान वेतन, ठरविक कामाचे तास, जीवन विमा आणि अनेक कल्याणकारी योजना दिल्या. डॉ. आंबेडकर हे मुख्य नेत्यांपैकी एक होते. ज्यांनी कामगार धोरण तयार केले आणि सिंचन आणि उर्जा क्षेत्राच्या मूलभूत विकासावर लक्ष केंद्रित केले, ज्यामुळे राष्ट्रीय विकासासाठी मदत झाली. शेवटी, ते श्रमाविषयी आपले विचार व्यक्त करतात, "कामाची केवळ न्याय्य परिस्थिती मिळवण्यातच श्रम समाधानी नाही, तर श्रमाला जीवनाची न्याय्य परिस्थिती हवी आहे”.

**आपली प्रगती तपासा:**

१. ब्रिटीश सरकारने ट्रेड युनियन कायदा केव्हा पास केला?

## ११.६ स्वातंत्र्योत्तर काळातील कामगार चळवळ

भारतीय स्वातंत्र्यापूर्वी कामगार चळवळ फोफावत होती. नारायण मेघाजी लोखंडे, एन. एम. जोशी, एम. एन. रॉय, बी. जी. टिळक, बी. पी. वाडिया, लाला लजपत राय, डॉ. आंबेडकर, व्ही. व्ही. गिरी इत्यादी अनेक दिग्गज नेत्यांनी चळवळीला योग्य आकार दिला. पहिल्या महायुद्धानंतर ही चळवळ लोकप्रिय झाली आणि संविधानिक बनली. ट्रेड युनियन कायदा १९२६ अंतर्गत संरक्षण. १९२९ मध्ये काही वैचारिक समस्यांमुळे युनियनमध्ये उभी फूट पडली. कामगार संघटनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ऐक्य हे होते. परंतु कामगार वर्गाच्या एकात्मतेत फूट पडल्यानंतर ती फुटली, नंतर ती कामगार संघटना चळवळीतील सर्वात उल्लेखनीय प्रवृत्ती बनली.

ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC) हा कामगार संघटनांचा पहिला राष्ट्रीय महासंघ होता. परंतु या महासंघात राष्ट्रवादी आणि कम्युनिस्ट विचारसरणींमधील रॉयल कमिशनवरील वैचारिक मुद्द्यांवरून दोन मोठे विभाजन झाले होते. ज्याची चर्चा आधीच करण्यात आली आहे. तथापि, १९३९ मध्ये, IFTU ने AITUC या मूळ संस्थेमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला. वसाहतवादी काळात, कम्युनिस्टांनी एआयटीयूसीच्या कामगार वर्गावर नियंत्रण ठेवले होते. परंतु भारतीय स्वातंत्र्याच्या तीन महिन्यांपूर्वी काँग्रेसने AITUC व कम्युनिस्ट वर पकड ठेवण्याचा निर्णय घेतला, म्हणून त्यांनी मे १९४७ मध्ये 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (INTUC)' या नावाने आणखी एक कामगार संघटना स्थापन केली. INTUC चे संस्थापक खंडूभाई देसाई हे होते.

भारतीय स्वातंत्र्यानंतर, विविध राजकीय पक्ष पुढे आले आणि त्यांनी प्रादेशिक स्तरावर कामगारांना आकर्षित करण्यासाठी त्यांच्या कामगार संघटना स्थापन केल्या.

प्रजा सोशालिस्ट पार्टी (PSP) ने आपली ट्रेड युनियन आघाडी स्थापन केली होती जी बिगर कम्युनिस्ट आणि बिगर काँग्रेस ट्रेड युनियन्सना आकर्षित करेल. अशा प्रकारे, 'द हिंदू मजदूर पंचायत'(एच.एम.पी.) ची स्थापना २९ डिसेंबर १९४८ रोजी झाली. आर. एस. रुईकर युनियनचे पहिले अध्यक्ष म्हणून तर अशोक मेहता सरचिटणीस म्हणून निवडून

आले. हे नेते पश्चिम बंगालमधील प्रसिद्ध कामगार नेते एम. एन. रॉय यांच्यापासून प्रेरित झाले होते. हिंदू मजदूर पंचायत (एच. एम. पी.) सोबत, इतर अनेक संघटना १९४९ मध्ये 'हिंदू मजदूर सभा' (एच. एम. एस.) नावाच्या नवीन महासंघात विलीन झाल्या. नंतर १९५२ मध्ये, आर. एस. पी. ने युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस या नावाने त्यांचा महासंघ स्थापन करण्याचा निर्णय घेतला.. १९५५ मध्ये, भारतीय जनसंघ या राजकीय पक्षाने २३ जुलै १९५५ रोजी 'भारतीय मजदूर संघ' या नावाने त्यांचे ट्रेड युनियन केंद्र स्थापन केले. दत्तोपंत ठेंगडी हे 'भारतीय मजदूर संघ'(BMS) चे संस्थापक होते. १९६५ मध्ये प्रजा सोशालिस्ट पार्टी तोडून जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली 'संयुक्त सोशलिस्ट पार्टी' १९६४ या नावाने नवीन पक्ष स्थापन केला. पुढे, जॉर्ज फर्नांडिस एक महत्त्वाचे राजकीय व्यक्ती तसेच कामगार नेते बनले, त्यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे संप यशस्वीपणे आयोजित केला गेला. तथापि, १९७० च्या सुरुवातीपर्यंत, सर्वात महत्त्वाच्या कामगार संघटना INTUC, AITUC आणि HMS या होत्या. १९६२ हे वर्ष पुन्हा भारतीय राजकारणाला कलाटणी देणारे ठरले. चिनी आक्रमकतेच्या प्रभावाखाली कम्युनिस्ट चळवळीचे विभाजन झाले आणि १९६४ मध्ये ज्योती बसू यांच्या नेतृत्वाखाली 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' (मार्क्सवादी) या नावाने एक नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्यात आला, इलामकुलम मनक्कल शंकरन नंबूदिरीपाद हे ई. एम. एस. हरकिशन या नावाने प्रसिद्ध होते. पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये कम्युनिस्टांचा गड होता, सिंग सुरजीत आणि इतर AITUC आणि CITU १९७० च्या दशकापर्यंत मोठ्या कामगार संघटनांचे नेतृत्व करत होते. फेडरेशन ऑफ ट्रेड युनियनमधील विभाजन १९२९ मध्ये सुरू झाले आणि ते समकालीन भारतामध्ये अस्तित्वात आहे.

पण १९७० च्या दशकानंतर कामगार संघटनांची परिस्थिती बदलली आणि अनेक प्रादेशिक राजकीय पक्ष कामगारांच्या प्रश्नांना बगल देत अस्तित्वात आले. त्यामुळे कामगार वर्ग राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांमध्ये विभागला गेला.

प्रादेशिक राजकीय वर्चस्व प्रक्रिया तामिळनाडू राज्यात सुरू झाली जिथे द्रविड मुनेत्र कळघम (डी.एम.के.) ने १९६७ मध्ये राज्य सरकार स्थापन केले.

**आपली प्रगती तपासा:**

१. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये फूट कधी पडली?

### ११.६.१ मुंबईतील कामगार चळवळ:

मुंबईत एन. एम. लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली पहिली कामगार संघटना स्थापन झाली, त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली कामगार चळवळीचा पाया रचला पण पुढे ते इतरांसाठी प्रेरणास्थान ठरले. त्यामुळे एन. एम. लोखंडे यांच्या निधनानंतरही मुंबईने कामगार चळवळीला खंबीर नेतृत्व दिले आहे. न. म. जोशी, श्रीपाद अमृत डांगे, मिरजकर, कॉम्रेड शामराव परुळेकर, कॉम्रेड रणदिवे ते डॉ. दाता सामंत हे कामगारांचे कणखर नेते होते. ज्यांनी चळवळीसाठी आपले आयुष्य वेचले. याशिवाय काही समाजवादी उल्लेखनीय नेत्यांनीही कामगार चळवळीच्या क्षेत्रात आपले नेतृत्व सिद्ध केले. लोकशाहीर अण्णाभाऊ

साठे, शाहीर अमर शेख, एस.एम. जोशी, प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, अहिल्या रांगणेकर, इत्यादि नेते होते ज्यांनी केवळ कामगारांसाठी काम केले नाही तर मराठी भाषिकांसाठी, मुंबईसह स्वतंत्र राज्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' सुरू केली.

महाराष्ट्रात, महाराष्ट्रीयांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६७ रोजी मुंबई येथे 'शिवसेना' या नावाने राजकीय पक्षाची स्थापना केली. बाळासाहेब ठाकरे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली शिवसेना अधिक लोकप्रिय झाली. मुंबई आणि महाराष्ट्रातील बहुतांश महाराष्ट्रीय कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनता शिवसेनेकडे आकर्षित झाली. त्यामुळे मुंबई हा शिवसेनेचा बालेकिल्ला बनला. बहुतांश गिरणी कामगार आणि सर्वसामान्य मराठी जनता ही या राजकीय पक्षाचा कणा होता. कामगारांच्या रक्षणासाठी व त्यांच्या हितासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी ‘भारतीय कामगार सेना’ या नावाने कामगार संघटना स्थापन केली. कामगारांचे सेनापती दत्ताजी साळवी हे 'भारतीय कामगार सेने' चे संस्थापक अध्यक्ष होते. पुढे रमाकांत मोरे आणि सूर्यकांत महाडिक या संघटनेचे अध्यक्ष झाले आणि या दोघांनीही त्यांच्या मूळ राजकीय पक्षाला मदत करणाऱ्या संस्थेला भक्कम नेतृत्व दिले.

वसाहतीच्या काळात मुंबई आणि कलकत्ता ही कामगार संघटनांची महत्त्वाची केंद्रे होती पण स्वातंत्र्यानंतर कामगार संघटनांसाठी मजबूत नेतृत्व दोन्ही प्रमुख शहरांमधून पुढे आले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात १९७० च्या मध्यापर्यंत, विविध सामाजिक गटांमध्ये एक समान भावना होती की देशात, राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावर विविध राजकीय पक्षांनी कामगार संघटनांवर नियंत्रण ठेवण्यास सुरुवात केली. प्रत्येक राजकीय पक्षाने आपापली कामगार संघटना स्थापन केली. ज्याद्वारे त्यांनी कामगार आणि सामान्य जनतेला संघटित करून संबंधित राज्यात आपली राजकीय सत्ता स्थापन केली. याशिवाय काही महत्त्वाच्या बिगर-राजकीय कामगार संघटनांनी औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात भक्कम नेतृत्व दिले होते. दत्ता सामंत, ए. के. रॉय, शंकर गुहा नियोगी, इला भट्ट, वर्किंग वुमेन्स फोरम, चेन्नई, सेल्फ एम्प्लॉयड वुमेन्स असोसिएशन, गुजरात, सोसायटी फॉर टेक्नॉलॉजी अँड डेव्हलपमेंट, हिमाचल प्रदेश, अमा संघटना, ओरिसा, केरळ दिनेश बीडी, केरळ, कच पत्र काश्मीर, पंचायत, महाराष्ट्र. या स्वतंत्र युनियन्स आहेत ज्या कामगार समस्या सोडवत आहेत आणि देशातील विविध उद्योगांमधील कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

'महाराष्ट्र गिरणी कामगार युनियन' (MGKU) च्या डॉ. दाता सामंत यांच्या नेतृत्वाखाली १९८० च्या दशकात देशात काही उल्लेखनीय संप झाले, विशेषत: मुंबईतील कापड उद्योगात आणि १९७४ मध्ये INTUC वगळता मुख्य कामगार संघटनांशी संलग्न असलेल्या रेल्वे कामगारांनी. देशव्यापी संप आयोजित केला. संपामुळे रेल्वे वाहतूक ठप्प झाली होती. सरकारने त्यामुळे संप मोडण्याचा प्रयत्न केला होता; परिणामी कामगार संप सुरू ठेवू शकले नाहीत. पुढे, १९७५-७७ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारने देशात आणीबाणी लागू केली आणि कामगारांच्या संपावर आळा घालण्यासाठी उपाययोजना केल्या.

**आपली प्रगती तपासा:**

१. भारतातील कामगार चळवळीचे जनक म्हणून कोणाला ओळखले जाते?

## ११.७ सारांश

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील कामगार चळवळीच्या वाटचालीचा अभ्यास करताना असे दिसून येते की चळवळीने कामगारांना संरक्षण दिले आहे आणि विविध उद्योगांमधील कामगारांचे प्रमुख प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू आर्थिक सुधारणांसाठी भारतात १९९१ मध्ये Liberalization, Privatization and Globalization (LPG) धोरण आणल्यानंतर. भांडवलदार वर्गाने नव-उदारमतवादी सुधारणांचा कार्यक्रम सुरू केला. ज्यामध्ये संप बेकायदेशीर ठरवणे आणि युनियनची शक्ती कमकुवत करणे इ. गोष्टींचा समावेश होता. यामुळे भारतातील कामगार चळवळीसाठी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण धोरण सर्वात हानिकारक मानले गेले.

## ११.८ प्रश्न

१. भारतात कामगार संघटनांचा उदय का आणि कसा झाला?
२. एन.एम. लोखंडे यांना भारतातील कामगार चळवळीचे जनक म्हणून का ओळखले जाते? स्पष्ट करा.
३. भारतीय कामगार चळवळीतील AITUC च्या योगदानाचे विश्लेषण करा.
४. भारतातील कामगार चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदानाचा आढावा घ्या?
५. स्वातंत्र्योत्तर भारतातील कामगार चळवळीच्या बदलत्या संरचनेचे वर्णन करा?

## ११.९ संदर्भ


१. मून, वसंत (संपादित), (१९९१), डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे, खंड-१०, पहिली आवृत्ती, महाराष्ट्र शासन, मुंबई, (१९९१).
२. पापोला, टी. एस., पी. सिन्हा, सीएस वेंकट रत्नम आणि जी. बटरवीड (एड्स.), लेबर अँड युनियन्स इन अ पीरियड ऑफ ट्रांझिशन, फ्रेडरिक एबर्ट स्टिफटंग, दिल्ली येथे रोजगार, वाढ आणि श्रमांचे सामाजिक संरक्षण,(१९९ ४).
३. रामास्वामी इ. ए., कामगार चेतना आणि ट्रेड युनियन प्रतिसाद, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, (१९८७).
४. रेवरी सी., द ट्रेड युनियन मूव्हमेंट इन इंडिया, ओरिएंट लाँगमन, हैदराबाद(१९५८)
५. मॉरिस एम. डी., द इमर्जन्स ऑफ इंडियन लेबर इन इंडिया: अ स्टडी ऑफ बॉम्बे कॉटन मिल्स, १८५ ४-१९ ४७, ऑक्सफर्ड, युनिव्हर्सिटी प्रेस, बॉम्बे, (१९६५).
६. कदम मनोहर, भारतीय कामगार चळवळीचे जनक: नारायण मेघाजी लोखंडे, अक्षर प्रकाशन, बॉम्बे.


*****

# १२

## २० व्या शतकातील भारतीय आदिवासी जमाती आणि त्यांच्या संघर्षाचे स्वरूप

**घटक रचना**


१२.० उद्दिष्टये

१२.१ प्रस्तावना

१२.२ भारतातील जमाती

१२.३ स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी संघर्षाचे स्वरूप

१२.४ स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी संघर्षाची कारणे

१२.५ स्वातंत्रोत्तर काळातील आदिवासी संघर्ष

१२.६ सारांश

१२.७ प्रश्न

१२.८ संदर्भ


## १२.० उद्दिष्टये

१. भारतीय आदिवासी जमातींचा आढावा घेणे.

२. आदिवासींच्या संघर्षाची कारणे जाणून घेणे.

३. आदिवासी संघर्षाचे स्वरूप समजून घेणे.

४. भारतातील काही महत्वाच्या आदिवासी संघर्षांचा आढावा घेणे.

## १२.१ प्रस्तावना

भारत हा विविध मानवी सांस्कृतिक समूह असलेला देश आहे. आदिवासी समाज हा या विशाल विविधतेतील सर्वात महत्वाचा विभाग आहे. भारतात आदिवासींची लोकसंख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.५% इतकी आहे. जी लक्षात घेण्याइतकी कमी आहे तरीही त्यांचा समृद्ध सांस्कृतिक वारसा त्यांना भारतीय लोकसंख्येत विशेष स्थान देतो. ऐतिहासिक दृष्टिकोनातून ते भारताचे सुरुवातीचे रहिवासी मानले जातात. जे बाह्य जगाचा आपल्या जीवनात कमीत कमी हस्तक्षेप व्हावा म्हणून उच्च डोंगर, घनदाट जंगल यांसारख्या भौगोलिकदृष्ट्या दुर्गम व भिन्न भागात राहत होते. मुक्त पक्ष्याप्रमाणे आदिवासी समुदायांनी अलिप्ततेची स्थिती कायम ठेवली परंतू वसाहतीच्या काळात त्यांच्या जीवन आणि संस्कृतीला तडा गेला. ब्रिटिश भारताचा इतिहास आदिवासींच्या जोरदार विद्रोहांनी आणि ब्रिटीश राजवटी विरुद्धच्या प्रतिकाराने ओतप्रत भरलेला आहे. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी थोड्या वेगळ्या पद्धतीने जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीसाठी आपला संघर्ष चालू ठेवला. सदरील पेपर स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्य काळातील आदिवासींच्या संघर्षावर

आधारित आहे. या पेपरचा मुख्य विषय म्हणजे आदिवासींच्या संघर्षासाठी जबाबदार असलेले घटक आणि वैशिष्ट्यांची चर्चा करणे. या पेपरमध्ये आदिवासी भारताचा समर्पक आढावा घेण्यात आला आहे.

## १२.२ भारतातील आदिवासी जमाती

भारताची लोकसंख्या ही अनेक जाती, जमाती व समाज मिळून बनली आहे. भारत हा प्रामुख्याने बाह्य जगाशी त्याच्या ऐतिहासिक परस्परसंवादामुळे (आक्रमण, व्यापार, धर्म, स्थलांतर, उपनिवेश) इ. जवळ आला आहे. जागतिकीकरणामुळे वैविध्यपूर्ण लोकसंख्या असलेल्या जगातील कोणत्याही पुरोगामी देशाप्रमाणे परिणाम झाला आहे. या संदर्भात भारतातील आदिवासी जमाती प्राचीन काळात त्यांची वस्ती शोधतात. तथापि, त्यांचा इतिहास अत्यंत अस्पष्ट आहे. परंतू भाषाशास्त्रानुसार आदिवासींनी भारतात दोन मार्गांनी प्रवेश केला असावा. एक म्हणजे भारताच्या ईशान्य भागातून तर दुसरा भारताच्या उत्तर पश्चिम भागातून. भौगोलिकदृष्ट्या, ते विस्तृत प्रादेशिक क्षेत्रात आढळतात. त्यांच्या भौगोलिक वस्तींचे चार भौगोलिक क्षेत्रांमध्ये वर्गीकरण करता येते. उदा.

(अ) ईशान्य क्षेत्र

(ब) पश्चिम क्षेत्र

(क) मध्य क्षेत्र

(ड) दक्षिण क्षेत्र

आदिवासी जमातींची लोकसंख्या कमी असली तरी त्यांच्यात संस्कृतीक विविधता आहे जी त्यांची भाषा आणि वंश प्रतिबिंबित करते. भाषिकदृष्ट्या, ते ऑस्ट्रो-एशियाटिक, द्रविड व तिबेटो-चिनी भाषेतील आहेत. रामचंद्र गुहा यांच्या मते, भारतातील आदिवासी जमाती नेग्रीटो, प्रोटो ऑस्ट्रेलॉइड, मंगोलॉइड, पॅलीओ मंगोलॉइड, नॉर्डिक किंवा इंडो-आर्यन अशा विविध वांशिक गटांशी संबंधित आहेत. त्याचा एक भाग, ते शिकार, अन्न गोळा करणे, मासेमारी, मजूरी, पशुपालन आणि शेतीशी संबधित विविध व्यवसायांमध्ये गुंतलेले आहेत. अनेक सुशिक्षित आदिवासी लोक सरकारी सेवा आणि व्यवसाय क्षेत्राकडे वळले आहेत.

आदिवासींना त्यांच्या पूर्वजांकडून समृद्ध संस्कृतीक वारसा लाभला आहे. त्यांची अतुलनीय संस्कृती त्यांच्या अन्न सवयी, निवासस्थान, पोशाख, अलंकार, धर्म, दंतकथा, सण, विधी, समारंभ, गाणी, नृत्य, शिक्षण व्यवस्था, विरता आणि उत्स्फूर्तता इत्यादींमध्ये दिसून येते. दुसरीकडे त्यांची मागासलेली सामाजिक व आर्थिक स्थिती हा सरकारसाठी चिंतेचा विषय आहे. म्हणून, स्वातंत्र्यानंतर त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्यात आला. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू हे आदिवासींच्या प्रश्नांवर गंभीरपणे विचार करत होते. शोषकांपासून आदिवासींना संरक्षण द्यावे असे त्यांचे मत होते. त्याच वेळी आदिवासींच्या समाज आणि संस्कृतीत काय सुंदर, मंत्रमुग्ध आहेत याचे रक्षण करण्यासाठीही त्यांनी युक्तिवाद केला होता.

स्वातंत्र्यानंतर नेहरूंच्या पाच तत्वांच्या (पंचशील तत्वे) प्रभावाखाली संविधान सभेने आदिवासींच्या सुरक्षेसाठी काही उपाय केले. आदिवासी लोकांना अधिक चांगल्या प्रकारे प्रवेश मिळावा म्हणून त्यांना नोंदणीकृत व सूचीबद्ध केले गेले. यानंतर त्यांना अधिकृतपणे अनुसूचित जमाती म्हणून संबोधले गेले. १९५० च्या राज्यघटनेच्या आदेशानुसार १४ राज्यांमध्ये स्थायिक झालेल्या २१२ जमातींना अनुसूचित जमाती म्हणून घोषित केले. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ मध्ये अनुसूचित जमाती म्हणजे कोण असेल हे परिभाषित केले आहे. भारतातील आदिवासी जमातींना भारतीय संविधानाने राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगाराशी संबंधित सुरक्षा प्रदान केली आहे. संविधानाची ५ आणि ६ अनुसूची विशेषतः आदिवासी लोकांच्या संरक्षणासाठी लागू करण्यात आलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून, आज राज्य आणि केंद्र सरकारकडून अनेक विकास कार्यक्रम आणि योजना आदिवासी कल्याणासाठी चालवल्या जातात. विशेष म्हणजे, ही सर्व सरकारी संरक्षणात्मक धोरणे आणि नियोजन अनेकदा पूर्ण होत नाही आणि आदिवासी लोकांच्या प्रत्येक मागणीची पूर्तता करत नाही. परिणामी, राजकीय स्वायत्तता, आर्थिक न्याय, सांस्कृतिक ओळख आणि वेगळे राज्य यांसारख्या कारणांमुळे त्यांचा आंदोलन, असंतोष आणि सरकारविरोधात संघर्ष झाल्याचे दिसून येते.

## १२.३ स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी संघर्षाचे स्वरूप

भारतात ब्रिटीश राजवटीच्या प्रारंभामुळे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात खूप अनपेक्षित बदल झाले. नवीन प्रशासकीय व्यवस्थेने पारंपारिक शासकीय यंत्रणेला छेद दिला. बाहेरील जगापासून अलिप्त राहणाऱ्या आदिवासी लोकसंख्येलाही या प्रचंड लाटेने सोडले नाही, अगदी ब्रिटीश वसाहतीपूर्वीच्या राज्यकर्त्यांनीही आदिवासी क्षेत्राला नेहमीच त्यांच्या राज्यापासून दूर ठेवले किंवा त्यांच्या कार्यात कमीत कमी रस दाखवला. परंतू ब्रिटीश राजवटीने भारतीय समाजव्यवस्थेवर विपरित परिणाम केला. आदिवासी भागात हा संघर्ष अधिक तीव्र झाला. ब्रिटिश राजवटीपूर्वी आदिवासी कधीही बाहेरील लोकांच्या थेट संपर्कात आले नाहीत किंवा बाहेरील राज्यकर्ते व इतर लोकांनी त्यांच्या जीवनात थेट हस्तक्षेप केला नाही. दुसरे म्हणजे, त्यांची जीवनशैली उर्वरित भारतीय लोकसंख्येपेक्षा लक्षणीय भिन्न होती, परिणामी बाह्य जग त्यांना परके आणि अपरिचित वाटू लागले. तिसरे, जबरदस्तीने, प्रचंड हस्तक्षेपामुळे त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक आणि आर्थिक जडन-घडणीमध्ये अचानक झालेल्या बदलांमुळे त्यांच्यात प्रचंड असंतोष, चीड आणि निराशा निर्माण झाली. परिणामी, विद्रोहाची मालिका सुरू होण्यापूर्वी ब्रिटिशांनी आदिवासी भागात प्रवेश केला नाही. आदिवासींच्या संघर्षाबद्दल चित्तवेधक गोष्ट म्हणजे हा संघर्ष भारतातील आदिवासी वर्चस्व असलेल्या सर्व भागांत झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील आदिवासी संघर्ष खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. दडपशाहीची कठोर कृती:**

भारताच्या आदिवासी संघर्षात ब्रिटिश राजवटीने मोठ्या प्रमाणात दडपशाही केली. आदिवासींच्या संघर्षाचा प्रतिकार करण्यासाठी ब्रिटीशांनी अटक, लढाई, अनैतिक मार्गांपर्यंत शिक्षा, निर्दयी हत्या, लूट इ. मार्गांचा अवलंब केला.

**२. संघर्षाची मंद गती:**

संघर्षाची मंद गती हे सूचित करते की आदिवासी संघर्ष एकाचवेळी कधीच सुरू झाला नाही. आदिवासींनी प्रात्यक्षिक, हलके युक्तिवाद, अनिच्छा इत्यादींद्वारे संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत आपला असंतोष पोहचवण्याचा प्रत्येक संभाव्य मार्ग वापरला. आदिवासी उठावाला अनेकदा हिंसक वळण लागले. ज्यामध्ये आदिवासींनी अत्याचारींची शासनकर्त्यांची हत्या केली व घरे जाळली.

**३. बैठका, सल्लामसलत आणि चर्चा:**

प्रत्येक आदिवासी संघर्षामागे आदिवासी समाजातील ज्येष्ठ लोकांची संमती असते. संघर्ष नेहमीच समाजाचे नेते, वडीलधाऱ्या लोकांशी सल्लामसलत केल्यानंतर सुरू केला गेला. समाज मेळावा, गुप्त बैठक, पंचायत चर्चा इ. संघर्ष सुरू करण्यापूर्वी अपरिहार्यपणे केल्या जाणाऱ्या काही गोष्टी आहेत.

**४. नेता किंवा नेत्यांच्या प्रभावाखाली संघर्ष:**

भारतातील आदिवासी संघर्ष एखाद्या नेत्याने किंवा नेत्यांनी संघटीत केल्याची उदाहरणे सापडतात. काही नेत्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी संघर्षाची मोहीम राबवली गेली. जे नेते समाजात प्रभावी होते त्यांच्या नेतृत्वाखाली हा संघर्ष केला गेला. ज्या नेत्याकडे आधुनिक काळासारखा नेता बनवण्याची योजना नव्हती परंतू परिस्थितीची जाणीव, आंतरिक इच्छा व अंतप्रेरणा होती. भारतातील अनेक आदिवासी संघर्ष त्याच्या नेत्याच्या नावाने ओळखले जातात. आपण अनेक नेत्यांचे विचारांचा अभ्यास करू शकतो ज्यांनी संघर्ष यशस्वी करण्याची जबाबदारी घेतली.

**५. संघर्ष फक्त मूळ क्षेत्रापुरता मर्यादित नव्हता:**

भारताच्या आदिवासी संघर्षाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे व्यापक क्षेत्र होय. ब्रिटीश राजवटीत आतापर्यंत नोंदवलेल्या कोणत्याही संघर्षाचे हे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. कारण संघर्ष क्षेत्राचे नसलेले बंधन त्यांच्या सर्व बंधुत्वाच्या भावनांपेक्षा त्यांची एकता आणि सहकार्य दर्शवते. जंगलातील आगीप्रमाणे बंड पसरल्याच्या घटनांनी आदिवासी संघर्षाचा इतिहास भरलेला आहे. गुजरातच्या देवी चळवळीचे उदाहरण घ्या ज्याने दक्षिण गुजरातमधील सर्व आदिवासी भागांना वेठीस धरले.

**६. मजबूत समाजाची भावना:**

इतर संघर्षांप्रमाणे आदिवासी संघर्ष प्रचंड समाजिक ऐक्याची भावना दर्शवतो. जल, जंगल आणि जमीनीवर त्यांचे वडिलोपार्जित अधिकार टिकवण्यासाठी त्यांनी लढा दिला. ते त्यांच्या नैतिक मूल्यांसाठी देखील संघर्ष करतात. म्हणूनच त्यांनी जमीनदार, सावकार, सरंजामी सरदारांचा विरोध केला, कारण आदिवासी त्यांना त्यांच्या सांस्कृतिक रूढी

परंपरांचा शत्रू मानतात. त्यांची अशी भावना होती की या लोकांमुळेच त्यांच्या जीवनात सर्व प्रकारचे दुःख येत आहे.

## १२.४ स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी संघर्षाची कारणे

स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासींच्या लढ्याला कोणतेही एकमेव कारण जबाबदार नाही. आदिवासी संघर्षाची कारणे दोन प्रकारात विभागली जाऊ शकतात. एक बाह्य आणि दुसरी म्हणजे अंतर्गत करणे होत. आदिवासी संघर्षाच्या कारणांवर चर्चा करण्यापूर्वी अनेक पिढ्यांपासून अलिप्त राहणाऱ्या जमातींच्या विशेष सांस्कृतिक पार्श्वभूमीबद्दल लक्षात घेतले पाहिजे. आदिवासी केवळ अशा वातावरणातच राहत नव्हते तर त्यांनी स्वेच्छेने आपले अलिप्त जीवन कायम ठेवले होते. परिणामी, बाह्य हस्तक्षेपामुळे ज्या आदिवासींना मुक्तजीवन जगण्याची सवय होती त्यांना गुदमरल्यासारखे वातावरण निर्माण झाले. यात काही शंका नाही की आदिवासींच्या संघर्षासाठी त्यांचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी असलेली निष्ठा ही ब्रिटिशांनी केलेल्या छळांइतकीच जबाबदार होती. आदिवासींच्या रक्तातील वीरता त्यांच्या विद्रोहाचा एक घटक असू शकतो. आदिवासींच्या या अंतर्निहित आवेगांना आदिवासी संघर्षाची अंतर्गत कारणे मानली जातात.

तथापि, आदिवासी संघर्षाच्या घटनांसाठी ब्रिटिशांची आर्थिक धोरणे ही सर्वात मोठा घटक म्हणून जबाबदार होती. हे लक्षात ठेवले पाहिजे की ब्रिटिश प्रशासनाच्या हद्दीत आदिवासी भागांचे विलीनीकरण प्रामुख्याने दोन कारणांमुळे सुरू झाले आहे. एक म्हणजे वन आणि खनिज स्त्रोतांसारख्या आदिवासी भागात नैसर्गिक संसाधनांची विपुलता हे आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा आणि झारखंड या आदिवासी पट्ट्यांना त्यांच्या नैसर्गिक संसाधनांसाठी लक्ष्य केले गेले.  दुसरे कारण आदिवासी भागांचे धोरणात्मक स्थान. ब्रिटीश वसाहतीचा सर्वदूरपर्यंत विस्तार करण्यासाठी ईशान्य भारताचे स्थान राजनैतिकदृष्ट्या महत्त्वाचे होते. त्याचप्रमाणे झारखंडमध्ये मराठा आंदोलनावर लक्ष ठेवण्याच्या गरजेमुळे ब्रिटिश हस्तक्षेप झाला. जमीन परकेपणा, स्थलांतर आणि बाहेरील लोकांचा बंदोबस्त, सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक शोषण, ही इतर कारणे आहेत ज्यामुळे आदिवासी बंड पेटले.

## १२.५ स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रमुख आदिवासी उठाव

आदिवासी संघर्ष हा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचा प्रणेता म्हणून ओळखला जातो. भारतीय इतिहासात आदिवासींच्या संघर्षाला विशेष स्थान आहे, ते ब्रिटिश राजवटीविरोधातील पहिले प्रतिकार होते. आदिवासी संघर्षाने प्रचंड शौर्य, एकता, स्वाभिमान आणि धैर्य दाखवले. जरी संघर्ष कधीच अधिक काळ चालू राहिला नाही आणि अन्यायकारक मार्गाने अल्पावधीत दडपला गेला गेला तरी ब्रिटिश सरकारला या उठावांनी जोरदार संदेश दिला की आदिवासी साधे आणि सामान्य जीवन जगत असले तरी ते शूर आणि पराक्रमी आहेत.

२० व्या शतकात झालेल्या प्रमुख आदिवासी संघर्षांचे थोडक्यात वर्णन येथे आले आहे, तथापि, ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीपासून आदिवासी विद्रोह नोंदवले गेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या संघर्षांचा हेतू जल, जंगल आणि जमीनीवरील हक्क, स्वतंत्र राज्य आणि सामाजिक व धार्मिक सुधारणा सुरक्षित करण्यापर्यंत मर्यादित होते.

**१. भूमकाल आंदोलन:**

छत्तीसगढ राज्यात आदिवासी ब्रिटीश राजवटीच्या प्रारंभापासून त्यांच्या सांस्कृतिक, रूढी आणि सामाजिक व्यवस्थेवर बाहेरील लोकांच्या हल्ल्यामुळे असमाधानी होते. त्यांनी सातत्याने विरोध केला आणि वेळोवेळी जमीनदार, सावकार आणि ब्रिटिश अधिकारी यांच्याविरुद्ध बंड केले. भूमकाल चळवळ ही बस्तरच्या आदिवासी बंडांची सुरूवात आहे. एकूण ४६ प्रशासकीय आदिवासी विभाग (परगना) यांनी संयुक्तपणे १९१० साली बंड केले होते. हे बंड त्यांच्या जमिनी, संस्कृती आणि समाजाच्या संरक्षणासाठी सुरू करण्यात आले होते.

**२. बिरसा मुंडा आंदोलन:**

भारताच्या इतिहासातील सर्व आदिवासी चळवळींमध्ये बिरसा मुंडा चळवळ अपवादात्मक आहे कारण ही चळवळ ब्रिटिश राजवटीविरुद्ध उठाव तसेच सामाजिक आणि धार्मिक सुधारणांसाठी ओळखली जाते. बिरसा मुंडा नावाच्या प्रभावी नेत्याच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी बंड केले. मुंडा जमातीतील सामाजिक आणि धार्मिक सुधारणांमध्ये अभूतपूर्व योगदानामुळे ते नंतर भगवान बिरसा म्हणून प्रसिद्ध झाले. सन १८९५ मध्ये मुंडा समुदायाने जमिनी बळकावणे आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवला जो १९०१ पर्यंत चालू होता. या भागात बाहेरील लोकांनी केलेल्या स्थलांतरामुळे मुंडाची पारंपारिक जमीन व्यवस्था संकटात सापडली होती. त्यांच्या भागात ते प्रथम नागरिक होते परंतु हळूहळू जमीनदार, व्यापारी, सावकार इत्यादींच्या हाती त्यांची जमीन जाऊन त्यांनी जमिनीची मालकी गमावली.

**३. ताना भगत चळवळ:**

देश चळवळीच्या आगीत होरपळून निघत असताना झारखंड राज्यात हे आंदोलन झाले. ही चळवळ मुळात एक धार्मिक सुधारणा होती जी १९२१ मध्ये ओरांव या आदिवसी जमातीतील संत जत्रा भगत आणि तुरिया भगत यांनी सुरू केली होती. ही चळवळ ओरांव जमातीतील धार्मिक नेत्यांच्या पुनरुज्जीवनवादी विचारांनी प्रेरित होती ज्यांनी त्यांच्या समाजातील काही वाईट प्रथांमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. ताना भगत चळवळ गांधीवादी तत्त्वज्ञानावर मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली होती म्हणून त्यांच्या उपदेशात ते अहिंसा, शाकाहारी अन्न, खादी कापड, त्यांच्या अंगणात तुळशी लावण्यावर भर देतात तर मद्यपान वर्ज्य मानतात. आज कोणीही त्यांना त्यांच्या गांधी टोपी आणि पांढऱ्या सुती वेशामुळे ओळखू शकतो. ही चळवळ भारताच्या राष्ट्रीय चळवळीशी देखील संबंधित आहे.

**४. देवी चळवळ:**

१९२२ मध्ये गुजरातमध्ये ही चळवळ झाली. असे मानले जात होते की देवी सालाबाईंना त्यांच्या लोकांनी दारू, मांस खाणे टाळावे आणि घरापासून शरीरापर्यंत सर्वकाही स्वच्छ

ठेवावे असे वाटते. ही चळवळ मुळात मद्य (दारू) व्यापारी व सावकारांच्या विरोधात संघटीत झाली होती. जी आदिवासींना त्यांच्या शोषणाची कारणे वाटली. ही चळवळ दक्षिण गुजरातच्या सर्व आदिवासी भागात काही महिन्यांत मोठ्या प्रमाणावर पसरली होती. गेली.

**आपली प्रगती तपासा:**

१. स्वातंत्र्यपूर्व भारतातील आदिवासींच्या संघर्षाची ठळक वैशिष्ट्ये सांगा.

## १२.६ स्वातंत्रोत्तर काळातील आदिवासी संघर्षाचे स्वरूप

सामाजिक-आर्थिक असमानतेसह जातीय विविधता हे नव्याने स्थापन झालेल्या भारत सरकारसाठी एक मोठे कोडे होते. आदिवासींच्या बाबतीत हा केवळ सामाजिक-आर्थिक उन्नतीचा प्रश्न नव्हता तर मुख्य समस्या असलेल्या त्यांच्या जातीय गुणधर्मांमध्ये कमीत कमी अडथळा न येता मुख्य प्रवाहातील लोकांशी त्यांच्या समाकलनाचे उत्तर मिळवणे ही खरी समस्या आहे. अशा प्रकारे जरी आदिवासींचा विकास सरकारी धोरणांमध्ये सर्वात वरती असला तरीही, त्यांच्या एकात्मतेचा प्रश्न दोन तत्त्वांमध्ये विभागला गेला होता, एक म्हणजे उर्वरित भारतीय लोकसंख्येपासून हा समाज संपूर्णपणे अलग होता. जसे संग्रहालयात दाखवलेला वारसा. दुसरे म्हणजे त्यांना भारतीय लोकसंख्येत मिसळणे. परिणामी दोन्ही एकत्रीकरण धोरणांचे नुकसान झाले. शेवटी त्यांना एकत्र करण्यासाठी एक मध्यम मार्ग स्वीकारला गेला ज्यात जमातींना लोकसंख्येमध्ये मिसळण्याची परवानगी देण्यात आली त्याच वेळी त्यांचे सांस्कृतिक गुणधर्म टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. एकत्रीकरण धोरणांव्यतिरिक्त, आदिवासी उपयोजना, पंचवार्षिक योजनेमध्ये सुरू केलेले विविध विकासात्मक उपाय यांसारखे अनेक विकास कार्यक्रम. संविधानाचा भाग १० विशेषतः आदिवासी प्रशासनाला विशेष अधिकार प्रदान करतो. घटनेच्या भाग १० मध्ये अनुसूचित ५ आणि अनुसूचित ६ साठी तरतुदी आहेत.

अशा प्रकारे, आदिवासींच्या समस्या आणि प्रश्न प्राधान्याने घेतल्या जातात. त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी एक सुनियोजित कार्यक्रम तयार करण्यात आला होता, तरीही स्वातंत्रोत्तर काळात आदिवासींच्या संघर्षाची उदाहरणे सापडतात. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्रोत्तर काळातील संघर्षाचे स्वरूप, कारणे आणि आचरण यात आपण थोडा फरक पाहू शकतो. स्वातंत्रोत्तर काळातील आदिवासींच्या संघर्षाच्या स्वरूपावर आपण एक नजर टाकू जे खालीलप्रमाणे आहे.

**१. संघटित आणि सुनियोजित:**

स्वातंत्रोत्तर काळातील आदिवासी संघर्ष पद्धतशीरपणे रचलेले आहेत. संघर्ष व्यवस्थित आणि नियोजनबद्ध आहेत. त्यांनी त्यांच्या समस्या संघटनांखाली तर कधी राजकीय पक्षांच्या अंतर्गत मांडल्या आहेत. त्यांना त्यांचे हक्क आणि निषेधाची पद्धत याची जाणीव आहे. त्यांच्या संघटनांना त्यांच्या लोकांचा पूर्ण पाठिंबा मिळतो. एकतेची आणि बंधुत्वाची महान भावना निषेधाच्या वेळी आणि चळवळींच्या प्रसंगी दिसून येते.

**२. संघर्षाचा दीर्घ कालावधी:**

आदिवासींचा संघर्ष अनेक वर्षे चालला. हा संघर्ष हिंसा, तीव्र लढा किंवा गृहयुद्धाच्या माध्यमातून नव्हे तर उच्च अधिकाऱ्यांना आपले म्हणणे पटवून देण्याच्या उद्देशाने प्रेरित आहे. त्यामुळे आदिवासींचा संघर्ष वर्षानुवर्षे शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने सुरू आहे.

**३. निषेधाचा हिंसा आणि लोकशाही मार्ग:**

मागणी पूर्ण करण्याच्या प्रयत्नासाठी, आदिवासींनी हिंसा आणि शांतता या दोन्ही मार्गांचा अवलंब केला. संघर्ष आणि दंगलींच्या संदर्भात संघर्ष हा अपवादात्मक नाही परंतु अतिरेकी सहभागींद्वारे त्या घटना उत्स्फूर्तपणे घडतात. कधी कधी काही गट संघर्ष अधिक पेटवून देण्यासाठी हिंसेचा मार्ग निवडतात. तथापि, बहुतेक प्रकरणांमध्ये, आदिवासी संघर्ष शांततापूर्ण विरोध, दबाव गट इत्यादी वैध मार्गांनी केलेला दिसतो.

**४. मजबूत संघटना / पक्ष/ गट तयार करणे:**

हे आदिवासींच्या संघर्षाचे सर्वात लक्षणीय स्वरूप आहे. एकोणिसाव्या शतकात, एका राजकीय पक्षात निघालेल्या काही संघटनांच्या अंतर्गत आदिवासी संघर्ष झाला. हे राजकीय पक्ष, प्रादेशिक पक्ष म्हणून यशस्वीरित्या बाहेर पडले आहेत आणि लोकसभेत व राज्य विधानसभेतही स्थान मिळवले आहे. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा या चळवळीतून उदयास आलेल्या आदिवासी पक्षाने काँग्रेस पक्षाच्या युतीसह विद्यमान सरकार स्थापन केले आहे. अशी उदाहरणे आपण ईशान्य भारतातही पाहू शकतो.

**५. आदिवासींच्या संघर्षावर राजकारण:**

आदिवासींच्या संघर्षाचा आणखी एक भाग राजकीय संघटनेच्या पार्श्वभूमीवर दिसून येतो ज्याला आदिवासींच्या प्रश्नांवर राजकारण असे म्हटले जाऊ शकते. आदिवासींच्या लढ्याला जनतेचा पाठिंबा आहे. हे पैसे, शक्ती आणि नेत्यांना देखील एकत्रित करते जे मागणीवर राजी करण्यासाठी उच्च अधिकाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात दबाव निर्माण करतात. त्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष निवडणुकीच्या वेळी त्यांची मर्जी मिळवण्यासाठी आदिवासींच्या मागण्यांचे समर्थन करतात. अनेक वेळा ते उघडपणे समर्थन करतात आणि निषेधात सामील होतात. आदिवासी संघर्षातील या प्रकारच्या क्रियाकलापांमुळे आदिवासींमध्ये एकता आणि आत्मविश्वास बळकट होतो. परंतु त्याच वेळी ते त्यांना त्यांच्या मुख्य उद्दिष्टापासून विचलित करते.

## १२.७ स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी संघर्षाची कारणे

घटनात्मक सुरक्षा, केंद्र आणि राज्य सरकारची कल्याणकारी धोरणे असूनही आदिवासी विकासाची वाढ मंद आहे. १९४७ नंतर शिक्षण, रोजगार, मध्यमवर्गाचा उदय, जागरूकता इत्यादी क्षेत्रात काही सकारात्मक बदल दिसून येत आहेत. परंतु आदिवासींमध्ये हक्क, ओळख, शोषण, सामाजिक न्याय इत्यादी कारणांमुळे असमाधान निर्माण झाले आहे.

आदिवासी राज्याची मागणी हे भारतीय स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या संघर्षाचे प्रमुख कारण होते. भारताच्या एकीकरणाच्या प्रक्रियेदरम्यान अनेक आदिवासी भागांना आदिवासी वांशिकतेशिवाय वाटप केले आहे. परिणामी, आदिवासी बहुल क्षेत्रे बिगर आदिवासी बहुल भागांच्या प्रभावाखाली आली आहेत. अविभाजित बिहारचा छोटानागपूर प्रदेश हे राज्याच्या अविचारी विभाजनाचे एक चांगले उदाहरण आहे. ज्यात सांस्कृतिक भावनांचा विचार केला गेला नाही. ईशान्य भारतातील बहुतेक आदिवासी संघर्ष स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी सुरू झाले आहेत. नागा चळवळ, मिझोराम चळवळ आणि बोडो चळवळ ही त्यांची काही उदाहरणे आहेत.

आदिवासी भागात बाहेरील लोकसंख्येचा ओघ यामुळे त्यांच्या वडिलोपार्जित जमिनीवर आदिवासींची मालकी कमी करणे, आदिवासी भागात आदिवासी लोकसंख्येपेक्षा बिगर आदिवासी लोकसंख्येत वाढ होणे. त्यांची भाषा आणि संस्कृतीला धोका निर्माण करणे यांचा समावेश आहे. आदिवासी नेहमीच त्यांच्या ओळख, अधिकार आणि संस्कृतीसाठी जागरूक असतात म्हणून त्यांनी वेळोवेळी या समस्यांसाठी आवाज उठवला आहे. काही प्रकरणांमध्ये मंद विकास, निराशा, अन्याय आणि शोषण ही आदिवासींच्या संघर्षाची कारणे बनली.

औद्योगिकीकरण, वन आणि खनिज संसाधनांचे शोषण, धरणे आणि वीज प्रकल्पांच्या स्वरूपात विकासाची प्रक्रिया आदिवासींमध्ये आंदोलन निर्माण करण्यासाठी तेवढीच जबाबदार आहे.

## १२.८ स्वातंत्र्योत्तर काळातील प्रमुख आदिवासी संघर्ष

स्वातंत्र्यानंतर आदिवासी संघर्षाने सुरुवातीच्या काही मुद्द्यांवर आधारित शोषण, जमीन व जंगल हक्क, विकास आराखड्यात अपयश आणि त्यात काही नवीन मुद्यांचा जसे स्वतंत्र राज्य, सामाजिक सांस्कृतिक घटकांचे संवर्धन इत्यादींचा समावेश केला आहे. स्वतंत्र भारतातील काही मोठे आदिवासी संघर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

**१. ईशान्य भारतातील अलिप्ततावादी चळवळी:**
ईशान्य भारत हे रंगीबेरंगी वांशिक गटांचे माहेरघर आहे. स्वातंत्र्यानंतर वांशिक गट भारताच्या आत किंवा बाहेर स्वतंत्र राज्यासाठी परस्परविरोधी परिस्थितीमध्ये एकत्र आले. अस्मितेची भावना, बिगर आदिवासी लोकांशी विरोधी संबंध, राजकीय सत्ता आणि संसाधनांवर त्यांचा हक्क बहाल करण्यासाठी वेगळ्या जमिनीची मागणी. या भावनांनी ईशान्य भारतातील अलिप्ततावादी चळवळीला जन्म दिला. नागालँड, मिझोराम, मेघालय आणि अरुणाचल प्रदेश राज्यांची निर्मिती ही फुटीरतावादी चळवळीचा परिणाम आहे.

या मालिकेत बोडो आंदोलन अजूनही निकालाची वाट पाहत आहे. ब्रिटीश राजवटीच्या वेळी बोडो वडिलोपार्जित भौगोलिक क्षेत्र आसामी हद्दीत घेतले गेले. ज्यांनी बोडो जमातीला कधीच त्यांचा भाग मानले नाही. म्हणून ते ब्रिटिश राजवटीपासून स्वतंत्र बोडो राज्य

मिळवण्यासाठी संघर्ष करत आहेत. बोडो जमात मजबूत संघटनांच्या मार्फत एकत्रितपणे स्वतंत्र राज्याची मागणी मांडत आहे. पहिली संघटना १९३३ साली ऑल आसाम प्लेन्स ट्रायबल लीग या नावाने तयार झाली. यानंतर बोडो साहित्य सभा (१९५२), प्लेन्स ट्रायबल कौन्सिल ऑफ आसाम आणि ऑल बोडो स्टुडंट्स युनियन (१९६७) यासारख्या भारत सरकारवर दबाव निर्माण करण्यासाठी इतर संघटना स्थापन करण्यात आल्या. या सर्व संघटना बोडो जमातीच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी निर्धार दर्शवतात. ऑल बोडो स्टुडंट्स युनियन हा अतिशय सक्रिय गट आहे ज्याने त्यांच्या स्वतंत्र राज्यासाठी राजकीय मंचावर लढण्यासाठी बोडो लोक कृती समिती नावाचा राजकीय पक्ष स्थापन केला. मात्र स्वतंत्र राज्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही व अजूनही आंदोलन सुरू आहे. १९९३ मध्ये बोडो लँड ऑटोनॉमस कौन्सिलच्या स्थापनेमुळे या चळवळीला यश मिळाले.

**२. झारखंड चळवळ:**

आदिवासींच्या संघर्षांमध्ये झारखंड चळवळ सर्वांत दीर्घ आहे. आदिवासी भागातील शिक्षण, खनिज संसाधनांचा असमान नफा वाटप, शोषण, खाणकाम, उद्योग आणि विकासासाठी आदिवासींच्या जमिनीचे अधिग्रहण व झारखंडच्या जमाती आणि गैर जमाती यांच्यातील विरोधी संबंध यासारख्या चळवळीला प्रज्वलित करणारे विविध घटक आहेत. बिहारमध्ये १८५६ साली वेगळ्या झारखंड राज्याची मागणी सुरू झाली. त्या वेळी वेगळ्या आदिवासी राज्याचे क्षेत्र सध्याच्या झारखंड राज्यापेक्षा मोठे होते कारण त्याने ओरिसा, छत्तीसगड, पश्चिम बंगाल आणि बिहार या आदिवासी भागांना एकत्र केले होते. झारखंड चळवळीने आदिवासी शिक्षण समाजात राजकीय अभिमुखता दिली. हे आश्चर्यकारक नाही की आज झारखंड चळवळीच्या काळातील अनेक आदिवासी राजकीय पक्ष विधानसभांमध्ये सक्रियपणे भाग घेत आहेत. जुने बिहार राज्याचे विभाजन झाल्यानंतर वेगळ्या राज्याची मान्यता मिळऊन वर्ष २००० मध्ये झारखंड चळवळ संपुष्टात आली.

**३. डोंगारिया खोंड चळवळ:**

आदिवासींचा निसर्गाशी सहजीवी आणि पवित्र संबंध आहे. डोंगारिया खोंड चळवळ निसर्गाशी त्यांचे जुने नाते जतन करण्याच्या हेतूने आयोजित केली गेली. ओडिसाची खोंड जमाती नियमगिरी पर्वत रांगेच्या पायथ्याशी वसलेली आहे आणि त्यातील एक टेकडी त्यांच्या देवाचे नाव, नियम, राजाचे निवासस्थान म्हणून ओळखली जाते. या पर्वताला खाण कंपन्यांकडून बॉक्साइट जमा करण्यासाठी लक्ष्य केले जात आहे. ७ जून २००३ रोजी जे प्रस्ताव ओडिशा सरकार व वेदांता कंपनी यांच्यात मंजूर करण्यात आले होते त्यानुसार बॉक्साईट खाण वेदांता कंपनीला मंजूर करण्यात आली होती.

डोंगारिया खोंडने विकासात्मक पाऊल स्वीकारले नाही कारण त्यांच्या मते श्रध्येनुसार झाडे तोडणे आणि कोणत्याही प्रकारे निसर्गाचा नाश करणे निषिद्ध आहे. व ते कठोरपणे प्रतिबंधित आहे. परिणामी, डोंगरीया खोंडने या निर्णयाला तीव्र विरोध केला आणि आंदोलन सुरू केले. सात वर्षांपासून आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय संघटनेसह खोंड जमातीने वेदांतने प्रस्ताव मागे घेईपर्यंत आंदोलन केले.

**आपली प्रगती तपासा:**

१. स्वतंत्र भारताने त्यांच्या कल्याणासाठी अनेक प्रयत्न केले, तरीही आदिवासी संघर्ष का झाले?

## १२.९ सारांश

आदिवासी त्यांच्या हक्क, संस्कृती, चालीरीती आणि स्वातंत्र्यासाठी नेहमीच लढताना दिसतात. आदिवासी संघर्षाच्या घटनांमधून तीन गोष्टी बाहेर येतात.

१. दोन्ही काळात संघर्षाचे काही हेतू बहुतांशी सारखे असतात आणि काही अपवादात्मक उद्दिष्टे वेळोवेळी बदलल्यामुळे प्रेरित होतात. त्यामुळे त्यांच्या मानसिकतेत कोणताही आमूलाग्र बदल होताना दिसत नाही.

२. आदिवासी संघर्ष आदिवासी समुदायांमध्ये एकता, बंधुता आणि वांशिकतेच्या उपस्थितीची पुष्टी करतो.

३. मर्यादित साधनांसह आदिवासींनी ब्रिटीशांना मोठे आव्हान दिले. त्यांच्या संघर्षाच्या विरातापूर्ण कामगिरीमुळे भारताच्या इतिहासात आदिवासींच्या संघर्षाला विशेष स्थान आहे.

## १२.१० प्रश्न

१. आदिवासींच्या लढ्याला भारताची पहिली स्वातंत्र्य चळवळ का म्हणतात. स्पष्ट करा?

२. स्वातंत्र्यानंतर ईशान्य भारताचा भाग अलिप्ततावादी चळवळीत का उतरला याची कारणमीमांसा करा?

३. ब्रिटीश वसाहतीच्या काळात भारतातील आदिवासी संघर्षाची मुख्य कारणे स्पष्ट करा?

४. धार्मिक आणि सामाजिक सुधारणांमुळे सुरू झालेल्या भारताच्या आदिवासी संघर्षाबद्दल वर्णन करा.

## १२.११ संदर्भ

१. घनश्याम शहा, भारतातील सामाजिक हालचाली, सेज, नवी दिल्ली, २००४.

२. ए. आर. देसाई (संपादित), युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, १९८३ स्वातंत्र्यानंतर भारतातील कृषी संघर्ष, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, नवी दिल्ली, १९९८.

३. एस. के. सिंह (संपादित), आदिवासी भारतातील प्राचीनता ते आधुनिकता: भारतातील आदिवासी चालवळी, खंड-४, इंटर इंडिया प्रकाशन, १९९८.

४. रणजित गुहा, औपनिवेशिक भारतातील शेतकरी विद्रोहाचे प्राथमिक पैलू, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, १९८३.

५. ए.आर. देसाई, (संपादित), भारतातील शेतकरी संघर्ष, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, बॉम्बे, १९७९.

*****